लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालामधील अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.२), जलसंपदा विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५) यावरील

सेहेचाळीसावा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक नोव्हेंबर, २०१८ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
नोव्हेंबर, २०१८

एचबी १४८७—कव्हर

लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालामधील अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.२), जलसंपदा विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३, ३.४, व ३.५) यावरील

सेहेचाळीसावा अहवाल

एचबी १४८७–१

लोकलेखा समिती

२०१७-२०१८

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

*(२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

**(२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

***(२४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

निमंत्रित

****(२६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM).

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी.

* **श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची पुन्हा दिनांक ५ सप्टेंबर २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

** **श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

*** **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे जागा रिक्त झाली.**

**** **श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी निमंत्रित समिती सदस्य म्हणून दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी नामनियुक्ती केली होती. दिनांक २७ जुलै २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांची निमंत्रित समिती सदस्यत्वाची नियुक्ती संपुष्टात आली होती. ते विधानपरिषद सदस्य म्हणून पुन्हा निवडून आल्यामुळे मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची दिनांक ५ सप्टेंबर २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून रिक्त जागेवर नामनियुक्ती केली.**

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालामधील अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.२), जलसंपदा विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५) यावर विचार करून लोकलेखा समितीचा सेहेचाळीसावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक २०, २१ फेब्रुवारी, दिनांक २४ एप्रिल, दिनांक ३० मे, दिनांक ३१ जुलै, दिनांक ७ ऑगस्ट, दिनांक ११ व २९ ऑक्टोबर आणि दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग तसेच प्रधान सचिव,जलसंपदा विभाग व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या बैठकीत जलसंपदा विभागासंदर्भात व दिनांक १४ व १५ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागासंदर्भात तयार केलेला प्रारूप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारूप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन,
मुंबई, नागपूर.
दिनांक : १५ नोव्हेंबर २०१८.

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

अनुक्रमणिका

अनुक्रमांक (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	**(पाच)**
(१)	**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**	१
	(परिच्छेद क्र. ३.२)	१
(२)	**जलसंपदा विभाग**	४४
	(परिच्छेद क्र. ३.३)	४४
	(परिच्छेद क्र. ३.४)	४८
	(परिच्छेद क्र. ३.५)	५०

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ "किमान आधारभूत किंमती अंतर्गत धानाचे प्रापण आणि सडीकरण" यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

प्रस्तावना :-

१.१ महाराष्ट्रात , राज्य शासनाच्या दोन अभिकरणांव्दारे SGAs बिगर आदिवासी क्षेत्रात, महाराष्ट्र राज्य पणन महासंघ (महासंघ) आणि आदिवासी क्षेत्रात, महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळाव्दारे (TDC), केंद्र शासनाची किमान आधारभूत किंमतीला धान प्रापण योजना अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाद्वारे राबविली जात आहे. SGAs त्यांच्या प्रापण केंद्रावर, केंद्र शासनाने घोषित केलेल्या MSP मध्ये दरवर्षी शेतकऱ्यांकडून खरीप पणन हंगामासाठी KMS धान खरेदी करतात, अशा पद्धतीने खरेदी केलेले धान SGAsस्थानिक खाजगी भात गिरणीधारकांकडून स्वच्छ (milled) करून घेते आणि अशा प्रकारे मिळालेला ग्राहकपयोगी तांदूळ (CMR) FCIकडे जी केंद्र शासनाची नोडल एजेन्सी आहे, निर्धारित सार्वजनिक वितरण प्रणाली TPDS अंतर्गत उपयोगासाठी जमा केला जातो. केंद्र शासनाने CMRसाठी महाराष्ट्र शासनाला देण्याचे दर सुद्धा निश्चित केले आहेत. ज्यामध्ये शेतकऱ्यांना द्यावयाची MSPआणि इतर प्रासंगिक शुल्कही सम्मिलीत असतात. वखारीपासून गिरणीपर्यंत धानाच्या आणि गिरणी पासून FCIच्या वखारीपर्यंत CMRS च्या वाहतुकीचा खर्चही केंद्र शासनाकडून गिरणीधारकाला महाराष्ट्र शासनाव्दारे देय असतो.

लेखापरीक्षेने अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागातील (विभाग) आणि गोदिया, ठाणे, रायगड आणि भंडारा या चार जिल्ह्यांतील दोन SGAs कडून KMS २००९-१५ दरम्यानचा धान प्रापणाचा आणि KMS २००९-१४ (४४) च्या सडणीचा समावेश असलेल्या योजनेच्या अंमलबजावणीची चाचणी तपासणी केली. या चार जिल्ह्यांतील दोन SGAs च्या ५० प्रापण केंद्रातील दस्ताऐवजांचीही चाचणी तपासणी करण्यात आली होती. KMS २००९-१५ दरम्यान, MSP योजनेअंतर्गत राज्यात १५०.९८ लक्ष क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली ज्यावर रु. १९१२.९० कोटी खर्च केला गेला आणि जुलै, २०१५ पर्यंत ७१.३२ लक्ष क्विं. CMR FCIला पोचता केला गेला होता/ पाठविला होता.

परिच्छेद क्र. ३. २. १ लेखापरिक्षा निष्कर्ष

भारतीय अन्न महामंडळाकडील थकबाकी

१.२ MSP ही केंद्र शासनाची योजना असल्यामुळे ही योजना राबविण्यासाठी राज्य शासनाकडून करण्यात आलेल्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती केंद्र शासन FCI द्वारे करते. सुरूवातीला विभाग, MSP ला खरेदी केलेल्या धानासाठी SGAs ना विभागाचे वित्तीय सल्लागार आणि उप सचिव यांच्या नावावर असलेल्या स्वीय प्रपंजी लेख्यातून रक्कम प्रदान करते. CMR, FCI ला पोहचल्यावर SGAs, विसउसद्वारे CMR च्या मुल्याची मागणी FCI कडे सादर करते. FCI कडून प्रतिपूर्ती मिळाल्यानंतर स्वीय प्रपंजी लेख्यात पुन्हा भरणा केला जातो आणि SGAs ना दुसऱ्या प्रासंगिक शुल्कांसाठी रक्कम प्रदान केली जाते.

लेखापरिक्षेला असे आढळून आले की, KMS २००९ ते २०१५ च्या खरीप पणन हंगामात जो ग्राहकोपयोगी तांदुळ FCI ला पोहचविला होता त्याबाबतची रु. ५१.५१ कोटीची प्रतिपूर्ती करणे प्रलंबित होती.

धान खरेदीसाठी केलेला खर्च, FCI ला पोहचविलेला CMR आणि FCI कडे प्रलंबित असलेले दावे.

हंगाम	खरेदी धान (क्विं.)	FCI ला पोहचविलेले धान	FCI ला पाठविलेल्या प्रतीपूर्ती दाव्याची रक्कम (कोटीत)	FCI कडून पूर्ण करण्यात आलेले प्रतिपूर्ती दावे	जुलै २०१५ ला FCI कडे प्रलंबित असलेले दावे
२००९-१०	२३.३१	१२.५१	२२४.७६	२०६.६३	१८.१३
२०१०-११	१९.४०	७.९८	१४२.८३	१४१.७२	१.११
२०११-१२	२६	१६.१०	३११.४७	३००.४७	११.००
२०१२-१३	२८.६२	१५.२६	३३७.५५	३३३.६०	३.९५
२०१३-१४	२३.९९	११.७१	३१५.०५	३१२.९७	२.०८
२०१४-१५ जुलै २०१५ पर्यंत	२९.६६	७.७६	१८४.५४	१६९.३०	१५.२४
एकूण	**१५०.९८**	**७१. ३२**	**१५१६. २०**	**१४६४. ६९**	**५१. ५१**

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की एकूण प्रलंबित दाव्यांपैकी (रु. ५१.५१ कोटी) ५८.७० टक्क्यांपेक्षा (रु. ३०.२४ कोटी) जास्त दावे तीन वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित होते. (२००९-१२) FCI कडून दावे पूर्ण न करण्याची कारणे विभागाने सादर केली नव्हती.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

१.३ खरीप पणन हंगाम २००९-१० ते २०१४-१५ पर्यंत जुलै, २०१५ अखेर भारतीय खादय निगमकडून रु. ५१.५१ कोटी रक्कम येणे प्रलंबित होती. सदयस्थितीत दिनांक २१ सप्टेंबर २०१७ रोजी रु. ३९.०३ कोटी इतकी रक्कम भा. खा. नी कडून प्राप्त झालेली असून रक्कम रु. १२.४७ कोटी प्राप्त होणे प्रलंबित आहे.

हंगाम २००९-१० ते २०११-१२ मधील धानास भरडाईसाठी दिनांक ३१ डिसेंबर २०१३ पर्यंत शेवटची मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यामुळे भरडाईस विलंब झाल्यामुळे CMR जमा करून पावत्या या कार्यालयास प्राप्त होण्यास विलंबही झाला परिणामी प्रतीपुर्ती दावे तसेच प्रत्यक्ष प्रतीपुर्ती रक्कम प्राप्त करून घेण्यासही विलंब झालेला आहे.

२. तसेच प्रतिपुर्तीच्या काही दाव्यांमध्ये त्रुटी असल्यामुळे त्रुटींची पुर्तता करून ते भा. खा. नी. कडे सादर करण्यामध्ये मोठया प्रमाणात कालापव्यय झाल्यामुळे विलंब झालेला आहे. या रकमा जमा करणेबाबत वारंवार पत्राद्वारे, दुरध्वनीद्वारे, तसेच प्रत्यक्ष भा. खा. नी. तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयांमध्ये दौरेही काढण्यात आलेले होते. त्याद्वारे ३९.०३ कोटी प्राप्त करून घेण्यात आलेले आहे. उर्वरित रकमा लवकरात लवकर प्राप्त करून घेण्याकरीता संबंधित जि. पु. अ. कार्यालय तथा भा. खा. नी. यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

तरी कृपया सदरचा मुद्दा स्विकृत होणेस विनंती आहे.

सुधारित उत्तर-

१.४ दावे मंजूर करताना भारतीय खाद्य निगमने पुढीलप्रमाणे त्रुटी नमूद केलेल्या आहेत :–

१. लेखा परिक्षित विवरणाकरिता रक्कम राखून ठेवण्यात येत आहे.

२. बारदाना घसारापोटी व सी. एम. आर. मधील आर्द्रतेपोटी रक्कम रोखण्यात येत आहे.

परिच्छेद क्र. ३. २. २ स्विय प्रपंजी लेख्यात निधिची अनियमीत जमा.

१.५ केंद्र शासनाने, धानातील आर्द्रता कमी होण्यामुळे धानाच्या वजनात होणारी एक टक्का हानी ग्राह्य धरली आहे. याशिवाय, महाराष्ट्र शासनाने महासंघाला KMS २००९-१२ साठी अजून एक टक्का वजनाच्या हानीची सूट दिलेली आहे. परंतु असडीत धानाची विल्हेवाट लावण्याचे काम चालू असल्यामुळे हानी ग्राह्यतेची सुविधा TDC ला दिली गेली नव्हती.

MSP ही केंद्र शासनाची योजना असल्यामुळे, महाराष्ट्र शासनाने महासंघाला देऊ केलेली हानी दायित्वाची जबाबदारी ही अतिरिक्त एक टक्का देण्याइतकीच मर्यादित होती.

लेखापरिक्षेला असे आढळून आले की या योजनेखाली विभागाने २००९-१५ दरम्यान, अतिरिक्त शुष्क भत्त्यापोटी अंदाजित रु. ३.६२ कोटी ऐवजी रु. ३२३.१५ कोटींपैकी २००९-१५ दरम्यान रु. २६१.१३ कोटी मुक्त करून PLAमध्ये जमा केले होते यामुळे PLAमध्ये रु. २५७.५१ कोटी अतिरिक्त जमा करण्यात आले. ही कृती नियमबाह्यच होती असे नाही तर विभागाच्या सदोष अर्थसंकल्पाचेही निर्दशक होती. PLAमधील रु. २५७.५१ कोटीच्या अतिरिक्त जमेची सद्यःस्थिती विभागाकडून सादर करण्यात आली नव्हती. (डिसेंबर, २०१५).

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

१.६ २००९-१५ या कालावधीतील हंगाम २००९-१० ते २०११-१२ या कालावधीसाठी मार्केटिंग फेडरेशनला राज्या शासनाने १% तूट अनुज्ञेय केली होती. त्याची रु. ३.६२ कोटी ऐवजी ३२३.१५ कोटींची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येऊन २६१.१३ कोटी PLAमध्ये जमा केले आहेत. लेखापरिक्षणानुसार रु. २५७.५१ कोटीची अतिरिक्ता जमेची सद्यःस्थिती पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

तत्कालीन अर्थसंकल्पाचे अवलोकन केले असता रु. २५७.५१ कोटी अतिरिक्त निधी काढल्याचे दिसून येते. त्यापैकी प्रोत्साहनपर राशी तसेच, अतिरिक्त भरडाई दर मंजुरीबाबत मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेअंती निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार पुढीलप्रमाणे रकमा खर्च करण्यात आलेल्या आहेत.

- शासन निर्णय क्रमांक धानभ १२११/ प्रक्र. २३३/नापु. २९, दिनांक १७.१२.२०११ नुसार
  - (१) २००९-१० चा रु. १०/- प्र. क्विं. वाढीव भरडाई खर्च रु. ६२,३७,७२२/-
  - (२) हंगाम २०१०-११ चा रु. १०/- प्र. क्विं. वाढीव भरडाई खर्च रु. ६५,०३,३४८/-
  - (३) हंगाम २०११-१२ चा रु. १०/- प्र. क्विं. वाढीव भरडाई खर्च एकुण रु. २,४०,२९,२५०/-
- शासन निर्णय क्र. खरेदी १०१२/ प्रक्र. १५९/नापु. २९, दि. १८.२.२०१४ नुसार
  - (४) हंगाम २०१३-१४ चा रु. २००/- बोनस खर्च एकुण रु. ४२,३२,५२,२९२/-

- शासन निर्णय क्र. धानभ १२१३/ प्रक्र. १४०/नापु. २९, दि. ७.२.२०१४ नुसार

  (५) हंगाम २०१३-१४ चा रु. २०/- प्र. क्विं. वाढीव भरडाई खर्च रु. ४,०५,८२,४०७/-

- शासन निर्णय क्र. खरेदी १०१५/ प्रक्र. १०६/नापु. २९, दि. २१.५.२०१५ नुसार

  (६) हंगाम २०१४-१५ रु. २५०/- प्रो. राशी खर्च रु. ७४,२०,८३,७२०/-

- शासन निर्णय क्र. धानभ १२१५/ प्रक्र. १४/नापु. २९, दि. ६.५.२०१५ नुसार

  (७) हंगाम २०१४-१५ रु. ३०/- वाढीव भरडाई खर्च रु. ८,१७,८२,१३९/-

- एकुण रु. १३२,४४,७०,८७८/-

उपरोक्त नमुद बाबींसाठी रु. २५७.५१ पैकी रु. १३२,४४,७०,८७८/- रक्कम खर्च करण्यात आली आहे.

उर्वरित रु. १२५.०६ कोटी अतिरिक्त आहरित केलेल्या रकमेच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

अतिरिक्त रक्कम अर्थसंकल्पित करण्यात येऊन PLA मध्ये जमा करण्यात आली असल्याचे लेखापरिक्षेचे निरिक्षण बरोबर असुन त्यानुषंगाने अर्थसंकल्पात करण्यात आलेली परिगणना विशेषतः जमा रक्कमेबाबतचा बर्हिगोदाम दर चुकीचा घेण्यात येत असल्याचे दिसुन आले. तथापि, अतिरिक्त जमा रक्कम आधारभूत किंमत योजनेअंतर्गत व योजना सुरू ठेवण्यासाठी आवश्यक असलेले प्रदान (उदा. खरेदी प्रदान, अनु. खर्च ई) करण्यासाठी उपयोगात आणलेली आहे. धान शिल्लक राहुन निविदेद्वारा विक्री करावी लागणे, विहित कालावधीत भरडाई पूर्ण न होणे ई. कारणामुळे येणे रक्कमा प्राप्तच न होणे किंवा कमी प्राप्त होणे यामुळे PLA उणे होऊन योजनेची अंमलबजावणी खंडित झाली असती त्यामुळे रक्कम शेतकरी प्रदानासाठी वापरण्यात आली आहे.

११.४४ लक्ष क्विं धान निविदा/ई लिलाव द्वारे विक्री करावी लागल्यामुळे जवळजवळ रु. ७१.७६ कोटी एवढा तोटा झालेला आहे. तसेच, भरडधान्य खरेदीसाठी खर्च करण्यात आलेल्या (२००९-१० ते २०१५-१६)

रु. १३४.२८ कोटी रक्कमेपैकी रु. ८०.९७ कोटी रक्कमेचीच प्रतिपुर्ती झाली असून उर्वरित रु. ५३.३० कोटी रक्कम अद्यापही अप्राप्त आहे. उपरोक्त बाबी विचारात घेता कृपया सदरचे अनुपालन स्विकृत होणेस विनंती.

सुधारित उत्तर-

१.७ १. एम. एस. पी. ही केंद्र शासनाची योजना असल्यामुळे त्याच्या खर्चाची १०० टक्के प्रतिपुर्ती केंद्र शासनाकडून होते. त्यामुळे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करतांना तुटीच्या रक्कमेची तरतूद करणे अपेक्षित नाही. परंतु ती तशी करण्यात आली आहे.

२. बजेट तयार करताना योजनेच्या एकुण खर्चापेक्षा प्रतिपुर्तीची रक्कम कमीने परिगणित करण्यात आली त्यामुळे दिसून येणारा तोटा/तुटीची मागणी अर्थसंकल्पात करण्यात आली.

३. अशी अनियमितता झाली असली तरी आहरीत केलेली काही रक्कम वाढीव भरडाई व प्रोत्साहनपर राशी यासाठी वापरण्यात आली.

४. उर्वरित रु. १२५.०० कोटी रक्कम भरडाई विना शिल्लक असलेल्या धानाची प्रतिपुर्ती न झाल्यामुळे त्यामध्ये गुंतून राहिली आहे. जेव्हा याबाबीचे हिशोब पुर्ण होऊन अभिकर्ताकडुन रक्कम वसूल करण्यात येईल, तेव्हा ती शासनास परत करण्यात येईल.

५. या योजनेसाठी तुट मंजूर करण्याचे कोणतेही धोरण नसताना अर्थसंकल्पिय अंदाज सादर करण्यात आले व तसे ते वित्त विभागाकडून मंजूर करण्यात आले.

परिच्छेद क्र. ३.२.३ प्रापण केंद्राचे कामकाजः

१.८ केंद्र/महाराष्ट्र शासनाच्या निर्देशांनुसार, फक्त सरासरी चांगल्या दर्जाच्या(FAQ) धानाची खरेदी करण्यात यावी. FAQ निर्धारकांमध्ये इतर गोष्टींबरोबरच आर्द्रतेची कमाल पातळी आणि जैविक व अजैविक घटकांची ग्राहय टक्केवारी विहित केलेली असते. केंद्र शासनाकडुन दोन प्रतिंच्या धानांसाठी वेगवेगळे MSP दर निश्चित केल्यामुळे, प्रापण केलेल्या धानाची ग्रेडरकडुन दोन प्रतित, जसे प्रत 'अ' आणि 'सामान्य प्रत' अशी वर्गवारी केली जाते. प्रापण केंद्रामध्ये, धानात असलेल्या आर्द्रतेचे प्रमाण आणि धानाची प्रत आणि जैविक व अजैविक केंद्रामध्ये, धानात असलेल्या आर्द्रतेचे प्रमाण आणि धानाची प्रत आणि जैविक व अजैविक घटकांची टक्केवारी मोजण्यासाठी ग्रेडरकडुन आर्द्रता मीटर आणि प्रतिमा विश्लेषक उपकरणांचा वापर केला जातो. दोन SGAs च्या चाचणी तपासणी केलेल्या ५० प्रापण केंद्राच्या दस्तऐंवजांच्या छाननीत असे दिसुन आले कीः

(१)FAQ च्या निर्धारकांनुसार, ज्या धानांमध्ये १७% किंवा त्याहुन कमी आर्द्रतेचे प्रमाणे आहे तेच खरेदी करावे. ५० प्रापण केंद्रातील १६ केंद्रापैकी १५ केंद्रावर २००९-१५ दरम्यान एकाही वर्षात आर्द्रता मीटर्स उपलब्ध नव्हते तर एका केंद्रामध्ये धानातील आर्द्रतेचे प्रमाण न पडताळता, रु. ४७.६५ कोटींच्या ३. ८६ लक्ष क्विं. धानाचे प्रापण केले होते. अशा प्रकारे, FAQ च्या निर्धारकांविरुद्ध जास्त प्रमाणात आर्द्रता असलेल्या(१७% पेक्षा जास्त) धानाचे प्रापण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. उर्वरित ज्या ३४ केंद्रावर आर्द्रता मीटर कार्यरत होते, तेथे शेतकऱ्यांना धानाच्या प्रतिचे निर्धारण आणि FAQ च्या निर्धारणांची प्रतिपूर्ती निर्देशित केलेल्या ज्या प्रतवारी चिठ्ठ्या दिल्या जातात त्यावर आर्द्रतेचे प्रमाण दर्शविण्यात आले नव्हते.

(२) चाचणी तपासणी केलेल्या ५० केंद्रापैकी एकाही केंद्रावर प्रतिमा विश्लेषक उपकरणे उपलब्ध नव्हती. या उपकरणांच्या अभावामुळे, धानाची प्रतवारीता ठरविणे तसेच धानामध्ये अनावश्यक घटक, टाकाऊ धान्य इत्यादींचे प्रमाण विहित प्रमाणात होते याची खात्री खरेदी केंद्रावर असलेल्या ग्रेडरकडुन केवळ त्याच्या पूर्वानुभावरुन केली.

गेली होती. KMS २००९-१५, दरम्यान चाचणी तपासणी केलेल्या ५० खरेदी केंद्रामध्ये रु. ४४३.१९ कोटीच्या ३४.५८ लक्ष क्विं. धानाचे प्रापण केले गेले होते. अशा प्रकारे अशास्त्रीय पद्धतीचा अवलंब केल्यामुळे सामान्य प्रतिचे धान अ प्रतिचे धान म्हणुन किंवा अ प्रतीचे धान सामान्य प्रतीचे धान म्हणुन वर्गीकृत होण्याची जोखीम होती ज्यामुळे शेतकऱ्यांची/ विभागाची हानी होणार होती.

(३) MSP अंतर्गत प्रापण केलेले धान हे खऱ्या/वास्तविक शेतकऱ्यांकडुन खरेदी केले आहे. याची निश्चिती करण्यासाठी, ज्या धानाची शेतकरी विक्री करणार आहे त्याचे प्रमाण निश्चित करण्यासाठी त्या शेतकऱ्याच्या मालकीची शेतजमीन आणि कृषी विभागाकडुन त्या शेतजमिनीतुन निघणारे सरासरी धानाचे उत्पादन याची पडताळणी SGAs नी करावयाची होती. या व्यवस्थेमुळे MSP योजनेअंतर्गत व्यापाऱ्यांकडुन धानाची विक्री होण्यास प्रतिबंधित होईल असेही अपेक्षित होते. तथापि, ५० पैकी चाचणी तपासणी केलेल्या ३० प्रापण केंद्रावरील संपूर्ण सहा वर्षाचे (२००९-१५) शेतकऱ्यांचे जमीन धारण दस्तऐवज लेखापरिक्षेला पडताळणीसाठी सादर केले नव्हते. परिणामी २००९-१५ मध्ये या ३० केंद्रावर प्रापण केलेले रु. ९७.५६ कोटी मूल्याचे ८.२८ लक्ष क्विं. धान हे खऱ्या शेतकऱ्याचेच होते अथवा नाही याची लेखापरिक्षा खात्री करु शकली नव्हती.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

१.९ १. कोकण व विदर्भातील सर्व जिल्ह्यातील खरेदी केंद्रावर आर्द्रता तपासणी यंत्र सुस्थितीत कार्यान्वित ठेवण्यात आलेली आहेत.

शेतकऱ्यांकडून खरेदी करताना धानामध्ये १७% पेक्षा कमी आर्द्रता असल्याची ग्रेडर्सने खातरजमा केलेली आहे. फक्त एफएक्यु प्रतीच्याच धानाची खरेदी करण्यात आलेली आहे. सदर धानाची भरडाई केल्यानंतर तयार झालेला सर्व तांदूळ भारतीय अन्न महामंडळाने तपासणी करून स्विकृत केलेला आहे. स्विकृत केलेल्या तांदुळाच्या प्राप्त झालेल्या पोहोच पावत्या शासनाकडे सादर करण्यात आलेल्या आहेत.

३४ खरेदी केंद्रासहित इतर सर्व खरेदी केंद्रावर आर्द्रता निर्धारण करण्याचे आदेश देण्यात आलेले असून त्याप्रमाणे खरेदी पावत्यांवर तशी नोंद घेण्यात आलेली आहे.

२. सर्व खरेदी केंद्रावर भारतीय अन्न महामंडळाकडून प्रशिक्षण घेतलेल्या ग्रेडर्सची नेमणूक करण्यात आलेली आहे.

धानाच्या प्रतवारीवरुन अनुभवाच्या आधारे करण्यात आलेली ‘ अ ’ प्रतीच्या धानाच्या खरेदी नुसार ‘ अ ’ दर्जाचा व ‘ क ’ प्रतीच्या धानानुसार क प्रतीचा तांदूळ भरडाई नंतर भारतीय अन्न महामंडळाकडे विहीत विनिर्देशानुसार जमा करण्यात आलेला आहे.

ग्रेडरला QC चे प्रशिक्षण FCI ने दिलेले आहे. कार्यबाहुल्यामुळे ग्रेडिंग मध्ये चूक झाल्यास ‘ अ ’ धानाच्या बदल्यात ‘ क ’ दर्जाचा CMR जमा केल्यास अशा प्रकरणी शासन निर्देशानुसार ‘ अ ’ व ‘ क ’ धानाच्या किमतीतील फरकाची रक्कम अभिकर्त्यांकडून वसूल करण्यात येते.

३. कृषि उत्पन्न बाजार समितीने टोकन दिलेल्या शेतकऱ्यांचे महसूल विभागाने दिलेले ७/१२ उतारे व त्यावरील पिक पेऱ्याच्या नोंदीनुसार धानाची खरेदी करण्यात येत आहे. कोणत्याही परिस्थितीत व्यापाऱ्याचे धान खरेदी होणार नाही याची पूर्ण दक्षता घेण्यात आलेली आहे.

९ ते १५ या कालावधीत धान खरेदीचे रेकॉर्ड अद्ययावत करण्यात आलेले आहे. संबंधित जिल्ह्यामध्ये शेतकरी रजिस्टर ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडील संपूर्ण केवायसी ची माहिती घेऊन धान खरेदी करण्यात येते.

सदरचे अनुपालन मान्य करण्यास विनंती आहे.

सुधारित उत्तर-

१.१० १. आर्द्रता मापक-मार्कफेडचा खुलासा- खरेदी केंद्रावर कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत नेमणूक करण्यात आलेल्या ग्रेडर मार्फत धानाची खरेदी करण्यात आली आहे. सदर ग्रेडर हे भारतीय अन्न महामंडळाकडून प्रशिक्षण देण्यात आलेले होते. तसेच सदरचे सर्व ग्रेडर हे स्थानिक असल्यामुळे त्यांना त्या क्षेत्रात पिकणाऱ्या धानाची प्रतवारी अनुभवाच्या आधारे निश्चित करण्यात येते. सदर ग्रेडर मार्फत स्विकृत करण्यात आलेल्या धानाची भरडाई केल्यानंतर जो तांदूळ तयार करण्यात आला. त्याची संबंधित विभागातील भारतीय अन्न महामंडळाच्या गुणनियंत्रकाकडून (क्वालिटी कंट्रोलर) तपासणी करण्यात येऊन तो भारतीय अन्न महामंडळाने निश्चित केलेल्या स्पेशिफीकेशन नुसार असल्याची खातरजमा झाल्यानंतर मगच तो स्विकृत करण्यात येऊन भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामात जमा करण्यात आलेला आहे. त्यामुळे नॉन एफ. ए. क्यु. धानाची खरेदी होण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

२. आर्द्रता मापक- टी. डी. सी. चा खुलासा- महामंडळाकडे कार्यरत ग्रेडरची संख्या कमी असल्याने ग्रेडरकडे एक पेक्षा अधिक खरेदी केंद्राचा कार्यभार होता. त्यामुळे प्रत्येक केंद्राला स्वतंत्र आर्द्रतामापक यंत्र नव्हते. एकापेक्षा जास्त खरेदी केंद्र ग्रेडर सांभाळत असल्यामुळे तपासणीवेळी आर्द्रतामापक यंत्र उपलब्ध करून देता आले नाही. यापुढे प्रत्येक केंद्रावर आर्द्रतामापक यंत्र उपलब्ध करून देण्यात येईल.

३. आदिवासी विकास महामंडळ- शेतकऱ्याकडील ७/१२ उतारा बघूनच धान खरेदी करणेबाबत क्षेत्रीय कार्यालयांना निर्देश दिले जातात व त्यानुसार खरेदी केली जाते. मात्र बऱ्याचदा आदिवासी शेतकरी अल्प प्रमाणात धान खरेदी केंद्रावर घेवून आल्यास ७/१२ उतारा अभावि त्याचे धान नाकारल्यास स्थानिक लोकप्रतिनिधीकडून तक्रारी होण्याची शक्यता असते. सदर शेतकरी आदिवासी दुर्गम भागातुन येत असल्यामुळे अशा वेळी ७/१२ उतारा नसतांना देखील धान खरेदी करणे भाग पडते. त्यामुळे अशा शेतकऱ्यांची ७/१२ उतारे तपासणीवेळी सादर करता आलेले नाहीत. अशा शेतकऱ्यांच्या नोंदी खरेदी केंद्रावरील खरेदी रजिस्टरमध्ये करून शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या घेतलेल्या आहेत. त्यामूळे व्यापाऱ्यांच्या धान खरेदी न करता शेतकऱ्यांचाच धान आहे. हे दिसून येईल.

४. मार्केफेड-सर्व खरेदी केंद्रावर प्रथम शेतकऱ्यांकडील चालु कालावधीतील ७/१२ उतारा व त्यावर धानाच्या पिक पेऱ्याची नोंद असल्याची खातरजमा केल्यानंतरच कृषी उत्पन्न बाजार समितीकडून संबंधित शेतकऱ्यांस टोकन देण्यात आलेले आहे. टोकन प्राप्त असलेल्या शेतकऱ्यांकडील ७/१२ उताऱ्याच्या आधारे पिकपेरा क्षेत्र व संबंधित विभागातील प्रति हेक्टरी सरासरी धानाची उत्पादकता विचारात घेऊन ग्रेडरमार्फत स्वीकृत केलेल्या धानाची खरेदी करण्यात आली आहे. प्रत्येक खरेदी केंद्रावर गाव/शेतकरीनिहाय ७/१२ रजिस्टर अद्ययावत ठेवण्यात आलेले आहे. लेखा आक्षेपात नमुद करण्यात आलेल्या संबंधित खरेदी केंद्रावरील हंगाम २००९-१० ते २०१४-१५ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या धानाचे ७/१२ उतारे संबंधित सब एजंट संस्थाकडे उपलब्ध असल्याचे गोंदिया, भंडारा व रायगड या जिल्ह्यांतून कळविण्यात आले आहे. सदरचे ७/१२ उतारे आपणाकडे अलाहिदा सादर करण्यात येत आहे. सद्यःस्थितीत ठाणे जिल्ह्यांतील हंगाम २००९-१० ते २०१४-१५ मधील ७/१२ उताऱ्यांचे प्रती सोबत पाठविण्यात येत आहे.

५. सद्यःस्थितीत एन. इ. एम. एल. पोर्टलद्वारे सर्व खरेदीच्या नोंदी ऑनलाईन घेण्यात येतात. त्यामध्येदेखील ७/१२ च्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

परिच्छेद क्र. ३.२.४ भाताची सडणी व तो FCI कडे पोहोचविणे

१.११ राज्यात प्राप्त झालेले धान, /GOI/GOM ने मंजूर केलेले शुष्कतेचे प्रमाण SGAs कडील सडणी न झालेल्या धान्याची विल्हेवाट, भात गिरण्यांमध्ये पडून असलेला CMR, FCI कडे पाठविलेला CMR इत्यादीची KMS २००९-१४ दरम्यानची संक्षिप्त स्थिती पुढीलप्रमाणे :–

अ. क्र.	तपशील	महासंघ		आविम		एकूण	
		(लक्षक्विं.)	टक्केवारी	(लक्ष क्विं.)	टक्केवारी	(लक्ष क्विं.)	टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
१	प्राप्त झालेले धान	६५. १३	१००	५६. १९	१००	१२१. ३२	१००
२	भात गिरणीकडे पाठविलेले धान	६१. ६५	९४. ६६	४१. ९४	७४. ६३	१०३. ५९	८५. ३९
३	FCI कडे पाठविलेला प्रत्यक्ष CMR	३९. २५	N/A	२४. ३१	N/A	६३. ५६	
४	भात गिरणीत पडून असलेला CMR	२. ०६	N/A	३. ७९	N/A	५. ८५	
५	FCI ला पाठविलेल्या CMR च्या समप्रमाणात धान(अ. क्र. १-५)	५८. ५८	८९. ९४	३६. २८	६४. ५७	९४. ८६	७८. १९
६(अ)	भात गिरणीत पडून असलेल्याCMR च्या समप्रमाणात धान.	३. ०७	४. ७१	५. ६६	१०. ०७	८. ७३	७. २०
६(ब)	शुष्कता हानी (GOI ने ग्राह्य केलेले)	०. ६५	१. ००	०. ४३	०. ७७	१. ०८	०. ८९
६(क)	शुष्कता हानी (GOM ने ग्राह्य केलेले)	०. ३५	०. ५४	०. ००	०. ००	०. ३५	०. २९
६(ड)	SGAs नी विकलेले धान (निविदा/लिलाव)	निरंक	निरंक	११. ४४	२०. ३६	११. ४४	९.४३
६(इ)	SGAs कडे शिल्लक धान (विल्हेवाट लावण्यासाठी)	१. ५९	२. ४४	१. ९४	३. ४५	३. ५३	२.९१
६(फ)	शुष्कतेच्या ग्राह्य प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणात झालेली धानाची हानी	०. ८९	१. ३७	०. ४४	०. ७८	१. ३३	१.१०

यावरुन असे निर्दशनास येते की SGAs कडे पडून असलेले भात गिरणी न पाठवलेले धान(२.९१%)

SGAs ने ई-निविदा/लिलावाद्वारे विल्हेवाट लावलेले भात गिरणीत न पाठवलेले धान (९.४३%) भात गिरणीत पडून असलेल्या CMR च्या समप्रमाणात धान(७.२०%) आणि शुष्कतेमुळे झालेली हानि(१.१०%) यामुळे प्रामुख्याने KMS २००९-१४ दरम्यान एकूण १२१.३२ लक्ष क्विं. धानापैकी २६.४६ लक्ष क्विं. (२१.८१%) धान भात गिरणीत पाठविण्यात आले नव्हते व FCI कडे पोहोचविण्यात आले नव्हते.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

१.१२ लेखापरीक्षकांनी दिलेल्या अभिप्रायानुसार खरीप हंगाम २००९-१० ते २०१४-१५ दरम्यान एकूण खरेदी केलेल्या १२१. ३२ लक्ष क्विं धानापैकी २१. ८१% म्हणजेच २६.४६ लक्ष क्विं धान अभिकर्ता संस्थांनी मिलींग करीता पाठविलेले नव्हते.

- सदर २६.४६ लक्ष क्विं धानाचे विल्हेवाटीचे अभिकर्ता संस्थानिहाय तपशीलवार विवरण पुढीलप्रमाणे आहे :—

अ. क्र. (१)	विवरण (२)	मा. फे. (३)	टीडीसी (४)	एकूण (५)
१	अतिरिक्त शुष्कतेमुळे झालेली हानी	८९००० क्विं	४४००० क्विं	१३३००० क्विं
२	अभिकर्तासंस्थांकडे पडून असलेले धान	१५९००० क्विं	१९४००० क्विं	३५३००० क्विं
३	गिरणीत पडून असलेला CMR	२०६००० क्विं	३७९००० क्विं	५८५००० क्विं
४	ई-लिलावाद्वारे विक्री	०	११४४००० क्विं	११४४००० क्विं

- अतिरिक्त शुष्कतेमुळे झालेली हानी:- १२१ लक्ष क्विं च्या १. १०% म्हणजेच १३३००० क्विं अतिरिक्त हानी झाली होती. त्यापोटी फेडरेशन कडून रु. १९.८६ कोटीची वसुली करण्यात आलेली आहे. व टीडीसीकडून रु. ५.८९ कोटीची वसुली करण्यात आलेली असून त्यांचेकडे रु. १.०४ कोटी शिल्लक आहेत. वसूलीची कार्यवाही प्रगतीत आहे.
- SGA कडे पडून असलेले धान ३५३००० क्विं पैकी १३९५५८ क्विं चा लिलाव झालेला असून त्यापोटी रु. १०. ७४ कोटी प्राप्त झालेले आहेत. उर्वरित शिल्लक धानाची लिलाव प्रक्रिया चालू आहे.
- ई लिलावाद्वारे ११४४००० क्विं धानाची विक्री करण्यात आलेली आहे. त्यापोटी रु. ३४.७७ कोटी रक्कम प्राप्त झालेली आहे.
- गिरणीमालकाकडे शिल्लक असलेल्या CMR ची दि. १५.२.१७ चे शासन निर्णयाप्रमाणे रु. २.१७ कोटी वसूल झाले आहेत. उर्वरित रु. ६२ कोटी रकमेची CMR च्या दराने वसुली करण्याची कार्यवाही चालू आहे.

सुधारित उत्तर-

१.१३ **अभिकर्ता संस्थांकडील २००९ ते २०१५ या कालावधीतील शिल्लक धानाच्या वसुलीबाबत :**

- सन २००९- १० ते २०१५- १६ या कालावधीमध्ये एकूण २६० कोटी किंमतीचे १९. ७१ लाख क्विं.धान शिल्लक राहीले आहे. त्यांपैकी लिलावातून ५०. ०६ कोटी तर केंद्र शासनाच्या १ टक्का तुटीमुळे १७.४६ कोटी प्राप्त झाले, अभिकर्ता संस्थांकडून २५.९४ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत. आज घडीला अभिकर्ता संस्थांकडे १६८ कोटीएवढी वसुली शिल्लक आहे. त्याबाबतचा पाठपुरावा संस्थेकडे करण्यात येत आहे.
- सदर शिल्लक धानाच्या वसूलीबाबत वि.स. व उ.स. कार्यालयीन दिनांक २३ फेब्रुवारी २०१८ रोजी अभिकर्ता संस्थांना सदरची वसूली तात्काळ करून वसुलीच्या ८ दिवसांच्या आत शासनखाती जमा कराव्यात, वसूली शक्य नसल्यास, संबंधितांवर फौजदारी स्वरूपाची कार्यवाही करावी, असे पत्र दिले आहे.

२००९ ते २०१५ शिल्लक धानाची सद्य:परिस्थिती (कोटी)

अ. क्र. (१)	तपशील (२)	टी.डी.सी. (३)	मार्केटिंग फेर्डेशन (४)	एकूण (५)
१	खरेदी (लाख/क्विं.)	६८.८७	८२.१३	१५१.०१
२	भरडाई (लाख/क्विं.)	५३.०६	७८.२४	१३१.३०
३	शिल्लक धान (लाख/क्विं.)	१५.८१	३.८९	१९.७१
४	शिल्लक धानाची सी.एम.आर. प्रमाणे किंमत (कोटी)	२०४.४८	५६.३५	२६०.८३
५	लिलावाद्वारे प्राप्त रक्कम (कोटी)	३५.६९	१४.३६	५०.०६
६	केंद्र शासनाने मान्य केलेली १ टक्का तुटीची रक्कम (कोटी)	६.७०	१०.७६	१७.४६
७	अभिकर्ता संस्थांकडून वसूल केलेली रक्कम (कोटी)	६.०८	१९.८६	२५.९४
८	अभिकर्ता संस्थांकडे शिल्लक असलेली वसूली (कोटी)	१४४.३३	२३.८३	१६८.१६

मिलर्सकडील प्रलंबित सी.एम.आर. च्या वसुलीबाबत :

- सन २००९-१० ते २०१५-१६ या कालावधीमध्ये एकूण कोटी किंमतीचे ३.३६ लाख क्विं. सी. एम. आर. मिलर्सकडे शिल्लक राहीले आहे. त्यांपैकी मिलींग, प्राप्त देयके व EMD यांच्यातून १४.२३ कोटी रुपयांची वसुली झाली आहे/होऊ शकते
- टी. डी. सी. च्या एकूण ७३ मिलर्सपैकी २ मिलर्सकडून १०० टक्के वसूली करण्यात आली आहे. ३४ मिलर्सकडून अंशत : वसूली व समायोजन मान्य करण्यात आले आहे. उर्वरित २७ मिलर्सकडून अद्याप काहीही वसूली झाली नाही.
- मार्केफेडच्या १६ मिलर्सकडून ५.७४ कोटी रकमेच्या सी. एम. आर. च्या वसुलीबाबत कार्यवाही चालू आहे.
- उर्वरित ५४.९९ कोटीच्या वसूलीकरिता शासनाच्या दि. १ मार्च २०१८ व ६ एप्रिल २०१८ च्या पत्रान्वये फौजदारी कार्यवाही करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. याबाबतीत वि.स. व उ.स. कार्यालयाने दि. ७ मार्च २०१८ व दि. ९ एप्रिल २०१८ रोजी अभिकर्ता संस्थांना वसुली करणेबाबत पत्रे दिलेली आहेत.
- शासन पत्र दि. २६ सप्टेंबर २०१७ व २० जानेवारी २०१८ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांना सदर मिलर्सच्या मिलवरती आर.आर.सी. कार्यवाही करण्याचे आदेशित करण्यात आले आहे.

२००९ ते २०१४ शिल्लक CMR ची सद्यःपरिस्थिती (कोटी)

अ. क्र.	तपशील	टी.डी.सी.	मार्केटिंग फेर्डेशन	एकूण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	शिल्लक सी.एम.आर. ची किंमत	६३.४८	५.७४	६९.२२
२	मिलर्सच्या प्राप्त देयकातून EMD व मिलींगमधून होऊ शकणारी वसुली.	१४.२३	०.००	१४.२३
३	मिलर्सकडे शिल्लक असलेली वसुली	४९.२५	५.७४	५४.९९
४	१०० टक्के वसुली झालेली मिलर्स	२	०	२
५	अंशतः वसुली झालेले मिलर्स	३४	०	३४
६	शून्य वसुली असणारे मिलर्स	२७	०	२७

सारांश :

शासनाची नुकसानभरपाई करण्याकरिता शिल्लक धानाचे रु. १६८.१६ कोटी तसेच प्रलंबित सी. एम. आर. चे ५४.९९ कोटी असे एकूण २२३.१५ कोटी वसूल होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

सुधारित उत्तर (२) :–

मिलर्सकडील प्रलंबित सी. एम. आर. च्या वसुलीबाबत :

- सन २००९-१० ते २०१५-१६ या कालावधीमध्ये एकूण कोटी किंमतीचे ३. ५५ लाख क्विं. सी. एम. आर. मिलर्सकडे शिल्लक राहीले आहे. त्यांपैकी मिलींग, प्राप्त देयके व EMD यांच्यातून २९.४२ कोटी रुपयांची वसूली झाली आहे/होऊ शकते.
- टी .डी. सीच्या एकूण ८७ मिलर्सपैकी ४८ मिलर्सकडून १०० टक्के वसुली/समायोजन करण्यात आली आहे. २७ मिलर्सकडून अंशत : वसूली व समायोजन मान्य करण्यात आले आहे. उर्वरित १२ मिलर्सकडून अद्याप काहीही वसूली/समायोजन झाली नाही. अंशतः वसुली असलेले २७ मिलर्स व ० वसूली/समायोजन १२ मिलर्स यांच्यावर एफआयआर दाखल करण्यात आले आहे. तसेच त्यांपैकी १२ मिलर्सवरती आरआरसी ची कार्यवाही करण्यात आलेली आहे.
- मार्केफेडच्या १६ मिलर्सपैकी ७ मिलर्सकडून १०० टक्के वसूली/समायोजन करण्यात आलेली आहे. उर्वरीत ९ मिलर्सकडून १२.७४ कोटी रकमेच्या सी.एम.आर. च्या वसूलीबाबत कार्यवाही चालू असुन त्यांचेवर एफआयआर दाखल करण्यात आले आहे. त्यांपैकी ३ मिलर्सवरती आरआरसी ची कार्यवाही करण्यात आलेली आहे.
- उर्वरित ४६.८० कोटीच्या वसूलीकरिता शासनाच्या ६ एप्रिल २०१८, दि. ९ एप्रिल २०१८, दि. १ मार्च २०१८ व दि. ७ मार्च २०१८ च्या पत्रांन्वये फौजदारी कार्यवाही करण्याबाबत तसेच मिलर्सकडील वसूली करणेबाबत आदेशित करण्यात आले आहे.
- शासन पत्र दि. २६ सप्टेंबर २०१७ व २० जानेवारी २०१८ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांना सदर मिलर्सच्या मिलवरती आर. आर. सी. कार्यवाही करण्याचे आदेशित करण्यात आले आहे.

२००९ ते २०१४ शिल्लक CMR ची सद्यःपरिस्थिती (कोटी)

अ. क्र. (१)	तपशील (२)	टी.डी.सी. (३)	मार्केटिंग फेर्डेशन (४)	एकूण (५)
१	शिल्लक सी.एम.आर. ची किंमत	६३.४८	१२.७४	७६.०८
२	मिलर्सच्या प्राप्त देयकातून EMD व मिलींगमधून होऊ शकणारी वसुली/समायोजन	२९.०५	०.३७	२९.४२
३	मिलर्सकडे शिल्लक असलेली वसुली	३४.४३	१२.३७	४६.८०
४	१०० टक्के समायोजन होणारे मिलर्स	४८	७	५५
५	अंशतः वसुली झालेले मिलर्स	२७	१	२८
६	शून्य वसुली असणारे मिलर्स	१२	८	२०

सारांश :

शासनाची नुकसान भरपाई करण्याकरिता शिल्लक धानाचे रु. १६८.१६ कोटी तसेच प्रलंबित सी.एम.आर. चे ४६.८० कोटी असे एकूण २१४.९६ कोटी वसूल होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

परिच्छेद क्र. ३.२.४.१ शुष्कतेमुळे झालेल्या हानीपोटी नुकसानभरपाई वसूल न करणे :

विभागाच्या निर्देशानुसार (नोव्हे. २०१३) ग्राह्य मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात आर्द्रता कमी झाल्यामुळे होणाऱ्या हानीपोटी SGAs कडून संबंधित वर्षातील धानाच्या MSP च्या १५०% दराने वसुली करावयाची होती. FADS च्या दस्तऐवजांच्या तपासणीत असे निर्दशनास आले की केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या १% इतक्या आर्द्रतेच्या अभावामुळे झालेल्या हानीच्या मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात झालेल्या ०.४४ लक्ष क्विं. धानाच्या हानीपोटी TDC कडून वसूल करावयाच्या रु. ८.०२ कोटीपैकी मार्च, २०१५ पर्यत रु. १.९४ कोटीची वसुली प्रलंबित होती.

ज्ञापन :

१.१४ महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

प्रचलित पद्धतीनुसार धान खरेदी/भरडाईचे हिशोब करताना अतिरिक्त आर्द्रतेची (घटीची) रक्कम धानाच्या दिडपट दराने या कार्यालयाकडुन वसूल करण्यात येते.

केंद्र शासनाने अनुषंगिक खर्च मंजूर करताना १% शुष्कतेमुळे येणारी घट मंजूर केली आहे. तसेच राज्य शासनाची १% वाजवी घट पुर्ण हंगामासाठी मंजूर केली जाते. १% वरील घट (अवाजवी घट) धानाच्या किंमतीच्या दिडपट दराने अभिकर्ता संस्थांकडुन वसुल केल्या जातात. हंगाम २००७-०८ पर्यत शासनाने अशी वसुली करण्याबाबतच्या दिलेल्या निर्देशानुसार FADS ने घटीच्या रक्कमा अभिकर्ता संस्थांकडुन दिडपट दराने वसुल केलेल्या आहेत.

हंगाम २००८-०९ पासुन पुढील हंगामांसाठी शासन निर्देश प्राप्त होतील असे गृहित धरुन हंगाम २००९-१० ते २०११-१२ करीता रु. ५.८९ कोटी एवढी वसुली आविमकडून करण्यात आली. तथापि शासनपत्र दि. २१ नोव्हे. २०१३ अन्वये फक्त पणन महासंघाला १% तूट अनुज्ञेय करण्यात आली व आविमकडील शिल्लक धान निविदा/लिलावाद्वारे विक्री करण्यात आले.

आदिवासी विकास महामंडळाच्या अखत्यारीतील क्षेत्रातील हंगाम २००९-१० ते २०१०-११ व २०११-१२ मधील खुल्या जागेवर साठविलेले धान दुरच्या अंतरावरील गोदामे उपलब्ध होउनही वाहतुक करून साठविता आली नाहीत. त्यामुळे खरेदी केंद्रावरील मोकळया जागेवर ताडपत्र्यांनी झाकुन ठेवलेले धान ३ ते ४ वर्ष पावसानी भिजुन खराब झाले. त्यामुळे धानातील घटी वाढल्या आहेत. सदरच्या घटीची रक्कम धानाच्या किंमतीच्या दिडपटीने अभिकर्ता संस्थांकडुन वसुल केली जाते. अशा आलेल्या घटी नैसर्गिक असल्याने त्या अभिकर्ता संस्थांना माफ करणे आवश्यक आहे. अशी त्यांनी शासनाकडे मागणी केली आहे. तरी कृपया सदरचा मुद्दा स्विकृत होणेस विनंती आहे.

सुधारित उत्तर-

१.१५ १. आदिवासी विकास महामंडळाला देय असलेल्या रकमेतून रु. १.९४ कोटीची वसुली करण्यात येईल.

परिच्छेद क्र. ३.२.४.२ SGAs कडे पडून असलेल्या असडीत धानाची विल्हेवाट लावल्यामुळे आणि भात गिरण्यांमध्ये पडून असलेल्या CMR ची किंमत वसूल न करण्यामुळे झालेले नुकसान.

१.१६ KMS २००९-१४ दरम्यान प्रापण झालेल्या १२१. ३२ लक्ष क्विं. धानापैकी ११. ४४ लक्ष क्विं. असडीत धानची विल्हेवाट ई-निविदा/लिलावाद्वारे लावण्यात आली, ३. ५३ लक्ष क्विं. धान्य SGAs कडे पडून होते. आणि ५. ८५ लक्ष क्विंटल ५६ CMR भात गिरणीमध्ये डिसेंबर २०१४ पर्यंत पडून होता. (तक्ता ३. २. २ मधील अ. क्र. ६ (ड), ६ (इ) आणि ४ पहावा).

लेखापरीक्षणास असे आढळून आले की, धान सडण्यासाठी ते SGAs मधून काढून CMR – FCI कडे पोहचविण्यास भात गिरण्या उत्सुक नव्हत्या कारण केंद्र शासनाने KMS २००८-१० साठी निश्चित केलेले (ऑगस्ट २०१०) वाहतुकीचे दर KMS २००७-०८ दरम्यान भात गिरण्यांना दिलेल्या दरापेक्षा ४० टक्क्याने कमी होते, तसेच KMS २०११-१२५७ पर्यंत कायम ठेवण्यात आले होते. परिणामी धानाची उचल/FCI CMR कडे पोहचविणे या दोहोंवर त्याचा परिणाम झाला ज्यामुळे दोन्ही स्थळांवर(SGAs आणि भातगिरण्या) साठा वाढला. परंतु, या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था राज्य शासनाने शोधली नाही. मध्यवर्ती वखारीत मोठ्याप्रमाणात राखीव साठा पडून असल्याने KMS २००९-१२ मधील शिल्लक धान/CMR स्वीकारण्यास केंद्र शासनाने नकार दिल्याने (ऑगस्ट २०१३) ही समस्या आणखीनच गंभिर झाली. KMS २०१२-१३ पासून पुढील हंगामामध्ये मात्र केंद्र शासनाने राज्य शासनाला प्रत्येक KMS५८ च्या अखेरीस माल पाठविला जावा अन्यथा शिल्लक साठ्याची महाराष्ट्र शासनाने स्वखर्चाने आणि जोखमीवर विल्हेवाट लावावी असे निर्देश दिले(जून २०१३).

परिणामी महाराष्ट्र शासनाने TDC कडे पडून असलेल्या ११.४४ लक्ष क्विं. असडीत धानाची (KMS २००९-१२)लिलाव/ई-निविदाद्वारे MSP पेक्षा खूपच कमी दराने विल्हेवाट लावली ज्यामुळे रु. ८२.९६ कोटीचे ५९ नुकसान झाले, तसेच जुलै २०१५ पर्यत ३.५३ लक्ष क्विंटल ६० (KMS २०१२-१४) धानाची विल्हेवाट लावली गेली नव्हती. भात गिरण्यात पडून असलेल्या ५.८५ लक्ष क्विंटल CMR संबंधात आधी महाराष्ट्र शासनाने त्यासाठी FCI कडून दर्जाचे प्रमाणपत्र प्राप्त करून नंतर हा साठा निर्धारित सार्वजनिक वितरण प्रणाली (TPDS) अंतर्गत वापरण्याचा निर्णय घेतला होता. परंतु FCI ने मालाला प्रमाणित करण्यास नकार दिल्याने आणि राज्यातील जिल्हा पुरवठा कार्यालयांमधील (DSO) साठवण क्षमता अपूरी असल्याने भात गिरण्यातील रु. १२८.३३ कोटी ५१ किमतीचा ५.८५ लक्ष क्विंटल CMR विल्हेवाट न होता पडून राहिला(जुलै २०१५).

भात गिरण्यांमधील CMR साठी (५.८५ लक्ष क्विंटल) महाराष्ट्र शासनाने रु. १६०.४१ कोटी६२ दंड/शास्ती न आकारल्यामुळे भात गिरण्यांना अवाजवी आर्थिक लाभ देण्यात आला. तसेच ५.८५ लक्ष क्विंटल CMR पैकी SGAs नी भात गिरण्यांकडून बँक हमींच्या (BG) रुपात CMR च्या रकमेएवढी सुरक्षा ठेव प्राप्त केली नव्हती किंवा चार निवडक जिल्ह्यांमध्ये भात गिरण्यांमध्ये पडून असलेल्या १.६७ लक्ष क्विंटल CMR संबंधीच्या बँक हमीची मुदत संपल्यावर SGAs नी ती पुन:वैध करून घेतली नव्हती. (बँक हमी : रु. ३५.२३ कोटी).

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

१.१७ हंगाम २००९-१० ते २०१२-१३ मध्ये पणन महासंघातर्फे खरेदी करण्यात आलेल्या धानाची विहित मुदतीत धानाची भरडाई करून प्राप्त तांदुळ भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामात जमा करण्यात आला आहे. हंगाम २०१३-१४ मध्ये कोकण विभागातील धानाची भरडाई स्थानिक मिलधारकांकडून करण्यात आलेली नाही. शासनाने कोकण विभागातील शिल्लक धानाची ई-निविदा प्रक्रियेद्वारे विक्री केलेली आहे.

आदिवासी विकास महामंडळाच्या ख. प. हं. २००९-१० ते २०११-१२ मधील भरडाईविना शिल्लक असलेल्या ११. ८४ लक्ष क्विं. धानाची दि. १५ जून, २०१३ व दि. ५ एप्रिल २०१४ च्या शा. नि. नुसार ई-निविदा/लिलाव प्रक्रियेद्वारे विक्री करण्यात आलेली आहे.

हंगाम २००९-१० ते २०१३-१४ मध्ये आविमकडे ३. ०९ लक्ष क्विं. CMR राईस मिलर्सकडे पडून आहे. याबाबत भारतीय अन्न महामंडळाकडे जमा न झालेल्या परंतु मिलर्सकडे शिल्लक असलेल्या हा CMR शासनाच्या ताब्यात घेणेबाबत शासन निर्णय दि. २३ जानेवारी १५ रोजी निर्गमित करण्यात आलेला होता. त्यानुसार मिलर्सकडून प्राप्त होणाऱ्या CMR चे सॅम्पलींग करण्यासाठी भारतीय अन्न महामंडळाच्या स्थानिक गुणनियंत्रण अधिकारी यांचेकडून आवश्यक ते सहकार्य देण्याची हमी भारतीय अन्न महामंडळाच्या उप महाव्यवस्थापकांनी हमी देण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे सदर CMR जमा करण्यास मिलर्स अपयशी ठरत असतील तर त्यांच्या विरुद्ध FIR दाखल करण्याबाबत देखील शासन निर्देश आहेत.

सदरील शिल्लक तांदुळ जमा करण्याकरीता DSO गोंदिया, गडचिरोली यांनी भाडयाने गोदामे घेतली होते. यानुसार दि. २ मार्च २०१५ रोजी १३ ट्रक तांदुळ DSO च्या गोदामात आले असता FCI च्या त्यांना प्राप्त आदेशानुसार सॅम्पलींग प्रक्रिया करून देण्याचे मात्र विश्लेषन अहवाल लिखीत स्वरुपात देण्यास नकार दिल्याने सदर मिलर्सनी तांदुळ जमा केला नाही. याबाबत आविमकडून दि. ४ मार्च व जिल्हाधिकारी गोंदिया यांनी दि. २ मार्च २०१५ रोजी शासनास कळविली असून याबाबत काही उपाय न निघाल्याने FCI कडे अद्यापही तांदुळ जमा झालेला नाही.

याबाबत CMR जमा न झाल्यामुळे शासनस्तरावर तांदळाची प्र. क्विं. रक्कम निश्चित करून राईस मिलर्सकडून ही रक्कम शासनखाती जमा करतील व जे मिलर्स रक्कम जमा करणार नाहीत त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाही हाती घेण्यात येईल. याबाबतही आविमकडुन शासनास दि. २८ एप्रिल २०१६ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला असुन त्यावर निर्णय प्रलंबित आहे. तरी कृपया सदरचा मुद्दा स्वीकृत होणेस विनंती आहे.

सुधारित उत्तर-

१.१८ १. उक्त परिस्थितीत धानाची व सी. एम. आरची वाहतुक मिलर्सने करणे आवश्यक असल्यामुळे त्यावेळी दुसरा पर्याय शोधणे शक्य नव्हते.

२. सद्य परिस्थितीत टी. डी. सी. गिरणीधारकांकडील ३.२० लक्ष क्विं. व मार्कफेड गिरणीधारकांकडील ०.२७ लक्ष क्वि. असा एकुण ३.४७ लक्ष क्वि. सी. एम. आर. एकूण अंदाजित किंमत रु. ७६.१२ कोटी बाकी आहे. त्याच्या वसूलीबाबतची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. रु. ३.०० कोटी वसूल करण्यात आली आहे.

३. ५.८५ लक्ष क्विं. मधून ३.४७ लक्ष क्विं. सीएमआर वजा जाता उर्वरित २.३८ लक्ष क्वि. सी. एम. आर. शिल्लक असल्याचे दिसून येत नाही. त्याचे काही प्रमाणात धान शिल्लक होते.

४. पुरेसी बँक गॅरंटी न घेणे व ती पुर्नजीवित न करणे इ. कारणासाठी आदिवासी विकास महामंडळाने श्री. एन. झेड. येरमे व श्री. जे. एस. राठोड या कर्मचाऱ्याला निलंबित करून यांच्या विरुद्ध विभागीय चौकशी चालू केली आहे. चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

परिच्छेद क्र. ३.२.५ भात गिरण्यांवर शास्ती न आकारणे.

१.१९ विभागाच्या निर्देशानुसार SGAs नी पुरवठा आदेश दिल्यावर १० दिवसांच्या आत भात गिरण्यांनी सडण्यासाठी धानाची उचल करणे बंधनकारक असते. १० दिवसांत धानाची उचल न केल्यास निर्धारित दराने विलंबाच्या कालावधीसाठी शास्ती आकारणीय होती. KMS २००९-१४ दरम्यान निवडक ४ जिल्ह्यातील SGAs च्या दस्ताऐवजांच्या तपासणीत असे आढळुन आले की १०८ भात गिरण्यांनी एक दिवस ते ६७३ दिवसांच्या विलंबाने ६. ९३ लक्ष क्विं. धानाची उचल केली होती. परंतु भात गिरण्यांकडून रु. ०.८९ कोटीची शास्ती वसूल करण्यात आली नव्हती.

पुढे SGAs भात गिरण्यांबरोबर केलेल्या भातसडणीच्या करारानुसार भात गिरण्यांनी FCI कडे जमा केलेल्या CMR चा दर्जा व भातगिरण्यांनी SGAs कडून उचल केलेल्या धानाचा दर्जा एकसारखा असणे आवश्यक होते. भातगिरण्यांनी FCI कडे कमी प्रमाणात जमा केलेल्या एखाद्या विशिष्ट दर्जाच्या धानाच्या CMR ची वसुली ही त्या KMS मध्ये लागु असलेल्या CMR च्या दराच्या १२५% करावी. तांदुळ उत्पादक १३ जिल्ह्यांपैकी दोन जिल्ह्यांमध्ये जरी ४९ भात गिरण्यांनी KMS २००९-१४ दरम्यान अ दर्जाच्या CMR ची ०.७० लक्ष क्विं. इतकी कमी प्रमाणात जमा करून तेवढ्या प्रमाणात साधारण प्रतीचा CMR जमा करूनही विभागाने रु. ३.७३ कोटीची शास्ती (साधारण प्रतीच्या CMR च्या अतिरिक्त साठ्याची किंमत वजा करून) सक्तीने वसूल केली नव्हती.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

१.२० धान भरडाई करताना राईस मिलर्सने धानाचे डिलीव्हरी आदेश घेतल्यापासुन १० दिवसात धानाची उचल करून १५ दिवसात CMR भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करणे आवश्यक असून तसे स्पष्ट निर्देश प्रत्येक हंगामाच्या भरडाई परिपत्रकानुसार संबंधिताना देण्यात येतात.

धानाची उचल करण्यास तसेच CMR भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करण्यास झालेल्या विलंबासाठी आकार व दंड याबाबतची कार्यवाही दोन्ही अभिकर्ता संस्थांकडून होणे आवश्यक असुन त्याबाबत विचारणा केली असता मार्केटिंग फेडकडील वसुली ही त्यांना अनुज्ञेय वाहतुक देयकाच्या रकमेचे प्रदानातुन वसूल करून शासनास जमा करण्यात येईल असे कळविले आहे.

वाहतुक दराबाबतच्या मिलर्सच्या मागणीनुसार अपेक्षित दरवाढ मिळाली नसल्यामुळे दोन्ही अभिकर्ता संस्थांकडून वाहतुक देयके सादर करण्यात आलेली नव्हती. तथापि याबाबत दि. १० मे, २०१६ च्या शासननिर्णयानुसार हंगाम २००८-०९ ते २०११- १२ पर्यतच्या वाहतुक देयकांची अदायगी हंगाम २००७-०८ च्या दरानुसार करावयाचे निर्देश असल्याने २००८-०९ ते २०११-१२ मध्ये धान भरडाईचे काम केलेल्या मिलधारकांनी हंगाम २००७-०८ च्या दराने देयके सादर करण्यास सुरवात केली असल्यामुळे सादर वाहतूक देयकांचे प्रदान संबंधित मिलर्सना करताना विलंब आकार व दंडणीय वसुली करून शासनाकडे जमा करण्याबाबत अभिकर्ता संस्थांनी कळविले आहे. तरी कृपया सदरचा मुद्दा स्वीकृत होणेस विनंती आहे.

सुधारित उत्तर-

१.२१ १ मिलधारकांने त्यांच्या वाहतुकीचे देयक सादर केल्यानंतर त्यामधून प्रलंबित रकमेची वसुली करण्यात येणार आहे. तथापि आतापर्यंत सर्व देयके प्राप्त झालेली नाहीत. त्यामूळे वसुली होऊ शकली नाही. आतापर्यंत फक्त ०. ५७ लक्ष एवढी वसुली करण्यात आली आहे.

परिच्छेद क्र. ३.२.६ CMR चे प्रमाणीकरण आणि त्याचा पुरवठा कार्यालयांना पुरवठा यातील वेळेचा अपव्यय.

१.२२ CMR ची FCI वखारीमध्ये पाठवणी केल्यावर तो स्वीकारण्यापूर्वी FCI कडून CMR चा दर्जा प्रमाणित केला जातो. परंतु ४ जिल्ह्यांमध्ये (रायगड व ठाणे या दोन निवडक जिल्ह्यांसह) FCIची वखार आणि भात गिरण्या यामधील अंतर जास्त असल्याने FCI कडून प्रत्यक्ष भात गिरण्यांमध्ये भेट देऊन तेथेच CMR च्या दर्जाची तपासणी करून त्यास प्रमाणित केले जाते. TPDS अंतर्गत या FCI द्वारे प्रमाणित CMR चे वितरण करण्यासाठी भात गिरण्यांकडुन तो संबंधित DSO कडे पाठविला जातो.

KMS २००९-१४ दरम्यान FCI ने प्रमाणित केलेल्या तारखेनंतर ५ दिवस ते ५५१ दिवसांनी रु. ४६. १७ कोटी किंमतीचा २. ३७ लक्ष क्विं. CMR TPDS अंतर्गत वितरण करण्यासाठी DSO रायगड व ठाणे यांना पाठविण्यात आला. FCI कडून CMR प्रमाणित केला जाणे आणि तो DSO कडे पाठविला जाणे यातील लक्षणीय कालापव्यय लक्षात घेता FCI नी भात गिरण्यांमध्ये प्रत्यक्ष जाऊन प्रमाणित केलेल्या दर्जाच्या CMR ऐवजी दुसऱ्या दर्जाच्या CMR चे वितरण TPDS अंतर्गत केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ही बाब शासनाला कळविण्यात आली. (ऑगस्ट २०१५) ; त्याचे उत्तर प्रतिक्षित आहे. (डिसेंबर २०१५).

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे :—

१.२३ हंगाम २००९-१० मधील ८१८२९ क्विं. मंजूर CMR तांदळाच्या नियतनापैकी ५४३७९ क्विं. च्या FCI च्या प्रमाणीकरणाच्या प्राप्त पत्रानुसार पुढील ४ ते ५ दिवसात नियतन आदेश मंजूर केले आहेत. उर्वरित तांदुळ भरडाईला झालेल्या विलंबामुळे म्हणजे सन २०१२-१३ मध्ये भरडाई झाल्याने अन्न महामंडळाने प्रमाणिकरणाबाबतही मे, जुलै व ऑगस्ट, २०१२ मध्ये कळविल्यानुसार तांदुळ प्राप्त झाला होता. भरडाईस झालेला विलंब व त्यानुसार FCI कडून प्रमाणिकरण यानंतर जिपुअ कार्यालयाने उचित कार्यवाही केलेली आहे व त्यांच्या कार्यालयामार्फत कालापव्यय झाला नसल्याचे दिसून येते.

हंगाम २०१०-११ मधील विलंबही उपरोल्लेखित नुसार शिल्लक धानाच्या विलंबाने भरडाईमुळेच आलेला आहे.

हंगाम २०११-१२ मध्येही दि. ३१ मे, २०१३ पर्यत प्रमाणिकरण पत्र हे दोन टप्प्यात प्राप्त झाले असून नियतन आदेशानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

हंगाम २०१२-१३ मध्ये सॅम्पलिंग आदेशान्वये प्रमाणित करण्यात आलेला तांदुळ फेब्रुवारी, २०१४ मध्ये अन्नसुरक्षा योजना सुरू झाल्याने लाभार्थी प्राधान्य गटानुसार नियतन वाटपात झालेल्या प्रदानानुसार लाभार्थ्यांना वाटप करणेबाबत शासन आदेश प्राप्त होण्यास झालेल्या विलंबामुळे दि. २९ मे, २०१४ रोजीच्या आदेशान्वये अन्नसुरक्षा योजनंअंतर्गत मंजूर करण्यात आले.

सन २०१३-१४ मधील खरेदी केलेल्या धानाची भरडाई न झाल्यामुळे शासन निर्णयानुसार ई-लिलाव करण्यात आला आहे.

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती पाहता FCI ने प्रमाणित केल्यानंतर या कार्यालयाकडून विहित मुदतीत CMR तांदळाचे TPDS अंतर्गत नियतन आदेश मंजूर करणेत आले आहेत. यास्तव या कार्यालयाकडून कालापव्यय झालेला नाही. जो तांदुळ सॅम्पलींग करणेत आला आहे. भारतीय अन्न महामंडळाचे सॅम्पलींग पत्र प्राप्त झाल्यानंतर सन २००९-१० पासुन ते २०१२-१३ पर्यत विहित मुदतीतच नियतन आदेश काढले आहेत. तरी कृपया सदरचा मुद्दा स्वीकृत होणेस विनंती आहे.

सुधारित उत्तर-

१.२४ १. सी. एम. आर. प्रमाणीत केल्यानंतर वितरीत करण्यास विलंब झाला असला तरी प्रमाणीत झालेला सी. एम. आरचं वितरीत झाला असल्याची जि. पु. अ. कार्यालयाने खात्री केली आहे.

निष्कर्ष व शिफारशी :-

१.२५ किमान आधारभूत किंमत योजनेच्या अंतर्गत धानाचे प्रापण करणे आणि ते सडण्यासाठी भातगिरण्यांमध्ये पाठवणे या प्रक्रियेच्या तपासणीत असे आढळून आले कि दोन SGAs नी प्राप्त केलेल्या धानाचा दर्जा निश्चित करण्यासाठी अशा प्रापण केंद्रांमध्ये आवश्यक उपकरणे (आर्द्रतामापक आणि प्रतिमा विश्लेषक संच) उपलब्ध नव्हती . धान भात गिरणीत पाठविण्यात तसेच भारतीय खाद्य निगमकडे ग्राहकोपयोगी तांदूळ पाठविण्यात झालेल्या विलंबामुळे SGAsकडे व भात गिरण्यामध्ये मोठ्या प्रमाणात साठा संचयित झाला. न सडलेल्या ११.४४ लक्ष क्विंटल धानाची विल्हेवाट लावल्यामुळे रु. ८२.९६ कोटी तोटा झाला आणि KMS २००९-१४ दरम्यान भारतीय खाद्य निगमला ग्राहकोपयोगी ५.८५ लक्ष क्विंटल तांदूळ पाठवू न शकल्या निर्धारित कालावधीत भात गिरण्यांनी धानाची उचल करण्यात विलंब झाल्याबद्दल आणि भारतीय खाद्य निगमकडे निर्धारित प्रतीचा सी. एम. आर. कमी प्रमाणात जमा केल्याबद्दल भात गिरण्यांवर एकुण रु. ४.६२ कोटीची शास्ती देखील आकारण्यात आली नाही.

केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या वैशिष्टयांशी प्रापण केलेल्या धानाचा दर्जा सुसंगत असेल याची खात्री करण्यासाठी शासनाने प्रापण केंद्रामध्ये गुणवत्तामापक उपकरण उपलब्ध आहे. चालू स्थितीत आहे अथवा नाही याचा आढावा घ्यावा. धान सडण्यासाठी भात गिरणीत पाठविण्यात आणि भारतीय खाद्य निगमला ग्राहकोपयोगी तांदूळ पुरविण्यात विलंब झाल्यामुळे भविष्यात होणारी हानी टाळण्यासाठी शासनाने वर्धनक्षम व्यूहरचना आखावी.

ही बाब शासनास कळविण्यात आली (ऑगस्ट, २०१५);त्याचे उत्तर प्रतीक्षित आहे (डिसेंबर, २०१५).

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

कोकण व विदर्भातील सर्व जिल्ह्यांतील खरेदी केंद्रावर आर्द्रता तपासणी यंत्र सुस्थितीत कार्यन्वित ठेवण्यात आली आहेत. १७ टक्के पेक्षा कमी आर्द्रता असल्याची ग्रेडर्सकडून खातरजमा केलेली असून फक्त FAQ दर्जातील धानाची खरेदी करण्यात आली आहे. सर्व केंद्रावर भारतीय अन्न महामंडळाकडून प्रशिक्षीत ग्रेडर्सची नेमणूक करण्यात आली असून आर्द्रता निर्धारण करून त्याप्रमाणे खरेदी पावत्यांवर तशी नोंद घेण्यात येत आहे. SGAsकडे पडून असलेल्या रु. १२. ८३ लाख क्विं. धानाचा लिलाव झाला असून त्यापोटी रु. ४५. ५१ कोटी रक्कम प्राप्त झाली आहे. तसेच गिरणीधारकांकडील शिल्लक सी. एम. आर. पोटी रु. २. १७ कोटी वसूल करण्यात आले असून उर्वरित रकमेची वसुली करण्याची कार्यवाही चालू आहे.

सर्व खरेदी केंद्रावर आर्द्रतामापक यंत्रे उपलब्ध करून देण्यात आली असून खरेदी धान त्वरीत भरडाईसाठी पाठविण्यात येत आहे. त्यामुळे हंगाम २०१५-१६ मध्ये ९६ टक्के व हंगाम २०१६-१७ मध्ये ९७ टक्के भरडाई पुर्ण झाली आहे.

दिनांक २० फेब्रुवारी, २०१८

साक्ष :-

२.१ उपरोक्त परिच्छेदाबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २० फेब्रुवारी, ३१ जुलै व ७ ऑगस्ट, २०१८ रोजी, अन्न व नागरी पुरवठा विभागाचे सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी परिच्छेद क्र. ३.२.४.२ हा अतिशय मोठा विषय आहे. या अंतर्गत ११ लाख क्विंटल धानाची विक्री करण्यात आलेली आहे. यामध्ये सीएमआर वसुली वेगळी करण्यात आलेली आहे. विभाग हा विषय गांभीर्याने घेत नाही. It is not a very easy para. This single para will take two hours. महालेखाकार यांनी सुद्धा या विषयाला गांभीर्याने घेतलेले नाही. साक्षीसाठी असलेल्या परिच्छेदांच्या अनुषंगाने विभागाने जे सुधारित उत्तर सादर केलेले आहे त्यावरुन समितीचे समाधान होत नाही. समितीचे मत आहे की, विभागाने या संदर्भात समाधानकारक सुधारित लेखी उत्तर सादर केल्यास बरे होईल. अन्यथा, यातून शेकडो प्रश्न उपस्थित होतील. विभागाचे उत्तर वाचल्यावरुन समितीचे समाधान झालेले नाही. अशा प्रकारचे लेखी उत्तर विभागाकडून अपेक्षित नव्हते. ११ लाख क्विंटल धान सडून गेले आहे. ५ लाख क्विंटल धानाच्या सीएमआरची वसुली झाली नाही. तसेच २ लाख ८५ हजार क्विंटल धानाचा कुठेही हिशेब लागत नाही. हा विषय मोठा असल्यामुळे परिच्छेद क्र. ३.२.४.२ ला गांभीर्याने घेतले तर समितीचे समाधान होईल. असे मत समितीने व्यक्त केले असता, गेल्या वर्षापासून ऑनलाईन प्रोक्युअरमेंट पद्धत सुरू करण्यात आलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले व यासंदर्भात विभागाच्यावतीने ऑनलाईन प्रोक्युअरमेंट पद्धतीबाबत सादरीकरण करण्यात आले.

या वर्षी १ लाख शेतकऱ्यांना जवळजवळ ३०० कोटी रुपयांचे ऑनलाईन प्रदान सुद्धा करण्यात आलेले आहे. या वर्षी धानाची खरेदी जवळजवळ ३७५ कोटी रुपयांची झाली आहे. गेल्या वर्षी डिसेंट्रलाईज खरेदी आणि ऑनलाईन खरेदी सुद्धा झाली. पूर्वी विभागाकडून भारतीय खाद्य निगमला माल देण्यात येत होता आणि त्यानंतर त्यांच्याकडून ॲलोकेशन घेऊन ब्लिप करण्यात येत होते. आता त्यांनी ही पद्धत बंद केली आहे. आता थेट विभागाच्या सिस्टीमच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे. आता एफसीआयचा रोल एवढाच आहे की, त्यांनी त्याच्या क्लेमच्या अनुषंगाने शिफारशी करावयाच्या आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभाग पॅडीसाठी पैसे देतो आणि त्यांच्याकडून धान खरेदी करतो. आता नवीन पद्धतीनुसार विभाग स्वतः धान खरेदी करीत आहे. यामध्ये जे तोटे आहेत त्याची जबाबदारी कोण घेतो ? अशी विचारणा समितीने केली असता, यावर एफसीआयचे सुद्धा इन्स्पेक्शन असते. १ टक्क्यापर्यंतची तूट अनुज्ञेय आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मुद्दा वजनातील घट असल्याबाबत नसून तांदुळ आणि पॅडीच्या कॉस्टींगचा जो फरक आहे त्यामध्ये एफसीआयकडून विभागाला प्रतिपूर्ती होते काय ? अशी समितीने विचारणा केली असता, जेवढे साठा किंवा भरडाई अनुज्ञेय आहे त्यापेक्षा जास्त देण्यात येत असल्यामुळे यातील तूट राज्य सरकारला सोसावी लागते. अनुज्ञेय तूट असतील तर त्याची प्रतिपूर्ती होते. परंतु त्यापेक्षा जास्त तूट असेल तर तो भार राज्य सरकारवर पडतो किंवा अभिकर्ता संस्थाकडून (एजन्सी) ती तूट वसूल करण्यात येते, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

पूर्वी विभागाच्या माध्यमातून एफसीआयच्या खात्यावर पॅडी खरेदी करण्यात येत होती. विभाग त्यांना धानाचे पैसे कोणत्या दराने देतो, अकाऊंटचे समायोजन कसे केले जाते ? अशी विचारणा समितीने केली असता, विभाग आज सुद्धा एफसीआय एजन्सीच्या वतीने खरेदी करीत आहे. परंतु आता एजन्सीकडे सीएमआर न जाता थेट विभागाच्या खात्यात येते. एजन्सी सीएमआरच्या बाबतीत शेवटी संयुक्त इन्स्पेक्शन करतात. धानाची रक्कम पीडीएस दरानुसार अदा करण्यात येते.

विभाग पीडीएसच्या दरानुसार प्रदान करतो. परंतु खरेदी किंमतीसह पॅडीवर येणारा सर्व खर्च विभागाकडून भारतीय खाद्य निगमवर आकारण्यात येते. पीडीएस दराप्रमाणे किमतीची रक्कम जमा केली जाते आणि उर्वरित रकमेची त्यांच्याकडे मागणी केली जाते असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, विभाग तफावतीची रक्कम घेत नाही. पैसे जमा करण्यासाठी DSO चे वेगळे अकाऊंट आहे आणि सीएमआर नफा होणारे अकाऊंट वेगळे आहे. मागच्या वर्षी सुरू केलेल्या पद्धतीचा फायदा या वर्षी शेतकऱ्यांना झाला. कारण मागच्या वर्षी डेटा जमा केला होता. त्यामुळे आता केवळ नावाची नोंद केली की, सर्व तपशील उपलब्ध होतो असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विहित मुदतीत प्रदान करण्याच्या बाबतीत विभागाची पद्धती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सध्या १० दिवसांत प्रदान करण्यात येते. परंतु विभागाचा ७ दिवसांमध्ये प्रदान करण्याचा प्रयत्न आहे. कालपर्यंत ३७५ कोटी रुपयांपैकी दोन्ही एजन्सी मिळून ३०० कोटी रुपयांपर्यंत प्रदान करण्यात आलेले आहे. या वेळी १०० टक्के शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा करण्यात येत आहेत. पूर्वीची हुंजी पद्धत पूर्णतः बंद केली आहे. सध्या १ लाख ८३ हजार शेतकऱ्यांनी या पद्धतींतर्गत नोंदणी केलेली आहे. शेतकऱ्यांची नोंदणी १०० टक्के ऑनलाईन केलेली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाने २०१६-१७ मध्ये सुरू केलेल्या ऑनलाईन प्रोक्युअरमेंट पद्धतीचे सादरीकरण केले होते त्यानुसार विभागाने सुरू केलेली योजना समाधानकारक आहे. परंतु ज्या परिच्छेदांच्या अनुषंगाने साक्ष आयोजित करण्यात आलेली होती त्या परिच्छेदांना विभागाकडून समाधानकारक लेखी उत्तरे देण्यात आलेली नाहीत. विभागाला सुधारित लेखी उत्तरे सादर करण्यासाठी अजून एक संधी उपलब्ध आहे. तसेच ३.२.४.१ तसेच ३.२.४.२ या परिच्छेदांच्या बाबतीत समितीला सविस्तर लेखी उत्तर अपेक्षित आहे. कारण सध्या या परिच्छेदांच्या अनुषंगाने जे लेखी उत्तर सादर करण्यात आलेले आहे ते अयोग्य आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, ज्या बाबतीत प्रश्न विचारण्यात आले होते त्या संदर्भात उत्तरे देण्यात आलेली आहेत. परंतु ज्या ठिकाणी प्रश्नच विचारण्यात आले नाहीत त्या संदर्भात उत्तरे देण्यात आलेली नाहीत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पॅडी सडल्यामुळे विभागाला ११ लाख क्विंटलची विक्री करावी लागली. तसेच ग्राहकोपयोगी तांदुळाचा माल पूर्णपणे परत आला नाही. पाच वर्षांतील एकूण खरेदी १२१.३२ लाख क्विंटल असून, यातील अंदाजे २ लाख ८५ हजार क्विंटल धान हे सीएमआरसाठी पोहचले नाही आणि केंद्रावरसुद्धा उपलब्ध असल्याचे दिसत नाही. यामध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी आहेत. या बाबतीत समितीला सविस्तर माहिती हवी आहे. तसेच सीएमआर वसुलीचे प्रकरण न्यायप्रविष्ट

आहे. विभागाकडून सीएमआर वसुलीबाबतचा प्रस्ताव मंत्री महोदयांकडे सादर करण्यात आला होता. परंतु मंत्री महोदय, दोन-दोन वर्षे त्यावर निर्णय घेत नाहीत, असे विभागाने लेखी उत्तरात नमूद केले आहे. २०१६ मध्ये मंत्री महोदयांकडे प्रस्ताव सादर केला होता, परंतु त्यावर निर्णय झाला नाही. अशा परिस्थितीत १०० कोटी रुपयांची वसुली कशी होईल ? या संदर्भात सविस्तर कार्यवाही करणे अपेक्षित आहे. सीएमआर वसुलीचे प्रकरण न्यायालयात आहे. विभागाने चांगल्या वकिलांची नेमणूक केलेली आहे. परंतु न्यायालयीन तारखांच्या वेळी कधी कधी वैयक्तिक अडचणींमुळे वकील उपस्थित राहत नाहीत. असेही लेखी उत्तरात नमूद आहे. विभागाने या प्रकरणाचा निर्णय लवकरात लवकर लागण्यासाठी अतिरिक्त वकिलांची नेमणूक करावी. समितीची अपेक्षा आहे की, या परिच्छेदांच्या अनुषंगाने विभागाने समर्पक उत्तर देऊन योग्य प्रकारची कार्यवाही करावयास पाहिजे. कारण यामध्ये सरकारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. विभागाने पुढील साक्षीच्या वेळी समाधानकारक उत्तरे सादर करावीत, जेणेकरून समितीला शिफारशी करण्याची आवश्यकता पडणार नाही.

शासनाचे पैसे वसूल झाले पाहिजेत. शासनाचे नुकसान झाल्यामुळे जबाबदारी निश्चित केली पाहिजे. ११ लाख क्विंटल धान सडले. विभागाने ८२.०० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले. हे नुकसान त्यापेक्षा जास्त झाले आहे काय ? यास कोण जबाबदार आहे. हे काही एका वर्षाचे धान नाही. ते २ ते ४ वर्षाचे धान आहे. पहिला वर्षात धान सडले तर दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी काळजी का घेण्यात आली नाही ? विभाग धान खरेदी करत गेला आणि माल बाहेर पडून राहिला. यास कोणीतरी जबाबदार असले पाहिजे. हा प्रकार टीडीसीमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. तेव्हा यासंबंधात कोणावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे ? ज्याला सीएमआर दिला त्याच्याकडून बँक गॅरंटी घेण्यात आली नाही. विभागाने कनिष्ठ अधिकाऱ्याला निलंबित केले आहे. मात्र, वरिष्ठ अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली नाही. मेळघाटमध्येदेखील अशाच प्रकारचा अपहार होता. सर्वात जास्त अपहार आदिवासी विकास महामंडळामध्येच होतो. यासंबंधात सर्व कारवाई करून साक्ष दिली तर साक्ष लवकर संपेल असे समितीने सूचित केले.

अर्थसंकल्पीय तरतूद ३.६२ कोटी रुपयांची होती. ती फक्त ड्रायेज चार्जेससाठी होती. विभागाने अर्थसंकल्पीय तरतूद ३२३ कोटी रुपयांची केली आहे. मग हा निधी ड्रायेज चार्जेसच्या व्यतिरिक्त पॅडी प्रोक्युरमेंटसाठी वापरल्याचे उत्तरात नमूद केले आहे. त्यासंबंधात खुलासा करण्यास महालेखापालांनी सूचित केले असता, यासंबंधात एफसीआयकडून माल मिळतो त्यापेक्षा जास्त माल विभागाकडून देण्यात येतो. विभाग भाडे जास्त देतो. शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात येते. त्यामुळे नुकसान होते. ते नुकसान भरून काढण्यासाठी विभागाकडे आर्थिक तरतूद असणे आवश्यक आहे. नाही तर मग विभाग मायनस, मायनसमध्ये जाऊन प्रदान करायला पैसे राहणार नाहीत. कारण पीएलए मायनसमध्ये जाऊ शकतो. मायनसमध्ये गेल्यानंतर बिले कशी काय निघतील. जितके खर्च झाले तितकेच पैसे येतील. प्रत्यक्षात तसे होत नाही. तसेच सीएमआर पूर्णपणे जमा होत नाही. धान सीएमआरमध्ये तसेच्या तसे राहते. ते कन्व्हर्ट होत नाही. ते नुकसान वेगळे असते. त्याचा पीएलएवर भार येतो. हे सर्व काही वित्त विभागाच्या परवानगीने करण्यात येते. मागील वर्षामध्ये केंद्र शासनाकडून २१७ कोटी रुपये आले. ते पीएलएमध्ये जमा न होता फायनान्सच्या जनरल अकाऊंटमध्ये जमा झाले. तेदेखील मिळालेले नाहीत. ही आताची गोष्ट आहे. अशा प्रकारे नुकसान होत असते. त्यासाठी विभागाला ही रक्कम लागते. ती रक्कम ठेवली नाही तर ही योजना राबवू शकणार नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी ॲडव्हान्सपणे ॲन्टीसिपेशनमध्ये कशासाठी ठेवला आहे असे महालेखापालांचे मत आहे ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, मागच्या वर्षी प्रतिपूर्तीतून जी रक्कम आली ती विभागाने जमादेखील केली आहे. दोन वर्षापूर्वी २०० कोटी रुपये जमा केले आहेत. वित्त विभागाने पुरवणी मागणीला मान्यता दिल्यानंतर ती रक्कम विभागाकडे जमा होते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

हे उत्तर समाधानकारक नाही. As per Accountant General observation, this is defective budgetting. Department is asking funds for one thing, however, Department is utilising that funds for another thing. असे मत महालेखापालांनी व्यक्त केले असता, How would run the scheme then? At Rs. 10 of milling, we are giving Rs. 20 असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Then, Department has to make provision for it specifically असे मत समितीने व्यक्त केले असता, This we have explained it. यामध्ये जादा भरडाई खर्च व बोनस आहे. रुपये २५७. ०० कोटी रूपयाला आक्षेप घेण्यात आला आहे. या २५७. ०० कोटी रूपयांपैकी भरडाई खर्च व बोनसवर रुपये १३२. ०० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

The objection is that this MSP is a Government of India's scheme. शासनाची जबाबदारी ही फक्त ॲडिशनल ड्रायेज अलाऊन्सची असते. It is expected that Department should make a provision for the Drayage Charges which were estimated to be Rs. 3.62 crores. Whereas, Department made a provision of Rs. 323 crores for the procurement and all under this MSP. Therefore, this is defective budgetting असे मत महालेखापालांनी व्यक्त केले असता, this is theory. However, in practicality, it is different. How do Department run the scheme? It is not defective budgetting. Ours is a Welfare State असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

Department should have a Revenue and a Budget Head, why Department making it under this MSP ? अशी विचारणा महालेखापालांनी केली असता, Otherwise, the Scheme will stop. FCI gives Department Rs. 10 and Department gives Rs. 40 to the miller. Where do Department get Rs. 30 from? From this PLA. There is no bonus to be given to the farmers. Department give Rs. 200 bonus to farmers. Where do Department give it from? From this PLA. If Department do only drayage charges then, the scheme will stop. After two months of procurement Department will say Department don't have money. Department cannot run the scheme like this. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभाग पीएलए में से रुपये निकालता है. विभाग कि तरफसे जो बोनस देना है उसके लिए स्पेसिफिकली अलग से प्रावधान कीजिए ऐसा महालेखापालजीं का कहना है, इनका यह कहना नहीं है कि इनको मत दीजिए. इनका कहना है कि एमएसपी से कैसे निकाला जाता है ? अशी विचारणा समितीने केली असता, हेड एक ही है, अलग हेड नहीं है. वित्त विभाग के मान्यता से ही यह सब काम करते है. इसके लिए जो शासन निर्णय हैं उसके हिसाब से ही काम किया जाता है. वित्त आणि एफसीआयकडून जो निधी येतो तो पीएलएमध्ये जातो असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

अर्थसंकल्पीय तरतुदीचा निधी काढून ते पीएलएमध्ये जमा करण्यात येतो, असे मत महालेखापालांनी व्यक्त केले असता, त्याशिवाय योजना चालविताच येणार नाही. मग विभागाकडून दहा रुपयाच्या वर कोणालाही काही देता येणार नाही असा निर्णय घ्यावा लागेल. एफसीआय जेवढे मंजूर करते तेवढेच विभाग देणार असा निर्णय घ्यावा लागेल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखापालांचे म्हणणे आहे की, देण्यास काही नकार नाही. महालेखापालांचे म्हणणे आहे की, पीएलएमध्ये पैसे एफसीआयकडून येतात. त्यांना १० रुपयांऐवजी ४० रुपये द्यायचे असतील किंवा ट्रान्सपोर्टचे पैसे जास्त द्यायचे असतील, बोनस द्यायचा असेल तर त्यासाठी वेगळी तरतूद करावी. पीएलएमध्ये करू नये असे मत समितीने व्यक्त केले असता, वेगळी तरतूद म्हणजे नेमके काय ? हेड वेगळा करायचा काय ? या योजनेचा एकच हेड आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

The Department made a provision under MSP of Paddy where they were expected to make a provision only for drayage charges असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले असता, How do Department pay the millers and how do pay the bonus then? अशी विभागीय सचिवांनी विचारणा केली.

वित्तीय शिस्तीच्या अंतर्गत एमएसपीच्या अकाऊंटमधून पैसे देणे योग्य नाही. त्यासाठी वेगळी तरतूद करावी असे समितीने सूचित केले.

Department has different Head असे महालेखापालांनी निदर्शनास आणले असता, हा वेगळा हेड नाही. एकच हेड आहे. ती स्कीम पीएलएमध्येच राहणार असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मेजर हेड एक असला तरी सब-हेड करण्यात यावा असे समितीने सूचित केले.

2408 and 4404 are Department's two Major Heads. Department take their budget provision under that for procurement of any of these grains. असे मत महालेखापालांनी व्यक्त केले.

विभाग को सब देना पडेगा लेकिन उसको सेम हेड में, एमएसपी में मत डालिए, ऐसा महालेखापाल का कहना है। यह एमएसपी का खर्चा नहीं है. विभाग एक्स्ट्रा बेनिफिट दे रहे है. असे मत समितीने व्यक्त केले असता, एमएसपी का ही खर्चा है तो उसको अलग हेड में कैसे डालेंगे ? वित्त विभागाने मंजूर केले तर काहीही हरकत नाही. विभागाला पैसे मिळण्यात स्वारस्य आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याला एमएसपीमध्ये समाविष्ट करण्यात येऊ नये असे महालेखापालांचे मत आहे असे समितीने निदर्शनास आणले.

Department should study and come back before the Committee असे महालेखापालांनी सूचित केले असता, Department has studied. That is why I am saying that Rs. 132 crores is the excess payment and Rs. 70 crores is for सीएमआर झाले नाही, धान विक्री करावे लागले यामध्ये ७०. ०० कोटी रुपयांचा लॉस आहे. प्रतिपूर्ती न झाल्यामुळे ५०. ०० कोटी रुपयांचा लॉस आहे. तेदेखील एमएसपीमधून घेण्यात येते असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

It means you are saying that you are spending much more than what is expected under the Government of India scheme. असे मत महालेखापालांनी व्यक्त केले असता, Not only that, some reimbursement doesn't come from Government of India, and in between, we have to take money from Finance Department. Otherwise, the scheme will stop. सन २००९-१० ते २०१५-१६ पर्यंत १३४ कोटी रुपयांपैकी ८०.०० कोटी रुपये मिळाले आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ही सगळी अर्थसंकल्पीय तरतूद कोणत्या शीर्षाखाली करतात ? अशी विचारणा महालेखापालांनी केली असता, मुख्य शीर्षाखाली सगळी तरतूद करण्यात येते. वित्त विभागाची मंजुरी घेऊनच हा निधी काढला जातो. यासंबंधातील सगळी माहिती वित्त विभागाला माहीत असते. बोनसचा निर्णय हा मंत्रीमंडळ बैठकीत होतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मेजर हेडमध्ये सब हेड करावा असे प्रधान महालेखापाल यांचे मत आहे असे समितीने सूचित केले.

परिच्छेद क्रमांक ३.२.१- भारतीय अन्न महामंडळाकडील थकबाकी

२.२ दिनांक ३१ जुलै, २०१८ रोजी समितीने पुन्हा अन्न व नागरी पुरवठा विभागाचे प्रधान सचिव इतर विभागीय प्रतिनिधींनी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी सांगितले की, मागच्यासाक्षीमध्ये देखील भारतीय अन्न महामंडळाकडील थकबाकी संदर्भात चर्चा झाली होती. महालेखापालांचे असे म्हणणे होते की, विभागाने तुटीचे अंदाजपत्रक कसे काय केले, तसेच पैसे का दिले ? शेतकऱ्यांना बोनस दिला जातो, मिलर्सना पैसे दिले जातात, त्याकरिता पैसे लागतात, त्यामुळे तूट येते. राज्य शासनाच्या दोन अभिकरणांद्वारे महाराष्ट्र राज्य पणन महासंघ व महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळाद्वारे केंद्र शासनाची किमान आधारभूत किमतीला धान प्रापण योजना राबविली जाते. तेथे जवळच्या केंद्रावर शेतकरी नोंदणी करतात. त्या नोंदणीप्रमाणे त्या वर्षाचे

उत्पादन किती असायला पाहिजे याबाबतची माहिती कृषी विभागाकडून घेतली जाते. त्यानुसार प्रापण केंद्रावर केंद्र शासनाने घोषित केलेल्या एम. एस. पी. मध्ये दरवर्षी शेतकऱ्यांकडून खरीप पणन हंगामासाठी धानाची खरेदी करण्यात येते. अशा पद्धतीने खरेदी केलेले धान स्थानिक खाजगी भात गिरणीधारकांकडून स्वच्छ करून घेतले जाते. अशाप्रकारे मिळालेला ग्राहकापयोगी तांदूळ म्हणजे सी. एम. आर. पूर्वी केंद्र शासनाची नोडल एजन्सी असलेल्या भारतीय खाद्य निगमकडे जमा केला जात असे. परंतु, त्यांचे वितरण करण्याच्या दृष्टीने आता ते विभागाकडूनच ठेवले जातात. गेल्या वर्षापासून डी. सी. पी. सुरू झाले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यावर परस्पर पैसे जमा होऊ लागले. बोनससुद्धा देण्यात येतो. याबाबतचे सादरीकरणदेखील समिती समोर केलेले आहे. आता हुंडीचा प्रकार पूर्णपणे बंद केलेला आहे. हा विषय असा आहे की, काही रक्कम रोखून ठेवली होती. त्यातील त्रुटी अशा आहेत की, बारदाना घसारापोटी व सी. एम. आर. मधील आर्द्रतेपोटी रक्कम रोखण्यात येत आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

सी. एम. आर. त्यातील आर्द्रता पाहूनच घेतला असेल मग पैसे रोखून ठेवण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. विभागाच्या सुधारित उत्तरातील हे आर्द्रतेचे कारण मान्य करण्यासारखे नाही. तांदुळामध्ये किती आर्द्रता असते व त्याकरिता किती पैसे द्यावेत हे सर्व ठरलेलेच असते. याबाबतच्या सद्य:स्थिती बाबत समितीने विचारणा केली असता, समितीचे म्हणणे बरोबर आहे. परंतु, सर्व गोष्टींचे पुरावे मिळाले पाहिजेत. आज अशी परिस्थिती आहे की, ४९.७ कोटी रुपये वसूल झालेले असून केवळ १.८१ कोटी रुपये शिल्लक राहिले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सुधारित उत्तरांमध्ये असे नमूद केले आहे की, लेखा परिक्षित विवरणाकरिता रक्कम राखून ठेवण्यात येत आहे. असे का नमूद केले आहे ? याबाबतची अधिक माहिती द्यावी तसेच बारदानाच्या विषयाबाबतही माहिती द्यावी असे समितीने सूचित केले असता, त्यांचे बारदान असते त्याचे पैसे कमी केले जातात म्हणून ते रोखून ठेवले जातात. मग ते पुरावा सादर करतात. परंतु, पुरावा वेळेवर न मिळाल्याने रोखून ठेवले जातात. खास करून या गोष्टींमुळे विलंब होतो. याबाबत ताळमेळाचे काम केल्यानंतर हा विषय संपविता येईल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

हा विषय किती दिवसांत संपेल, विभागाकडून दरवर्षी असे ताळमेळाचे काम का करण्यात येत नाही अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये खूप काम प्रलंबित आहे. सन १९९९ पासून ते सन २०१६-२०१७ पर्यंतचे काम प्रलंबित आहे. ते मार्च, २०१९ पर्यंत पूर्ण करण्याच्या दृष्टीने कालबद्ध योजना तयार केलेली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

महालेखाकारांचा परिच्छेद सन २०१४ मधील आहे डी. सी. पी. सन २०१६-२०१७ पासून सुरू केले आहे. सन २०१५-२०१६ पर्यंतच्या एफ. सी. आय. कडील थकबाकीच्या वस्तुस्थितीबाबत समितीने विचारणा केली असता, याबाबतची माहिती सादर करण्यात येईल. मात्र जे ८६७ कोटी येणे आहे, त्याचे मुख्य कारण हेच आहे की, हिशोब पूर्ण होत नाही. त्यामध्ये पी. डी. एस. ही समाविष्ट आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यंत्रणा नियमित झाली पाहिजे, त्याकरिता मोहिम हाती घेतलां पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले. This is only advance. But why you are paying100% as advance? विभागाचे असे म्हणणे आहे की, एफ. सी. आय. त्याचे ऐकत नाही, १००% अग्रिम द्यावा लागतो कारण त्यांची मक्तेदारी असते. त्यामुळे ते जेवढी मागणी करतात तेवढे द्यावेच लागते असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले असता, ते बरीच रक्कम अमान्य करतात. त्यांचे निकष फार कडक आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ती रक्कम अद्ययावत करावी लागेल. शेतकऱ्यांनी खर्च केलेलाच असतो. वेळच्या वेळी कामे केली तर काहीच प्रश्न उपस्थित होणार नाहीत, यावर काय उपाययोजना करता येईल अशी विचारणा समितीने केली, हा विषय केंद्र सरकारकडे मांडला असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एफ. सी. आय. ला असे कळवावे की १०० टक्के अग्रिमासाठी आग्रह करा नये, especially when there is backlog in lifting of foodgrains असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले असता, विभागाकडून प्रतिपूर्ती करण्यात येते, गोदामाचे भाडे देण्यात येते, रस्ते वाहतुकीचा खर्च हा महाराष्ट्र शासनाद्वारे देय असतो. शेतकऱ्यांसाठी योजना सुरू करताना सरकारला हा खर्च सोसावा लागतो. त्यांचे निकष खूप कडक आहेत, जाचक आहेत. ते वस्तुनिष्ठ नाहीत, परिस्थितीला धरुन नाहीत. गडचिरोलीसारख्या ठिकाणीही कधीकधी धान वाहतूक करून भरडाईसाठी न्यावे लागते. त्याचे दर अमान्य करतात, ही अडचण आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

राज्य शासनाला केंद्र शासनाकडून सन २००३ पासून ते आतापर्यंतचे मिळून ८६७ कोटी रुपये घ्यायचे आहेत, विभागाने ताळमेळाचे काम करून तो विषय निकाली काढावा, अशी समितीची शिफारस आहे. विभागाने वसुलीची रक्कम १. ८१ कोटी पर्यंत आणलेली आहे त्याबाबत समिती समाधानी आहे असे मत समितीने व्यक्त केले.

परिच्छेद क्र. ३.२.२- स्वीय प्रपंजी लेख्यात निधीची अनियमित जमा

२.३ अनियमित जमा MSP या केंद्रशासनाच्या योजनेअंतर्गत २५७ कोटी रुपये पीएलएमध्ये काढले. १३२ कोटी रुपयांचा तपशील दिलेला आहे. १२५ कोटी रुपयांचा हिशोब लागला. धानावर ७१ कोटी रुपयांचे नुकसान झाले. धान सडून गेले. प्रोत्साहन राशी काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, ५० कोटी रुपयांचे प्रोत्साहन राशी दिलेली आहे. एकूण नुकसान १६८ कोटी रुपये आहे. १२५ पैकी ५३ कोटी रुपये एफसीआय कडून वसूल झाले नसून ८० कोटी रुपयांची प्रतिपूर्ती झालेली आहे. ७१ कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. त्याचा पूर्ण तक्ता दिलेला आहे. ३ वर्षे मिलींग झाले नाही. ३ वर्षे मिलींग न होण्याचे कारण दरामध्ये एकमत होऊ शकले नाही. धान खरेदी झाल्यानंतर त्याची साठवणूक योग्य प्रकारे झाली नाही. त्यामुळे धान ३ वर्षे पडून होते असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

५३ कोटी रुपये कधी मिळणार आहेत ? ७१ कोटी रुपयांचे काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, जसजशा मागण्या सादर होतील तसतशी ती रक्कम मिळेल. त्याबाबत जे कर्मचारी, अधिकारी वसुलीस जबाबदार असतील त्यांच्याकडून वसुली करावयाची आहे. खरेदी विक्री संस्था जबाबदार असतील त्यांच्याकडून वसुली करावयाची आहे. जे नैसर्गिक नुकसान टाळता न येण्याजोगे आहे, ते राईट ऑफ करावे लागेल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

व्यवस्थेवर नियंत्रण नसणे हा मुख्य मुद्दा आहे. पर्यायी व्यवस्था करण्यामध्ये शासन कमी पडले. एका वर्षाचे धान असते तर समजणे शक्य होते. मात्र या ठिकाणी ३-४ वर्षे धान पडून राहिले. त्याच्या भरडाईची व्यवस्था केली नाही. मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. याकरिता अंतिम स्तरावरील कर्मचाऱ्यापासूनन ते वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांपर्यंत सर्वचजण जबाबदार आहेत. या बाबत विभागाने चौकशी केली पाहिजे. कोण जबाबदार आहे, कोणावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे या बाबतचा अहवाल समोर आला पाहिजे. वेळेवर निर्णय न झाल्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, संदर्भात समितीला एक महिन्यात कळविण्यात येईल. आदिवासी विकास विभाग, मार्केटींग विभाग यांच्याकडील रक्कम राईट ऑफ करण्याकरिता वित्त विभागाकडून परवानगी घ्यावी लागेल. ही प्रक्रिया सुरू करणे शक्य आहे. मात्र ती एक महिन्यात पूर्ण होऊ शकणार नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाला पीडीसीच्या माध्यमातून माल विकावा लागला काय? अशी विचारणा समितीने केली असता, पीडीसी व काही प्रमाणात मार्केटींग फेडरेशनकडूनही लिलाव झालेला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

या संदर्भात दिलेल्या सुधारीत उत्तरामध्ये असे नमूद आहे की, उर्वरित रु. १२५ कोटी रुपये भरडाईविना शिल्लक असलेल्या धानाची प्रतिपूर्ती न झाल्यामुळे त्यामध्ये गुंतून राहिली आहे. जेव्हा या बाबीचे हिशोब पूर्ण होऊन अभिकर्ताकडून रक्कम वसूल करण्यात येईल तेव्हा ती शासनास परत करण्यात येईल. ८० कोटी रुपये खर्च केलेले आहेत. ७१ कोटी रुपये गुंतले आहेत. एक टक्का रक्कम अनुज्ञेय होती असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

त्या व्यतिरिक्त विभागाने एफसीआयला अतिरिक्त १ टक्का रक्कम दिली. केंद्र शासनाची योजना विभाग राबवित आहे. Why did you give 1% more? अशी विचारणा महालेखाकारांनी केली असता, This 1% extra has no scientific basis. अनेक गोष्टींमध्ये केंद्र शासनाच्या निकषांच्या वर किंमत दिली जाते. उदा. गोडाऊनचे भाडे, भरडाईची रक्कम एक टक्क्यामध्ये होत नाही. एक टक्क्याचा बेस हादेखील सायंटिफिक नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

परिच्छेद क्र. ३.२.३ प्रापण केंद्रांचे कामकाज

२.४ या परिच्छेदासंदर्भात प्रत्येक धान खरेदी केंद्राच्या ठिकाणी आर्दता मापक यंत्र आहे असे सांगितले होते. मात्र तसे नव्हते असे मत समितीने व्यक्त केले असता, महामंडळाकडे कार्यरत ग्रेडरची संख्या कमी असल्याने ग्रेडरकडे एकापेक्षा अधिक खरेदी केंद्राचा कार्यभार होता. त्यामुळे प्रत्येक खरेदी केंद्राला स्वतंत्र आर्दता मापक यंत्र नव्हते. यापुढे प्रत्येक खरेदी केंद्रावर आर्दता मापक यंत्र उपलब्ध करून देण्यात येईल. मार्कफेडचा खुलासा आहे की, त्यांच्याकडे एक्सपर्ट्स होते, धान नाकारण्यात आलेले नाही या मालाची गुणनियंत्रकाकडून तपासणी करण्यात आली आहे. एफसीआयकडून प्रशिक्षण दिलेले गुणनियंत्रक आहेत. आता केंद्रावर विभागाचेच गुणनियंत्रक आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

What do you have to say regarding the issue of bonafide farmers? अशी विचारणा महालेखापालांनी केली असता, ७/१२ उताऱ्याची नोंदणी केली जाते व त्यानुसार त्यांच्या खात्यामध्ये रक्कम जमा केली जाते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

७/१२ चा नियम पूर्वी देखील फार कडक नव्हता. सन २००९ पासून ७/१२ चा नियम असेल मात्र तरी त्यानुसार धान खरेदीचे आदेश दिले जात नव्हते ग्रामीण भागातून अनेक शेतकरी येतात त्यांच्याकडून धान घेतले पाहिजे यामध्ये काही दुमत नाही. मात्र सन २००९ पासून या नियमाचे काटेकोरपणे पालन केलेले नाही. महालेखापालांचा आक्षेप योग्य आहे. नियम पूर्वीपासून आहेत. मात्र त्याची अंमलबजावणी नंतरच्या काळात सुरू झालेली आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, पीडीसीने असे नमूद केले आहे की, काही वेळा दबाव येतो त्यामुळे विना ७/१२ देखील काही ठिकाणी धान घेतले आहे. आता नियम कडक केलेले आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्र. ३.२.४ भाताची सडणी व तो FCI कडे पोहचविणे

२.५ सन २००९ ते २०१४ दरम्यान सडणी झालेली ५.८५ लक्ष क्विंटल भात गिरणीत पडून होता. ३.४८ लक्ष क्विंटल धानाबाबत काय ? ५.८५ लक्ष क्विंटल मधून ३ कोटी ४७ लाख क्विंटल सीएमआरवजा जाता उर्वरित २ लक्ष ३८ हजार क्विंटल सीएमआर शिल्लक असल्याचे दिसून येत नाही. काही प्रमाणात धान शिल्लक होते. याबाबत मोघम उत्तर दिलेले आहे. या संदर्भात सविस्तर स्पष्टीकरण पुढील बैठकीच्या वेळी देण्याबाबत समितीने सूचित केले. ३.४७ लाख क्विंटल सीएमआरचा हिशोब दिलेला आहे. मात्र २.३८ लक्ष क्विंटल सीएमआरचा हिशोब दिलेला नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाच्या हिशोबानुसार तो माल जमा झालेला आहे. विभागाकडे मिलरवाईज हिशोब आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ही बाब तपासून घ्यावी. सदर उत्तराने समितीचे समाधान होत नाही. या संदर्भात पुढील बैठकीत सविस्तर उत्तर द्यावे असे समितीने सूचित केले.

दिनांक ७ ऑगस्ट, २०१८ रोजी समितीने पुन्हा अन्न व नागरी पुरवठा विभागाचे विभागीय सचिव व विभागीय प्रतिनिधीची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी परिच्छेद क्रमांक ३.२.४ यामध्ये माहिती दिलेली आहे त्यामध्ये धानाची शुष्कतेमुळे अतिरिक्त झालेली हानी याबाबत नुकसान झालेले धान १ लाख ३३ हजार क्विंटल आहे. शुष्कतेमुळे त्या मालामध्ये अतिरिक्त घट आली. ही उणीव २ टक्क्यांच्या मर्यादेनंतरची आहे. याला जबाबदार कोण आहे? या नुकसानीची भरपाई

संबंधित संस्था किंवा अभिकर्त्यांकडून वसूल केली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये काही घट १ टक्क्यांपेक्षा जास्त आहे तर काही २ टक्क्यांपेक्षा जास्त आहेत. त्यासंबंधी विभागाला जी वसुली करावयाची आहे त्यासंबंधी हिशेब दिलेला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१ टक्क्यापर्यंत एफसीआय सूट देते. राज्य सरकारच्या वतीने १ टक्का म्हणजे विभागाने ३५ हजार कोटी रुपये सोसले आहेत. त्यानंतरची अतिरिक्त तूट १ लाख ३३ हजार क्विंटलची आहे. याचे प्रदान पणन महासंघाकडून घेतले आहे काय, एडीसीकडून घेतले काय किंवा त्या दलालकडून घेतले काय आणि घेतले नसल्यास काय झाले? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबतचा जो संपूर्ण हिशेब आहे त्याची माहिती सुधारित उत्तरामध्ये दिलेली आहे. २ टक्क्यांच्या वरचा सुद्धा त्यामध्ये समावेश आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

परिच्छेद क्र. ४.१ मध्ये शुष्कतेमुळे मध्ये नुकसान भरपाई वसूल न करणे असे म्हटले आहे. यामध्ये नुकसान ३.१ टक्क्यांच्या पुढे आहे. १ टक्का राज्य शासनाकडून देतो. १ टक्का एफसीआयकडून देतो आणि त्याशिवाय यामध्ये १.१ अतिरिक्त नुकसान झाले आहे. त्यामुळे ३ पाईन्ट आणि आणखी काही टक्का नुकसान झाल्यामुळे जवळपास १२१ लाखांपैकी सुमारे साडेतीन ते पावणेचार लाख मेट्रीक टन शुष्कतेमुळे घट झाली आहे. मूळ मुद्दा असा आहे की राज्य सरकारकडून १२१ लाख ३२ हजार क्विंटलची खरेदी मागील ५ वर्षांत म्हणजे सन २००९ ते २०१४ या कालावधीत केली आहे. राज्य सरकारने त्याची संपूर्ण रक्कम अदा केली आहे. त्यावेळी हे सर्व विभागाचे दलाल होते. त्यावेळी त्यांनी तितक्या मालाची पोहच केली नाही. या मालाचे पैसे त्यांच्याकडून घेणार की दलालाकडून वसूल करणार? कारण एका एका सोसायटीमध्ये १०-१० ते १५-१५ टक्के घट झालेली आहे. त्या लोकांनी घोटाळा केला आहे आणि तेच वारंवार या मालाची खरेदी करतात. त्या लोकांना बदलण्यात येत नाही किंवा त्यांना काळ्या यादीत टाकत नाही. विभागाला केंद्र सरकारच्या सूचनांप्रमाणे १ टक्का घट अनुज्ञेय आहे. परंतु विभागाने त्यांच्या मागणीप्रमाणे त्यांना २ टक्के घट मान्य केली असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये एकूण नुकसान १९ लाख ७१ क्विंटल आहे. यामध्ये शुष्कतेमुळे हानी सुद्धा आहे. त्यामुळे त्याचा आता हिशेब लागत नाही. ३ वर्षांसाठी २ टक्के घट मान्य केली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सरकारच्या त्या निर्णयावर समितीला प्रश्न विचारण्यात स्वारस्य नाही. पणन महासंघाकडे ८९ हजार क्विंटलची तूट आहे आणि आदिवासी विकास मंडळाकडे ४४ हजार क्विंटलची तूट आहे. या ४४ हजार क्विंटलपैकी १ कोटी ९४ लाख रुपयांच्या रकमेची वसुली केली आहे. समितीला सन २०१५ ची नाहीतर त्यामागील ५ वर्षांच्या कालावधीतील माहिती द्यावी कारण हा परिच्छेद फक्त २०१४ पर्यंतच्या माहितीशी संबंधित आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, सन २०१५ मध्ये १५१ क्विंटलची खरेदी झाली आहे. एकूण शिल्लक धान १९. ७१ लाख क्विंटल आहे. त्यातील शुष्कतेमुळे जी हानी झाली आहे ती यामध्ये समाविष्ट आहे. हा १२१ लाख क्विंटलचा हिशेब नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

म्हणजे १५१ मध्ये १९ लाख क्विंटलची तूट आहे. त्या तूटीबद्दल सीएमआर मिळाला नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, सीएमआर हा वेगळा आहे. गेल्या वेळी सुधारित उत्तर दिले होते. सीएमआरमध्ये २ वेळा सुधारणा केली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१९ लाखबद्दल काय उत्तर दिले आहे हे उत्तर पूर्णपणे बदलून टाकले आहे. हे सुधारीत उत्तर आता दिले आहे. पृष्ठ क्रमांक ८ वर जी माहिती दिली आहे त्यामध्ये शुष्कतेमुळे हानी एकूण १३३००० इतकी आहे. अभिकर्ता संस्थांकडे ३५३००० इतके धान पडून आहे तर गिरणीत पडून असलेला सीएमआर ५८५०००० आणि ई लिलावाद्वारे विकलेले ११४४००० क्विंटल इतके आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, जे १९ लाख क्विंटल धान शिल्लक राहिले त्याची किंमत २६० कोटी रुपये आहे. त्यापैकी १५.८१ क्विंटल हे टीडीसीकडे आहे. ३.८९ क्विंटल हे पणन महासंघाकडे आहे. असे मिळून १९.७१ क्विंटल होते. शिल्लक धानाची सीएमआरची किंमत २६०.८ कोटी होते. त्यापैकी टीडीसीकडे २०४.४८ इतके आहे तर पणन महासंघाकडे ५६.३५ इतके आहे. या दोन्हीची माहिती तक्त्यामध्ये दिली आहे. याची वसुली ३ माध्यमातून झाली आहे. ही चूक मान्य आहे. त्यामध्ये लिलावाद्वारे प्राप्त रक्कम ५० कोटी रुपये आहे. यामध्ये शिल्लक पॅडीचा लिलाव करण्यात आला होता. त्याचे ३५ कोटी तर मार्केटिंग फेडरेशनचे १४.३६ कोटी असे मिळून ते ५० कोटी रुपये होतात. त दुसरे म्हणजे जी १ टक्का चूक मान्य केली ती ६.७६ आहे ती १७.४६ झाली. अभिकर्ता संस्थांकडून वसूल केलेली रक्कम ६ कोटी आणि मार्केटिंग फेडरेशनचे १९ कोटी अशी मिळून २५ कोटी रुपये त्यांनी दाखविले आहे. हे सर्व मिळून १६८ कोटी रुपये शिल्लक राहतात असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

आता शिल्लक राहिलेल्या रकमेचे कसे करणार अशी विचारणा समितीने केली असता, शिल्लक राहिलेल्या रकमेसंबंधी तीन गोष्टी कराव्या लागतील. त्यामध्ये सर्व संस्थांना आणि सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना नोटीस काढावी लागेल. व त्या रकमेची किंवा शिल्लक धानाची जबाबदारी किती येईल ती त्या संबंधितांवर निश्चित करावी लागेल. त्यानंतर त्यांचे नोटीसीला आलेले उत्तर विचारात घेऊन आणि त्यावर निर्णय घेऊन त्यानंतर शिल्लक धानाची किंमत राईट ऑफ करावी लागेल. ही रक्कम निश्चित केल्यानंतर प्रपोशनेटली ती त्यांच्या विभागाच्या सल्ल्याने लागू करावी लागेल. याबाबतची कार्यवाही कोण करणार आहे आणि कधीपर्यंत करण्यात येईल २६० कोटींपैकी १६८ कोटी रुपये वसूल करण्यासंबंधी कोणते नियोजन केले आहे. अशी विचारणा समितीने केली असता, यासंबंधी नवीन उत्तर देऊन सर्व गौडबंगाल करून टाकले आहे. याबाबतची कार्यवाही पीडीसीने सुरू केली आहे. यामध्ये १६० कोटी रुपयांची वसुली शिल्लक आहे. २६० कोटी रुपयांपैकी १९.७१ लाख क्विंटलच्या धानाचा मुद्दा आहे. त्यातून लिलावाद्वारे प्राप्त झालेली रक्कम दाखविली आहे. लिलावामध्ये एकूण तूट १६८ कोटी रुपयांची आली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

एकूण तूट आली आहे ते बरोबर आहे. कारण विभागाने हजार रुपयाने धान्य खरेदी केले आणि २५० दराने विकले आहे. त्यामुळे तूट येईलच. त्या तुटीसंबंधी प्रत्येक बाबतीत सविस्तर आकडेवारीची इगतवारी करून द्यावी, असे केले की इतर बाकी रक्कम मिळेल. पण ही बाकी रक्कम येणारच नाही. कारण विभागाने ती रक्कम राईट ऑफ केली आहे. विभागाने हजार रुपयांमध्ये धान खरेदी केले आणि २५० रुपयांप्रमाणे ते विकून टाकले आहे. त्यामुळे विभागाला क्विंटलमागे ७५० रुपये तातडीने व थेट राईट ऑफच करावे लागतील. याचा विचार केला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये पीडीसीची तूट १४४ कोटी रुपये आहे तर अभिकर्ता संस्थांची तूट २३ कोटी रुपयांची आहे. यामध्ये सर्व आले असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाला ही सर्व रक्कम वसूल करावी लागेल. समितीला याबाबत जी माहिती आहे त्या दृष्टीने लिलावाद्वारे जे ५० कोटी रुपयांचे धान विक्री केले आहे त्याची मूळ किंमत किती होती आणि तो लिलाव करण्याचे कारण काय होते? कारण भरडाई ३-३, ४-४ वर्षे होत नव्हती आणि त्यामुळे संपूर्ण धान सडून गेले. त्यामुळे विभागाला जरी त्यातून ५० कोटी रुपये मिळाले असले तरी भरडाई न झाल्यामुळे आपल्याला किती रुपयांची हानी झाली आहे. कारण सरकारच्या मान्यतेच विभागास तो लिलाव करण्याची परवानगी देण्यात आली आहे. विभागाने ही रक्कम ताबडतोब १६८ कोटी रुपयांच्या हिशेबातून वजा केली पाहिजे होती. त्यामुळे आता नियोजन करण्याची गरज काय आहे. १६८ कोटी रुपयांचा प्रश्न पुढे येणारच आहे. यामध्ये दोन तीन मुद्दे स्पष्ट आहेत की ईएसआरमध्ये जाऊन काही उपयोग होणार नाही. सीएमआरची वसुली आणि अतिरिक्त शॉर्टेजची जबाबदारी व वसुली आणि त्यापलिकडे जाऊन उर्वरित धानाची विल्हेवाट कधी लागणार आहे आणि शेवटचा मुद्दा असा आहे की जे धान सडले आणि त्यातून अंदाजे ५० कोटी रुपयांचे नुकसान झाले. सर्व धान सडून गेले. हजार रुपये दराने खरेदी केलेल्या धानाची विक्री २०० ते २५० रुपयाने करावी लागली. त्यामुळे झालेल्या नुकसानीची जबाबदारी कोणावर निश्चित करणार याबाबत थोडक्यात माहिती द्यावी अन्यथा ते राईट ऑफ करु असे म्हणून प्रश्न सुटणार नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यावेळी ती कार्यवाही झाली नाही हे तर मान्यच आहे. टीडीसीने सर्व संस्था आणि संबंधित कर्मचाऱ्यांना नोटीस बजावली आहे. १६३ संस्थांना जबाबदार धरले आहे. त्यांच्या ५९ कर्मचाऱ्यांवर नोटीस बजाविण्याचे काम सुरू केलेले आहे. त्यांना दिलेल्या नोटीसीचे उत्तर देण्यासाठी १ सप्टेंबर २०१८ पर्यंत मुदत दिलेली आहे. १ सप्टेंबर २०१८ नंतर चौकशीचे आदेश काढले जातील आणि १ नोव्हेंबर २०१८ पर्यंत चौकशी पूर्ण होऊन दिनांक १५ नोव्हेंबर २०१८ पासून वसुलीचे आदेश काढण्यात येतील. त्यामध्ये सर्व बाबींचा समावेश असेल. मग त्यामध्ये डी. ई. असेल किंवा आर. आर. सी. असेल. लम्हणजे दिनांक २० नोव्हेंबऱ २०१८ नंतर डी. ई. किंवा आर. आर. सी. प्रमाणे वसुली करावी लागेल. संबंधितांनी नोटीसीला उत्तर दिल्यानंतर त्यांच्याविरुद्ध जेव्हा चौकशीचे आदेश काढण्यात येईल त्यामध्ये समजेल की त्यातून किती रक्कम राईट ऑफ करणे अपेक्षित आहे. कारण जबाबदारी किती आहे आणि नैसर्गिकरित्या ते देऊ शकत नव्हते किंवा ते वाचवू शकत नव्हते त्या पॅडीची रक्कम किती आहे हे निश्चित होईल. मार्केटिंग फेडरेशनची सविस्तर माहिती विभागाकडे आलेली नाही. मार्केटिंग फेडरेशनचे २३ कोटी ८० लाख म्हणजे त्यांचा ३.८९ लाख क्विंटलचे त्यांचे नुकसान आहे आणि त्यांना सुद्धा हीच प्रक्रिया स्वीकारावी लागेल. अधिकारी, कर्मचारी आणि संस्थांवर जबाबदारी निश्चित करून त्यांची डी. ई. किंवा आर. आर. सी. करायची ते ठरवावे लागेल. त्यांना नोटीस देऊन त्या नोटीसीचे उत्तर त्यांनी विहित कालमर्यादेत द्यावे असा कार्यक्रम त्यांना आखून दिलेला आहे. त्यांच्याकडून याबाबतची माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. मात्र टीडीसीने याबाबतची कार्यवाही सुरू केलेली आहे. त्यांनी काही वसुली सुद्धा केलेली आहे. पण विभागाकडे अद्याप ती जमा झाल्याचे दाखविण्यात आले नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

लिलावाद्वारे जे ५० कोटी रुपये मिळाले त्यामध्ये नेमके किती रकमेचे नुकसान झाले आहे, सरासरी हे नुकसान किती आहे अशी विचारणा समितीने केली असता, त्यामध्ये ८० कोटींचा लॉस झाला आहे. ७७० रुपये प्रती क्विंटल वगैरे. झाला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

९ लाख क्विंटल धान्य कसे काय होते ? कारण, ११ लाख ४४ हजार पूर्वीची आकडेवारी आहे अशी विचारणा समितीने केली असता, ही लिलावातील आकडेवारी आहे. परंतु, डिलेव्हरी दिलेली आकडेवारी ९ लाख क्विंटल आहे आणि त्यामध्ये सुद्धा नुकसान झालेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

९ लाख क्विंटल धान विकण्यात आले. त्यामध्ये ८० कोटी रुपयांचा लॉस झालेला आहे. कारण, ते धान ४ वर्षे बाहेर पाण्यात पडून होते. यामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टिकोनातून समितीने शासनाला शिफारस करण्याची आवश्यकता आहे. विभागामार्फत कोणत्या महिन्यात धानाची खरेदी केली जाते, खरेदी केलेला माल कोठे साठविण्यात येतो आणि माल वाहतुकीचे टेंडर झालेले आहे काय या तिन्ही गोष्टी तपासण्याची नितांत आवश्यकता आहे. धानाची खरेदी केल्यानंतर पोत्यांमध्ये भरलेला माल कोणत्या गोडावूनमध्ये पाठविला जाणार आहे हे ठरलेले नसते. त्यामुळे खरेदी केलेला माल तेथेच पडून राहतो. त्यानंतर ट्रान्सपोर्टेशनसाठी टेंडर काढले जाते, गोडावून शिल्लक नसतात आणि पावसामुळे किंवा दव पडल्यामुळे धान खराब होते. म्हणून खरेदी केलेला माल कोठे साठविण्यात येणार आहे हे प्रथम निश्चित करणे आवश्यक आहे. यामध्ये प्रामुख्याने दोन गोष्टी लक्षात घेण्यासारख्या आहेत. धान खरेदी केल्यानंतर ते ताबडतोब भरडाईसाठी पाठविले जात नाही. ते धान गोडावूनमध्ये साठविण्यात येते. त्यासाठी खरेदी केंद्रावरुन गोडावून पर्यंत धानाची वाहतूक करावी लागते. त्यानंतर गोडावूनमधील धान भरडाईसाठी गिरणीपर्यंत पाठविले जाते. त्यासाठी पुन्हा वाहतुकीचा खर्च करावा लागतो आणि त्यामुळे येणारी तूट या सर्व गोष्टी संदर्भात शिफारस करण्याची आवश्यकता आहे.

शासनाच्या निर्णय प्रक्रियेमध्ये बराच विलंब होतो. यावर्षी ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यात खरेदी सुरू करण्यात आली व मिलिंग चार्जेस फेब्रुवारी महिन्यात देण्यात आले. मिलिंग चार्जेस देण्यासाठीच ४-४ महिने लागतात. खरे म्हणजे ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यात खरेदी केल्यानंतर २ टक्के तूट येत नाही. फेब्रुवारी महिन्यापर्यंत जी तूट यायची ती येते. परंतु, फेब्रुवारी महिन्यात अभिकर्त्यांना पुन्हा २ टक्के देण्याची आवश्यकता नाही. ताबडतोब मिलिंग करून घेतले, सीएमआर किंवा डीसीपीमध्ये वाटप करून दिले तर २ टक्के सुद्धा तूट येणार नाही. दुसरा मुद्दा असा आहे की, विभागाला आदिवासी भागात धान खरेदी करावे लागते. तेथे गोडावूनची अडचण होती. परंतु, २-३ वर्षे धान पडून राहिले आणि तो भ्रष्टाचाराचा अड्डा झाला. तेथील चांगला माल काढून घेतला गेला आणि तेथे दुसरा माल ठेवला गेला आणि नुकसान सुद्धा झाले. यामध्ये टीडीसीच्या सर्व सब एजंटचा सहभाग आहे आणि विभागाच्या अधिकाऱ्यांनी गॅरंटी न घेता मिलर्सला संपूर्ण माल दिला. त्यामुळे सीएमआरचा माल अडकला. भंडारा येथील मार्केटिंग मधील घोळ वगळता इतर ठिकाणी मार्केटिंगमध्ये कमी घोळ आहे. परंतु, टीडीसीमध्ये खूप घोळ झालेला आहे. टीडीसी विभागाचे सचिव मार्केटिंग असो किंवा टीडीसी असो, ते एजंट म्हणून काम करतात. शेवटी राज्य शासनाच्या निधीची जबाबदारी निश्चित केली पाहिजे. वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून कनिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत ज्या लोकांनी वेळेवर कार्यवाही केली नाही, मग सचिव असतील, एमडी असतील, त्यांनी विभागाकडे फाईल पाठविली तर विभाग २-२ वर्षे उत्तरच देत नाही, त्यामुळे कार्यवाही झालेली नाही. समितीला सांगण्यात आले की, आता सीएमआरचे पैसे टाईमबार झालेले आहेत. विभाग एफआयआर दाखल करतो. परंतु, संबंधित लोक जामीन मिळवितात. त्यामुळे त्यांना भिती वाटत नाही.

विभाग जी बँक गॅरंटी घेतो त्याचे नूतनीकरण केले जात नाही. यामध्ये १०० ते १५० कोटी रुपयांचा घोटाळा झालेला आहे. म्हणून विभागाने वरिष्ठ पातळीपासून कनिष्ठ पातळीपर्यंत संबंधिताना जबाबदार धरलेच पाहिजे. आता ८ लाख क्विंटल धानाच्या सीएमआरची वसुली बाकी आहे. विभाग ती आकडेवारी कमी करणार असेल तर ती समितीला दाखवावी. त्याच बरोबर ॲडिशनल शॉर्टेज आहे. सोसायटीच्या लोकांनी अपहार केलेला आहे. त्यांनी टीडीसीला माल दिलाच नाही. आता जो साठा शिल्लक आहे त्यामध्ये ते ॲडजेस्ट करून देतील. आता १६८ कोटी रुपयांपैकी काही रक्कम वसूल झालेली आहे. परंतु, ऊर्वरित रक्कम वसूल होईल किंवा नाही याबाबत साशंकता आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, एकूण २६० कोटी रुपयांपैकी ९२ कोटी रुपये वसूल झालेले आहेत. आता १६८ कोटी रुपये शिल्लक आहेत. यामध्ये सीएमआरच्या रकमेचा समावेश नाही. सीएमआरची रक्कम ७४ कोटी रुपये आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

म्हणजे १६८ कोटी अधिक ७४ कोटी रुपये वसुली बाकी आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाने सन २०१७-१८ मध्ये ऑनलाईन प्रक्रिया सुरू केली. त्यामध्ये डीसीपी सुद्धा आहे. विभागाकडून सिझन १५-१५ दिवसांनी पुढे आणण्यात आला. त्यामुळे २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये जवळपास ९६ ते ९८ टक्के मिलिंग झाले. डीसीपी झाल्यामुळे मालाचा खप होत आहे. विभागाने मागील वर्षी विदर्भातील बाहेरच्या जिल्ह्यात देखील धान पाठविले होते. परंतु, यावर्षी कमी धान मिळाल्यामुळे ते बाहेर पाठविणे शक्य झाले नाही. विदर्भातील सर्व जिल्ह्यातील धान संपविले आहे. पूर्वी ऑनलाईन प्रक्रियेसंदर्भात सादरीकरण समितीसमोर करण्यात आले होते. विभागाने हुंडी पद्धत बंद केलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

गडचिरोली जिल्ह्यात गोडावूनची अडचण आहे. मध्यंतरी गडचिरोली जिल्ह्यातील हजारो क्विंटल धान पाण्यात भिजत असल्याची बातमी वर्तमानपत्रात छापून आली होती. असे प्रकार होऊन शासनाचे नुकसान होऊ नये यासाठी काळजी घेण्याची आवश्यकता आहे असे समितीने सूचित केले असता, आता संपूर्ण सीएमआर पाठविलेला आहे. त्यामुळे आता सीएमआरचा मुद्दा राहिलेला नाही. सन २०१६-१७ मध्ये ऑनलाईन पेमेंट करणे शक्य झाले नाही. परंतु, सन २०१७-१८ मध्ये शेतकऱ्यांना शंभर टक्के ऑनलाईन पेमेंट केले, सर्वांना ऑनलाईन पद्धतीने बोनस देण्यात आला. आता मिलर्स आणि ट्रान्सपोटर्सचे पेमेंट ऑनलाईन पद्धतीने करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. सॉफ्टवेअर सिस्टीमध्ये ती कॅपॅबिलिटी आहे. डाटा एन्ट्री बरोबर झाली तर त्यांचे पेमेंट सुद्धा ताबडतोब करणे शक्य आहे. मागील २ वर्षापासून यामध्ये सुधारणा करण्यात येत आहे. डीसीपी झाल्यामुळे फायदा झालेला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून डाटा एन्ट्री करून घेणे शक्य आहे असे समितीने सूचित केले असता, डाटा एन्ट्री संबंधित सेंटरवरील लोकांनीच करावयाची आहे. तसेच, मोबाईल डिव्हाईस सुद्धा आहे. साधा फॉर्म असल्यामुळे मोबाईल डिव्हाईसद्वारे सुद्धा एन्ट्री होऊ शकते. गोडाऊन, मिलर्स व सेंटर अशा तीन ठिकाणी डाटा एन्ट्री होते. धान कशा प्रकारे येते, ते सीएमआरमध्ये कसे कन्व्हर्ट होते आणि विभागाच्या गोडावूनपर्यंत कसे पोहोचते हे दिसते. मागील २ वर्षापासून ही सिस्टीम व्यवस्थित सुरू आहे. विभागाने शेतकऱ्यांना ऑनलाईन पेमेंट दिलेले आहे. आता ट्रान्सपोर्ट, मिलर्स यांचे पेमेंट सुद्धा त्यातून व्हावे यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अभिकर्ता संस्थांकडून वसूल केलेली रक्कम २५.९४ असल्याचे लेखी माहितीमध्ये नमूद केले आहे. त्यांच्याकडे २६० कोटी रुपयांचा माल होता. विभागाला एकूण ९२ कोटी रुपये मिळाले आणि १६८ कोटी रुपये शिल्लक राहिलेले आहेत. आता १६८ कोटी रुपयांच्या अगेन्स्ट विभागाच्या दोन्ही एजंटकडे काही माल शिल्लक आहे काय ? आज रोजी धानाचा लिलाव करणे बाकी आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांनी यापूर्वीच त्यांच्या संस्थांकडून वसुली केलेली आहे. परंतु, आता आणखी वसुली करावयाची आहे. आता लिलाव झालेला आहे, सीएमआर झालेले आहे. धानाचा लिलाव करणे बाकी नाही. आता सन २००९ ते २०१४ मधील कोणतेही धान शिल्लक नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

म्हणजे आता विभागाचे १६८ कोटी व ७४ कोटी अशा २४२ कोटी रुपये बुडीत समजायचे काय? अशी विचारणा समितीने केली असता, त्यापैकी ३० कोटी रुपये वसूल झालेले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ती आकडेवारी सुद्धा चुकीची आहे. ज्यांनी पैसे दिलेच नाहीत त्यांचे पैसे जमा केलेले आहेत. ते अकाऊंट दुरुस्त करण्यात यावे. काही लोकांकडून पैसे जमा करावयाचे होते. परंतु, त्यांच्याकडून पैसे आले नाहीत तरी सुद्धा ते जमा केल्याचे दाखविले गेले याबाबतचे रेकॉर्ड दुरुस्त करण्यात यावे. समितीकडे या संदर्भातील माहिती आहे. सीएमआरच्या निधीचे काय या संदर्भात केवळ एफआयआर दाखल करून काहीही होणार नाही. एफआयआरचा ड्राफ्ट देखील बरोबर झालेला नाही. ते कशा प्रकारे इफेक्टीव्ह करावयाचे हे बघितले पाहिजे. कारण, शासनाचे पैसे बुडता कामा नयेत. यासाठी खाजगी वकिलाची नियुक्ती करावी. कारण, सरकारी वकिलाच्या भरवशावर हे होणार नाही. म्हणून खाजगी वकिलाची नियुक्ती करून त्यांना ५-५० लाख रुपये फी द्यावी. सरकारी वकील कोर्टात वेळेवर उपस्थित सुद्धा राहत नाहीत. आता ५-६ वर्षे झालेले असल्यामुळे हे पैसे वसूल होतील काय ? हे प्रकरण विभागाकडे पाठवून यासाठी खाजगी वकिलाची नियुक्ती करून घ्यावी. कोर्टात गेल्यानंतर हे सर्व होईल. परंतु, अद्याप ती प्रक्रियाच सुरू झालेली नाही. प्रक्रिया सुरू करण्यासाठी सुद्धा वकिलाची मदत घ्यावी लागेल. म्हणजे एफआयआर दाखल करण्यापासून कोर्टात अहवाल सादर करण्यासाठी सुद्धा वकिलाची मदत घ्यावी लागेल. कारण, शासकीय वकिलाच्या भरवशावर काहीच होणार नाही. सीएमआरचे अंदाजे ४५ ते ५० कोटी रुपये बाकी आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, एकूण ७६ कोटी रुपये आहेत. त्यापैकी २९ कोटी रुपये वसूल झाले असून ४६ कोटी रुपये शिल्लक राहिलेले आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

आकडेवारी सांगताना अंदाजे असा शब्द प्रयोग करावा. कारण, आकडेवारी चुकीची आहे. अंदाजे ४५ ते ५० कोटी रुपये बाकी आहेत. ही रक्कम वसूल करण्याबाबत कोणते नियोजन केलेले आहे ? कारण, ही रक्कम बुडता कामा नये. शासनाचे पैसे वसूल झाले पाहिजेत. त्या दृष्टीने विभाग कोणती कार्यवाही करणार? समितीला त्याची फलश्रुती दिसली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, ५५ मिलर्सचे शंभर टक्के समायोजन झाले आहे. टीडीसीकडे ४८ मिलर्स आहेत. ४८ आणि ७ अशा ५५ मिलर्सचे शंभर टक्के समायोजन झालेले आहे. अंशतः वसूल झालेले २८ मिलर्स आहेत. म्हणजे एकूण ८३ मिलर्सकडून वसुली झालेली आहे आणि २० मिलर्सकडून शून्य वसुली झालेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्या मिलर्सकडून पार्ट पेमेंट वसूल झालेले आहे त्यांच्याकडे बरीच वसुली बाकी आहे. २० मिलर्सकडून वसुली का झाली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, किती रक्कम आहे याची माहिती विभागाकडे आहे. सर्वांवर एफआयआर दाखल केलेला आहे. त्यांना सेक्शन्स सुद्धा सांगितले होते असे विभागीय सचिवांनी अवगत केले. परंतु, सर्वांना अँटीसिपेटरी बेल सुद्धा मिळालेली आहे असे समितीने निदर्शनास आणले असता अँटीसिपेटरी बेल व्हॅकेट करावयास पाहिजे असे संबंधितांना सांगितले आहे. त्यासाठी खाजगी वकील देण्याबाबत सुद्धा कळविण्यात आले आहे, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ज्या प्रकारे आपला एफआयआर आहे त्यामध्ये त्यांची अँटीसिपेटरी बेल रद्द होणारच नाही. या संदर्भात सचिव स्तरावरुन डायरेक्शन्स देण्याची आवश्यकता आहे. कारण, ते स्थानिक स्तरावर योग्य प्रकारे केस हाताळत नाहीत असे मत समितीने व्यक्त केले असता, ते ॲडिशनल माहिती देऊ शकतात, ॲडिशनल एफआयआर करु शकता, ती सुद्धा त्यांनी करावी. जी काही वसुली झालेली आहे ती २०१८ मध्येच झालेली आहे. समितीने रेटा लावल्यामुळे सन २००९ ते २०१४ या कालावधीतील २९ कोटी रुपये यावर्षी वसूल झालेले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जे लोक सुटलेले आहेत ते बिनधास्त आहेत. त्यांच्याकडून एक रुपया सुद्धा वसूल करु शकत नाही असे त्यांचे मत आहे. असे निदर्शनास आणून एकूण ४८ मिलर्स आहेत, २० मिलर्सकडून वसुली का होऊ शकली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, आरआरसीमध्ये काही शिल्लक आहे. त्यांनी शंभर टक्के आरआरसी करणे गरजेचे आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

गोंदिया, भंडारा जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांनी आरआरसी संदर्भात कोणतीही कार्यवाही केली नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, याबाबत विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना पत्रे दिलेली आहेत. विभागाकडे त्याची यादी आहे. यासंदर्भात मंत्री महोदयांनी देखील पत्र दिलेले आहे. मंत्री महोदयांच्या व विभागाच्या स्तरावरुन एकूण २० पत्रे पाठविण्यात आलेली आहेत. सप्टेंबर, २०१७ मध्ये पहिले पत्र दिलेले आहे. २-४ दिवसांपूर्वी देखील पत्र दिलेले आहे याबाबत त्यांच्याकडून उत्तरे येतात. विभागाने रेटा लावल्यामुळेच एवढी वसुली झालेली आहे. पत्राची उत्तरे देखील मिळतात. परंतु, त्यांना पूर्ण लक्ष देऊन हे काम करावे लागेल. समितीने सांगितल्याप्रमाणे अँटिसिपेटरी बेल व्हॅकेट करावयास पाहिजे, शंभर टक्के आरआरसी करावयास पाहिजे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कोणत्या जिल्हाधिकाऱ्यांनी कार्यवाही केलेली नाही ? गोंदिया, भंडारा व चंद्रपूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आहेत. समितीने जिल्हाधिकाऱ्यांना समिती समोर साक्षीसाठी बोलावून त्यांच्याकडून प्रोग्राम घेतला पाहिजे. तसेच, या संदर्भात मार्केटिंग फेडरेशनची काय भूमिका आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, एकूण १२ कोटी ७४ लाख रुपयांपैकी केवळ ३७ लाख रुपये वसुली झालेली आहे. १२ कोटी ३७ लाख रुपये वसुली बाकी आहे. त्यांनी शंभर टक्के लोकांवर आरआरसी आणि एफआयआर दाखल केलेला आहे. आता १२ कोटी ३७ लाख रुपये शिल्लक राहिलेले आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मार्केटिंग फेडरेशनचे व्यवस्थापकीय संचालक हे नाफेड येथे बैठक असल्यामुळे ते समिती समोर साक्षीसाठी उपस्थित राहू शकले नाहीत. मार्केटिंग फेडरेशनचे व्यवस्थापकीय संचालक समितीला महत्त्व देत नाहीत. ते मागील बैठकीस उपस्थित नव्हते आणि आजच्या बैठकीस सुद्धा उपस्थित नाहीत असे समितीने निदर्शनास आणले असता, या संदर्भात पणन विभागाकडे ८ मिलर्स आहेत. एकूण १२ कोटी ७४ लाख रुपये रक्कम आहे. एका मिलरकडून ३७ लाख रुपये वसूल झालेले आहेत. आता ८ मिलर्सकडून वसुली होणे बाकी आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

भंडारा जिल्ह्यातील स्थानिक अधिकारी सांगतात की, केवळ समायोजन करावयाचे बाकी आहे, समायोजन केल्यानंतर हा विषय पूर्ण होईल, अशी परिस्थिती आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागाला तसा अहवाल मिळालेला नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मार्केटिंग फेडरेशनच्या व्यवस्थापकीय संचालकपदी श्री. मसे आहेत. व्यवस्थापकीय संचालक बैठकीस अनुपस्थित असल्यामुळे समितीने नाराजी व्यक्त केली. व्यवस्थापकीय संचालक मागील बैठकीस उपस्थित नव्हते आणि बैठकीस सुद्धा उपस्थित नाहीत. मार्केटिंग फेडरेशन या विषयाकडे खूप दुर्लक्ष करीत आहे, त्यांनी दिरंगाई केलेली आहे असे निदर्शनास आणून वसुली संदर्भात समितीने विभागीय सचिवांचे मत विचारले असता, मार्केटिंग फेडरेशन संचालकांनी अशी माहिती दिलेली आहे की, एकूण ८ मिलर्सपैकी ४ मिलर्सची वसुली समायोजनानंतर संपू शकेल. एकाच व्यक्तीच्या ४ मील आहेत. ३ मिलर्सकडून शून्य वसुली झालेली आहे. त्यांना त्यांच्याकडून वसुली करावीच लागेल. एका मिलर्सकडे केवळ ६७ हजार रुपये आहेत. ती रक्कम ते वसूल करतील असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

ते १५ दिवसात संपूर्ण वसुली करतील काय ? अशी विचारणा समितीने केली असता, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या प्रधान सचिवांनी सांगितले की, मार्केटींग फेडरेशनला एकूण ६८ कोटी ७२ लाख रुपयांपैकी १२ कोटी ३७ लाख रुपये मिलर्सकडून बँकेला येतात. धानाच्या तुटवड्याचा आकडा अन्न व नागरी पुरवठा विभागाने प्रस्तावित केला आहे. त्याचा लिलाव १४ कोटी ३६ लाख रुपये मिळेल. परंतु कमी रेट मिळावा व नेट रक्कम मिळाली आहे. ५६ कोटी ३६ लाख हे वजा केले आणि १२ कोटी ३६ लाख हे मिलर्सचे आहेत. मार्केटींग फेडरेशनप्रमाणे जबाबदारी निश्चित करताना १ कोटी १२ लाख हे एफआयआरच्या सेक्शनप्रमाणे दिलेले आहेत. एफआयआर म्हणजे विभागाला हे सांगावे लागते की, जे गुन्हे आहेत म्हणजे त्यांनी विभागाला एवढे सीएमआर दिले तर विभागाला पैसे किंवा धान मिळवून द्यावे असे वाटते. त्यांनी बाजारात विक्री केली असावी. तर हा गुन्हा तयार होत नाही. एफआयआर सुधारित करण्यासंबंधी विभागाने त्यांना सूचना दिलेली आहे. कारण एफआयआर मध्ये काही पणन विभागाने गुन्हे गृहीत धरले आहेत असे पणन विभागाच्या सचिवांनी सांगितले.

जे कोणी अधिकारी आहेत त्यांची एफआयआर दाखल झाली पाहिजे. समिती सदस्य या सिस्टिममध्ये रोज काम करतात. गुन्हेगारी हा शब्द नाहीतर मग ते ग्रेडर सर्व एकच येतील असे मत समितीने व्यक्त केले असता, १५ दिवसात तो एफआयआर दुरुस्त करून देण्यात येईल. TDC मध्ये विभागाने नावानुसार तीन सेक्शन केले आहेत. एक म्हणजे कंबाईन इंटेंट, हे फ्रॉड आहे म्हणजे तो सपोर्टेटेंडींग एरिया आहे. त्यांनी शासकीय मालमत्ता स्वतःची समजून विकलेली आहे. तसेच गुन्हा दाखवणे. कारण ही रिलेटेड शासकीय मालमत्ता आहे आणि त्यांनी ती स्वतःची दाखवलेली आहे. ईओडब्ल्युला विचारुन त्यामध्ये हे तीन सेक्शन घातलेले आहेत. त्यामुळे हे सेक्शन स्ट्रॉंग आहेत पण त्याला डिस्ट्रिक्शन पाहिजे ते बरोबर नाही असे अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या सचिवांनी सांगितले.

सेक्शन बरोबर आहेत. विभागाने कोणते डाक्युमेंट तयार केले हे त्यांना माहितच नाही असा आरोप लावण्यात येतो. याचा प्रक्रियेपासून विचार केला असता, कोणता व्यक्ती कधी तो इश्यु करतो हे असता वाचले. एकतर बँक गॅरंटी इश्यु करावी किंवा ॲडव्हान्स सीएमआर इश्यु करावा. ॲडव्हान्स सीएमआर बिल येण्याच्या पूर्वी इश्यु केला तर त्याच्या अगेन्स्ट पॅडी दिला किंवा बँक गॅरंटी इश्यु केला तर ठिक होते. परंतु हे दोन्ही मिस केलेले आहे. ज्याने हे इश्यु केले आहे तो व्यक्ती यामध्ये सहभागी नसेल कारण त्याने ॲडव्हान्स सीएमआर ही घेतला नाही. विभाग ज्याच्यावर आरोप लावतो त्याने एका दिवशी पावती घेतलेली आहे आणि माल घेतलेला आहे. १५ दिवसात एफआयआर दुरुस्त करून घेण्याता येईल असे पणन विभागाच्या सचिवांनी सांगितले.

विभाग त्या व्यक्तीला जेव्हा भरडाईसाठी धान देतो त्यानंतर स्टाफ व्हेरिफिकेशन करीत नाही. नियमाचे पालन कोठेही झालेले नाही, कोणतीही बँक गॅरंटी घेतलेली नाही. त्यांना तसाच माल देऊन टाकला म्हणून आज ही अडचण आलेली आहे. टीडीसीने दोन कर्मचाऱ्यांना निलंबीत केले आहे. ज्या अधिकाऱ्यांनी बँक गॅरंटी घेतली नाही त्यांच्यावर विभागाने कारवाई केली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, श्री. शहारे यांना तत्कालीन प्रादेशिक भंडारा कार्यालयाकडून निलंबीत केले आहे. श्री. ऐरमे आणि श्री. राठोड या कर्मचाऱ्यांना टीडीसीने निलंबीत करून त्यांची विभागीय चौकशी सुरू केली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्या कर्मचाऱ्यांना निलंबित करूनही चौकशीसाठी पुन्हा ६ महिने लागले असतील. ज्याप्रमाणे पणन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, १५ दिवसाच्या आत एफआयआरची दुरुस्ती करण्यात येते. त्याप्रमाणे आता टीडीसीबद्दल कोण कारवाई करणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडे एकूण ८७ मिलर होते त्यापैकी ४२ लोकांचे समायोजन झालेले आहे. अजून ५१ एफआयआर दाखल करावे लागले. यानंतर त्यांनी काही अर्ज दिलेले आहेत. तेथील पब्लिक प्रोसिक्युटर आणि विभागाने एक वकील दिलेला आहे. गडचिरोलीमध्ये ४ लोकांनी अँटीसिपेटरी जामिन घेतलेली आहे. तो जामिन रद्द करण्यासाठी विभागाने उच्च न्यायालयामध्ये विभागाचा वकील नेमलेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ज्याप्रकारे एफआयआर इफेक्टीव्ह नाही तर पणन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितल्याप्रमाणे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने काही कार्यवाही केली आहे काय ? एफआयआरची जी तक्रार होती ती झाली काय ? अशी विचारणा समितीने केली असता, एफआयआरमध्ये काही त्रुटी असतील तर त्या दुरुस्त करून समोरची परिस्थिती एफआयआर दाखल करण्यासारखी असेल तर कोणीही एफआयआर दाखल करु शकतो. काही तक्रारींची प्राथमिक माहिती घेऊन त्या तक्रारी एफआयआरमध्ये रुपांतरीत झाल्या आहेत. गृह विभागाला सुद्धा विभागाने पत्र दिलेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

कृषी व पणन विभाग, आदिवासी विभाग आणि गृह विभाग या चार ही विभागांच्या सचिवांची एकत्र बैठक अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या सचिवांसमवेत घेण्यात येऊन एक चांगल्या प्रकारचा वकील नेमण्यात यावा. कारण शेवटी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाची जबाबदारी आहे, टीडीसी आणि माध्यमिकच्यावर अवलंबून चालणार नाही. या पैशाची चांगल्याप्रकारे कशी वसुली करता येईल हे पाहिले पाहिजे. या सर्वांची एकत्रित बैठक घेऊन या सर्व प्रक्रियेमध्ये थोडे पुढे गेले तर काही निष्पन्न होईल नाहीतर हे पैसे मिळणारच नाही तर ते बुडतील. या पद्धतीने कार्यवाही करून एक महिन्यानंतर समितीस कळवावे. पण एक महिन्यानंतर या सर्व विषयाची कार्यवाही करून जेवढ्या जिल्हाधिकाऱ्यांकडे विभागाने आरआरसी सांगितली आहे त्या सर्वांना बैठकीला बोलविण्यात यावे. या विषयावर कडक कार्यवाही करून या चारही विभागाचे सचिव आणि अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने नेमलेला वकील यांनी टीडीसी व मार्केटींगचा पण विषय बघायचा. कारण याची प्रक्रिया सारखीच आहे आणि ज्यांचे समायोजन होत असेल तर त्याबाबत समितीची काही हरकत नाही. पण ज्यांचे समायोजन होत नसेल त्यांच्यावर कार्यवाही करावीच लागेल. पण पैसे देण्याची गरज पडणार नाही, ही जी मानसिकता झालेली आहे या दृष्टीने काळजी घेऊन विभागाची केस कमजोर होऊ नये यासाठी बैठक घेऊन निर्णय करावा आणि सरकारचे पैसे वसूल झाले पाहिजे या दृष्टीने कार्यवाही करावी. जे अधिकारी यामध्ये जबाबदार आहेत किंवा त्यांच्यामुळे निर्णय देण्यात व कार्यवाही करण्यामध्ये विलंब झालेला आहे ते सर्व यामध्ये जबाबदार आहेत त्या सर्वांची जबाबदारी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागात, टीडीसीमध्ये निश्चित केली पाहिजे. या सर्व सूचनांबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला पुढच्या बैठकीमध्ये देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, आधी तो दर ५. ८५ टक्के होता आता ३.४१ टक्के झालेला आहे. तो विभागाने जमा केलेला आहे आणि त्याचा हिशोब पण विभागाकडे आहे. पुढचा सीएमआर दिलेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

समितीने पुन्हा दिनांक ११ ऑक्टोबर २०१८ रोजी विभागीय सचिव व विभागीय प्रतिनीधींची साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी मागच्यावेळी परिच्छेद क्र. ३.२.४ बद्दल चर्चा केलेली आहे. या परिच्छेदामध्ये ५ लाख ८५ हजार क्विंटल राईस मिलर्सकडून घेणे प्रलंबित होते. त्याची सध्याची परिस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, मागच्या बैठकीच्यावेळी पण सांगितले होते की, ते ५ लाख ८५ हजार क्विंटल राईस नव्हता तर ३ लाख २९ हजार क्विंटल होते. त्याचा हिशोब विभागाने घेतला आहे तर सन २०१४-१५ नंतरचे सीएमआर एफसीआयकडे जमा झाले आहेत, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

भात गिरणीत पडून असलेल्या सीएमआरच्या समप्रमाणात धान एकूण ८.७३ लक्ष क्विंटल आहे आणि प्राप्त झालेल्या धानाची बेरीज १२१.३२ दाखवली आहे. तर ८.७३ लक्ष क्विंटलच्या समतुल्य ५.८५ लक्ष क्विंटल होईल, असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, समितीचे मत बरोबर आहे. पण त्या नंतरच्या कालावधीमध्ये सीएमआर जमा झाला, याची खात्री केली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मग एफसीआयला पाठविलेल्या सीएमआरच्या समप्रमाणात धान याचा आकडा ९४.८६ लक्ष क्विंटल आहे तो विभागाने बदलला पाहिजे असे समितीने सूचित केले असता, ऑडिटच्या कालावधीमध्ये सीएमआर शिल्लक होता. नंतर तो जमा झाल्यानंतर ३.२९ लक्ष क्विंटल शिल्लक आहे, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

एफसीआयला पाठविलेल्या सीएमआरच्या समप्रमाणात धान याचा आकडा ९४.८६ लक्ष क्विंटल आहे हा फरक २.५६ च्या तुलनेमध्ये धानाची जेवढी क्वांटीटी होईल तेवढे ते वाढेल. ३.२९ धान शिल्लक आहे तर याच्या वसुलीची काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने समितीला सादर केलेल्या पुस्तकामध्ये दोन पानांची माहिती नवीन पाठवली आहे. त्यामध्ये शिल्लक सीएमआरची सद्यःस्थिती दिलेली आहे. तिथे दिलेल्या तक्त्यामध्ये शिल्लक सीएमआरची किंमत ७६ कोटी २२ लाख रुपये आहे. यापैकी ईएमडी व मिलींगमधून जमा झालेली वसुली समायोजनन करून टीडीसीच्या ६३.४८ कोटी पैकी २९.०५ कोटी रुपये वसुल झाले आहेत. मार्केटींग फेडरेशनमधील १२.७४ कोटी रुपयांपैकी ७.७९ कोटी रुपये वसुल झाले आहेत, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मिलर्सच्या प्राप्त देयकातून ईएमडी व मिलींगधून होऊ शकणारी वसुली आहे. होऊ शकणारी आणि समायोजन म्हणजे It is a only books adjustment. त्यांना धान भरडई केली तर सूट देण्यात येते. धान भरडई करून डिलेव्हरी घेतली तर सूट ॲप्लिकेबल होते, असे मत समितीने व्यक्त केले असता, त्या मिलर्सनी पुढे पण कामे केलेली आहेत त्यांच्या कामाच्या बिलातून ईमडीतून जे वसूल होऊ शकले त्याचे पेमेंट न दाखवता फक्त पेड अशी ॲडजेस्टमेंट दाखवायची. असे मिलर्सकडचे २९.०५ कोटी रुपये आहेत आणि फेडरेशनकडचे ७.७९ कोटी रुपये आहेत. मिलर्सच्या प्राप्त देयकातून, ईएमडी व मिलींगमधून होऊ शकणारी वसुली व समायोजन हे सर्व मिळून ३६.८४ कोटी रुपये वसुल झाले आहेत. मिलर्सकडून शिल्लक असलेली वसुली ३९.३८ कोटी रुपये आहे. यामध्ये १०० टक्के समायोजन होणारे टीडीसीमध्ये ४८ मिलर्स आणि फेडरेशमध्ये १२ मिलर्स म्हणजे असे एकूण ६० मिलर्स आहेत. पुढच्या सिझनला विभाग या मिलर्सना एनओसी देऊ शकतो. अंशतः वसुली झालेले टीडीसीमध्ये २७ मिलर्स, फेडरेशनमध्ये १ मिलर्स असे एकूण २८ मिलर्स आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अशंतः वसुली झालेल्या मिलर्सचा काही विषय नाही. ४६ लोकांची वसुली थकबाकी आहे. याचे विभाग काय करणार ? अशी विचारणा समितीने केली असता, माहितीमधील मुद्दा क्र. ३ मध्ये असे दिले आहे की, टीडीसीचे अंशतः वसुली असलेले २७ आणि शून्य वसुली/समायोजन असलेले १२ मिलर्स असे एकूण ३९ मिलर्स यांच्यावर एफआयआर दाखल केलेला आहे. तसेच ४६ मिलर्सवर आरआरसीची कार्यवाही केली आहे. ज्या मिलर्सची अशंतः आणि पूर्ण वसुली बाकी आहे त्यांच्यावर आरआरसीची कार्यवाही आणि एफआयआर पण दाखल केलेला आहे, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मिलर्सकडे शिल्लक असलेली वसुली ३८.३९ कोटी रुपये दाखवलेली आहे. यासंदर्भात ३९ मिलर्सवर एफआयआर कधी दाखल झाला आहे ? एफआयआरमध्ये विभागाने त्यांच्यावर काय आरोप केले होते ? एफआयआर दाखल करणारे सरकारी प्रशासन आहे तर कोणत्या दर्जाच्या अधिकाऱ्यांनी ते एफआयआर दाखल केले आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, डीएमओने एफआयआर दाखल केले आहेत. प्रत्येक जिल्ह्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी मिलर्स आहेत त्या ठिकाणी एफआयआर दाखल झाले आहेत. एफआयआर दाखल करण्याची तारीख मार्च महिन्यापासून सुरू होते आणि जुलै ते ऑगस्ट महिन्यापर्यंत असते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या विषयामध्ये असंबद्ध उत्तर देऊन समितीचे समाधान होणार नाही म्हणून वारंवार याबाबत बैठक घेतली जात आहे. बैठकीला आदिवासी विकास विभाग आणि पणन विभागाचे सचिव उपस्थित आहेत. या विषयामध्ये फक्त औपचारीकता करण्याचे काम झालेले आहे. कारण समितीने एफआयआर का केला असे विचारले. मागच्या बैठकीला श्री. विजयकुमार उपस्थित होते ते म्हणाले की, एफआयआर चुकीचा आहे हे त्यांनी बैठकीमध्ये स्वीकारले. दुसरा मुद्दा असा आहे की, सर्व लोकांनी जामीन घेतली आहे. कारण त्यांचे वकील म्हणतात की, सिव्हिल केस आहे त्यामुळे विभागाला पैसे द्यायचे नाही म्हणून जे लोक पैसे देऊ शकतात ते पण देत नाहीत. या सर्वांची आरआरसी झाली असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले पण समितीच्या माहितीप्रमाणे याची आरआरसी झालेली नाही. त्यावेळी विभागाला सांगितले होते की, विभागाने आरआरसी काढून पुढच्या बैठकीला जिल्हाधिकाऱ्यांना बोलविण्यात यावे. पण विभागाने त्यांना बोलावले नाही. आरआरसी झाली हा विभागाचा समज आहे पण समितीच्या माहितीप्रमाणे सर्व ठिकाणी आरआरसीची कारवाई झालेली नाही. विशेषतः गोंदिया जिल्ह्यामध्ये तर आरआरसीची कारवाई झालीच नाही. त्याबरोबर विभागाने एफआयआर दाखल करून जामीन (ॲन्टीसिपेटरी) घेतला पण पोलिसांनी त्यापुढे कोणावरही काही कारवाई केली नाही. आजच्या बैठकीला विधि व न्याय विभागाच्या सचिवांना आवर्जून बोलावले होते की, त्यांनी पण आजच्या बैठकीला येऊन त्यांची बाजू मांडावी आणि ही सर्व वसुली झाली पाहिजे यासाठी काय करावे यावर चर्चा करावी. आदिवासी आणि पणन विभागाच्या सचिवांनी विधि व न्याय विभागाचा या विषयावर सल्ला घेऊन वसुलीचा योग्य निर्णय करावा आणि ज्या लोकांकडून जेमतेम पैसे वसूल होतील ते करण्यात यावे. त्यामध्ये व्याजाची पेनॉल्टी पण घेणे शक्य आहे. पण मूळ रक्कमच वसूल होत नाही तर बाकीचे काय बोलायचे आहे. ४० कोटी रुपये मिलर्सकडून वसूल करण्यासाठी एफआयआर झाली आणि आरआरसी निघाली तरी विभागाचे पैसे वसूल होणार नाहीत. या विषयावर विभागाने योग्य वकीलाच्या माध्यमातून कार्यवाही करायला पाहिजे होती. पण ही कार्यवाही झाली नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, यासंदर्भात ३१ ऑगस्टला श्री. विजयकुमार यांच्यासोबत सर्व संबंधीतांची बैठक झालेली आहे. टीडीसीमध्ये वकील म्हणून श्री. मनोहर यांना नियुक्त केले होते. तसेच मार्केटींग फेडरेशनला पण कळवले आहे की, ती केस हाताळण्यासाठी त्यांना देखील याच वकीलांना नियुक्त करावे. दुसरी गोष्ट म्हणजे एफआयआरमध्ये दुरुस्ती करण्यासाठी विभागाने इकॉनॉमिक ऑफेन्स विंगचा सल्ला घेऊन सेक्शन घालून दिले होते. डीएमओने प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रत्येक पोलीस स्टेशन हद्दीमध्ये एफआयआर दाखल केले आहेत. त्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी त्यांनी लिगल ओपिनियन घेतल्यानंतर लक्षात आले की, विभाग यामध्ये दुरुस्ती करु शकत नाही त्यामुळे चार्जशिटमध्येच विभागाला हे सर्व मांडावे लागेल. तिसरे असे की, याबाबत बैठक झाली. पण एफआयआरमध्ये दुरुस्ती करणे शक्य नाही. बेल कंडीशनमध्ये असे दिले आहे की, ॲन्टीसिपेटरीमध्ये बेल कंडीशन व्हायलेट होतात काय हे सर्व बघून विभागाला रद्दबादल करावे लागेल. एका जिल्ह्याच्या केसमध्ये सीआयडी चौकशी झालेली आहे. यामध्ये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने गृह विभागाला विनंती केली आहे की, ज्याप्रमाणे एका जिल्ह्याची सीआयडी चौकशी झाली आहे त्याचप्रमाणे इतर जिल्ह्यांची चौकशी सीआयडीकडे वर्ग करण्यासाठी यादी दिलेली आहे. विभागाच्या माहितीप्रमाणे तो निर्णय आता होणार आहे, अशी ती वस्तुस्थिती आहे.

समितीने बैठकीबाबत जिल्हाधिकाऱ्यांना बोलावण्याचा जो मुद्दा उपस्थित केला त्याबद्दल समितीनेचे असे म्हटले होते की, आम्ही जिल्हाधिकाऱ्यांना कळवतो. आम्ही यासाठी पत्र दिले होते त्यानुसार डीएसओ आले आहेत पण समितीने जर सांगितले असते तर जिल्हाधिकारी आले असते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आरआरसीची माहिती जिल्हाधिकारी पाहत असतात, असे समितीने निदर्शनास आणले असता, मार्फेड आणि टीडीसीने सांगितले तर चांगले होईल, अशी विनंती विभागीय सचिवांनी केली.

श्री. मनोहर यांना वकील केले आहे असे सांगितले तर त्यांनी टीडीसीच्या लोकांना काय सल्ला दिला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने रिजनल मॅनेजरला त्यासाठी प्राधिकृत केले होते. रिजनल मॅनेजर श्री. मनोहर यांना दोन ते तीन वेळा भेटले. त्यांनी असे सांगितले की, नियुक्तीच्या विधिवत प्रक्रियेला अन्न व नागरी पुरवठा विभागाने मंजुरी दिलेली आहे. परंतु उच्च न्यायालयाच्या विधि विभागाकडून त्यासाठी मान्यता पाहिजे. नागपूरच्या अवर सचिवांना ती मान्यता मिळाली आहे. श्री. देवपुजारी हे तेथील आहेत. या केससाठी श्री. मनोहर या वकीलांना नेमणुकीची मान्यता मिळाली आहे असे ते अवर सचिव जीबीला ॲप्रुव्हल देतील. मग ते श्री. मनोहर यांना ती केस लढण्यासाठी प्राधिकृत करतील. अशा प्रकारची प्रक्रिया आम्ही पूर्ण करून घेत आहोत, असे विभागीय यांनी सांगितले.

ज्यावेळेस विभागाने एफआयआर दाखल करण्याचे निर्देश दिले तेव्हा ते चुकीचे दाखल केले. विभागाचे असे मत आहे की, विभागाचा जो कोणी अधिकारी तेथील मुख्य असेल तो चुकीचे एफआयआर दाखल करतो. ते एफआयआर दाखल करणारे अधिकारी आणि संबंधित यांचे संगनमत आहे असे समितीने समजावे काय ? चुकीचा एफआयआर दाखल करणे म्हणजे ती केसच संपली आहे. कोणतेही न्यायालयात बेल देताना एफआयआरवर केस ग्राह्य धरुन त्यावर निर्णय दिला जातो. एफआयआर चुकीची आहे असे मागच्या बैठकीमध्ये श्री. विजयकुमार यांनी सांगितले होते. १५ दिवसात आम्ही ती दुरुस्त करून घेतो, असे समितीने लक्षात आणून दिले असता, त्यांनी त्यांचे मत मांडले होते. याबद्दल विभागामध्ये असे मत नाही. आता अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या सचिवांशी संपर्क करून एफआयआर दुरुस्त करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल, असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

एफआयआरमध्ये दुरुस्ती करता येते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे सचिव यांनी सांगितल्याप्रमाणे चार्जशिटवर त्यांच्या फायडींग करता येता येतात, असे विभागाच्या प्रतिनिधींनी सांगितले.

श्री. मनोहर यांनी विभागाला त्यांचे मत दिले काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर त्यांनी सांगितले की, ही प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी. ज्यावेळी त्या केसेस न्यायालयामध्ये येतील तेव्हा ते जीबीबरोबर आर्ग्युमेंट करतील असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

संबंधित पोलीस स्टेशनला चार्जशीट दाखल केली जाते. विभागीय प्रतिनिधी जे लर्नेट कॉन्सिल म्हणत आहेत ते विभागातील सर्वांचे मत घेऊन सादर करण्यात यावे म्हणजे जेव्हा न्यायालयामध्ये केस सादर होईल तेव्हा ते आर्ग्युमेंटवर बोलतील. असे काही होणार नाही कारण यातून विभाग त्यांना मार्ग दाखवत आहे. चार्जशिट दाखल करायची असेल तरी संबंधित सचिव म्हणाले त्याप्रमाणे चार्जशिटमध्ये अधिकचे काही म्हणणे असेल तर ते पोलिसांच्या लक्षात आणून देऊन त्यांच्या चार्जशिटमध्ये या सर्व गोष्टी इंटरव्हेन करून घ्याव्या लागतील. चार्जशिटमध्ये या सर्व गोष्टी समाविष्ट झाल्यातर चार्जशिटवर ही केस चालणार आहे. आर्ग्युमेंटवर ही केस चालणार नाही. त्यामुळे विभागाने त्यांना बाहेर पडण्याचे मार्ग दाखवू नये असे समितीने सूचित केले असता, समितीमध्ये दोन वेगवेगळ्या मुद्यावर चर्चा सुरू आहे. समिती ॲन्टीसिपेटरी बेल उच्च न्यायालयातून रद्द करून घेण्याच्या प्रक्रियेविषयी बोलत आहे, ते आपल्याला सांगितले आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

त्यांनी समितीला सांगितले की, श्री. मनोहर साहेब म्हणाले, एफआयआर चुकीची आहे. FIR should be file by the finance department not by the marketing federation and not by the TDC.

हे करणे आवश्यक आहे, असे म्हटले होते. समितीने सूचित केले होते की योग्य वकील ठरवावा. त्यानंतर विभाग श्री. मनोहर यांच्याकडे गेला. त्यांना भेटल्यानंतर श्री. मनोहर यांनी काय सल्ला दिला याचा येथे कुठेही उल्लेख नाही. श्री. मनोहर यांनी सांगितले की, ही तक्रार अन्न व नागरी पुरवठा विभागाने दाखल केली पाहिजे. त्यानंतर त्यांना अपॉईंट केले तर मी बरोबर उभा राहीन. एफ. आय. आर. चुकीचा झालेला आहे हा विषय श्री. विजय कुमार यांनीही सांगितला. त्यांनी सांगितले की, ते उभे राहणार. ते कसे उभे राहणार जेव्हा वकीलच सांगतात की, एफ. आय. आर. चुकीचा आहे, ॲप्लीकंट चुकीचा आहे ? विभागाच्या चुकीच्या एफ. आय. आर. मुळे त्यांना अँटीसीपेटरी बेल मिळाली, नाही तर अशा केसमध्ये अँटीसीपेटरी बेलच होत नाही. दुसरा मुद्दा असा आहे की, समितीने विभागाचा असाच प्रयत्न आहे की, पैसे वसूल झाले पाहिजेत. शासनाचे ४-५ विभाग एकत्र बसून जे लोक पळ काढतात त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. कारण शासनाचे पैसे कधी बुडत नाहीत. शासनाचे पैसे ५० वर्षे झाली तरीही द्यावे लागतात. मागच्या वेळेसही समितीने सांगितले होते की, या संदर्भात सर्वजणांनी सामोपचाराने एकत्रित बसून योग्य ती कारवाई करावी. अँटीसीपेटरी बेल ज्यांनी घेतलेली आहे, ती रद्द झाली पाहिजे. शासनाचे पैसे वसूल झाले पाहिजेत. या दृष्टीने काम केले तर या ३९ कोटीपैकी ३० कोटी रुपयांपर्यंतचे पैसे परत येतील. काही बुडालेच आहेत परंतु, काही लोकांचे पैसे परत येऊ शकतात. आर. आर. सी. मध्ये सर्वांची प्रॉपर्टी आहे. एका जिल्हाधिकाऱ्यांची आर. आर. सी. करून घ्यायची बाकी आहे. अधिकाऱ्यांनी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, आर. आर. सी. झालेली आहे, याबाबत काय स्पष्टीकरण आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, महोदय, आदिवासी विकास विभागाकडे असलेल्या रिपोर्टनुसार आर. आर. सी. च्या ४६ केसेस होत्या. त्या सर्व झालेल्या आहेत. गोंदियासह सगळीकडच्या झालेल्या आहेत. याबाबतचा अहवाल त्यांनी सादर केलेला आहे, असे आदिवासी विकास विभागाच्या सचिवांनी सांगितले.

मार्केटिंगबाबतची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, मला मार्केटिंगबाबत माहिती नाही. समितीची अशी शंका होती की, हा एफ. आय. आर. चुकीचा झालेला आहे. त्या अनुषंगाने विभागाने भंडारा जिल्ह्यातील एफ. आय. आर. ची प्रत मागवली होती. त्यांनी जो कॉन्टेंट दिलेला आहे, त्यामध्ये त्यांनी स्पष्टपणे लिहिलेले आहे की, असा प्रकार आहे की, वरील घटना व वरील ठिकाणी आदिवासी विकास महांडळ राज्य शासनाच्यावतीने भंडारा व नागपूर जिल्ह्यात धान खरेदी योजना राबवित असून आरोपी १ ते २४ यांनी शासकीय योजनेनुसार खरिप हंगाम सन २००९-२०१० ते सन २०१२-२०१३ पर्यंत आदिवासी शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेले धान भरडाई करून नियमाप्रमाणे निश्चित केलेल्या प्रमाणात भरडाई झालेले तांदूळ संबंधित विभागाकडे जमा न करता शासनाचे १५ कोटी, ५१ लक्ष, ८६ हजार, ४७९ रुपयांचे आर्थिक नुकसान केले आहे, अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरुन आदिवासी विकास विभागाकडून गुन्हा दाखल करण्यात येत आहे. This has been done at a senior level of Regional Manager. एफ. आय. आर. सी. आर. पी. सी. बाबत जी थोडी माहिती आहे त्यानुसार कोणीही दाखल करु शकतो. The Regional Manager is the highest authority. त्यानंतर लोकलेखा समितीच्या डायरेक्शनच्या अनुषंगाने परत आमचे एम. डी. टी. डी. सी. यांनी एस. डी. पी. ओ. जे की डी. एस. पी. रँकचे अधिकारी आहेत व यामध्ये इनव्हेस्टीगेटीव्ह आय. ओ. आहेत त्यांना हे लेखी दिले होते की, माननीय लोकलेखा समितीचे असे निदेश आहेत की, जी कलमे यामध्ये लावायची आहेत ती त्यांनी यामध्ये जास्तीची लावावीत. त्यांनी आदिवासी विकास विभागाला असा लेखी अहवाल दिलेला आहे की, जसजसे तपासणीचे अहवाल समोर येतील त्यानुसार आवश्यक कलमे, आय. पी. सी. प्रोव्हीजन्स ते लावणार आहेत. I think at the level of TDC officers, this is the maximum that the officials can do, असे आदिवासी विकास विभागाच्या सचिवांनी अवगत केले.

समितीला हे मान्य आहे की, चौकशीमध्ये जसजसे समोर येईल तसतसे त्यांच्यावर अधिकची कलमे लावता येतील. परंतु, ज्यावेळेस एफ. आय. आर. दाखल केला त्यावेळेस जर स्वयंस्पष्ट एफ. आय. आर. दाखल केला असता व त्यामध्ये सर्व गोष्टींचा उल्लेख केला असता तर त्याच दिवशी त्यांच्या विरोधात एवढी कलमे लागली असती. आदिवासी विकास विभागाने अपूर्ण एफ. आय. आर. दाखल केला त्यामुळे संपूर्ण कलमे लावता आली नाहीत. एफ. आय. आर. स्वयंस्पष्ट असता की, यामध्ये असे केले आहे, त्यामध्ये तसे केले आहे तर त्या अनुषंगाने कलमे एफ. आय. आर. मध्ये लावता आली असती. आदिवासी विकास विभागाने अपूर्ण एफ. आय. आर. दाखल केला म्हणून त्यांनी ही संधी मिळाली. शासनाचे १५ कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. विभागाने जर गुन्ह्याची ग्रॅव्हीटी दाखवली तर कोर्ट ॲक्शन घेईल. शासनाचे जे नुकसान झालेले आहे, त्याबाबत त्यांनी काय व्यवहार केला हे याप्रकरणी नमूद करणे आवश्यक होते. श्री. विजयकुमार यांनी असे सांगितले होते की, पहिली गोष्ट ही आहे की, एफ.आय.आर. म्हणजे विभागाला हे सांगावे लागते की, ऑफेन्स आहेत म्हणजे त्यांनी विभागाला एवढे सीएमआर दिले तर विभागाला पैसे किंवा धान मिळवून द्यावे असे वाटते. त्यांनी बाजारात विक्री केली असावी तर गुन्हा होत नाही. एफ.आय.आर. सुधारीत करण्यासंबंधी विभागाने त्यांना सूचना दिलेली आहे आणि विभाग १५ दिवसांत एफ. आय. आर. दुरुस्त करून देईल. अधिकारी बदलले की, विषय बदलतात. असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यांचे असे म्हणणे होते की, सेक्शन बरोबर घातलेले आहेत. परंतु, त्या सेक्शनला जी सर्पोटिंग स्टोरी आहे की, गुन्हा कसा सिद्ध आहे ती कमजोर आहे. असे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या सचिवांनी सांगितले.

त्यामुळेच त्याला अँटीसीपेटरी बेल मिळालेली आहे. विभागाने स्पष्ट कागदपत्रांसहीत व्यवस्थित एफ. आय. आर. दाखल केला असता तर अँटीसीपेटरी बेल मिळालीच नसती. कारण विभागाला हायकोर्टामध्ये त्या सर्व मुद्यांवर भांडता आले असते. सर्व विभागांनी एकत्र बसावे विधि विभागाला एकत्र घेऊन शासनाचे पैसे कसे वसूल होतील याबाबत कडक कारवाई करावी, असे समितीने सूचित केले.

पुढच्या १३ नोव्हेंबर पर्यंत विभागाने केलेल्या कारवाईची माहिती समितीला द्यावी. त्यावर आवश्यक असेल तर समिती साक्षीसाठी बोलावेल नाही तर समिती अहवाल सादर करेल. समितीला नकारात्मक अहवाल सादर करावयाचा नाही. लोकलेखा समितीच्या माध्यमातून जर ३०-४० कोटी रुपये वसूल झाले तर आणखी आनंद होईल. ज्यांच्याकडे पैसे असताना देत नाहीत ते विभाग वसूल करू शकत नाही. विभागाकडे खूप निष्काळजीपणामुळे पैसे वसूल करण्याकरिता कोणी प्रयत्न केला नाही. विभागाकडे वारंवार सभागृहात याबाबतची मागणी उपस्थित केली. योगायोगाने हा परिच्छेद समिती समोर आला. समितीला याची पूर्ण जाणीव आहे म्हणून समिती जास्त खोलात जाऊन सांगते की, हे सर्व पैसे वसूल होऊ शकतात. अँटीसीपेटरी बेल रद्द झाली की, ५० टक्के पैसे असेच वसूल होतील. कारण अँटीसीपेटरी बेल रद्द झाली की, तो व्यापारी जेलमध्ये जाण्याच्या भीतीने पैसे १०० टक्के भरणारच. असे मत समितीने व्यक्त केले असता, आर. आर. सी. काही होत नाही. कोणाला विभागाचे बिल चुकवायचे नाही. विभागाने आर. आर. सी. पुढे जाऊन कारवाई करावी. कारण विभाग आर. आर. सी. च्या पुढे जाऊन कारवाई करीत नाही. They will take further action. साहेबांनी सांगितले आहे तोच पर्याय आहे. आर. आर. सी. दाखल केल्यानंतर त्याचा जिल्हाधिकाऱ्यांनी फॉलोअप केला पाहिजे की, त्या पुढे कुठपर्यंत गेल्या, त्यांची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, जिल्हाधिकाऱ्यांना ३ वेळा असे कळविले आहे की, त्याच्याकडे आर. आर. सी. आलेली आहे. ती पुढे तहसीलदारांकडे पाठवून सर्टिफिकेट इशू करून मालमत्तेची यादी जोडावी लागते मग पुढचे काम सुरू होते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे समितीस मान्य आहे. परंतु, ते काम जलद गतीने करावे लागेल नाही तर अभिकर्ता संस्था मालमत्ता ट्रान्सफर करतील. अभिकर्ता संस्था म्हणजे टी. डी. सी. व मार्केटिंग फेडरेशन हा एक विषय झाला. दुसरे म्हणजे जी सुधारित माहिती दिलेली आहे त्यामध्ये असे नमूद केले आहे की, अधिकारी, कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करणे, नैसर्गिक घट, तुटीबाबत माहिती तयार करून त्या तुटीच्या निर्लेखनाबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येणार आहे. हा प्रस्ताव किती दिवसांत सादर होणार आहे? सदस्यांचा अधिकाऱ्यांवरील कारवाईबाबतचाही एक प्रश्न होता. यांनी ६० अधिकाऱ्यांवर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, नोव्हेंबरमध्ये चार्जशिट दाखल करू असे आश्वासन दिले होते. त्याबाबत काही कारवाई केली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सी. एम. आर. बाबत याची कारवाई करून सर्व लोकांनी एकत्र बसून आर. आर. सी. इफेक्टीव्हली लागू केली पाहिजे. तसेच, अँटीसीपेटरी बेल रद्द करण्यासाठी विभागाने योग्य वकिलाची नेमणूक करावी. हे पैसे एफ ॲण्ड सी. एस. चे आहेत, मार्केटिंग असो किंवा टि. डी. सी. असो शासनाचे तुमचे एजंट आहेत, असे मत समितीने व्यक्त केले असता, मिलरनी ॲग्रिमेंट हे मार्केटिंग फेडरेशन बरोबर केले आहे त्यामुळे एफ. आय. आर. योग्य आहे.

असे विभागीय सचिवांनी सांगितले ते वकिलांना समजावून एकदा निर्णय घ्यावा. या संदर्भात उच्च स्तरावर कारवाई झाली पाहिजे. एकाला टारगेट करून एक अँटीसीपेटरी बेल कॅन्सल झाली ना तर याचा योग्य परिणाम होईल, असे मत समितीने व्यक्त केले असता,

त्यांनी पेपर्स पाहिले नाहीत फक्त चर्चा केली आहे. याबाबत विभागाकडून आर. आर. सी. फॉलोअप करण्यात येईल. दुसरे म्हणजे चांगल्या वकिलाची नेमणूक करणे आणि तिसरी गोष्ट म्हणजे सर्वांची एकत्रित सी. आय. डी. चौकशी झाली तर बेटर होईल कारण सर्व केसेस एकत्रित क्लब होतील व जो निर्णय होईल तो सर्वांना लागू होईल. या ३ गोष्टी करून त्याची माहिती समितीला देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सुधारित माहितीमध्ये मुद्दा क्रमांक ५ मध्ये असे नमूद केले आहे की, टी. डी. सी. ने सादर केलेल्या कालबद्ध कार्यक्रमांतर्गत प्राथमिक स्वरुपातील ५९ कर्मचाऱ्यांकडून १५ कोटी व १६३ संस्थांकडून १०९ कोटी रुपये वसूल करण्यात येतील असे कळविले आहे. या ५९ कर्मचाऱ्यांची व १६३ संस्थांची यादी समितीला देण्यात यावी. ते ५९ कर्मचारी आता सेवेत आहेत काय, त्यातील कोणी आज येथे आले आहेत काय ? त्या ५९ कर्मचाऱ्यांपैकी कोणी आजच्या बैठकीस आले आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, आज येथे कोणी त्यापैकी आलेले नाहीत. परंतु, विभागाकडे त्यांची यादी आहे ती समितीला देण्यात येईल, असे आदिवासी विकास विभागाच्या सचिवांनी सांगितले.

टी. डी. सी. चा कालबद्ध कार्यक्रम ३ क्रमांकावर दिलेला आहे. ४ क्रमांकावर मार्कफेडचा दिलेला आहे, असे अन्न, नागरी पुरवठा विभागाच्या सचिवांनी सांगितले.

ज्या कर्मचाऱ्यांना विभागाने प्रथमदर्शनी दोषी धरलेले आहे, त्या कर्मचाऱ्यांच्या विरोधात आजपर्यंत काय कारवाई केली ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये असे नमूद केले आहे की, १५ पर्यंत नोटीस बजावणे, त्याचे उत्तर ३०. ९ पर्यंत आल्यानंतर त्या उत्तराची तपासणी ते १.१० ते १.११ पर्यंत करणार आहेत. तपासणी केल्यानंतर वसुली किंवा डी. ई. वगैरे कारवाई रिडीसीचे अधिकारी करणार आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ही कारवाई आर. आर. डी. व टी. डी. सी. दोन्हीचे वेगळे करणार आहे. जो काही कालबद्ध कार्यक्रम दिला होता त्याप्रमाणे विभाग विभागाच्या स्तरावर पथके नेमून व एस. आर. एम. आर. एम. कडून प्राथमिक चौकशी करून घेतली आहे. त्यामध्ये १६३ संस्थांच्या ऐवजी १९० संस्था निष्पन्न झालेल्या आहेत. त्यांची आमच्याकडे प्राथमिक माहिती आहे. त्याची चौकशी सुरू आहे. ती प्रधान सचिव अन्न व नागरी पुरवठा यांना १ नोव्हेंबर पर्यंत चौकशी करून देण्यात येईल. मागच्या वेळेपर्यंत ५९ कर्मचाऱ्यांची माहिती होती त्यामध्येही वाढ झालेली आहे. आतापर्यंत ९३ कर्मचारी निष्पन्न झाले आहेत. त्यापैकी २ मयत झाले आहेत. २४ कार्यरत आहेत. ५७ निवृत्त झालेले आहेत व रोजंदारीवरचे १० आहेत. ती प्रक्रिया देखील १ नोव्हेंबरपर्यंत अंतिमतः शहानिशा करून आदरणीय सचिवांचे मार्गदर्शन घेऊन कारवाईची प्रक्रिया हाती घेण्यात येत आहे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

६ इ व ६ एफ असे पुढचे दोन पॉईंट आहेत. उर्वरित जो तपशील विभागाने दिला आहेत तो समिती मान्य करीत आहे. सडलेला माल व सी. एम. आर. मध्ये मिळालेला माल. उरलेला माल आहे तो ३.५३ मार्केटिंग व टी. डी. सी. कडे उपलब्ध शिल्लक आहे तो व १.३३ हे दोनच पॉईंट शिल्लक आहेत. त्यातील २ पॉईंटचे विभागाने समाधान करावे. एक तर ३ लक्ष ५३ हजार क्विंटल माल मार्केटिंग व टी. डी. सी. कडे शिल्लक आहे काय ? विभागाच्या चार्टमधील ६ इ मध्ये ३ लक्ष ५३ हजार क्विंटल माल अभिकर्त्यांकडे उपलब्ध आहे व जो शॉर्टेज आहे तो १ लक्ष ३३ हजार क्विंटल म्हणजे विभागाच्या नॉर्मसच्या पलीकडे आहे, याबाबत समितीला माहिती देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, शिल्लक धान १९ लक्ष क्विंटल आहे त्यामध्ये हे दोन्ही धान आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्या १९ लक्ष क्विंटलचा, सी. एम. आर. चा ब्रेकअप विभागाने समितीला दिलेला आहे. १२१ लक्षचे डिटेल्स दिले. १२१ लक्ष ३५ हजार क्विंटलची खरेदी विभागाने केली. सी. एम. आर. मध्ये मिळालेला तांदूळ, सी. एम. आर. मध्ये पेडिंग असलेला तांदूळ व त्यानंतर केंद्र शासनाने ग्राह्य धरलेली हानी व राज्य शासनाने मान्य केलेली हानी व विकलेले धान याबाबतच्या विभागाच्या आकडेवारी समिती मान्य करते. कारण त्यावर चर्चा झालेली आहे. या व्यतिरिक्त मागच्या दोन फिगर्स आहेत. ३ लक्ष ५३ हजार क्विंटल संस्थांकडे पेडिंग आहे. ते मिलरकडे नाही व त्यांनी ते विभागाला दिले नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, पृष्ठ क्रमांक २ वर जो तक्ता आहे त्यामध्ये जे १९ लक्ष क्विंटल शिल्लक नमूद केले आहे त्यामध्येच हे दोन्ही आहे, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाने दिलेल्या नवीन माहितीतील पृष्ठ क्रमांक ७ वर ६ इ व ६ एफ हे मुद्दे आहेत, असे समितीने नमूद केले असता, ४ पानांची माहिती दिलेली आहे. त्यातील पृष्ठ क्रमांक २ वरील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या १९. ७ मध्येच हे सर्व आले आहे. १५१ क्विंटल खरेदी झाली. १२१ क्विंटल भरडाई झाली. शिल्लक १९ क्विंटल राहिले त्यामध्ये हे दोन्ही धान आले. पूर्वीचा चार्ट चुकीचा नाही. ती अमाऊंट १९ क्विंटलमध्ये धरलेली आहे. दोन्हीचा हिशोब या १९. ७० मध्ये आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समिती या १९ लक्ष ७० हजाराच्यावर चर्चा करत नाही. We are limiting our discussion to 3. 53 lakh quintal and 1.33 lakh quintal. आम्हाला सर्व मान्य आहे. १९. ७० पैकी ४. ८८ व्यतिरिक्त सर्व मान्य आहे. ४. ८८ चे डिटेल्स द्यावेत सांगावे. विभागीय सचिवांनी सांगितले की, १९. ७० पूर्ण येणे बाकी आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, हे जे धान आहे ते त्यामध्येच आहे. त्यांनी त्याचा लिलाव केला. लिलावाची फिगर साधारणतः ११ लक्ष अशी सांगितलेली आहे. ती वाढली नाही व ११. ४४ च्या वर गेली नाही, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

समितीने विभागाकडे १९.७० चा ब्रेकअप मागितला तर विभाग हाच ब्रेकअप देणार. १९.७० च्या मोठ्या आयटममध्ये जायचे नाही. समितीला इ व एफ या दोन आयटमच्या ब्रेकअपबाबत माहिती द्यावी. इ बाबत समितीचे असे म्हणणे आहे की, जो ३ लक्ष ५३ हजार क्विंटल माल फिजिकली उपलब्ध आहे काय? कारण तोही शॉर्टेजच आहे. उपलब्ध नाही तर याचा हिशोब काय आहे, अशी विचारणा समितीने केली असता, तो माल वसुलीसाठी आलेला आहे, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

३ लक्ष ५३ हजार क्विंटल माल विभागाकडे उपलब्ध नाही. विभागाला त्यांनी तो माल दिलेला नाही. ३ लक्ष ५३ हजार क्विंटल मालाची वसुली प्रलंबित आहे. १ लक्ष ३३ हजार क्विंटल मालाचा शॉर्टेज आहे असे सांगण्यात येत आहे. कोणता माल पकडण्यात आला आहे. कारण ते सर्व टीडीसीकडे बाकी आहे. टीडीसीकडून ४ लक्ष ८५ हजार क्विंटल माल पणन महासंघाला कमी मिळाला आहे. या संदर्भातील सर्व डिटेल माहिती समितीला पाहिजे. जे ग्राह्य आहे ते विभागाने मान्य करावे. समितीने मागच्या बैठकीच्या वेळी सांगितले की, शासनाने मार्केटिंग फेडरेशनला १ टक्केच्या ऐवजी २ टक्के लॅप्सेसची सूट दिली तशीच सूट टीडीसीला देण्यात यावी. समितीची काहीही हरकत नाही. शासनाने मार्केटिंग फेडरेशनला जो न्याय दिला तोच न्याय टीडीसीला दिला पाहिजे. बाकीचा जो माल आहे त्याचा वाली कोण आहे. यासाठी कोण जबाबदार आहे. फिजिकली माल नसून हा शॉर्टेज आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, १६७ कोटी रुपयांमधून टीडीसीला १ टक्का लॅप्सेस जादा देय राहतील त्याचे ४ ते ५ कोटी रुपये त्यातून वजा होतील त्यामुळे १६३ कोटी रुपयांची वसुली राहणार आहे. १६३ कोटी रुपयांमध्ये मिलरचे नाहीत ते वेगळे आहेत. मिलरचे ७० कोटी रुपये वेगळे आहेत, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

१६३ कोटी रुपयांमध्ये विभागाला ठिकाणावर जे लॉसेस झाले ते कमी झाले आहेत. ते कसे देणार, शासनाच्या परवानगीने विकले तरी ते देता येणार नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, लिलावात विकलेला मालाची किंमत यातून वजा केली आहे. नुकसान वजा केले आहेत. प्रत्यक्षात हा माल नाही म्हणून त्याची किंमत १६७ कोटी रुपये काढण्यात आलेली आहे. त्यातून ४ ते ५ कोटी रुपये वजा केले तर १६३ कोटी रुपये राहतील. १५२ कोटी रुपये यांचे राहतील व ११ कोटी रुपये त्यांचे राहतील. यासंदर्भात नोटीस काढून जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

टीडीसीला दोन टक्के नुकसानामध्ये सूट द्यावी. दुसरा मुद्दा असा होता की, मिलिंगसाठी उशीर झाला असेल तर त्याप्रमाणे शॉर्टेज ठरविण्यात यावेत, असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यासाठी संस्थांना व संबधितांना नोटीस दिलेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आणखी ५० हजार क्विंटल माल कमी होईल. बाकीचे ४ लाख क्विंटल माल गायब झालेला आहे. ही बाब समितीने नमूद केली असता, विभागाची तूट ३६ टक्के आहे, एका वर्षी ६० टक्के आहे, एका वर्षी १७ टक्के तूट आहे, रिझनेबल तूट ३ ते ५ टक्क्यांच्यावर होऊ शकत नाही. इन्डिव्हीजवली तूट निश्चित करावी लागेल व त्यानंतर तो प्रस्ताव विभागाकडे द्यावा लागेल. किती रक्कम वसूल झाली, कोणावर जबाबदारी निश्चित केली. त्यानंतर माफ करावे की, वसुली करावी. जेवढे जस्टीफाईड आहे तेवढे केसबाय केस करावे लागेल. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

जे शासन ठरवेल ते समितीला मान्य आहे. जे अन् जस्टीफाईड आहे त्याची वसुली झाली पाहिजे त्यामध्ये टीडीसीकडे मोठा घोळ जास्त दिसत आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, सन २००९-१० ते सन २०१२-१३ या चार वर्षाचा ऑडीट पिरियड कालावधी आहे, त्या कालावधीत वाहतुकीचे दर वेळेत न ठरल्यामुळे साठवणूक खूप जास्त झाली. टीडीसीचे कार्यक्षेत्र ग्रामीण भागात असते. गडचिरोली, भंडारा, गोंदिया व अन्य काही ठिकाणी असते. त्यामुळे मालाची भरडाई नियमित न झाल्यामुळे व जास्त साठवणूक वाढल्यामुळे टीडीसीकडे आकडेवारी जास्त दिसत आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागाचे सचिव टीडीसीला जे धोरण ठरवून देतील. त्यामध्ये दोन टक्के व त्यांच्या सूचनेप्रमाणे दीडपट कॅल्क्युलेट केले आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने दीडपटीने रक्कम कॅल्क्युलेट केली असेल समितीने असे सांगितले होते की, १.१ करावे. १.१ केले तर रक्कम कमी होईल. परंतु कॉन्टेटी कमी होणार नाही, असे समितीने सूचित केले असता, काही ना काही वसुली प्रत्येक संस्थेकडे थोडी फार निघेल. शासनाचे २ टक्के किंवा १.१ चे जसे निर्देश प्राप्त होतील त्याप्रमाणे विभागाची आकडेवारी बदलेल. त्यानुसार पुढील प्रक्रिया करण्यात येईल, असे विभागाच्या प्रतिनिधींनी सांगितले.

हा समज आहे की, रेट न ठरल्यामुळे किंवा एफसीआयने सन २००९ मध्ये असे ठरविले की, ट्रान्सपोर्टचा दर अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग ठरविणार आहे. ते खरे नाही. आकडेवारी पाहिली तर मार्च २००९ मध्ये टीडीसीकडे ३२ टक्के शिल्लक होती. मार्चपेडची ३ टक्के शिल्लक राहिली. सन २०१०-११ मध्ये टीडीसीकडे ६३ टक्के शिल्लक होती. मार्चपेडची ४.४२ टक्के शिल्लक होती. सन २०११-१२ मध्ये मिलिंग जास्त होऊन टीडीसीकडे फक्त ११ टक्के शिल्लक राहिली आहे. मार्कफेडची ५ टक्के शिल्लक राहिली. सन २०१२-१३ मध्ये पुन्हा ३६ टक्के व ३ टक्के शिल्लक राहिली. हे सर्व आकडे आहेत, २ टक्के सूट दिल्यावर व दीड टक्क्याचे १.१ केल्यावर देखील रक्कम मोठी राहणार आहे, असे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या सचिवांनी सांगितले.

त्यांचे म्हणणे असे आहे की, २ किंवा ३ वर्षे माल राहिला तर त्यासाठी किती सूट देणार आहात ते एकदा ठरवून घ्यावे. त्यानंतर बाकीच्या मालाच्या वसुलीचे बघावे यासंदर्भातील आकडे समितीला १० नोव्हेंबरच्या आत सांगावेत. किती क्विंटल शॉर्टेज आहे व त्यासंदर्भात कोणती कारवाई करणार आहेत हे ठरवून द्यावे, असे समितीने सूचित केले असता यासाठी विभागाला थोडा जास्त वेळ पाहिजे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीला १९ नोव्हेंबरला अधिवेशनात अहवाल सादर करावाचा आहे. त्यापूर्वी १३ व १४ नोव्हेंबरला बैठक होईल. आजच १३ नोव्हेंबर ही बैठकीची तारीख देतो. त्या कालावधीपर्यंत ही सर्व कामे करून घ्यावीत. दिलेल्या निर्देशाप्रमाणे शासनाने कार्यवाही करावी.

अगोदर आकडेवारी फिक्स करावी चौकशी नंतर करण्यात येईल. असे समितीने सूचित केले असता, कोणाला किती शॉर्टेज अलाऊ करायचा ते ठरवायचे आहे. ही कार्यवाही केसबाय केस, संस्थाबाय संस्था व कर्मचारीवाईज होईल. १ ते १२ डिसेंबरपर्यंत संस्थानिहाय वसुलीचे आदेश निर्गमित करून १ ते १२ डिसेंबरमध्ये त्यांची कार्यवाही संपेल. जास्तीत जास्त एक आठवड्यात ते १५ दिवस ते अगोदर करू शकतात. ही बाब टीडीसीबाबत आहे. चार क्रमाकांच्या पॅरामध्ये मार्केटचे ७ डिसेंबर पर्यंत वसुलीचा हिशोब येईल. समितीकडे ते १६ डिसेंबरपर्यंत पाठवू शकतात. मार्केटची कार्यवाही १५ दिवसानंतर उशिरा आहे. या नोटीसमध्ये ते सर्व डिसाईड होईल. जास्तीत जास्त लवकर करण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीला अहवाल विधिमंडळाला सादर करावयाचा आहे. समितीकडे मटेरियल नसेल तर आपण अहवाल कसा काय देणार, असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, त्यांनी लवकर करावे अशा सूचना विभाग त्यांना देऊ शकतो. जबाबदारी लवकर निश्चित करावी. तुटीचे फायनल फिगर शासनाला कळवावे, असे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या सचिवांनी सांगितले.

याबाबत अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या प्रधान सचिवांसोबत चर्चा करते. यामध्ये दोन विषय आहेत, १ टक्के किंवा २ टक्के सूत्र ठरविणे आवश्यक आहे, असे आदिवासी विकास विभागाच्या सचिवांनी सांगितले.

राज्य शासनाने ऑलरेडी १ टक्के दिले आहे टीडीसीला दोन टक्के लॉसेसची मर्यादा दिली पाहिजे, असे समितीने सूचित केले असता, अन्न व नागरी पुरवठा विभागाने तत्वतः दोन टक्यांना मान्यता दिली तर दोन टक्के प्रमाणे आदिवासी विकास विभागाचे कॅल्क्युलेशन थोडे बदल होईल. विभागाने टिप्पणीमध्ये असे नमूद केले आहे की, अवाजवी घट-तूट ची वसुली एक टक्के प्रमाणे १४ कोटी ९४ लक्ष रुपये होतात. दोन टक्के प्रमाणे १२ कोटी रुपये होतात. त्याशिवाय if it is lying in open for more than one year, आता या केसेसमध्ये तीन वर्षातील सन २००९-१० मधील धान ६ ते ७ वर्षे, सन २०१०-११ चे धान ५ ते ६ वर्षे, सन २०११-१२ चे ४ ते ५ वर्षे ओपनमध्ये ठेवण्यात आले होते, for want of milling. विभागाने जो डाटा गोळा केला आहे त्यामध्ये जवळपासचे ट्रान्सपोर्ट चार्जेस होते. ते less than ४० टक्के होते. शासनाचा सन २००७-०८ मधील शासन निर्णय होता. त्यानंतर जे रेट लावण्यात आले. त्यामध्ये there was a sharp decline of 40% in transportation. त्यामुळे त्या त्या वर्षात मिलिंगचे प्रमाण एकदम शार्प डिक्लाईन होते. हा प्रीव्हीयस ट्रेन्ड आहे. मुद्दा इतकाच आहे की, त्यासंदर्भात अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण प्रधान सचिव यांच्यासोबत चर्चा करणार आहे. It was lying in open for more than 4-5 years यामध्ये जे नैसर्गिक नुकसान व निर्लेखनाचा मुद्दा येतो. त्याचा विचार किती कालावधीत तो माल बाहेर पडून राहिला होता. त्यामध्ये थोडे कन्सिडरेशन असावे, असे आदिवासी विकास विभागाच्या सचिवांनी सांगितले.

ज्या कालावधीत माल बाहेर पडून राहीला त्याची कारणे काय आहेत, अशी विचारणा समितीने केली असता, त्यावेळी गोडाऊन्स नव्हते, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

त्यावेळी गोडाऊन्स नव्हते ही बाब लोकलेखा समिती ऐकणार नाही. तुमच्या विभागाची सोय तुम्हीच केली पाहिजे. यांच्याकडे गोडाऊन नव्हते, माणूस नव्हता की, चौकीदार नव्हता, it is not a matter before this Committee. मग तो माल मिलरकडे का पाठविण्यात आला नाही. ही जबाबदारी आमच्या विभागाची नाही असे विभाग म्हणू शकत नाही. विभागाकडे काय होते व काय नव्हते ही बाब तुमच्या विभागाची आहे. ज्यावेळी विभागाने हे काम घेतले त्यावेळीच तुम्ही सांगायला पाहिजे होते की, ही विभागाची ड्यूटी नाही, विभागाची जबाबदारी नाही. विभाग करीत नाही. जबाबदारी स्वीकारल्यावर ती विभागाला पूर्ण पार पाडावीच लागणार आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, सन २०११-१२ मध्ये यावर लवकर निर्णय होत नव्हता. त्यावेळी आमच्या संचालक मंडळाने ठराव केला होता की, यापुढे हे काम आम्ही करणार नाही. सरकारला कळविण्यात आले होते की, यापुढील काळात हे काम आम्ही करणार नाही. आमचे महामंडळ शासनाचा अंगिकृत भाग असल्यामुळे ती जबाबदारी आमच्यावर आली, असे आदिवासी विकास महामंडळाच्या प्रतिनिधींनी सांगितले.

जबाबदारी महामंडळावर आली म्हणजे विषय संपला. त्यामुळे तुम्हाला ती जबाबदारी पार पाडावी लागते. असे असताना महामंडळ ३ ते ४ वर्षे माल सातत्याने खरेदी करीत आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, यामध्ये ३० ते ४० टक्के शॉर्टेज येत आहे. बाहेर माल असल्यामुळे जेवढा शॉर्टेज होतो तसाच तो माल वाढतो देखील. पावसाळ्यात त्यामध्ये वाढ होते. रिझनेबल वाढ करावी. रिझनेबल घट मान्य करण्यात येईल. माल बाहेर आहे खरेदी जास्त झाली आहे, त्यामुळे माल नक्कीच कमी होईल. परंतु ३० ते ४० टक्के घट होणार नाही. सन २००९-१० मध्ये माल बाहेर ठेवण्यात आला असेल व तो पाच ते सहा वर्षे बाहेर असेल तर पुढील वर्षात तेवढा माल कमी का खरेदी केला नाही. शेतकऱ्यांचा माल खरेदी करावयाचा असल्यामुळे ते खरेदी थांबवू शकत नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, या आदिवासी सहकारी संस्था आहे. वाहतुकीचा मुद्दाची यासोबत तुलना करता येणार नाही. विभाग अकाऊंटिबिलिटी ठेवणार नाही काय, Reasonable reasons can be accepted but how can we accept 30%, 40% shortages. अनुपकुमार खूप दिवस त्या एरियात आयुक्त होते. ३० टक्के चा शॉर्टेज अलाऊ केला पाहिजे काय ? त्यांचे शॉर्टेज आदिवासी विकास महामंडळाने मान्य करावे त्यामध्ये काहीही अडचण नाही but it should be with firm justification. माल उघड्यावर ठेवल्यामुळे गोडाऊनला गती दिली पाहिजे. गोडाऊन्स नसल्यामुळे सर्व माल बाहेर ठेवावा लागतो. दरवर्षी मालाची खरेदी करायचीच आहे. शेतकऱ्यांचा माल कमी भावात विकला जायला नको, असे समितीने सूचित केले असता, एकदम उष्णतेमुळे माल कमी होतो व पाऊस झाला की, माल वाढतो, हे मुद्दे विचार करण्यासारखे असले तरी तीन, चार किंवा पाच ते सहा कालावधीमध्ये गडचिरोली व त्या परिसरात अतिवृष्टी काही ठिकाणी झाली होती. त्यावेळी उघड्यावरील काही धान भिजून खराब झाले होते. त्यावेळच्या विभागीय आयुक्तांमार्फत कार्यवाही करण्यात आली होती. असे आदिवासी विकास विभागाच्या प्रतिनिधींनी सांगितले.

गडचिरोली व गोंदिया या आदिवासी जिल्ह्यांमध्ये जेथे गोडाऊन्स आहेत, तेथे खरेदी केंद्र सुरू झाले होते. तेथे अत्यंत खराब परिस्थिती होती. जास्तीत जास्त माल या संस्थांनी उघड्यावर ठेवला होता. त्यावेळी कै. आर. आर. पाटील यांनी मोठा निर्णय घेतला होता की, जे नुकसान झाले त्याबाबत ते क्षमापित झाले पाहिजे. कारण त्यांचा दोष नसताना अतिवृष्टी झाल्यामुळे धान खराब झाले होते. त्यासंदर्भात मूल्यमापन करून एका समितीच्या माध्यमातून खरेदी मूल्य निश्चित करून ऑक्शनची कारवाई झाली होती. सन २०१०-११ मध्ये झालेल्या खरेदीबाबत ही कारवाई झाली होती. दुर्दैवी परिस्थिती अशी होती की, अन्न व नागरी पुरवठा विभागाने मान्यता देऊन देखील त्या भागात गोडाऊन उभारणीचे काम फारसे होऊ शकलेले नाही. अशी परिस्थिती आहे, असे पणन विभागाच्या सचिवांनी अवगत केले.

तुलनात्मकदृष्ट्या मार्केटचे काम व्यवस्थित आहे. २ टक्केपेक्षा जास्त तूट त्यामध्ये आहे. तरी ती तूट ३ ते ५ टक्क्यांच्यावर जात नाही. सन २०१४-१५, १२. ८० टक्के तूट होती. सन २०१५-१६ मध्ये ती तूट २. ५ टक्क्यांवर आली आहे. त्यांचेच काम पुढील वर्षात सर्व मार्गी लावले तेव्हा कोणत्याही अडचणी आल्या नाहीत. ही बाब पाहण्यासारखी आहे. असे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या सचिवांनी सांगितले.

एक दोन टक्के कमी जास्त ठीक आहे, परंतु १० ते १५ व २० टक्के तूट येणे बरोबर नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, केसबाय केस, सेंटरबाय सेंटर कसे द्यावे हे पणन व आदिवासी विकास विभागाने ठरविले पाहिजे, असे अन्न नागरी पुरवठा विभागाच्या सचिवांनी सांगितले.

प्रत्येक ठिकाणी ताडपत्री लावण्यात आली होती. एकाही ठिकाणी उघड्यावर माल नव्हता. प्रत्येक ठिकाणी ताडपत्री टाकण्यात आली होती. सन २०१४-१५ मध्ये १२ टक्के लॉस कसा काय दाखविण्यात आला आहे. त्यावेळी यांच्या अन्न नागरी पुरवठा विभागाचा लॉस किती टक्के आला आहे, अशी विचारणा समितीने केली असता, पणन विभागाचे गोडाऊन तालुका स्तरावर असते. मिलर व गोडाऊन त्यांचे अंतर कमी असते. टीडीसीचे गोडाऊन ग्रामीण एरियात आहेत. आदिवासी क्षेत्रात अंतर जास्त असल्यामुळे वाहतुकीच्या दराचा प्रश्न होता, असे आदिवासी विकास विभागाच्या सचिवांनी सांगितले.

सन २०१४-१५ मध्ये वाहतुकीच्या दराचा प्रश्न नव्हता, सन २०१४-१५ चे रेकॉर्ड पाहिले. त्यावेळी २ ते अडीच टक्के तूट झालेली आहे. रिझनेबल शॉर्टेज अलाऊ करण्याचे अधिकार महामंडळाला आहेत. Reasonable shortages should be allowed but it should be justified. It should not be restricted to 1% or 2%. मार्केटिंगला जितके दिले तितके दिलेच पाहिजेत. यांच्या मालाची तीन ते चार वर्षे मिलिंग झाले नाही. माल उघड्यावर होता. पाण्यामुळे खालचा एक स्तर खराब झाला असेल. ही बाब प्रॅक्टीकली मान्य आहे. या सर्व बाबींचा विचार करून त्यांना किती अनुज्ञेय असेल तेवढे करावे. विभागाचे समाधान झाल्यावर प्रस्ताव सादर करावा. योग्य प्रस्ताव शासनाला सादर करण्यात यावा. इतकी मोठी घट कोणत्याही परिस्थिती मान्य करता येत नाही. यासाठी कोणावर तरी जबाबदारी निश्चित करावीच लागेल. ती प्रक्रिया विभागाने सुरू केलेली आहे. केलेल्या सर्व कार्यवाहीची माहिती १० डिसेंबरपर्यंत देण्यात यावी. या कामाचा रिझल्ट १० नोव्हेंबरपर्यंत देण्यात यावा. सर्व विभागांनी एकमेकांशी चर्चा करून हा विषय संपवायला पाहिजे. इतर पुष्कळ विभाग आहेत, असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीला माहिती आहे की, मार्च, एप्रिल, मे, जून मध्ये हा विषय मार्गी लागला आहे. यापूर्वी काहीही झालेले नव्हते. पणन विभागाने पत्र पाठविले, एफआयआर करा म्हणून सांगितले, आरआरसी करा म्हणून सांगितले, नोशनल वसुली झाली किंवा जे काही झाले ते आताच झाले आहे. असे अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या सचिवांनी सांगितले.

या परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी पुन्हा अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे सचिव व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी. मागच्या बैठकीत ॲण्टीसिपेटरी बेलबाबत कार्यवाही करावी असे म्हटले होते. सॉल्टेजचा फिगर १० नोव्हेंबरच्या आत ठरवून घ्यावा असे निर्देश दिले होते. किती योग्य सॉल्टेज आहे, किती अस्वीकारार्ह सॉल्टेज आहे यांची माहिती (आकडेवारी) मागितली होती. व्यावहारिकदृष्ट्या उघड्यावर पडलेल्या धानाबाबत विचार करावा असेही समितीने सांगितले होते. संपूर्ण केसमध्ये सध्याची परिस्थिती काय आहे ? याबाबत थोडक्यात माहिती द्यावी असे समितीने सूचित केले असता, गुन्हे दाखल करण्याबाबत सांगितले होते. मिलर्सची वसुली शिल्लक होती. समितीने सांगितले होते की, एफआयआर अधिक कडक करण्यात यावेत असे आदिवासी विकास विभागाच्या विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समितीने सांगितले होते की, आदिवासी विकास, पणन, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, विधी व न्याय व गृह या सर्व विभागांच्या सचिवांनी एकत्रित बैठक घेऊन शासनाचे बुडालेले पैसे कसे परत मिळतील यासंदर्भात कारवाई करता येईल का याबाबत पहावे. विभागाने दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८ नंतर या पाचही विभागांच्या सचिवांची एकत्रित बैठक घेतली का, कारवाई करण्याचा काही निर्णय झाला का ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने अशी बैठक घेतली होती. बैठकीला सचिव आले नव्हते असे आदिवासी विकास विभागाच्या प्रतिनिधींनी सांगितले.

समितीला या गंभीर विषयाबाबत गांभार्य दिसत नाही. आजही सचिव उपस्थित नाहीत. समिती वारंवार सांगत आहे की, एकत्र बसून बैठक घ्यावी, विभागाने बाजू योग्य करण्याच्या दृष्टीने कारवाई केली पाहिजे. मात्र विभाग ही बाब गांभीर्याने घेत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या बाजूने गांभीर्याने घेतले गेले होते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने दोषी अधिकारी कर्मचारी ॲण्टीसिपेटरी बेल घेऊन सुटले आहेत. मात्र तरीही विभाग पुढील कारवाई करीत नाही. टीडीसी व मार्केटिंग एजंट आहेत, त्यांचा पैसा गुंतलेला नाही. शासनाचा पैसा गुंतलेला आहे. ते मर्यादेच्या बाहेर काळजी करीत नाहीत. शेवटी सर्व काही गोडबंगालाच होणार आहे. समितीने त्यासाठीच सूचित केले होते की, एकत्रित कारवाईसाठी पाचही विभागाच्या सचिवांची बैठक घ्यावी आणि योग्य कारवाई करावी, जेणेकरुन पैसे वसूल होतील असे समितीने निदर्शनास आणले असता, ॲण्टीसिपेटरीबाबत आदिवासी विकास महामंडळाने सह सचिवांना सांगितले होते. ५ विभागाच्या सचिवांची बैठक बोलाविली होती. बैठकीस कोणत्याही विभागाचे सचिव आले नव्हते. उप सचिव होते असे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रतिनिधींनी सांगितले.

त्या बैठकीत काय ठरले, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण व आदिवासी विकास विभागांचे तरी सचिव आले होते का ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी बैठक घेतली असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आजही विभागाचे उप सचिव उपस्थित आहेत हे योग्य नाही. समिती गंभीर विषयावर चर्चा करीत आहे. वारंवार बैठक बोलावित आहे. याबाबत सर्व विभागांची उदासीनता असल्याचे दिसत आहे. विभागाचे दुर्लक्ष आहे. विभागाने कोणतीही परिणामकारक कारवाई केलेली नाही. दीड महिना झाला आहे. कारवाई झाली आहे का? सर्व मिलर्सवर एफआयआर झाले होते. हीच दिनांक ११ ऑक्टोबरची परिस्थिती होती. मात्र त्यानंतर कोणी कारवाई केली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सर्व मिलर्सवर एफआयआर झाले आहेत. आरआरसी देखील झाली आहे, सर्व एफआयआर सीआयडीकडे वर्ग झाले आहेत असे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रतिनिधींनी सांगितले.

ॲण्टीसिपेटरी बेल रद्द करण्याची कारवाई करण्यामध्ये विभाग यशस्वी ठरला तर हे पूर्ण पैसे विभागाला घेता येतील. या दृष्टीने कारवाई करावी. असे मागील बैठकीत सूचित केल्याचे समितीने निदर्शनास आणले असता, ॲण्टीसिपेटरी बेल रद्द करण्यासाठी विधी व न्याय, नागपूर येथे याचिका दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. याचिका सादर झाल्यानंतर विभाग स्पेशल काऊन्सिलर देखील लावणार आहे. विधी व न्याय विभागाला फाईल देखील पाठविली होती. याचिकेतील निर्णयानुसार होतील तशी कार्यवाही करण्यात येणार आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विशेष वकील नेमण्यासाठी समितीने मागील बैठकीत सूचित केले होते. त्यास अजूनपर्यंत विधी व न्याय विभागाने मान्यता दिलेली नाही, हे बरोबर नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, प्रस्ताव आला होता. प्रस्तावामध्ये केस नंबर काय, कोणता गुन्हा आहे, कोणते आरोपी आहेत, याबाबत काहीही नमूद नाही. विभागाला हे माहीत करायचे असते की, ज्यांना नामायचे आहे ते कधी कोणत्या केसमध्ये आरोपीकरिता ॲपिअर तर झाले नाहीत ना ? असे विधी व न्याय विभागाच्या प्रतिनिधींनी सांगितले.

विधी व न्याय विभाग, नागपूरकडे आदिवासी विकास महामंडळ व पण महासंघ या दोन्ही एजन्सींनी सादर केले आहे. पिटिशन फाईल झाल्यानंतर विशेष समुपेशक नेमता येईल. त्यासाठीचा खर्च विभाग करणार आहे हेही नमूद केले आहे. पिटिशन सुरु झाल्याबरोबर विशेष समुपदेशक नेमता येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे प्रतिनिधी वकील नेमण्याबाबत म्हणत आहेत. मात्र विधी व न्याय विभागाचे अधिकारी म्हणत आहेत की, विभागाच्या प्रस्तावामध्ये पूर्ण गोष्टींचा उल्लेख नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, त्यांचे म्हणणे बरोबर आहे. त्यांनी काही त्रुटी काढल्या होत्या. पिटिशन फाईल करताना सरळ विशेष समुपदेशक नेमण्यात येत नाही. विधी व न्याय विभागाने तसे सांगितले होते. दोन्ही एजन्सींतर्फे विधी व न्याय विभाग, नागपूरला पिटशिन फाईल करण्यासाठी मूव्ह झाले आहे. पिटिशन सरकारी वकिलांतर्फे मूव्ह झाल्यानंतर विभागाला विशेष समुपदेशक नेमता येतो असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समुपदेशक नेमता येतो, हे बरोबर आहे. पण विधी व न्याय विभागाच्या मतानुसार म्हणण्याचे काय केले आहे? अशी विचारणा समितीने केली असता, विधी व न्याय विभागाचे म्हणणे आहे की, केस नंबर वगैरे दिलेले नाही. सर्व गोष्टी विधी व न्याय विभाग, नागपूरला सादर केल्या आहेत. नागपूर खंडपीठाकडे सदरहू प्रकरण असल्यामळे नागपूर लॉ ॲन्ड ज्युडिशिअरीला ते सादर करावे लागले. प्रत्येक हायकोर्टप्रमाणे अधिकारी नियुक्त केलेले असतात असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

सदरहू प्रकरण नागपूरच्या लॉ ॲन्ड ज्युडिशिअरी अंतर्गत आहे. केस नंबर ॲप्लिकन्ड आणि रिस्पॉंडंड या दोन्हीची माहिती हवी आहे. १६७ कोटी रुपये आदिवासी विकास महामंडळाकडे आणि पणन महासंघाकडे प्रलंबित आहेत. लॉसेस ऑफ सेल गृहीत धरले पाहिजे. २५० रुपयांमध्ये धान विकून ते १००० रुपयांना खरेदी केले. त्याबाबतची थकबाकी कमी केली पाहिजे. त्याचप्रमाणे आदिवासी विकास महामंडळाचा प्रस्ताव मान्य केल्यानंतर साल्टेज माफ करण्यात येऊ नये. धान्याचा खालचा स्तर सडला आहे, त्याचप्रमाणे सर्व माल उघड्यावर पडलेला होता. यासाठी वैधानिक आधार घेऊन साल्टेज ठरविण्यात यावे, असे मागील बैठकीमध्ये सूचविण्यात आले होते. त्यामुळे यासंदर्भात कारवाई करण्यात आलेली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, आदिवासी विकास महामंडळाकडून जो प्रस्ताव आला होता त्यामध्ये असे ठरले होते की, पणन महासंघाला चार वर्षात एक टक्का तूट दिलेली आहे. ती तूट देण्यासाठी वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. त्यानंतर आदिवासी विकास विभागाला प्रस्ताव पाठविल्यानंतर पुन्हा वित्त विभागाला तो पाठविला जाईल असे पणन विभागाच्या प्रतिनिधींनी सांगितले.

प्रशासनिक कारणामळे चार वर्षापासून धान उघडयावर पडलेले होते. त्याचे साल्टेज एक टक्के करून चालणार नाही. त्यासाठी योग्य प्रकारे नियोजन केले नाही तर कोणत्याही प्रकारची वसुली होणार नाही. जे योग्य आहे ते करण्यात यावे, असे वारंवार समितीच्या माध्यमातून सांगण्यात येत आहे. व्यावहारीक बाजू समितीच्या निदर्शनास आणावी. एक टक्याचे दोन टक्के आदिवासी विकास महामंडळाला देण्याचा निर्णय अतिशय योग्य होता. त्याच धर्तीवर जो माल उघडावर आहे किंवा जो माल सडलेला आहे, त्याबाबत शासनाने काय कारवाई केली, चार वर्षापासून माल उघड्यावर पडलेला होता त्यानंतरही शासनाकडून खरेदी सुरूच होती. त्यामुळे हे सर्व ढिसाळ नियोजन झालेले आहे. यावर एक टक्क्यावर जर चिटकून राहिले तर याबाबत कोणताही निर्णय होणार नाही. त्यामुळे योग्य ती कारवाई करण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, आदिवासी विकास विभागाने प्रस्ताव तयार केलेला आहे. जसे की, ऊन वारा, पाऊस किंवा साठवणुकीमुळे किती तूट निर्माण झाली, उंदीर, घूस, उच्च तापमान या प्रमाणे प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे असे आदिवासी विकास विभागाच्या प्रतिनिधीनी सांगितले.

यावावत समितीने सांगितले होते की, या सर्व विषयासाठी वकिलांची नियुक्ती करण्यात यावी. त्यानंतर हे चाळीस कोटी रुपये वसूल होतील. या सर्व विषयाबाबत संबंधित विभागाची अनास्था दिसून येत आहे. जे अधिकारी या प्रकरणाबाबत दुर्लक्ष करीत आहेत. त्यांच्यावरही कारवाई केली पाहिजे. या सर्व विषयाबाबत पाचही विभागाच्या सचिवांची बैठक घेण्यात यावी. १६७ कोटी रुपयांची असलेली थकबाकीबाबत योग्य ती कारवाई करण्यात यावी. सडलेल्या, विकलेल्या धानाच्याबाबत राज्य सरकारने निर्णय घेतलेला आहे. १६७ कोटी रुपयांची आकडेवारी कमी होण्याच्या दृष्टीने काय कारवाई करता येईल, याची माहिती घ्यावी. प्रत्यक्षात असलेली वसूली किती आहे, याची माहिती समितीला देण्यात यावी आणि ती रक्कम वसूल करावी. चार-पाच वर्षापासून जर बिलिंग झाले नाही आणि ट्रान्स्पोर्टचे दर ठरविले नाही, तर याची जबाबदारी विभागावर येत असते. माल उघड्यावर पडलेला असताना देखील खरेदी करण्यात येत असते. त्यामुळे त्या मालाची योग्य ती विल्हेवाट लावली पाहिजे. या सर्व गोष्टीकडे शासनाचे आणि संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झालेले आहे. यामधील आकडेवारीला सबसाईट करण्यात यावे. त्याचप्रमाणे योग्य असलेली कारवाई विभागामार्फत करण्यात यावी असे समितीने सूचित केले.

परिच्छेद क्र. ३.२.४.१ शुष्कतेमुळे झालेल्या हानीपोटी नुकसान भरपाई न करणे-

या परिच्छेदाबाबत माहिती देताना ८ कोटी रुपयांपैकी १.९४ कोटी रुपये शिल्लक आहेत आणि बाकी सर्व वसुल झालेले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे किती दिवसात होणार आहे ? What about the marketing ? अशी विचारणा समितीने केले असता, विभागाने त्यांना २ वर्षापासून एक कमिशन सुद्धा दिलेले आहे. त्यांना पेमेंट सुद्धा नाही तर आता ते कसे वसुली करणार आहेत हा प्रश्नच आहे. सन २०१६-१७ पासुन विभाग त्यांना पेमेंटच करीत नाही. यामध्ये मार्केटींगचा काही विषय नाही. शासनाने फक्त एकाच एजन्सीला २ टक्के मान्य केले आहे. हा २ टक्के करण्याचा निर्णय हा फक्त मार्केटींगला लागू झालेला आहे. तो निर्णय टीडीसीला लागू करून एवढया वर्षाची शिल्लक असलेली वसुली करता येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले त्यावर दोन्ही संस्थांना तो निर्णय लागू करायला पाहिजे होता असे समितीने सूचित केले.

परिच्छेद क्र. ३.२.४.२- SGAS कडे पडून असलेल्या असडीत धानाची विल्हेवाट लावल्यामुळे आणि भात गिरण्यांमध्ये पडून असलेल्या CMR ची किंमत वसूल न करण्यामुळे झालेले नुकसान :–

२.६ हा मुद्दा सीएमआरचा आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागीय सचिवांनी सांगितले की, काही प्रमाणात धान शिल्लक होते तर हे असे नुकसान का झाले ? अशी विचारणा समितीने केली असता, सीएमआर जमा झालेले आहे. सन २०१३ मध्ये तो उशिर झाला होता. तो ४ वर्षांसाठी आणि मार्केटसाठी होता असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

दोघांनाही तो लागू करून विभागाने बाकीची वसुली तर पूर्ण करावी. २ ते ३ लोकांना निलंबित करून काही होणार नाही. विभागाने ३ लोकांना निलंबीत करून प्रकरण संपविण्यात येऊ नये. वेळेवर कारवाई केली नाही म्हणून जर हे पैसे बुडाले तर सर्वजण जबाबदार राहतील असे मत समितीने व्यक्त केले.

याबाबत पणन विभागाच्या विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, त्यांनी सूचना दिलेली आहे. सीएमआर ॲडव्हान्स सतत रिलिज करून जे सहभागी असतील त्यांचा समावेश करण्यात येईल. अधिकाऱ्यांना बडतर्फ करूनही विभागाला काही रक्कम मिळत नाही.

त्यांच्या वेतनामधून काही वसुली करता येत नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय चौकशी करून विभागाने त्यांना बडतर्फ केले. त्यानंतर त्यांना काही देणे लागत नाही. त्यामुळे हे स्टॉक कमी केले आहेत. कोणताही सीएमआर ॲडव्हान्स न घेता त्यांना सतत रिलिज करण्यात आले असे पणन विभागाच्या विभागीय सचिवांनी सांगितले.

संगनमताचा गुन्हा दाखल केला पाहिजे. याकडे गंभीरपणे बघितले पाहिजे आणि ही वसुली झाली पाहिजे. या सर्व अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन चालणार नाही तर बाकीच्या लोकांवरपण कारवाई केली पाहिजे असे समितीने सूचित केले असता, याबाबत सक्त भुमिका घेण्यासाठी श्री. पाटील यांना सॉफ्टवेअर वापरण्यासंबंधी सांगितले आहे असे पणन विभागाच्या सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्र. ३.२.५ भात गिरण्यांवर शास्ती आकारणे :—

२.७ या परिच्छेदाबाबत माहिती देताना विभागाला जी १. ५ पट वसुली करायची होती ती उशीर झाल्यामुळे विभागाकडून १ पट वसुली करण्यात येत आहे. सन २०१७ मध्ये ते माफ केलेले आहे. दुसरे जे ए टू सी आहे त्याच्या सीडमॅप मध्ये ३. ३१ लक्ष रुपयांची वसुली झालेली आहे. उरलेली वसुली करायची आहे. ती उरलेली वसूली एकूण ३. ७३ कोटी आहे. त्यापैकी ३ लक्ष वसुली झालेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाची प्रक्रियाच सुरू झाली नाहीतर कशी वसुली करणार ? अशी विचारणा समितीने केली असता, ठराविक लोकांकडून ती वसुली करण्यात येणार आहे. त्यांच्या बिलांमधून ती वसुली करण्यात येते पण ते सदस्य बिलासाठी आलेले नाहीत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाने सीएमआरची जी यादी तयार केली आहे त्यामध्ये ठराविक काही डयुमध्ये आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने असे कधी केलेले नाही. सीएमआर जमा न करणे असा विषय आहे. ती देखील वसुली केली जाईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाकडून मागणी व्हावयास हवी होती, नोटीस इश्यू करणे आवश्यक होते. अ ते क ग्रेड मधील फरकाची रक्कम वसूल करण्याची मागणी विभागाने करावयास हवी होती. त्या लोकांच्या खात्यात रक्कम डेबिट करण्यात यावी. सीएमआर व ग्रेडमधील फरकाची रक्कमम जमा करावी. ज्यांना विभागाने क्लिनचिट दिली ते देखील यामध्ये असतील. संबंधित अधिकारी यांची १०० टक्के चूक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, सीएमआरची वाहतूक केली असून त्या रकमेमधून ही वसुली करावयाची आहे. यामध्ये बहुतेक तेच सर्व मिलर्स असतील. ए टू सी पर्यंतची फाईल विभागाकडे जोपर्यंत येत नाही तोपर्यंत विभागाला ते समजत नाही. फाईलमध्ये एलडी असतात त्याच्या आधारे विभागाच्या लक्षात येते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ए टू सी ग्रेडचे पैसे कोणाकडून घ्यावयाचे आहेत याची यादी विभागाकडे असली पाहिजे. त्या यादीमध्ये त्यांच्या नावावर पैसे डेबिट केले पाहिजे असे समितीने सूचित केले असता, मिलर्सची यादी विभागाकडे नाही. बिलांची फाईल विभागाकडे येते तेव्हा विभागाला समजते. यांची बिले आली नाहीत. ही माहिती स्वतंत्रपणे देखील शक्य आहे. ते काम करावे लागेल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ज्यांची रिकव्हरी आहे व जे विभागाकडे येतच नाहीत ते कशाला विभागाकडे बिल सादर करतील ? विभागानेच त्यांच्याकडे मागणी करावी असे समितीने सूचित केले असता,

नोटीस काढल्यानंतरही त्यांनी रक्कम दिली नाही तर आरआरसी करता येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्र. ३.२.६ CMR चे प्रमाणीकरण आणि त्याचा पुरवठा, कार्यालयांना पुरवठा यातील वेळेचा अपव्ययः–

२.८ या परिच्छेदासंदर्भात धान वितरित करण्यामध्ये उशीर झालेला आहे, हे मान्य आहे. तोच सीएमआर वितरित झालेला आहे, याची खात्री केलेली आहे. सीएमआरमध्ये बदल झालेला नाही. उशीर झाल्यामुळे काही गडबड झाली आहे काय अशी शंका होती, मात्र तसे काहीही झालेले नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१६८ कोटी रुपयांपैकी ८० कोटी रुपयांचे नुकसान पॅडीच्या विक्रीमध्ये झालेले आहे. ८८ कोटी रुपयांचा काही पत्ताच लागत नाही. या संदर्भात जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. उर्वरित निधी बाबत काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, काही रक्कम कर्मचारी, अधिकारी संस्था यांच्याकडून वसूल करावयाची आहे. नोटीस देणे, नोटीस अंतिम करणे या नंतर रक्कम वसूल करणे, आर.आर.सी. करणे किंवा डीई करणे, चौकशी करणे व उर्वरित रक्कम राईट ऑफ करण्याचा प्रस्ताव तयार करावा लागेल. याबाबत टाईम टेबल आलेले आहे. याबाबत बोर्ड मिटींगमध्ये विरोध केला होता. ही वसुली करायची नाही असे त्यांचे म्हणणे होते. जे वसुलीस पात्र आहेत त्या संस्थांना किंवा इतरांना बोर्डाच्या बैठकीत निर्णय घेऊन पाठीशी घालता येणार नाही. या संदर्भात स्पष्ट सूचना द्याव्या लागतील असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

बोर्डाला असा अधिकार नाही. जे जबाबदार आहेत त्यांच्याकडून वसुली झाली पाहिजे. बोर्डाने त्यांना माफ करण्याचा निर्णय घेतला तरी देखील तसे करणे योग्य होणार नाही. ज्यांच्यावर जबाबदारी होती, अशा संस्था किंवा अधिकारी यांना संरक्षण देण्याचा बोर्डाने निर्णय घेतला तरी देखील त्याला शासनाने मान्यता देऊ नये. त्यांच्याकडून वसुली झाली पाहिजे. एखाद्या विभागामध्ये काही लॅप्स असेल त्यामुळे रक्कमेमध्ये काही फरक येत असेल किंवा काही बुक ॲडजस्टमेंटची रक्कम असते, त्यावेळी राईटऑफ करता येते. मात्र या ठिकाणी ही रक्कम फ्रॉड केलेली आहे. ही कशी काय राईट ऑफ करता येईल ? १६८ कोटी रुपयांपैकी ८० कोटी रुपयांचा माल सडल्यामुळे नुकसान झाले. ८८ कोटी रुपयांचा काहीच पत्ता लागत नाही. त्याबाबत जबाबदारी निश्चित झालेली नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, ११ ते १३ लाख क्विंटलचा लिलाव केला व प्रत्यक्षात ९ लाख क्विंटल धान्य दिले असे विभागीय सचिवांनी सांगितले.

उर्वरित मालच गायब होता. बँक गॅरेटी न घेता माल दिला. आरएम व्यतिरिक्त इतर अधिकारी काय करीत होते ? इंटरनल ऑडिटर, जीएम काय करीत होते ? ५-५ वर्षे निर्णय घेतला जात नाही ? या संदर्भात कारवाई करण्याची जबाबदारी सचिवांची नाही काय ? या संदर्भात जबाबदारी निश्चित केली पाहिजे. तसेच सीएमआरच्या वसुलीची कारवाई झाली पाहिजे. विभागाने चांगल्या वकीलांची नियुक्ती करावी. दोन्ही संस्थांकरिता एक वकील नियुक्त करावा व झालेल्या कारवाईची माहिती समितीला द्यावी. या संदर्भात एक महिन्याच्या आत कारवाई करावी सदर केस मजबुतीने कोर्टासमोर व पोलिसांसमोर मांडली पाहिजे. दोन्ही विभागाच्यावतीने एकत्रित बैठक घेऊन निर्णय घ्यावा. हा निधी राज्य शासनाचा आहे. मार्केटींग किंवा टीडीसी याबाबत कायदेशीर बाब सारखीच आहे. सीएमआरचा निधी बुडालेला आहे. या दृष्टीने कारवाई झाली पाहिजे. केवळ वसुलीच्या संदर्भात एक महिन्यानंतर सर्वांची एकत्रित साक्ष घेण्यात येईल असे समितीने सूचित केले.

अभिप्राय व शिफारशी :-

परिच्छेद क्र. ३.२.१ "भारतीय अन्न महामंडळाकडील थकबाकी"

अभिप्राय

३.१ किमान आधारभूत किंमतीला धान प्रापण योजना (MSP) ही केंद्रशासनाची योजना असल्यामुळे ती राबविण्यासाठी राज्य शासनाकडून करण्यात आलेल्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती केंद्रशासन भारतीय अन्न महामंडळाद्वारे (FCI) करते. सुरुवातीला विभाग, MSP ला खरेदी केलेल्या धानासाठी राज्य शासनाच्या दोन अभिकरणांना (SGAs) स्वीय प्रपंजी लेख्यातून रक्कम प्रदान करते. ग्राहकोपयोगी तांदूळ (CMR) FCI ला पोहचल्यावर SGAs, CMR मुल्याची मागणी FCI कडे करून प्राप्त प्रतिपूर्तीची रक्कम स्वीय प्रपंजी लेख्यात पुन्हा भरणा केली जाते आणि SGAs ना दुसऱ्या प्रासंगिक शुल्कांसाठी रक्कम प्रदान केली जाते. परंतु खरीप पणन हंगाम (KMS) २००९ ते २०१५ मध्ये जो ग्राहकोपयोगी तांदूळ FCI ला पोहचविला होता त्याबाबतची रु. ५१.५१ कोटीची प्रतिपूर्ती करणे प्रलंबित होती. धान खरेदीसाठी केलेला खर्च, FCI ला पोहचविलेला CMR आणि FCI कडे एकूण प्रलंबित दाव्यांपैकी (रु. ५१. ५१ कोटी) ५८.७० टक्यांपेक्षा (रु. ३०.२४ कोटी) जास्त दावे तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित होते(२००९-१२) असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

भारतीय अन्न महामंडळाकडील थकबाकीमागील कारणांची समितीने छाननी केली असता सन २००९ ते २०१२ मधील धानास भरडाईसाठी दि. ३१ डिसेंबर २०१३ पर्यंत शेवटची मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यामुळे CMR जमा करून पावत्या प्राप्त होण्यास व प्रतिपूर्तीचे दावे सादर करण्यास व प्रत्यक्ष प्रतिपूर्तीची रक्कम प्राप्त करून घेण्यास विलंब झाला. त्याचप्रमाणे प्रतिपूर्तीच्या काही दाव्यांमध्ये आढळलेल्या त्रुटींमुळे त्याची पुर्तता करण्यामध्ये कालापव्यय झाला. तसेच दावे मंजूर करताना FCI ने लेखापरिक्षित विवरणाकरीता रक्कम राखून ठेवणे व बारदाना घसारापोटी व CMR मधील आर्द्रतापोटी रक्कम राखून ठेवणे अशा त्रुटी आढळल्यामुळे या कारणास्तव देखील ही प्रतिपूर्ती प्रलंबित होती. परंतु तरीही सद्यःस्थितीत रु. ५१.५१ कोटीच्या प्रलंबित रकमेपैकी रु. ४९.७० कोटी एवढी प्रतिपूर्ती झालेली असून फक्त रु. १.८१ कोटी एवढ्या रकमेची प्रतिपूर्ती होणे बाकी असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. ज्यांच्याकडे बारदान असते त्यांचे पैसे कमी केले जातात व त्यासाठी काही रक्कम रोखून ठेवण्यात येते व याची पुराव्यानिशी तपासणी केल्यानंतर या रकमेची प्रतिपूर्ती होते. परंतु या सर्व बाबींचे ताळमेळ व नियोजन विभागाने विनाविलंब व अचूकरित्या केले तर हा थकबाकीचा विषय संपू शकेल. विभागाकडून दरवर्षी नियमितपणे या ताळमेळाचे काम होत नाही. परिणामी सन १९९९ पासून आजतागायत या ताळमेळाचे काम प्रलंबित आहे. सदरहू काम मार्च, २०१९ पर्यंत पुर्ण करण्याच्यादृष्टीने विभागाने कालबद्ध योजना तयार केलेली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. तसेच महालेखाकारांच्या आक्षेपामध्ये नमूद रु. ५१.५१ कोटी थकबाकीची रक्कम ही सन २०१४ पर्यंतची असून सद्यःस्थितीत थकबाकीची ही रक्कम फार मोठी असून त्या देखील रकमेची प्रतिपूर्ती विभागाने करून घेणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

शिफारस

३.२ **महाराष्ट्रात, राज्य शासनाच्या दोन अभिकरणांद्वारे बिगर आदिवासी क्षेत्रात, महाराष्ट्र राज्य पणन महासंघ (MARKFED) आणि आदिवासी क्षेत्रात, महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळाद्वारे (TDC), केंद्र शासनाची किमान आधारभूत किंमतीला धान प्रापण योजना अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाद्वारे राबविली जात आहे. या अभिकरणांद्वारे त्यांच्या प्रापण केंद्रावर, केंद्र शासनाने घोषित केलेल्या किमान आधारभूत किंमतीमध्ये दरवर्षी शेतकऱ्यांकडून खरीप पणन हंगामासाठी धान खरेदी करतात, अशा पद्धतीने खरेदी केलेले धान महासंघ व TDC ही दोन्ही अभिकरणे स्थानिक खाजगी भात गिरणीधारकांकडून धानाची भरडाई (milled) करून घेते आणि अशाप्रकारे मिळालेला ग्राहकोपयोगी तांदूळ FCI कडे जी केंद्र शासनाची नोडल एजेन्सी आहे, निर्धारित सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत उपयोगासाठी जमा केला जातो. केंद्र शासनाने या ग्राहकोपयोगी तांदूळासाठी महाराष्ट्र शासनाला देण्याचे दर सुद्धा निश्चित केले आहेत. ज्यामध्ये शेतकऱ्यांना द्यावयाची किमान आधारभूत किंमत आणि इतर प्रासंगिक शुल्कही संम्मिलीत असतात. वखारीपासून गिरणीपर्यंत धानाच्या आणि गिरणी पासुन FCI च्या वखारीपर्यंत तांदळाच्या वाहतुकीचा खर्चही केंद्र शासनाकडून गिरणीधारकाला महाराष्ट्र शासनाद्वारे देय असतो.**

लेखापरीक्षेने अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागातील (विभाग) आणि गोंदिया, ठाणे, रायगड आणि भंडारा या चार जिल्ह्यांतील या योजनेच्या अंमलबजावणीची नमुन्यादाखल तपासणी केली असता MSP योजनेअंतर्गत राज्यात १५०. ९८ लक्ष क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली ज्यावर रु. १९१२.९० कोटी खर्च केला गेला आणि जुलै २०१५ पर्यंत केवळ ७१.३२ लक्ष क्विं. CMR FCI ला पोचता केला गेला होता/पाठविला होता. त्यातील रु. ५१.५१ कोटींची प्रतिपूर्ती प्रलंबित होती जी सद्यःस्थितीत केवळ रु. १.८१ कोटी एवढी प्रलंबित आहे. ही प्रतिपूर्ती विभागाने तात्काळ FCI कडून करून घ्यावी. FCI लेखापरिक्षीत विवरणाकरिता रक्कम राखून ठेवते व बारदाना घसारापोटी तांदळाच्या आर्द्रतेपोटी काही रक्कम राखून ठेवते. त्यासाठी राज्य शासनाने उपरोक्त सर्व बाबींचा हिशोब व ताळमेळ FCI सोबत विनाविलंब केला तर या रकमांची देखील प्रतिपूर्ती विनाविलंब होऊ शकते. परंतु प्रतिपूर्तीचे दावे सादर करण्यास विलंब, दाव्यांमध्ये त्रुटी राहणे, त्रुटींचे निराकरण वेळेत न करणे, बारदानांच्या हिशोबाचा ताळमेळ न घालणे इ. अनेक कारणांमुळे सन १९९९ पासून FCI कडे मोठ्या प्रमाणात थकबाकीची रक्कम प्रलंबित आहे. यासाठी विभागाने या संपुर्ण बाबींचे योग्य नियोजन व ताळमेळ करून संपूर्ण हिशोब व लेखे अद्ययावत करणे आवश्यक आहे. सद्यःस्थितीत राज्य शासनाला केंद्र शासनाकडून सन २००३ पासून ते आजतागायत जवळजवळ रु. ८६७ कोटी घ्यायचे आहेत. जोपर्यंत मागील प्रकरणांच्या थकबाकीचा हिशोब व ताळमेळ पूर्ण होत नाही तोपर्यंत ही थकबाकी निरंक व अद्ययावत होवू शकणार नाही. त्यासाठी विभागाने आधुनिक व अद्ययावत तांत्रिक यंत्रणा व प्रणाली अवलंबावी, यासाठी एक विशेष धडक मोहिम राबवून प्रलंबित कामकाज

तात्काळ पूर्ण करावे व ही थकबाकीची व प्रतिपूर्तीची रक्कम अद्ययावत व निरंक करण्यात यावी. अतः विभागाने ताळमेळाचे काम युद्धपातळीवर करून हा विषय कालबद्ध पद्धतीने निकाली काढावा व संपूर्ण रकमेची प्रतिपूर्ती FCI कडून तातडीने करून घ्यावी. यामध्ये निर्धारीत सार्वजनिक वितरण प्रणालीचा (PDS) देखील समाविष्ट आहे. यासाठी FCI ला १०० टक्के अग्रीम रक्कम द्यावी लागते व त्यांचे निकष अतिशय कडक असल्याने त्यातील बरीचशी रक्कम ते अमान्य करतात. गोदामाचे भाडे, वाहतुकीचा खर्च केंद्र शासनाकडून देण्यात येतो व त्याची प्रतिपूर्ती न झाल्यास तो आर्थिक भार राज्य शासनाला सोसावा लागतो. यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे हा विषय सामोपचाराने व योग्य समन्वयाने हाताळून यादृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व FCI कडील थकबाकी अद्ययावत व निरंक करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. ३.२.२ "स्विय प्रपंजी लेख्यात निधिची अनियमीत जमा"

अभिप्राय

३.३ केंद्र शासनाने धानातील आर्द्रता कमी होण्यामुळे धानाच्या वजनात होणारी एक टक्का हानी ग्राहय धरली आहे. याशिवाय, महाराष्ट्र शासनाने महासंघाला सन २००९-१२ हंगामासाठी अजून एक टक्का वजनाच्या हानीची सूट दिलेली आहे. परंतु असडित धानाची विल्हेवाट लावण्याचे काम चालू असल्यामुळे सदरहू हानी ग्राहयतेची सुविधा आदिवासी विकास महामंडळाला मात्र दिली गेली नव्हती. ही योजना केंद्रशासनाची असल्यामुळे, महाराष्ट्र शासनाने महासंघाला देऊ केलेली हानी दायित्वाची जबाबदारी ही अतिरिक्त एक टक्का देण्याइतकीच मर्यादित होती. परंतु या योजनेखाली विभागाने २००९-१५ दरम्यान, अतिरिक्त शुष्क भत्त्यापोटी अंदाजीत रु. ३.६२ कोटी ऐवजी रु. ३२३.१५ कोटींपैकी रु. २६१.१३ कोटी मुक्त करून स्वीय प्रपंजी लेख्यात (PLA) जमा केले होते यामुळे PLA मध्ये रु. २५७.५१ कोटी अतिरिक्त जमा करण्यात आले. ही कृती केवळ नियमबाह्यच नव्हेतर विभागाच्या सदोष अर्थसंकल्पाचेही निदर्शक होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले.

अनुज्ञेय असलेल्या अतिरिक्त शुष्क भत्त्यापोटी रु. ३.६२ कोटीऐवजी रु. ३२३.१५ कोटीची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येवून रु. २६१.१३ कोटी पी. एल. ए. अकाऊंटमध्ये जमा करण्यात आली. परिणामी रु. २५७.५१ कोटी रक्कम अतिरिक्तरित्या जमा झाल्याबाबत समितीने विचारणा केली असता सन २००९ ते २०१५ या कालावधीत मंत्रीमंडळाने प्रोत्साहनपर राशी व अतिरिक्त भरडाई दर मंजूरीबाबतचा निर्णय घेतल्यामुळे रु. २५७.५१ कोटीपैकी रु. १३२,४४,७०,८७८ रक्कम खर्च करण्यात आली व उर्वरित रु. १२५.०६ कोटी अतिरिक्त अखर्चित रक्कम पी. एल. ए. मध्ये जमा करण्यात आली व ही अतिरिक्त जमा रक्कम आधारभूत किंमत योजनेअंतर्गत व योजना सुरू ठेवण्यासाठी आवश्यक असलेले प्रदान करण्यासाठी उपयोगात आणली. तसेच धान शिल्लक राहून निविदेद्वारे विक्री करावी लागणे, विहित कालावधीत भरडाई पूर्ण न होणे इ. कारणांमुळे येणे रक्कम वेळेत प्राप्त न होणे अथवा कमी प्राप्त होणे. परिणामी पी. एल. ए. अकाऊंटमध्ये उपलब्ध असलेल्या या निधीमुळे योजनेची अंमलबजावणी खंडीत झाली नाही. तसेच निविदा / ई-लिलावाद्वारे धानाची विक्री करावी लागल्यामुळे जवळ-जवळ रु. ७१.७६ कोटी एवढा तोटा झालेला आहे. तसेच भरड धान्य खरेदीसाठी खर्च करण्यात आलेल्या रु. १३४.२८ कोटी रकमेपैकी रु. ८०.९७ कोटी रकमेचीच प्रतिपूर्ती झाली असून उर्वरित रु. ५३.३० कोटी रक्कम अद्यापही अप्राप्त आहे. यातील धान सडल्यामुळे रु. ७१ कोटीचे नुकसान झालेले आहे. दरामध्ये एकमत न झाल्यामुळे ३-३ वर्षे मिलींग झाले नाही व संपुर्ण धान खराब झाले. अशा सर्व बाबींमुळे हा खर्च वाढल्यामुळे तो PLA अकाऊंटमध्ये असलेल्या निधीमधूनच करणे क्रमःप्राप्त ठरते व तसे न केल्यास या योजनेची अंमलबजावणी खंडीत होईल असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. यावर समितीने व महालेखाकारांनी आक्षेप नोंदवित उपरोक्त खर्च करण्यास समितीचे कोणतेही आक्षेप वा हरकत नाही. केवळ हा खर्च PLA अकाऊंटमधून करण्यात समितीचा व महालेखाकारांचा आक्षेप आहे. यासाठी लेखाशिर्ष एकच असले तरीही स्वतंत्र लेखा उपशिर्ष तयार करून त्यामध्ये उपरोक्त बाबींसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करून हा सर्व खर्च करणे आवश्यक आहे. हा निधी PLA अकाऊंटमध्ये जमा करून त्यातून हा खर्च करणे वित्तीय शिस्तीला अनुसरुन नाही असे योग्य आक्षेप महालेखाकारांनी नोंदविले असून समितीदेखील त्याचेशी सहमत आहे.

शिफारस

३.४ स्वीय प्रपंजी लेख्यात निधीची अनियमित जमा या शिर्षाखाली महालेखाकारांनी नोंदविलेले हे आक्षेप अतिशय गंभीर असून आर्थिक व वित्तीय नियमांचे उल्लंघन करणारे असून निश्चितच आर्थिक शिस्तीला अनुसरुन नाहीत. एवढेच नव्हेतर ही बाब सदोष अर्थसंकल्पाचे देखील द्योतक आहे. MSP ही योजना पुर्णतः केंद्र शासनाची योजना असल्यामुळे त्याच्या खर्चाची १०० टक्के प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून होत असताना या योजनेतील तरतूदी व्यतिरिक्त अन्य बाबी राज्य शासनाच्या स्तरावरुन अनुज्ञेय करणे व त्याअनुषंगाने होणाऱ्या खर्चाची स्वतंत्र आर्थिक तरतूद न करता ती रक्कम PLA अकाऊंटमधून खर्च करणे ही बाब निश्चितच आर्थिक शिस्तीला अनुसरुन नाही. राज्य शासनाचा अर्थसंकल्पिय अंदाज तयार करताना विभागाने तुटीच्या रकमेची तरतूद करणे अपेक्षित नाही, परंतु तरीही तशी करण्यात आली, ही गंभीर बाब आहे. बजेट तयार करताना योजनेच्या एकूण खर्चापेक्षा प्रतिपूर्तीची रक्कम कमीने परिगणित करण्यात आली. त्यामुळे दिसून येणारा तोटा किंवा तुटीची मागणी अर्थसंकल्पात करण्यात आली व ही निश्चितच अनियमितता आहे. अशी अनियमितता झाली असली तरी आहरीत केलेली काही रक्कम वाढीव भरडाई व प्रोत्साहनपर राशी यासाठी वापरण्यात आली असे विभागाने दिलेले स्पष्टीकरण निश्चितच समर्थनीय व मान्य करण्यासारखे नाही. मंत्रीमंडळाने मान्यता दिल्यास शासनाने हा खर्च करण्यास समितीचा कोणताही विरोध नाही. परंतु यासाठी स्वतंत्र उपलेखाशिर्ष उघडून व त्यासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करून हा खर्च करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत हा खर्च PLA अकाऊंटमधून करणे अभिप्रेत व नियमानुसार नाही. रु. १२५ कोटी रक्कम भरडाईविना शिल्लक असलेल्या धानाची प्रतिपूर्ती न झाल्यामुळे त्यामध्ये गुंतून

राहिली. या योजनेमधून रकमेची पूर्ण प्रतिपूर्ती झालेली नसल्यामुळे किंवा धान्य सडल्यामुळे झालेल्या नुकसानीचा भार तात्पुरत्या अथवा तुटीच्या फरकाचा भार राज्य शासनाला सोसावा लागला. अतः जेव्हा या सर्व बाबींचे तातडीने हिशोब पूर्ण होवून अभिकर्ताकडून ही रक्कम वसुल होईल तेव्हा शासनास परत करण्यात येईल असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. वास्तविकतः या योजनेसाठी तुट मंजूर करण्याचे कोणतेही धोरण नसताना अर्थसंकल्पिय अंदाज सादर करण्यात आले व तसे वित्त विभागाकडून मंजूर करण्यात आले ही बाब गंभीर आहे. अतः या संपुर्ण प्रकरणाची विभागाने गंभीर दखल घेवून यात जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी तसेच संबंधित खरेदी विक्री संस्थेवर कारवाई करून त्यांचेकडून या रकमेची वसुली करण्यात यावी. मालाची योग्य व्यवस्था न केल्यामुळे नैसर्गिक आपत्तीमुळे जे नुकसान झाले आहे त्यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व त्या रकमेच्या निर्लेखनाचा (राईट ऑफ) देखील शासनस्तरावरुन योग्य तो निर्णय घेण्यात यावा. अर्थसंकल्पिय अंदाज तयार करताना तो वित्तीय नियमांचे उल्लंघन करून सदोषरित्या करणाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी. शिल्लक राहिलेल्या धानाची प्रतिपूर्ती न मिळाल्यामुळे कोट्यावधी रुपयांची रक्कम त्यात गुंतून पडलेली आहे. या सर्व बाबींचे हिशोब तात्काळ पुर्ण करून ही रक्कम अभिकर्ताकडून तसेच मिलर्सकडून सर्व थकबाकी तातडीने वसूल करून शासनास परत करण्यात यावी व त्यांचेवर कायद्यानुसार योग्य ती कडक कारवाई करावी. १०० टक्के केंद्र शासन पुरस्कृत योजना ही केंद्र शासनाच्या निकषान्वये व अटी, शर्तीनुसारच राबविणेसंदर्भात नियोजन व अंमलबजावणी करण्यात यावी. या योजनेच्या अंमलबजावणीत झालेले नुकसान वा आलेली तूट राज्य शासनाने भरपाई करणेसंबंधीच्या कार्यपद्धतीचा अवलंब टाळणेसंदर्भातील योग्य ते नियोजन राज्य शासनाच्या स्तरावरुन करण्यात यावे. तरीही या योजनेंतर्गत राज्य शासनस्तरावरुन अनुज्ञेय करण्यात आलेल्या खर्चासाठी स्वतंत्र लेखा उपशिर्ष उघडून व त्यासाठी निधीची तरतूद अर्थसंकल्पित करून त्यातून हा खर्च करावा व PLA अकाऊंटमधून हा जमा व खर्च टाळावा. तसेच विभागाकडे येणे असलेल्या रक्कमा तातडीने प्राप्त करून घ्याव्यात व तूटीच्या रक्कमेतील तफावत दूर वा कमी करावी. त्याचप्रमाणे महासंघाप्रमाणेच १ टक्का राज्य शासनाची वाजवी घट मंजूरीचे धोरण आदिवासी विकास महामंडळासाठी देखील लागू करण्यात यावे व योजनेची अंमलबजावणी महासंघ व आदिवासी विकास महामंडळ स्तरावरुन समानरित्या करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. ३.२.३ "पणन केंद्राचे कामकाज"

अभिप्राय

३.५ केंद्र/महाराष्ट्र शासनाच्या निर्देशांनुसार, फक्त सरासरी चांगल्या दर्जाच्या (FAQ) धानाची खरेदी करण्यात यावी. FAQ निर्धारकांमध्ये इतर गोष्टींबरोबरच आर्द्रतेची कमाल पातळी आणि जैविक व अजैविक घटकांची ग्राह्य टक्केवारी विहित केलेली असते. केंद्र शासनाकडुन दोन प्रतिंच्या धानांसाठी वेगवेगळे MSP दर निश्चित केल्यामुळे, प्रापण केलेल्या धानाची ग्रेडरकडुन दोन प्रतित, जसे प्रत अ आणि सामान्य प्रत अशी वर्गवारी केली जाते. प्रापण केंद्रामध्ये, धानात असलेल्या आर्द्रतेचे प्रमाण आणि धानाची प्रत आणि जैविक व अजैविक केंद्रामध्ये, धानात असलेल्या आर्द्रतेचे प्रमाण आणि धानाची प्रत आणि जैविक व अजैविक घटकांची टक्केवारी मोजण्यासाठी ग्रेडरकडुन आर्द्रता मीटर आणि प्रतिमा विश्लेषक उपकरणांचा वापर केला जातो.

FAQ च्या निर्धारकांनुसार, ज्या धानांमध्ये १७% किंवा त्याहुन कमी आर्द्रतेचे प्रमाण आहे तेच खरेदी करावे. असे असताना ५० प्रापण केंद्रातील १६ केंद्रापैकी १५ केंद्रावर २००९-१५ दरम्यान एकाही वर्षात आर्द्रता मीटर्स उपलब्ध नव्हते तर एका केंद्रामध्ये धानातील आर्द्रतेचे प्रमाण न पडताळता, रु. ४७. ६५ कोटींच्या ३.८६ लक्ष क्विं. धानाचे प्रापण केले होते. अशाप्रकारे, FAQ च्या निर्धारकांविरुद्ध जास्त प्रमाणात आर्द्रता असलेल्या (१७% पेक्षा जास्त) धानाचे प्रापण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. उर्वरित ज्या ३४ केंद्रावर आर्द्रता मीटर कार्यरत होते, तेथे शेतकऱ्यांना धानाच्या प्रतिचे निर्धारण आणि FAQ च्या निर्धारणांची प्रतिपूर्ती निर्देशित केलेल्या ज्या प्रतवारी चिठ्ठया दिल्या जातात त्यावर आर्द्रतेचे प्रमाण दर्शविण्यात आले नव्हते. एकाही केंद्रावर प्रतिमा विश्लेषक उपकरणे उपलब्ध नव्हती. या उपकरणांच्या अभावामुळे, धानाची प्रतवारीता ठरविणे तसेच धानामध्ये अनावश्यक घटक, टाकाऊ धान्य इत्यादींचे प्रमाण विहित प्रमाणात होते याची खात्री खरेदी केंद्रावर असलेल्या ग्रेडरकडुन केवळ त्याच्या पूर्वानुभावरुन केली गेली होती. अशाप्रकारे ५० खरेदी केंद्रामध्ये रु. ४४३.१९ कोटीच्या ३४.५८ लक्ष क्विं. धानाचे प्रापण केले गेले होते. अशाप्रकारे अशास्त्रीय पद्धतीचा अवलंब केल्यामुळे सामान्य प्रतिचे धान "अ" प्रतिचे धान म्हणून किंवा "अ" प्रतीचे धान सामान्य प्रतीचे धान म्हणुन वर्गीकृत होण्याची जोखीम होती ज्यामुळे शेतकऱ्यांची/ विभागाची हानी होणार होती.

MSP अंतर्गत प्रापण केलेले धान हे खऱ्या/वास्तविक शेतकऱ्यांकडुन खरेदी केले आहे याची निश्चिती करण्यासाठी, ज्या धानाची शेतकरी विक्री करणार आहे त्याचे प्रमाण निश्चित करण्यासाठी त्या शेतकऱ्याच्या मालकीची शेतजमीन आणि कृषी विभागाकडुन त्या शेतजमीनीतुन निघणारे सरासरी धानाचे उत्पादन याची पडताळणी महासंघ व आदिवासी विकास महामंडळानी करावयाची होती. या व्यवस्थेमुळे MSP योजनेअंतर्गत व्यापाऱ्यांकडुन धानाची विक्री होण्यास प्रतिबंधित होईल असेही अपेक्षित होते. तथापि, ३० प्रापण केंद्रावरील संपूर्ण सहा वर्षाचे (२००९-१५) शेतकऱ्यांचे जमीन धारण दस्ताऐवज लेखापरिक्षेला पडताळणीसाठी सादर केले नव्हते. परिणामी २००९-१५ मध्ये या ३० केंद्रावर प्रापण केलेले रु. ९७.५६ कोटी मूल्याचे ८.२८ लक्ष क्विं. धान हे खऱ्या शेतकऱ्याचेच होते अथवा नाही याची लेखापरिक्षा खात्री करु शकली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप हे अत्यंत गंभीर असून या संपुर्ण योजनेच्या अंमलबजावणीची विश्वासार्हता आक्षेपित करणारे आहे. केंद्र/राज्य शासनाच्या निर्देशानुसार फक्त सरासरी चांगल्या दर्जाच्या धानाची खरेदी करण्यात येते. अशी निर्धारणा करताना इतर बाबींबरोबरच आर्द्रतेची कमाल पातळी आणि जैविक व अजैविक घटकांची ग्राह्य टक्केवारी विहित केलेली असते. परंतु प्रत्येक धान खरेदी केंद्रावर आर्द्रतामापक यंत्र असतेच असे नाही. अनेक ठिकाणी ही यंत्रेच उपलब्ध किंवा कार्यरत नाहीत. तसेच महामंडळाकडे कार्यरत ग्रेडरची संख्या कमी असल्यामुळे त्यांच्याकडे एकापेक्षा जास्त केंद्रांचा अतिरिक्त कार्यभार होता. परिणामी धानाची गुणवत्ता ठरविण्यासाठी सर्वच विहित निकषांचे पालन नियमानुसार व गुणवत्तापूर्वक झाले असल्याची

शाश्वती नाही. या परिच्छेदाच्या अनुषंगाने समितीसमोर विदित करण्यात आले की, खरेदी केंद्रावर कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत नेमणूक करण्यात आलेल्या ग्रेडर मार्फत धानाची खरेदी करण्यात आली आहे. सदर ग्रेडरना भारतीय अन्न महामंडळाकडून प्रशिक्षण देण्यात आलेले होते. तसेच सदरचे सर्व ग्रेडर हे स्थानिक असल्यामुळे त्यांना त्या क्षेत्रात पिकणाऱ्या धानाची प्रतवारी अनुभवाच्या आधारे निश्चित करता येते. सदर ग्रेडर मार्फत स्विकृत करण्यात आलेल्या धानाची भरडाई केल्यानंतर जो तांदूळ तयार करण्यात आला. त्याची संबंधित विभागातील भारतीय अन्न महामंडळाच्या गुणनियंत्रकाकडून (क्वालिटी कंट्रोलर) तपासणी करण्यात येऊन तो भारतीय अन्न महामंडळाने निश्चित केलेल्या स्पेसीफीकेशन नुसार असल्याची खातरजमा झाल्यानंतर तो स्विकृत करण्यात येऊन भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामात जमा करण्यात आलेला आहे. त्यामुळे FAQ नसलेल्या धानाची खरेदी होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असा खुलासा विभागाने केला. त्याचप्रमाणे शेतकऱ्याकडील ७/१२ उतारा बघूनच धान खरेदी करणेबाबत क्षेत्रिय कार्यालयांना निर्देश दिले जातात. मात्र बऱ्याचदा आदिवासी शेतकरी धान अल्प प्रमाणात धान खरेदी केंद्रावर घेवून आल्यास ७/१२ चे उतारे नसताना देखील केवळ ते दुर्गम भागातून येत असल्यामुळे धान खरेदी करणे भाग पडते. अशा शेतकऱ्यांच्या नोंदी खरेदी केंद्रावरील खरेदी रजिस्टरमध्ये नमूद करून ठेवल्या असून त्यावर शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या देखील आहेत. तसेच खरेदी केलेल्या धानाचे ७/१२ उतारे संबंधित सब-एजंटकडे उपलब्ध असल्याचेही सांगण्यात आले. सद्यःस्थितीत एन. ई. एम. एल. पोर्टलद्वारे सर्व खरेदीच्या नोंदी ऑनलाईन घेण्यात येत असल्यामुळे त्यात ७/१२ च्या नोंदी देखील घेण्यात आल्या आहेत असे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस

३.६ महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदाच्या अनुषंगाने नोंदविलेल्या आक्षेपाद्वारे प्रापण केंद्रातील कामकाजाबाबत अतिशय अचूक परिक्षण नोंदविलेले आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार केवळ सरासरी चांगल्या दर्जाच्या धानाची खरेदी करण्यात येऊन हा दर्जा वा प्रतवारी ग्रेडरकडून "अ" व "ब" अशा दोन प्रतीत ठरविण्यात येते. परंतू प्रापण केंद्रातही प्रतवारी ठरविण्याची कार्यपद्धती व त्यासाठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री व मनुष्यबळ याच्या कमतरतेमुळे ही प्रतवारीची निश्चिती गुणवत्तेनुसार होत नाही. प्रापण केंद्रात आर्द्रतेचे प्रमाण निश्चित करण्यासाठी मीटर्स वा प्रतिमा विश्लेषक उपकरणे उपलब्ध नसणे, त्यामुळे ग्रेडरकडून केवळ पुर्वानुभवाच्या आधारे ही प्रतिवारी निश्चित करण्यात येणे. परिणामी जास्त आर्द्रता असलेल्या धानाचे प्रापण होण्याची शक्यता नाकारता येत नाही अथवा अशास्त्रीय पद्धतीचा अवलंब केल्यामुळे सामान्य प्रतीचे धान "अ" प्रतीमध्ये व "अ" प्रतीचे धान सामान्य प्रतीमध्ये वर्गीकृत होण्याची जोखीम निश्चितच होती. ग्रेडरची संख्या कमी असणे अथवा एका ग्रेडरकडे दोन ते तीन केंद्रांचा अतिरिक्त कार्यभार सोपविणे त्यामुळे ही प्रतवारी ठरविण्याच्या पद्धतीची विश्वासार्हता नक्कीच शंकास्पद राहते. याहीउपर गरीब, मेहनती व या संपुर्ण तांत्रिक कार्यपद्धतीचे ज्ञान नसलेल्या व दुर्गम भागातून स्वतःचे धान्य घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांचे यात मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची पुर्ण शक्यता आहे. या शेतकऱ्यांना पुर्णतः प्रापण केंद्रातील या सदोष कार्यपद्धतीवर, निरीक्षणावर व निष्कर्षावर अवलंबून राहण्याशिवाय कोणताही अन्य पर्याय राहात नाही व त्यामुळे मध्यस्थांकडून वा प्रापण केंद्रातील कर्मचाऱ्यांकडून शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होण्याची पुर्ण शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताच्यादृष्टीने महालेखाकारांनी नोंदविलेल्या सदरहू आक्षेपांची शासनाने गांभीर्याने नोंद घ्यावी व यासाठी विभागाने आवश्यक ती उपाययोजना तातडीने करावी. सर्व धान खरेदी केंद्रावर पुरेशा प्रमाणात आर्द्रतामापक यंत्र प्रतिमा विश्लेषण उपकरणे व प्रत्येक केंद्राला स्वतंत्र ग्रेडर तातडीने उपलब्ध करून देण्यात यावे. आता विभागाने यासंदर्भातील नियम अतिशय कडक केलेले आहेत. परंतु त्याची अंमलबजावणी मात्र योग्यरित्या होणे आवश्यक आहे. विभागाने आता ही खरेदी ऑनलाईन प्रोक्युरमेंटच्या माध्यमातून सुरू केली असल्यामुळे यात अशा बाबींची शक्यता आता कमी झाली आहे. तरीही ही यंत्रणा अधिकाधिक पारदर्शक व शेतकऱ्यांच्या हिताची होण्याच्यादृष्टीने त्याची अंमलबजावणी योग्यरित्या करण्यात यावी व याच्या अंमलबजावणीचा विभागाने वेळोवेळी आढावा घ्यावा. शेतकऱ्यांना पोर्टल वापरण्यासंदर्भातील तांत्रिक बाबींचे ज्ञान असतेच असे नाही. त्यामुळे देखील शेतकऱ्यांचे नुकसान होवू नये व त्यांना योग्य त्या वेळी योग्य ते सहाय्य करण्यासाठी शासन यंत्रणा सज्ज ठेवावी वा उपलब्ध करून देण्यात यावी व प्रापण केंद्रातील त्रुटींमुळे वा सदोष कार्यपद्धतीमुळे कोणत्याही शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही याची पुरेपूर काळजी प्रशासकीय स्तरावरुन घेण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. ३.२.४ "भाताची सडणी व तो FCI कडे पोहचविणे "

अभिप्राय

३.७ राज्यात प्राप्त झालेले धान, GOI/GOM ने मंजूर केलेले शुष्कतेचे प्रमाण, SGAs कडील सडणी न झालेल्या धान्याची विल्हेवाट, भात गिरण्यांमध्ये पडून असलेला CMR, FCI कडे पाठविलेला CMR इत्यादीची खरीप हंगाम २००९-१४ दरम्यानच्या सांख्यिकीय माहितीवरुन असे निदर्शनास येते की SGAs कडे पडून असलेले भात गिरणीत न पाठवलेले धान (२.९१%) SGAs ने ई-निविदा/लिलावाद्वारे विल्हेवाट लावलेले भात गिरणीत न पाठवलेले धान (९.४३%) भात गिरणीत पडून असलेल्या CMR च्या समप्रमाणात धान (७.२०%) आणि शुष्कतेमुळे झालेली हानि (१.१०%) यामुळे प्रामुख्याने २००९-१४ दरम्यान एकूण १२१.३२ लक्ष क्विं. धानापैकी २६.४६ लक्ष क्विं. (२१.८१%) धान भात गिरणीत पाठविण्यात आले नव्हते व FCI कडे पोहचविण्यात आले नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात शासनाची नुकसान भरपाई करण्याकरिता शिल्लक धानाचे रु. १६८.१६ कोटी तसेच प्रलंबित CMR चे रु. ४६. ८० कोटी असे एकूण रु. २१४.९६ कोटी वसुल होणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे कारवाई करण्यात येत असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सादर केलेल्या लेखी उत्तरात नमूद केले.

सदरहू परिच्छेदामध्ये महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप हे अतिशय गंभीर आहेत. या सर्व अनियमितता स्वतःहून विभागाच्या निदर्शनास येऊन त्यावर विभागाने कारवाई करणे आवश्यक होते. विभागाच्या अंतर्गत लेखापरिक्षणातच या बाबी निदर्शनास येणे आवश्यक होते. परंतु स्वतःहून या बाबी विभागाच्या निदर्शनास आल्या नाहीत जे अंतर्गत लेखापरिक्षण अत्यंत कमकुवत असल्याचे द्योतक आहे. महालेखाकारांनी सन २०१४-१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालामध्ये हे आक्षेप नोंदविल्यानंतर तरी विभागाने याची तात्काळ गांभीर्याने दखल घेवून या प्रकरणी शासनस्तरावरुन कारवाई सुरू करणे आवश्यक असताना लोकलेखा समितीची बैठक सन २०१८ मध्ये लागेपर्यंत या गंभीर आक्षेपाची साधी दखलही विभागाने घेतली नाही. समितीची साक्ष लागली नसती तर अद्यापही विभागाने या प्रकरणाकडे लक्ष दिले नसते. समितीची साक्ष लागल्यानंतर विभागाने या आक्षेपाच्या अनुषंगाने कोट्यावधी रुपयांची वसुली सुरू केली. या परिच्छेदावर विभागाने वेळेत कारवाई केली असती तर आजपर्यंत ही चौकशी व वसुली पुर्ण देखील झाली असती. विभागाची या प्रकरणी असलेली उदासिनता व निष्क्रीयता यामुळे शासनाच्या कोट्यावधी रुपयांचे नुकसान तर झालेच परंतु दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर व अभिकर्ता संस्थांवर देखील कोणतीही कारवाई विभागाने केली नाही. परिणामी वर्षानुवर्षे हे गैरप्रकार सुरूच राहिले.

केंद्र शासनाकडून १ टक्का व राज्य शासनाकडून अतिरिक्त १ टक्का एवढीच शुष्कतेमधील तुट अनुज्ञेय असतानाही यामध्ये १० ते १५ टक्के तुट आल्याचे दिसून आले. ही अनियमितता वर्षानुवर्षे सुरू असताना संबंधित अभिकर्ता संस्था बदलणेसंदर्भात वा काळ्या यादीत टाकणेसंदर्भात कोणतीही कारवाई विभागाने केली नाही. परिणामी पणन महासंघ व आदिवासी विकास महामंडळाकडे या खरीप हंगाम कालावधीत हजारो क्विंटलची तुट झालेली दिसून येते. परिणामी CMR देखील मिळाला नाही. लाखो क्विंटल धानाचा यात हिशोबच लागला नाही व शेकडो कोटी रुपयांचा यात गैरव्यवहार व अनियमितता झालेली आहे. या विषयाचे गांभीर्य व यात झालेली अनियमितता व गैरप्रकार विभागाने समितीसमोर मान्यच केली व त्याअनुषंगाने काही प्रमाणात रकमेची वसुली देखील सुरू केली. उर्वरित वसुलपात्र रकमेसंबंधी सर्व अभिकर्ता संस्थांना व सर्व संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांना नोटीस काढण्यात आली असून यासंदर्भात जबाबदारी निश्चित करण्यात येईल असे समितीसमोर सांगण्यात आले.

शासनाने दरवर्षी वेगवेगळ्या दराने धान खरेदी केले. सन २००९-१४ या खरीप हंगामात शासनाने सरासरी रु. १०००/- प्रति क्विंटल दराने धान खरेदी केले परंतु विकताना मात्र ते सरासरी रु. २५०/- प्रति क्विंटल दराने विकले, त्यामुळे प्रति क्विंटलमागे सरासरी रु. ७५०/- इतकी तुट पडल्यामुळे ही तुटीची रक्कम देखील मोठी असून त्याचा भारही शासनालाच सोसावा लागत आहे. परिणामी या रकमेचे शासनस्तरावरुन निर्लेखन (राईट-ऑफ) करणेच क्रमप्राप्त व आवश्यक असल्यामुळे त्याचा देखील शासनस्तरावरुन विचार केला पाहिजे तसेच धानामध्ये झालेली नैसर्गिक तुटीची गणना स्वतंत्ररित्या करून ती रक्कम देखील निर्लेखित (राईट-ऑफ) करणे अपेक्षित व आवश्यक आहे. असे मत विभागाने व्यक्त केले. तरीही CMR ची वसुली आणि अतिरिक्त तुटीची जबाबदारी व वसुली वगळता उर्वरित धानाची विल्हेवाट विभाग कशी लावणार हा देखील प्रश्न अनुत्तरीत राहतो. यातही पणन महासंघाला राज्य शासनाच्या स्तरावरुन १ टक्का अतिरिक्त तुट अनुज्ञेय केल्यामुळे तेथे नुकसानीची व्याप्ती तुलनात्मकदृष्ट्या कमी आहे. परंतु ही १ टक्का अतिरिक्त तुट आदिवासी विकास महामंडळाला अनुज्ञेय न केल्यामुळे तसेच त्यांचेकडे निविदा/लिलाव पद्धतीचा अवलंब केल्यामुळे हे धान वाहतूक करून सुरक्षितरित्या गोदामात ठेवण्याच्या कामाला विलंब झाला. परिणामी ४-४ वर्षे हे धान बाहेर ताडपत्री घालून पडून राहिल्यामुळे पावसाच्या पाण्यात ते सडले व त्यामुळे आदिवासी विकास महामंडळाकडील तुटीच्या रकमेची व्याप्ती जास्त दिसून येते. वास्तविकतः पणन महासंघ व आदिवासी विकास महामंडळ यांना समानरित्या अतिरिक्त तुट अनुज्ञेय करणे राज्य शासनाच्या स्तरावरुन आवश्यक होते. परंतु तसे न केल्यामुळे या तुटीच्या रकमेत देखील या अभिकरणांच्या स्तरावरुन तफावत व विसंगती दिसून येते.

धानाची खरेदी कोणत्या महिन्यात केली जाते, तो कोठे साठविण्यात येतो, माल वाहतूकीची निविदा कधी काढण्यात येते या सर्व बाबींचे योग्य नियोजन करूनच राज्य शासनाच्या स्तरावरुन ही प्रक्रिया राबविली तर यातील अनेक अडचणी आपोआपच कमी होतील. धानाची खरेदी करेपर्यंत तो माल कोणत्या गोदामामध्ये साठविण्यात येणार आहे याची कोणतीही निश्चिती नसते. तसेच धान वाहतूकीची आणि धान भरडाईची निविदा माल खरेदी केल्यानंतर काढण्यात येते. त्यामुळे ती निविदा अंतिम होईपर्यंत धान तसाच पडून राहतो व खराब होतो. या प्रकरणी धान खरेदी करणे, खरेदी केंद्रावरुन गोदामापर्यंत धानाची वाहतूक करणे, धान गोदामामध्ये साठवून ठेवणे, गोदामामधून भरडाईसाठी धान गिरणीपर्यंत पोहोचविणे, या सर्व गोष्टींसाठी येणारा वाहतूकीचा खर्च या संपुर्ण बाबींचे नियोजन शासनाने एकत्रित व समांतररित्या करणे आवश्यक असताना यामध्ये अतिशय सुमार व कमकुवत नियोजन दिसून येते. ही संपुर्ण प्रक्रिया राबविण्यासाठी विभागाच्या स्तरावरुन बराच विलंब होतो. धानाची भरडाई कोणत्या महिन्यात करावी जेणेकरून शुष्कतेची तुट कमी येईल याचेही नियोजन विभागाने करणे आवश्यक आहे. धानाची ताबडतोब भरडाई करून CMR FCI कडे पाठविला तर यात २ टक्के तुट सुद्धा येत नाही. परंतु हे धान मोठ्या प्रमाणात गोदामामध्ये व आवश्यकतेनुसार उघड्यावर साठविण्यात येते व बऱ्याच कालावधीनंतर ते भरडाईसाठी पाठविण्यात येते त्यामुळे ही तुट वाढते. दरम्यानच्या काळात मालाच्या सुरक्षिततेची देखील काळजी पुरेशा प्रमाणात न घेतल्यामुळे मालाची अदलाबदल होण्याची देखील पुर्ण शक्यता असते. या सर्व बाबींसंदर्भात विभागाकडून योग्य नियोजन न झाल्यामुळे अनेक गंभीर बाबी उद्‌भवलेल्या आहेत व यात शासनाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

याहुनही गंभीर बाब म्हणजे या प्रकरणी जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांची यादी विभागाने समितीला सादर केली असता त्यातील अधिकाधीक कर्मचारी सद्यःस्थितीत सेवानिवृत्त झाल्याचे नमूद आहे. भरडाईसाठी देण्यात आलेल्या धानापासून तयार तांदूळ राईस मिल मालकांनी FCI कडे जमा केले नाही म्हणून नुकतेच पोलीसांकडे FIR दाखल केले आहेत. या गंभीर प्रकरणी दाखल केलेल्या एफ. आय. आर. चे प्रारुप देखील दोषपुर्ण आहे. एफ. आय. आर. च्या प्रारुपात बदल करून तो अधिक प्रभावशाली केला तरच यातून काही निष्पन्न होऊ शकेल. अतः हा एफ. आय. आर. बदलण्यात यावा असे समितीने सांगितले असता तो आता बदलता येणार नाही. चार्जशिट दाखल करताना अनेक अतिरिक्त बाबींचा यात समावेश करता येईल असेही समितीसमोर सांगण्यात आले. एवढेच नव्हेतर या प्रकरणांचे गांभीर्य पाहता यातून मोठ्या प्रमाणात न्यायालयीन दावे दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेक प्रकरणांमध्ये

तर लोकांनी अटकपूर्व जामीन देखील प्राप्त करून घेतलेला आहे. उपरोक्त परिस्थिती पाहता धानाची तुट व वसुली ही बाब हाताळताना समांतररित्या उद्‌भवणाऱ्या न्यायालयीन अडचणी नियोजनबद्ध पद्धतीने हाताळणे व याचा निर्णय शासनाच्या विरुद्ध लागणार नाही याची देखील दखल विभागाने घेवून या प्रकरणांचा अधिक पाठपुरावा करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणी विभागाला केवळ सरकारी वकीलांवर विसंबून राहणे योग्य होणार नाही. ज्याचा अप्रत्यक्ष लाभ हा संबंधित अभिकर्ता संस्था व अधिकाऱ्यांना तसेच राईल मिल मालकांनाच मिळेल. यासाठी विभागाने विषयाचे गांभीर्य लक्षात घेवून नामवंत व निष्णात वकीलाची तात्काळ नेमणूक करणे आवश्यक आहे.

या संपुर्ण परिच्छेदांतर्गत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने विभागाने या प्रकरणाची चौकशी करून समितीस अद्ययावत कारवाई व माहितीसह तपशिल दाखल करावा असे समितीने निदेशित केले असता ही माहिती सादर करणेबाबत समितीस दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने समितीस अद्ययावत माहिती सादर करण्यात आली. (**विवरणपत्र क्रमांक–१** जोडल्याप्रमाणे)

शिफारस

३.८ भाताची सडणी व तो FCI कडे पोहोचविणे यासंदर्भात महालेखाकारांनी गंभीर आक्षेप नोंदविले असून यात मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरप्रकार झाल्यामुळे समितीने या विषयाची विस्तृत छाननी व तपासणी करून व संबंधितांवर कारवाई व वसुली संदर्भात कार्यवाही करणेबाबत विभागाला निदेशित केले असता या प्रकरणी विभागाने विस्तृत कारवाई करून समितीला अद्ययावत माहिती सादर केली.

अभिकर्ता संस्थांकडील शिल्क धानाच्या वसुलीबाबत सन २००९-१० ते २०१४-१५ या कालावधीमध्ये एकूण रु. २०४.४८ कोटी किंमतीचे रु. १५.८१ लाख क्विंटल शिल्लक धानापैकी लिलावातून रु. ३५.६९ कोटी तर केंद्र शासनाच्या १ टक्का तुटीमुळे रु. ६.७० कोटी प्राप्त झाले. अभिकर्ता संस्थाकडून रु. ६.०८ कोटी वसूल करण्यात आले आहेत. आज घडीला आदिवासी विकास महामंडळाकडे अंदाजित एकूण रु. १५६.०१ कोटी एवढी वसुली शिल्लक असून मार्केटिंग फेडरेशनकडे रु. ११.३७ कोटी वसुली शिल्लक आहे. त्याबाबतचा पाठपुरावा संस्थेकडे करण्यात येत आहे.

मा. अप्पर मुख्य सचिव, पणन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३०.०८.२०१८ रोजी शिल्लक धान तूट वसुलीबाबत झालेल्या बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार धान नुकसान/तूट वसुलीबाबत दोन्ही अभिकर्ता संस्थांनी कालबद्ध आराखडा तयार करून शासनास सादर केलेला आहे. त्यानुसार घट तुटीस जबाबदार अधिकारी, कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करणे, नैसर्गिक घट तुटीबाबत माहिती तयार करून त्या तुटीच्या निर्लेखनाबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने आदिवासी विकास महामंडळाने (TDC) सादर केलेल्या कालबद्ध कार्यक्रमामध्ये नोटीसा बजावणे, खुलासे प्राप्त करणे, चौकशी पुर्ण करणे, कर्मचारी व संस्थानिहाय वसुली आदेश निर्गमित करून त्यांची बजावणी करणे संदर्भात तारीखनिहाय कालबद्ध कार्यक्रम सादर केला असून दि. १.१२.२०१८ पासून वसुलीची कार्यवाही पगारातून वसुल करणे/एफआयआर/आरआरसी इ. सुरू करण्यात येणार असल्याचे शासनास कळविले आहे.

पणन महासंघाने सादर केलेल्या कालबद्ध कार्यक्रमामध्ये जिल्हानिहाय चौकशी पथक निर्माण करणे, प्राथमिक चौकशी अहवाल प्रधान कार्यालयास द्वी-सदस्यीय समितीपुढे एकत्रितरित्या सादर करणे, जिल्हानिहाय संस्थांचा लेखी खुलासा घेणे, संस्थानिहाय प्राथमिक चौकशी अहवाल पथकाद्वारे संस्थानिहाय घटीबाबतची कारणमिमांसा व त्यावरील आपले अभिप्राय टिपणीसह सादर करणे, प्राथमिक चौकशीअंती दोषी सब-एजंट संस्थांना नोटीस देणे, वसुली झालेल्या व येणे बाकी असलेल्या घटीच्या रकमेचा तपशीलासह प्रधान कार्यालयास सादर करणे व त्यानंतर दि. १६.१२.२०१८ पासून पुढे प्रधान कार्यालयामार्फत कायदेशीर कार्यवाही करणे अशा प्रकारचा कालबद्ध कार्यक्रम शासनास सादर केलेला आहे.

टी. डी. सी. ने सादर केलेल्या कालबद्ध कार्यक्रमाअंतर्गत प्राथमिक स्वरुपातील ५९ कर्मचाऱ्यांकडून रु. १५ कोटी व १६३ संस्थांकडून रु. १०९ कोटी वसूल करण्यात येईल असे कळविले आहे. तसेच सन २००७-०८ ते २०११-१२ पासून मार्कफेडप्रमाणे २ टक्के वाजवी घट मंजूरीचा प्रस्ताव आदिवासी विकास महामंडळामार्फत दि. २४.०८.२०१८ रोजी शासनास सादर करण्यात आलेला आहे. त्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. वित्त विभागाच्या निर्णयाच्या अधीन राहून ती तुट त्यांना मान्य करण्यात येत आहे.

टी.डी.सी. ने हंगाम २००९-१० ते २०१२-१३ या कालावधीत धानाचे झालेल्या नुकसानाबाबत वाजवी व अवाजवी घट तूट बाबत निर्लेखन व वसुलीचा अंतरीम अहवाल सादर केला आहे. यामध्ये संस्थांकडे शिल्लक असलेल्या धानाबाबत ऊन, वारा, पाऊस, दीर्घ काळ साठवणूकीमुळे ३.८७ लक्ष क्विं, घट तसेच, ऊंदीर, घुस, जनावरे, उच्च तापमान, उघड्यावर पडून नुकसान यामुळे १.५७ लक्ष क्विं तूट व चोरी मुळे ०.१७ लक्ष क्विंटल अशी एकूण ५.६२ लक्ष क्विं, वाजवी घट तूट निर्लेखित करणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे. तसेच, वाजवी घट तूट निर्लेखनानंतर शिल्लक घटीवर २% तूट मान्य केल्यास रु. २१.९४ कोटी व १% तूट मान्य केल्यास रु. २९.९७ कोटी इतकी संस्थांकडून वसूलपात्र राहतील असे नमूद केले आहे. तर कर्मचाऱ्यांकडून २% तूट मान्य केल्यास रु. १२.८९ कोटी व १% तूट मान्य केल्यास रु. १५ कोटी वसूलपात्र राहतील असे नमूद केले आहे. एकूण प्रस्तावाचा विचार करता २% तूट मान्य केल्यास रु. ३४.८३ कोटी व १% तूट मान्य केल्यास एकूण रु. ४४.९७ कोटी वसूलपात्र दाखविण्यात आली आहे. सदरचा प्रस्तावास आदिवासी विकास विभागाची मान्यता घेऊन वित्त विभागाच्या मंजूरीस्तव सादर करण्यात येणार आहे असे सांगण्यात आले. या प्रस्तावावर योग्य तो निर्णय लवकर घेण्यात यावा.

तसेच हंगाम सन २००९-१० ते २०१४-१५ मधील शिल्लक CMR ची सद्यःस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

२००९ ते २०१४ शिल्लक CMR ची सद्यःपरिस्थीती (कोटी)

अ. क्र.	तपशील	टी. डी. सी.	मार्केटिंग फेडरेशन	एकूण
१	शिल्लक सी. एम. आर. ची किंमत	६३.४८	१२.७४	७६.२२
२	मिलर्सच्या प्राप्त देयकातून, EMD व मिलींगमधून होवू शकणारी वसूली/समायोजन	२९.०५	७.७९	३६.८४
३	मिलर्सकडे शिल्लक असलेली वसूली	३४.४३	४.९५	३९.३८
४	१०० टक्के समायोजन होणारे मिलर्स	४८	१३	६१
५	अंशतः वसुली झालेले मिलर्स	२७	०	२७
६	शुन्य वसुली असणारे मिलर्स	१२	३	१५

मिलर्सवर दाखल करण्यात आलेल्या एफआयआर बाबत टीडीसी वसुली बाकी असलेल्या ३९ मिलर्स व मार्केटिंग फेडरेशनची वसुली बाकी असलेले ३ मिलर्स असे एकूण ४२ मिलर्सवर एफआयआर दाखल करण्यात आलेली आहे. वसुली बाकी असलेल्या ४२ मिलर्सवर करण्यात आलेल्या एफआयआर चा पुढील तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. मिलर्सवरील सर्व गुन्हे पुढील तपासासाठी गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग केले असल्यामुळे सदर गुन्ह्यामध्ये भा. दं. वि. कलमांमध्ये सुधारणा करणे, त्यात वाढ करणे इत्यादी बाबत पुढील निर्णय चार्जशीट दाखल करीत असताना राज्य गुन्हे अन्वेषण विभाग घेईल. तसेच, याबाबत दि. १२.११.२०१८ रोजी प्रधान सचिव, अ.ना.पु.व ग्रा.सं. यांच्या अध्यक्षतेखाली गृह विभाग, कृषी व पणन विभाग, आदिवासी विकास विभाग, विधि व न्याय विभाग यांच्या समवेत बैठक घेण्यात आली. एफ. आय. आर. मधील सुधारणांबाबत गृह विभागाकडून पुढील माहिती घेऊन कार्यवाही करणेबाबत निर्देशित केले आहे. तसेच मिलर्सवरील आरआरसी कार्यवाहीबाबत वसुली बाकी असलेल्या ४२ मिलर्सवर आरआरसी करण्यात आलेली आहे. टी. डी. सी. च्या ३९ मिलर्सवरती आरआरसी ची कार्यवाही करण्यात आलेली आहे. संबंधित जिल्हाधिकारी यांनी आरआरसी ला मान्यता देऊन वसूलीबाबत पुढील कार्यवाही स्थानिक तहसीलदार यांच्याकडून पाठविली आहे. तहसिलदार यांनी नमुना-१ च्या नोटीस मिलर्सना दिलेल्या आहेत. नोटीसचा खुलासा प्राप्त होताच तहसीलदार संबंधित मिलर्सच्या मालमत्तांवर शासकीय बोजा चढविणे व बँक खाती सील करण्याची कार्यवाही करतील. मा. फे. च्या ३ मिलर्सवरती आरआरसी ची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच, या ३ मिलर्सच्या मालमत्तांवर शासकीय बोजा चढविण्यात आलेला आहे.

अभिकर्ता संस्थाकडील २००९ ते २०१५ या कालावधीतील शिल्लक धानाच्या वसुलीबाबत :

२००९ ते २०१५ शिल्लक धानाची सद्यपरिस्थिती (कोटी)

अ. क्र.	तपशील	टी. डी. सी.	मार्के फेड	एकूण
१	खरेदी (लाख/क्वि.)	६८.८७	८२.१३	१५१.००
२	भरडाई (लाख/क्वि.)	५३.०६	७८.२४	१३१.३०
३	शिल्लक धान (लाख/क्वि.)	१५.८१	३.८९	१९.७०
४	शिल्लक धानाची सी. एम. आर. प्रमाणे किंमत (कोटी)	२०४.४८	५६.३५	२६०.८३
५	लिलावाद्वारे प्राप्त रक्कम (कोटी)	३५.६९	१४.३६	५०.०५
६	केंद्रशासनाने मान्य केलेली १ टक्के तुटीची रक्कम (कोटी)	६.७०	१०.७६	१७.४६
७	अभिकर्ता संस्थाकडून वसुल केलेली रक्कम (कोटी)	६.०८	१९.८६	२५.९४
८	अभिकर्ता संस्थांकडे शिल्लक असलेली वसुली (कोटी)	१५६.०१	११.३७	१६७.३८

अशी विस्तृत माहिती समितीसमोर सादर करण्यात आली. दि. १२.११.२०१८ रोजी प्रधान सचिव, अ. ना. पु. व ग्रा. सं. यांच्या अध्यक्षतेखाली गृह विभाग, कृषी व पणन विभाग, आदिवासी विकास विभाग, विधि व न्याय विभाग यांच्या समवेत बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये दोन्ही अभिकर्ता संस्थांनी वाजवी व अवाजवी घट तूट बाबत निर्लेखन व वसुलीचा प्रस्ताव त्या त्या विभागाची (कृषी व पणन/ आदिवासी विकास विभाग) मान्यता घेऊन अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे सादर केलेनंतर तो मान्यतेस्तव वित्त विभागाकडे पाठविण्यात यावा असे निर्देशित केले आहे असेही समितीसमोर सांगण्यात आले.

या संपूर्ण प्रकरणाची समितीने विस्तृत छाननी केली असता या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरप्रकार दिसून आला. CMR चे पैसे वेळेत प्राप्त न होणे, वाहतुकीचे दराबाबत एकमत न होणे, मालाची अदलाबदल होणे, धान सुरक्षित ठिकाणी न साठविणे, घेण्यात आलेल्या बँक गॅरंटीचे नूतनीकरण न करणे अथवा ती व्यपगत होऊ देणे, बँक गॅरंटीच न घेण्यात येणे, ज्यांचेवर एफ. आय. आर. दाखल करण्यात आले आहेत त्या प्रकरणांचा योग्य पाठपुरावा न केल्यामुळे संबंधितांना न्यायालयातून जामीन प्राप्त होणे या सर्व बाबी समितीला दिसून आल्या. काही ठिकाणी पैसे दिलेच नाहीत तरीही विभागाने

ते शासनाकडे जमा केल्याचे दर्शविण्यात आले आहे, ही देखील बाब अतिशय गंभीर आहे. सदरहू विषय अत्यंत गंभीर असून केवळ एका अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या पातळीवर हाताळणे शक्य नसून हे प्रकरण अन्न व नागरी पुरवठा विभाग, आदिवासी विकास महामंडळ, पणन महासंघ, गृह विभाग, विधि व न्याय विभाग या सर्व विभागांनी नियोजनबद्ध पद्धतीने व सामंज्यस्य व सहकार्याने हाताळणे आवश्यक आहे व समितीने तसे निदेशही दिले असताना हा विषय शासनस्तरावरून गांभीर्याने हाताळला जात नसल्यामुळे या प्रकरणी अद्यापही आवश्यकत्या गतीने कारवाई होताना दिसत नाही. समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. या संपूर्ण प्रकरणाचे गांभीर्य व व्याप्ती लक्षात घेता विभागाने या प्रकरणी तात्काळ कालबद्ध पद्धतीने कारवाई करावी, उर्वरित वसुलपात्र रक्कम तातडीने व कालबद्ध पद्धतीने वसुल करावी, योग्य घट असल्यास ती तात्काळ करावी व जी घट मान्य करण्यासारखी नाही ती वसुल करावी व याची अंतिम निश्चिती करून प्रत्यक्षात वसुलपात्र रकमेची निश्चिती व वसुली तात्काळ करावी. शासनस्तरावर प्रलंबित असलेल्या प्रस्तावांवर तातडीने मान्यता मिळणेसंदर्भात पाठपुरावा करून विभागाने निर्णयाप्रत यावे. सदरहू रक्कम वसुल होण्यास अडचणी येत असल्यास महसूली वसुली (RRC) म्हणून ही वसुली करण्यात यावी व त्याची अंमलबजावणी तातडीने होण्याच्यादृष्टीने सर्व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक ते निदेश शासनस्तरावरून देण्यात यावेत. सर्व संबंधित दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, सुरू असलेल्या विभागीय चौकशा कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात याव्यात व या प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी. तसेच विभागांतर्गत लेखापरीक्षणा दरम्यानच या गंभीर बाबी विभागाच्या निदर्शनास येणे आवश्यक असताना त्याकडे विभागाने दुर्लक्ष केले जे अंतर्गत लेखापरीक्षण अत्यंत कमकुवत असल्याचे द्योतक आहे. त्यानंतर महालेखाकारांनी या प्रकरणी गंभीर आक्षेप नोंदविल्यानंतरही समितीची बैठक लागेपर्यंत विभागाने याची दखल गांभीर्याने घेऊन संबंधितांवर कारवाई वा वसुली केली नाही व यात कालापव्यय केला. यात अधिक गंभीर बाब म्हणजे विभागाने या प्रकरणी जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी समितीस सादर केली असता त्यातील अधिकाधिक कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याचे दिसून येते. या प्रकरणी विहित वेळेत कारवाई न केल्यामुळे विभागाने या सर्व कर्मचाऱ्यांना सुखरूप सेवानिवृत्त होण्याची सोईस्कर संधी उपलब्ध करून दिली ही देखील गंभीर बाब आहे. विभागाने यावर वेळेत कारवाई केली असती तर आजपर्यंत ही चौकशी व वसुली पूर्ण देखील झाली असती. विभागाच्या उदासिन व निष्क्रीय भूमिकेमुळे शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान तर झालेच परंतु वर्षानुवर्षे हे गैरप्रकार सुरूच राहिले. समिती या संपूर्ण प्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. विभागाने या प्रकरणी सर्व दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर (सेवानिवृत्त झाले असले तरीही) तात्काळ कारवाई करावी. या प्रकरणी मोठ्या प्रमाणात एफ. आय. आर. दाखल होणार असल्यामुळे एफ. आय. आर. चे प्रारूप, गुन्ह्याचे गांभीर्य, रकमेची व्याप्ती तसेच लावावयाची गुन्ह्याची कलमे या सर्व बाबी अतिशय गांभीर्याने व कायदेशीर व तांत्रिक बाबींची पूर्तता व अभ्यास करूनच एफआयआरचे प्रारूप अतिशय सुस्पष्ट व कायद्याच्या कसोटीवर टिकणारे करावे. या तांत्रिक व कायदेशीर बाबीमध्ये राहणाऱ्या त्रुटी व दोष यामुळे कोणत्याही परिस्थितीत अभिकर्ता संस्था अथवा अधिकाऱ्यांना कोणतेही संरक्षण मिळणार नाही याची गंभीर दखल विभागाने घेवून हे नियोजन करावे. शक्य असल्यास एफ. आय. आर. मध्ये दुरुस्ती करून अतिरिक्त एफ. आय. आर. दाखल करता येत असल्यास ते देखील विभागाने करावे. न्यायालयात शासनाची बाजू ऐकून न घेता एकतर्फी निकाल लागू नये यासाठी न्यायालयात कॅव्हेट (caveat) दाखल करून ठेवण्यात यावे. ज्या ४२ भात गिरणी मालकांवर FIR व RRC ची कारवाई करण्यात आली आहे त्या सर्व लोकांनी ही कारवाई टाळण्यासाठी अटकपूर्व जामीन (Anticipatory Bail) मिळवून घेतला आहे. हा जामीन तातडीने रद्द करण्यासाठी ही प्रकरणे न्यायालयीन स्तरावरून हाताळण्यासाठी निष्णात व नामवंत वकिलाची नेमणूक करण्यात यावी व कोणत्याही परिस्थितीत शासनस्तरावरील ढिसाळ कामकाजाचा लाभ या अभिकर्ता संस्थांना किंवा CMR ची डिलेव्हरी न देणाऱ्या राईस मिल मालकांना होणार नाही याची पूर्ण दक्षता विभागाच्या स्तरावरून घेण्यात यावी. या अभिकर्ता संस्थांच्या पदाधिकारी व संचालक मंडळाच्या नावासह काळ्या यादीत टाकण्यात यावे. तसेच विल्हेवाट न लावलेल्या धानाची वा CMR ची तातडीने विल्हेवाट लावण्यात यावी. उपरोक्त संपूर्ण कार्यवाही अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, कृषी व पणन विभाग, आदिवासी विकास विभाग, गृह विभाग व विधि व न्याय विभाग यांनी एकत्रितरीत्या चर्चा व सल्लामसलत करून या संपूर्ण प्रकरणाचे कायदेशीर नियोजन करून या प्रकरणी वसुली व संबंधितांवर कडक व प्रभावी कारवाई तात्काळ करावी. तसेच धान खरेदी करणे पासून तो FCI मध्ये पोहोचविण्यापर्यंतच्या संपूर्ण कार्यपद्धतीचे नियोजन विभागाने समांतररीत्या करणे आवश्यक आहे. त्यात धान खरेदी, वाहतूक निविदा, गोदामांची निश्चिती, धानाची/CMR ची साठवणूक या सर्व बाबींचे नियोजन विभागाने एकत्रितरीत्या न केल्यामुळे सुरक्षितता व दर्जा जपला गेला नाही. तसेच शुष्कतेची घट कमी करणेसाठी धान कोणत्या महिन्यात खरेदी करावे, त्याची भरडाई, साठवणूक, वितरण व वाहतूक इत्यादीबाबींचे नियोजन करून हवामानानुरूप ही प्रक्रिया कोणत्या महिन्यात करणे आवश्यक आहे याचे कोणतेही नियोजन विभागाने केले नाही. अतः उपरोक्त परिस्थिती पाहता विभागाने सदरहू योजनेंतर्गत राबवावयाच्या प्रत्येक टप्प्यामधील प्रक्रियेचे हवामानानुरूप नियोजन करून समांतररीत्या ही प्रक्रिया राबवावी व येणारी तुट कमीत कमी करण्यासाठी शासनस्तरावरून तात्काळ योग्य तो निर्णय घेण्यात यावा. विभागाचे अंतर्गत लेखापरीक्षण अत्यंत कमकुवत असल्यामुळे या बाबी विभागाच्या निदर्शनास वेळेत आल्या नाहीत. अतः विभागाने हे अंतर्गत लेखापरीक्षण अधिक सक्षमरीत्या करून भविष्यात असे गंभीर आक्षेप टाळावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. ३.२.४.१ "शुष्कतेमुळे झालेल्या हानीपोटी नुकसानभरपाई वसूल न करणे"

अभिप्राय

३.९ विभागाच्या निर्देशानुसार ग्राह्य मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात आर्द्रता कमी झाल्यामुळे होणाऱ्या हानीपोटी दोन्ही अभिकरणांकडून संबंधित वर्षातील धानाच्या MSP च्या १५०% दराने वसुली करावयाची होती. परंतु केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या १% इतक्या आर्द्रतेच्या अभावामुळे झालेल्या हानीच्या मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात झालेल्या ०.४४ लक्ष क्विं. धानाच्या हानीपोटी TDC कडून वसूल करावयाच्या रु. ८. ०२ कोटीपैकी मार्च २०१५ पर्यंत रु. १.९४ कोटीची वसुली प्रलंबित होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

प्रचलित पद्धतीनुसार धान खरेदी/भरडाईचे हिशोब करताना अतिरिक्त आर्द्रतेची (घटीची) रक्कम धानाच्या दीडपट दराने वसूल करण्यात येते. केंद्र शासनाकडून १ टक्का शुष्कतेमुळे येणारी घट मंजूर करण्यात येते. तसेच राज्य शासनाकडून १ टक्का वाजवी घट पूर्ण हंगामासाठी मंजूर केली जाते. १ टक्क्याच्या वरील घट (अवाजवी घट) धानाच्या किंमतीच्या दीडपट दराने अभिकर्ता संस्थांकडून वसूल केली जाते व अशी वसुली हंगाम २००७-०८ पर्यंत करण्यात आलेली आहे. परंतु पुढील हंगामासाठी शासन निर्देश प्राप्त होतील असे गृहित धरुन २०११-१२ पर्यंत रु. ५.८९ कोटी एवढी वसुली आदिवासी विकास महामंडळाकडून करण्यात आली. तथापि, शासन पत्र दि. २१/११/२०१३ अन्वये विभागाकडून फक्त पणन महासंघाला १ टक्का तुट अनुज्ञेय करण्यात आली व आदिवासी विकास महामंडळाकडील शिल्लक धान निविदा/लिलावाद्वारे विक्री करण्यात आले. आदिवासी विकास महामंडळाच्या अखत्यारीतील क्षेत्रातील धान खुल्या जागेवर साठविलेले असून दूरच्या अंतरावरील गोदामे उपलब्ध होऊनही वाहतूक करता आली नाही. त्यामुळे खरेदी केंद्रावरील मोकळ्या जागेवर हे धान ताडपत्र्यांनी झाकून ठेवण्यात आले. परिणामी पावसाने भिजून ते खराब झाले व धानातील घट वाढली. त्यामुळे ही रक्कम आदिवासी विकास महामंडळाकडून वसूलपात्र ठरते व अशाप्रकारे वसूलपात्र रु. ८.०२ कोटींपैकी रु. १.९४ कोटींची वसुली प्रलंबित (मार्च, २०१५ पर्यंत) होती. गत २ वर्षांपासून विभागाने या अभिकर्ता संस्थांना कमिशन सुद्धा दिलेले नाही. त्यामुळे त्यांचेकडून ही वसुली करता येऊ शकली नाही असेही विभागाने समितीसमोर सांगितले.

शिफारस

केंद्र शासनाने धानातील आर्द्रता कमी होण्यामुळे धानाच्या वजनात होणारी १ टक्का हानी ग्राह्य धरली व याशिवाय महाराष्ट्र शासनाने केवळ महासंघाला अजून १ टक्का वजनाच्या हानीची सूट दिलेली आहे. परंतु असडीत धानाची विल्हेवाट लावण्याचे काम चालू असल्यामुळे हानी ग्राह्यतेची सुविधा आदिवासी विकास महामंडळाला दिली नाही. त्यामुळे TDC च्या अखत्यारीतील क्षेत्रातील धानाच्या हानीमुळे त्यातील घट वाढली. वास्तविकतः शासनाने १ टक्का वजनाच्या हानीची सूट केवळ पणन महासंघाला लागू केली. त्याचवेळी ती आदिवासी विकास महामंडळालादेखील लागू करणे आवश्यक होते. केंद्र व राज्य शासनाच्या योजनेची अंमलबजावणी दोन्ही अभिकरणांच्या स्तरावर समानरीत्या होणे आवश्यक होते. परंतु तसे न झाल्यामुळे ही वसुली आदिवासी विकास महामंडळाच्या स्तरावर अधिक दिसून येते. महासंघांचा १ टक्केचा निर्णय आदिवासी विकास महामंडळाला लागू केला तरच ही शिल्लक वसुली करता येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर विदित केले. वास्तविक त्या दोन्ही संस्थांना त्यावेळी हा निर्णय लागू करणे आवश्यक होते, परंतु तसे न केल्यामुळे शुष्कतेमुळे झालेल्या हानीपोटी नुकसानभरपाईदेखील करता आली नाही. अतः विभागाने आदिवासी विकास महामंडळाला देय असलेल्या रकमेतून रु. १. ९४ कोटीची वसुली तातडीने करावी तसेच ही वसूलपात्र रक्कम केवळ सन २०१५ पर्यंतची आहे. सद्यःस्थितीत २०१८ पर्यंत ही वसुली जास्त असणार. अतः वसुलीची निश्चिती विभागाने आजतागायत करून ही वसुली करावी. राज्य शासनामार्फत देण्यात आलेल्या १ टक्के तुटीचा निर्णय हा पणन महासंघा सोबतच आदिवासी विकास महामंडळाला देखील लागू करण्याच्या पर्यायांचा शासनस्तरावरून सकारात्मकदृष्ट्या विचार व्हावा व योग्य तो निर्णय घेण्यात यावा. शासनस्तरावरील निर्णय व अंमलबजावणीत एकसमानता राहण्याच्यादृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच प्रशासनिक चुकांमुळे वेगवेगळ्या हंगामातील धान आदिवासी महामंडळाकडे उघड्यावर ठेवण्यात आला आहे. हा माल एकाच हंगामातील नसल्यामुळे त्याच्या शुष्कतेचे प्रमाण देखील निश्चितच वेगवेगळे राहणार आहे. अशा परिस्थितीत सरसकट १ टक्के वा २ टक्के शुष्कतेची अट सर्वच खरीप हंगामातील धानाला न लावता त्यासाठी धानाचा कालावधी बघून प्रत्येक वर्षीच्या आधारे शुष्कतेच्या प्रमाणाबाबत वैज्ञानिक आधार व तपासणी करून हे प्रमाण निश्चित करावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. ३.२.४.२ "SGAs कडे पडून असलेल्या असडीत धानाची विल्हेवाट लावल्यामुळे आणि भात गिरण्यांमध्ये पडून असलेल्या CMR ची किंमत वसूल न करण्यामुळे झालेले नुकसान".

अभिप्राय

३.१० खरीप हंगाम २००९-१४ दरम्यान प्रापण झालेल्या १२१.३२ लक्ष क्विं. धानापैकी ११.४४ लक्ष क्विं. असडीत धानाची विल्हेवाट ई-निविदा/लिलावाद्वारे लावण्यात आली. ३.५३ लक्ष क्विंटल धान SGAs कडे पडून होते व ५.८५ लक्ष क्विंटल CMR आत गिरणीमध्ये डिसेंबर, २०१४ पर्यंत पडून होता. धान सडण्यासाठी ते SGAs मधून काढून ग्राहकोपयोगी तांदूळ FCI कडे पोहचविण्यास भात गिरण्या उत्सुक नव्हत्या कारण केंद्र शासनाने त्यावेळी निश्चितच केलेले वाहतुकीचे दर त्याअगोदर भात गिरण्यांना दिलेल्या दरापेक्षा ४०% कमी होते व हेच कमी दर सन २०११-१२ पर्यत कायम ठेवण्यात आले होते. परिणामी धानाची उचल व ग्राहकोपयोगी तांदूळ FCI कडे पोहचविणे या दोहोंवर त्याचा परिणाम झाला ज्यामुळे दोन्ही स्थळांवर (SGAs आणि भातगिरण्या) साठा वाढला. परंतु या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था राज्य शासनाने शोधली नाही. मध्यवर्ती वखारीत मोठ्याप्रमाणात राखीव साठा पडून असल्याने हंगाम २००९-१२ मधील शिल्लक धान व ग्राहकोपयोगी तांदूळ पुढच्या वर्षी स्वीकारण्यास केंद्रशासनाने नकार दिल्याने (ऑगस्ट २०१३) ही समस्या आणखीनच गंभीर झाली. २०१२-१३ पासून पुढील हंगामामध्ये मात्र केंद्र शासनाने राज्य शासनाला प्रत्येक हंगामाच्या अखेरीस माल पाठविला जावा अन्यथा शिल्लक साठ्याची महाराष्ट्र शासनाने स्वखर्चाने आणि जोखमीवर विल्हेवाट लावावी असे निर्देश दिले. परिणामी महाराष्ट्र शासनाने TDC कडे पडून असलेल्या ११.४४ लक्ष क्विं. असडीत धानाची (KMS २००९-१२) लिलाव/ई-निविदाद्वारे MSP पेक्षा खूपच कमी दराने विल्हेवाट लावली ज्यामुळे रु. ८२.९६ कोटीचे नुकसान झाले, तसेच जुलै २०१५ पर्यंत ३.५३ लक्ष क्विं. KMS २०१२-१४ धानाची विल्हेवाट लावली गेली नव्हती. भात गिरण्यात पडून असलेल्या ५.८५ लक्ष क्विं. CMR संबंधात आधी महाराष्ट्र शासनाने त्यासाठी FCI कडून दर्जाचे प्रमाणपत्र प्राप्त करून नंतर हा साठा निर्धारित सार्वजनिक वितरण प्रणाली (TPDS) अंतर्गत वापरण्याचा निर्णय घेतला होता. परंतु FCI ने मालाला प्रमाणित करण्यास नकार दिल्याने आणि राज्यातील जिल्हा पुरवठा कार्यालयांमधील साठवण क्षमता अपुरी असल्याने भातगिरण्यातील रु. १२८.३३ कोटी किमतीचा ५.८५ लक्ष क्विं. CMR

विल्हेवाट न होता पडून राहिला. (जुलै २०१५) भात गिरण्यांमधील CMR साठी (५.८५ लक्ष क्विं.) महाराष्ट्र शासनाने रु. १६०.४१ कोटी दंड/शास्ती न आकारल्यामुळे भात गिरण्यांना अवाजवी आर्थिक लाभ देण्यात आला. तसेच ५.८५ लक्ष क्विं. CMR पैकी SGAs नी भात गिरण्यांकडून बॅंक हमींच्या रुपात CMR च्या रकमेएवढी सुरक्षा ठेव प्राप्त केली नव्हती किंवा चार निवडक जिल्ह्यांमध्ये भातगिरण्यांमध्ये पडून असलेल्या १.६७ लक्ष क्विं. CMR संबंधीच्या बँक हमीची मुदत संपल्यावर SGAs नी ती पुन:वैध करून घेतली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

हंगाम २००९-१० ते २०१३-१४ मध्ये TDC कडे ३. ०९ लक्ष क्विं. CMR राईस मिलर्सकडे पडून आहे. याबाबत भारतीय अन्न महामंडळाकडे जमा न झालेल्या परंतु मिलर्सकडे शिल्लक असलेला हा CMR शासनाच्या ताब्यात घेणेबाबत शासन निर्णय दि. २३ जानेवारी, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आलेला होता. त्यानुसार मिर्लसकडून प्राप्त होणाऱ्या CMR चे सॅम्पलींग करण्यासाठी भारतीय अन्न महामंडळाच्या स्थानिक गुणनियंत्रण अधिकारी यांचेकडून आवश्यक ते सहकार्य देण्याची हमी भारतीय अन्न महामंडळाच्या उप महाव्यवस्थापकांकडून देण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे सदर CMR जमा करण्यास मिलर्स अपयशी ठरत असतील तर त्यांच्या विरुद्ध FIR दाखल करण्याबाबत देखील शासन निर्देश आहेत. हा शिल्लक तांदूळ जमा करण्याकरिता जिल्हा पुरवठा अधिकारी, गोंदिया व गडचिरोली यांचेकडे आले असता FCI च्या त्यांना प्राप्त आदेशानुसार नमुनाप्रक्रिया करून देण्याचे मात्र विश्लेषण अहवाल लिखित स्वरुपात देण्यास FCI ने नकार दिल्याने सदर मिलर्सनी तांदूळ जमा केला नाही. यातून कोणताही मार्ग न निघाल्यामुळे एफ. सी. आय. कडे अद्यापही तांदूळ जमा झालेला नाही. परिणामी शासनस्तरावर तांदळाची प्रती क्विंटल रक्कम निश्चित करून राईस मिलर्सकडून ती शासनखाती जमा करून घेण्यात येईल व जे मिलर्स ही रक्कम जमा करणार नाहीत त्यांचेविरुद्ध कायदेशीर कारवाई हाती घेण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

धान व ग्राहकोपयोगी तांदूळासंदर्भात महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप अतिशय गंभीर व शासनाचे नुकसान करणारे आहेत. SGAs कडे पडून असलेल्या असडीत धानाची विल्हेवाट लावल्यामुळे आणि भात गिरण्यांमध्ये पडून असलेल्या CMR ची किंमत वसूल न करण्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे. केवळ केंद्र शासन व मिलर्समध्ये वाहतूकीच्या दरामध्ये एकमत न झाल्यामुळे व हे दर कमी असल्याचे मिलर्सना वाटत असल्यामुळे धानाची उचल व ग्राहकोपयोगी तांदूळ FCI कडे पोहचविणे या दोन्हीवर याचा गंभीर परिणाम झाला व धानाचा साठा वाढला. शासनस्तरावरुन या प्रकरणी कोणताही तोडगा काढण्यात आला नाही अथवा कोणतीही पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली नाही. राज्य शासनाने या प्रकरणात मध्यस्थी करून सामोपचाराने यातून मार्ग काढणे आवश्यक होते. परंतु तसे न केल्यामुळे सद्य:परिस्थितीत टी. डी. सी. गिरणीधारकांकडील ३.२० लक्ष क्विं. व मार्कफेड गिरणीधारकांकडील ०.२७ लक्ष क्विं. असा एकूण ३.४७ लक्ष क्विं. सी. एम. आर. एकुण अंदाजित किंमत रु. ७६.२२ कोटी बाकी आहे. त्याच्या वसुलीबाबतची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. रु. ३६.८४ कोटी वसुली करण्यात आली आहे. ५.८५ लक्ष क्विं. मधून ३.४७ लक्ष क्विं. सीएमआर वजा जाता उर्वरित २.३८ लक्ष क्वि. सी. एम. आर. शिल्लक असल्याचे दिसून येत नाही. त्याचे काही प्रमाणात धान शिल्लक होते. पुरेसी बँक गॅरंटी न घेणे व ती पुनर्जिवित न करणे इ. कारणासाठी आदिवासी विकास महामंडळाने कर्मचाऱ्यांना निलंबित करून यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी चालू केली आहे. चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच मार्केटिंग फेडरेशन यांचे तत्कालीन भंडारा प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांचे देखील पुरेशी बँक गॅरंटी न घेणे व ती पुन: जीवित न करणे साठी निलंबन करण्यात आले आहे असे समितीसमोर सांगण्यात आले.

इतक्या गंभीर प्रकरणी केवळ एक-दोन कर्मचाऱ्यांना निलंबित करून हे प्रकरण संपू शकत नाही. विभागाने या प्रकरणी संबंधितांवर अधिक गांभीर्याने कारवाई करणे आवश्यक आहे. वास्तविकत: महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपानंतर या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करूनच विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर उपस्थित राहणे आवश्यक होते. परंतु विभागाने या आक्षेपांची कोणतीही दखल गांभीर्याने घेतली नाही. अत: या प्रकरणी सर्व जबाबदार संस्था व अधिकारी यांचेवर कारवाई करण्यात यावी व वसुली देखील कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. ३.२.५ "भात गिरण्यांवर शास्ती न आकारणे"

अभिप्राय

३.११ विभागाच्या निर्देशानुसार SGAs नी पुरवठा आदेश दिल्यावर १० दिवसांच्या आत भात गिरण्यांनी सडण्यासाठी धानाची उचल करणे बंधनकारक असते. १० दिवसांत धानाची उचल न केल्यास निर्धारित दराने विलंबाच्या कालावधीसाठी शास्ती आकारणीय होती. परंतु १०८ भात गिरण्यांनी एक दिवस ते ६७३ दिवसांच्या विलंबाने ६.९३ लक्ष क्विं. धानाची उचल केली होती. परंतु भात गिरण्यांकडून रु. ०.८९ कोटीची शास्ती वसूल करण्यात आली नव्हती. तसेच SGAs नी भात गिरण्यांबरोबर केलेल्या भातसडणीच्या करारानुसार भात गिरण्यांनी FCI कडे जमा केलेल्या CMR चा दर्जा व भातगिरण्यांनी SGAs कडून उचल केलेल्या धानाचा दर्जा एकसारखा असणे आवश्यक होते. भातगिरण्यांनी FCI कडे कमी प्रमाणात जमा केलेल्या एखाद्या विशिष्ठ दर्जाच्या धानाच्या CMR ची वसुली ही त्या हंगामामध्ये लागू असलेल्या CMR च्या दराच्या १२५ टक्क्यांनी करावी. तांदूळ उत्पादक १३ जिल्ह्यांपैकी दोन जिल्ह्यांमध्ये जरी ४९ भात गिरण्यांनी २००९-१४ दरम्यान "अ" दर्जाच्या CMR ची ०.७० लक्ष क्विं. इतकी कमी प्रमाणात जमा करून तेवढ्या प्रमाणात साधारण प्रतीचा CMR जमा करूनही विभागाने रु. ३.७३ कोटीची शास्ती (साधारण प्रतीच्या CMR च्या अतिरिक्त साठ्याची किंमत वजा करून) सक्तीने वसूल केली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

धान भरडाई करताना राईस मिलर्सने धानाचे पुरवठा आदेश घेतल्यापासून १० दिवसांत धानाची उचल करून १५ दिवसांत सी. एम. आर. भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करणे आवश्यक असून तसे स्पष्ट निर्देश प्रत्येक हंगामाच्या भरडाई परिपत्रकानुसार संबंधितांना देण्यात येतात. तरीही धानाची उचल

करण्यास तसेच सी. एम. आर. भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करण्यास झालेल्या विलंबासाठी आकार व दंड याबाबतची कार्यवाही दोन्ही अभिकर्ता संस्थांकडून होणे आवश्यक आहे. यासंदर्भात मार्केटींग फेडरेशनकडील वसुली ही त्यांना अनुज्ञेय वाहतूक देयक रकमेच्या प्रदानातून वसूल करून शासनास जमा करण्यात येईल असे सांगण्यात आले. परंतु वाहतूक दराबाबतच्या मिलर्सच्या मागणीनुसार अपेक्षित दरवाढ मिळाली नसल्यामुळे दोन्ही अभिकर्ता संस्थांकडून वाहतूक देयके सादर झाली नाहीत. दि. १० मे, २०१६ च्या शासन निर्णयानुसार हंगाम २००८-०९ ते २०११-१२ पर्यंतच्या वाहतूक देयकांची अदायगी हंगाम २००७-०८ च्या दरानुसार करावयाचे निर्देश असल्यामुळे मिलधारकांनी देयके सादर करण्यास सुरूवात केलेली असल्यामुळे याचे प्रदान करताना विलंब आकार व दंडनीय वसुली करून शासनाकडे जमा करण्याबाबत अभिकर्ता संस्थांनी कळविले आहे. तसेच "अ" ते "क" ग्रेडमधील फरकाची रु. ३. ३१ लक्ष वसुली झालेली आहे. उरलेली रु. ३. ७३ कोटी वसुली करणे शिल्लक आहे. विभागाची प्रक्रियाच जर सुरू झाली नाही तर ही वसुली कशी होणार याबाबत समितीने विचारणा केली असता ठराविक लोकांकडून ही वसुली करण्यात येणार असल्याचे समितीला सांगण्यात आले. वास्तविक "अ" ते "ड" ग्रेडमधील फरकाच्या रकमेची विभागाकडून मागणी व्हावयास हवी होती व नोटीस जारी करणे आवश्यक होते. परंतु विभागाने तसे केले नाही. यात निश्चितच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची चूक आहे. विभागाने सी. एम. आर. व ग्रेडमधील फरकाची रक्कम तातडीने जमा करावी. वास्तविकत: "अ" ते "क" संदर्भातील नस्ती जोपर्यंत विभागाकडे येत नाही तोपर्यंत विभागाला या बाबी समजत नाहीत व मिलर्सची यादी देखील कळत नाही. मिलर्सने देयके सादर केली नाही तरीही त्यांची यादी विभागाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे व स्वतंत्ररित्या ही माहिती ठेवणे विभागाला निश्चितच शक्य आहे. अशी सदोष कार्यपद्धती जर विभागाच्या स्तरावर अस्तित्वात असेल तर ज्या मिलर्सकडे ही थकबाकी आहे ते मिलर्स विभागाकडे बिल सादरच करणार नाहीत. या संपुर्ण प्रक्रियेत विभागाने योग्य तो मार्ग काढून ही रक्कम तातडीने वसूल करणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

शिफारस

३.१२ भात गिरण्यांवर शास्ती न आकारणे संदर्भात गंभीर आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविलेले आहेत. मिलधारकांनी पुरवठा आदेश दिल्यावर १० दिवसात धानाची उचल व १५ दिवसात ग्राहकोपयोगी तांदूळ FCI कडे जमा करणे आवश्यक असताना त्याची अंमलबजावणी मिलधारकांनी विलंबाने केली. या विलंबासाठी निर्धारीत दराने शास्ती आकारणीय होती ती देखील आकारणी व वसुली करण्यात आली नव्हती. सदरहू आक्षेप गंभीर असून महालेखाकारांनी सन २०१४-१५ मध्ये हे आक्षेप नोंदविल्यानंतरही विभागाने याची कोणतीही दखल गांभीर्याने घेतली नाही. केवळ समितीची साक्ष लागल्यामुळे आता विभागाने ही कारवाई सुरू केली व समितीस सांगण्यात आले की, मिलधारकांने त्यांच्या वाहतुकीचे देयक सादर केल्यानंतर त्यामधून प्रलंबित रकमेची वसुली करण्यात येणार आहे. तथापि आत्तापर्यंत सर्व देयके प्राप्त झाली नाही. त्यामुळे वसुली होऊ शकली नाही. सद्य:स्थितीत फक्त रु. ०. ५७ लक्ष एवढी वसूली करण्यात आली आहे.

त्यानंतर शासन पत्र क्र. खरेदी १०१४/प्र. क्र. ५५/भाग १ /नापु २९, दि. २३.०६.२०१७ नुसार खरीप पणन हंगाम २००८-०९ ते २०१५-१६ या हंगामामध्ये खरेदी केलेल्या धानाची उचल करणे व सीएमआर जमा करणे याबाबत झालेल्या विलंबाबाबत दंड व व्याज आकारण्यात येऊ नये असा शासन निर्णय झालेला असल्याने दंड व व्याज आकारणी करण्यात आलेली नाही.

उपरोक्त पत्रानुसार सन २००८-०९ ते २०१५-१६ हंगामातील "अ" दर्जाच्या सीएमआर ऐवजी साधारण दर्जाचा सीएमआर जमा केला असल्यास "अ" दर्जाचा सीएमआर व साधारण दर्जाचा सीएमआर यामधील फक्त तफावतीची रक्कम वजाती करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार अद्याप पर्यंत प्राप्त झालेल्या देयकातून ३. ३१ लक्ष रुपयांची वसूली करण्यात आलेली आहे. आता शासनाने विलंबाबाबत दंड व व्याज न आकारण्याचा निर्णय घेतल्यामुळे वसुलीचा प्रश्न उद्‌भवत नाही. परंतु "अ" दर्जाच्या CMR ऐवजी साधारण दर्जाचा CMR जमा केल्याबाबत तफावतीची आजतागायत वसुलपात्र रकमेची निश्चिती करण्यात यावी व कालबद्ध पद्धतीने त्याची वसूल करण्यात यावी. ही वसुली करणेसाठी मिलधारकांकडून देयके सादर होण्याची विभागाने वाट पाहण्याची आवश्यकता नाही. या वसुलीमुळे मिलधारक देयकेच सादर करणार नाही तर विभाग ही वसुली करु शकणार नाही. याहूनही गंभीर बाब म्हणजे या मिलधारकांची यादी देखील विभागाकडे उपलब्ध व अद्ययावत नाही. जोपर्यंत मिलधारक देयके सादर करीत नाहीत तोपर्यंत त्यांचेवर विभागाचे कोणतेही नियंत्रण नाही. ही जर विभागाची कार्यपद्धती असेल तर ही वसुली विभाग कशी करणार याबाबत समिती साशंक आहे. अत: विभागाने मिलधारकांची अद्ययावत यादी तयार करून तातडीने ही वसुली करावी अन्यथा ही वसुली महसुली वसुली (Revenue Recovery) म्हणून संबंधितांकडून करण्यात यावी. तसेच या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवून याची पुर्तता करण्याची ज्या अधिकाऱ्यांची जबाबदारी होती त्यांनी ती पार न पाडल्यामुळे हे उल्लंघन झाले आहे त्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर देखील विभागाने जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. ३. २. ६ "CMR चे प्रमाणीकरण आणि त्याचा पुरवठा कार्यालयांना पुरवठा यातील वेळेचा अपव्यय"

अभिप्राय

३.१३ CMR ची FCI वखारीमध्ये पाठवणी केल्यावर तो स्वीकारण्यापूर्वी FCI कडून CMR चा दर्जा प्रमाणित केला जातो. परंतु ४ जिल्ह्यांमध्ये (रायगड व ठाणे या दोन निवडक जिल्ह्यांसह) FCI ची वखार आणि भात गिरण्या यामधील अंतर जास्त असल्याने FCI कडून प्रत्यक्ष भात गिरण्यांमध्ये भेट देऊन तेथेच CMR च्या दर्जाची तपासणी करून त्यास प्रमाणित केले जाते. TPDS अंतर्गत या FCI द्वारे प्रमाणित CMR चे वितरण

करण्यासाठी भात गिरण्यांकडून तो संबंधित जिल्हा पुरवठा अधिकाऱ्याकडे पाठविला जातो. २००९-१४ दरम्यान FCI ने प्रमाणित केलेल्या तारखेनंतर ५ दिवस ते ५५१ दिवसांनी रु. ४६. १७ कोटी किमतीचा २. ३७ लक्ष क्विं. CMR TPDS अंतर्गत वितरण करण्यासाठी जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड व ठाणे यांना पाठविण्यात आला. FCI कडून CMR प्रमाणित केला जाणे आणि तो जिल्हा पुरवठा अधिकाऱ्याकडे पाठविला जाणे यातील लक्षणीय कालापव्यय लक्षात घेता FCI नी भात गिरण्यांमध्ये प्रत्यक्ष जाउन प्रमाणित केलेल्या दर्जाच्या CMR ऐवजी दुसऱ्या दर्जाच्या CMR चे वितरण TPDS अंतर्गत केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सदरहू प्रकरणात धान वितरीत करण्यास विलंब झालेला आहे हे विभागाने समितीसमोर मान्य केले परंतु तोच सी. एम. आर. वितरीत झालेला असल्याची खात्री विभागाने केली आहे व सी. एम. आर. मध्ये कोणताही बदल नसल्यामुळे विलंब झाल्यामुळे यात काही गैरप्रकार झाल्याची शंका घेण्यास वाव नाही असेही विभागाने समितीसमोर स्पष्ट केले.

शिफारस

३.१४ सी. एम. आर. प्रमाणित केल्यानंतर वितरीत करण्यास विलंब झाला असला तरीही प्रमाणित झालेला सी. एम. आर. च वितरीत झालेला असल्याची पुर्ण खात्री विभागाने केली असल्यामुळे यात कोणताही गैरप्रकार झाल्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे विभागाने समितीस सांगितले. तरीही भविष्यात विभागाने याची पुनरावृत्ती टाळावी व सी. एम. आर. चे प्रमाणीकरण व त्याचा पुरवठा यातील वेळेचा अपव्यय विभागाने टाळावा. कारण त्या कालावधीत गैरप्रकार होण्याची शक्यता दाट असते. त्यामुळे विभागाने याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदरहू प्रकरणांमध्ये कालबद्ध पद्धतीने लवकरात लवकर आवश्यक ती कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे.

सर्वसाधारण

या संपुर्ण परिच्छेदात महालेखाकारांनी अन्न व नागरी पुरवठा विभागांतर्गत व पणन महासंघ आणि आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या किमान आधारभूत किमतीला धान प्रापण योजना या केंद्र शासनाच्या योजनेच्या राज्य स्तरावरील अंमलबजावणी संदर्भात गंभीर आक्षेप नोंदविलेले आहे. त्यात विशेषतः किमान आधारभूत किंमत योजनेच्या अंतर्गत धानाचे प्रापण करणे आणि ते भरडाईसाठी भातगिरण्यांमध्ये पाठवणे या प्रक्रियेच्या तपासणीत असे आढळून आले कि दोन SGAs नी प्राप्त केलेल्या धानाचा दर्जा निश्चित करण्यासाठी अशा प्रापण केंद्रांमध्ये आवश्यक उपकरणे (आर्द्रतामापक आणि प्रतिमा विश्लेषक संच) उपलब्ध नव्हती. धान भात गिरणीत पाठविण्यात तसेच भारतीय खाद्य निगमकडे ग्राहकोपयोगी तांदूळ पाठविण्यात झालेल्या विलंबामुळे SGAs कडे व भात गिरण्यामध्ये मोठया प्रमाणात साठा संचयित झाला. न सडलेल्या ११. ४४ लक्ष क्विंटल धानाची विल्हेवाट लावल्यामुळे रु. ८२. ९६ कोटी तोटा झाला आणि खरीप हंगाम २००९-१४ दरम्यान भारतीय खाद्य निगमला ग्राहकोपयोगी ५. ८५ लक्ष क्विंटल तांदूळ पाठवू न शकल्यामुळे निर्धारित कालावधीत भात गिरण्यांनी धानाची उचल करण्यात विलंब झाल्याबद्दल आणि भारतीय खाद्य निगमकडे निर्धारित प्रतीचा सी. एम. आर. कमी प्रमाणात जमा केल्याबद्दल भात गिरण्यांवर एकूण रु. ४.६२ कोटींची शास्ती देखील आकारण्यात आली नाही असे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. यावर समितीने सखोल चर्चा व छाननी केली व त्यासंदर्भात संबंधित परिच्छेदांमध्ये योग्य ती शिफारस देखील केली आहे. परंतु व्यापक दृष्टीकोनातून या योजनेच्या अंमलबजावणीचा समितीने आढावा घेतला असता यात राज्य शासनाच्या स्तरावरुन अनेक त्रुटी व दोष समितीच्या निदर्शनास आले आहेत. ही योजना राबविताना प्रशासकीय स्तरावरुन नियोजनाचा व नियंत्रणाचा निश्चितच अभाव दिसून आला. प्रशासकीय स्तरांवरुन नियमांची व अटी शर्तींची पुर्तता, पालन व पाठपुरावा करण्यात आला नाही. परिणामी या कमकुवत नियोजनामुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले व आता ही वसुली करणे विभागाला अत्यंत जिकीरीचे होत आहे. वेळोवेळी या बाबींचे पालन विभागाने केले असते तर आता ही गंभीर परिस्थिती उद्‌भवली नसती. समिती या संपुर्ण कार्यपद्धतीबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. या सर्व त्रुटी व दोषांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण देखील होते. बऱ्याचदा त्यांच्या अज्ञानाचा फायदा मिलधारकांकडून घेण्यात येतो. या सर्व बाबींमुळे केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या वैशिष्ट्यांशी प्रापण केलेल्या धानाचा दर्जा सुसंगत असेल याची खात्री करण्यासाठी व भविष्यात होणारी हानी टाळण्यासाठी शासनाने वर्धनक्षम व्यूहरचना आखावी. शासनस्तरावरुन या योजनेंतर्गत धानाची इतक्या मोठ्या प्रमाणात उलाढाल असताना विभागाचे व्यवस्थेवर नियंत्रण नसणे तसेच पर्यायी व्यवस्था करण्यामागे शासन कमी पडले असे स्पष्टपणे दिसून येते. यासाठी अद्ययावत व आधुनिक तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करावा व ही योजना अत्यंत पारदर्शकरित्या व शेतकऱ्यांच्या हितासाठी राबविण्यात यावी. तसेच भरडाईसाठी पाठविण्यात आलेले धानाचे तांदूळ (CMR) अंतर्गत अंदाजे ४२ राईस मिल मालकांकडून वसुल न झाल्यामागे अनेक अनियमितता आणि दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. राईस मिल मालकांकडून अंदाजे रु. ४० कोटींच्या वसुलीबाबत SGAs ची मवाळ, दुर्लक्षित व बेजबाबदारीची भूमिका दुर्देवी आहे. शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, आदिवासी विकास महामंडळ, पणन विभाग, गृह विभाग आणि विधी व न्याय विभाग यांनी अभिकर्ता संस्थांसमवेत एकत्रित चर्चा करून CMR ची वसुली गिरणी मालकांकडून करण्यासाठी तात्काळ कडक प्रभावी कारवाई करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील **परिच्छेद क्र. ३.३ मध्यम प्रकल्प पूर्ण करण्यास गैरवाजवी विलंब, परिच्छेद क्र. ३.४ "कंत्राटदारास अग्राह्य प्रदान" व परिच्छेद क्र. ३.५ "कंत्राटदारास गैरवाजवी आर्थिक लाभ"** जलसंपदा विभागाचे कामकाज यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत :—

परिच्छेद क्र. ३.३ मध्यम प्रकल्प पूर्ण करण्यास गैरवाजवी विलंब

४.१ धुळे मध्यम प्रकल्प विभाग क्र. २ नंदुरबार यांनी मुख्य घटकांकरीता (धरण आणि कालवे) जमिनीच्या उपलब्धतेची खात्री न करता मध्यम सिंचन प्रकल्पाची सुरूवात केली जे महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तिकेच्या तरतुदींच्या विरुद्ध होते. तसेच जो प्रकल्प चार वर्षात (ऑगस्ट १९८८) रु. ७.०९ कोटी अंदाजित किमतीवर पूर्ण करावयाचा होता तो २७ वर्षांचा कालावधी लोटल्यानंतरही आणि रु. ८१.१९ कोटी खर्चूनही पूर्ण करण्यात येऊ शकला नाही महत्वाचे असे की नवापूर तालुक्यातील आदिवासी लोक जे या प्रकल्पाचे मुख्य लाभार्थी म्हणून अपेक्षित होते ते सुद्धा उद्देशित लाभापासून वंचीत राहीले.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तिका, १९८४ च्या नियम २५१ नुसार संबधित नागरी अधिकाऱ्याने जमिनीबाबत पूर्ण ताबा घेतल्याशिवाय त्या जमिनीवर कोणतेही काम सुरू करु नये. तसेच, जेथे कामाच्या निविदा स्वीकारण्यात आल्या आहेत परंतु त्या कामासाठी लागणारी जमीन अद्याप संपादित करण्यात आली नसेल तर काम सुरू करावयाचे आदेश जारी करण्यापूर्वी जमीन संपादनासाठी लागणारा कालावधी जिल्हाधिकाऱ्यांकडून निश्चित करून घ्यावयास पाहीजे.

महाराष्ट्र शासनाच्या सिंचन विभागाने नंदुरबार जिल्ह्यातील तालुका नवापूर येथे नागन नदीवर रु. ७.०९ कोटीच्या अंदाजित किंमतीवर मध्यम सिंचन प्रकल्पाच्या बांधकामासाठी जो चार वर्षांचा (ऑगस्ट १९८८) कालावधीत पूर्ण करावयाचा होता. प्रशासकीय मान्यता प्रदान केली (ऑगस्ट १९८४) या प्रकल्पाचा उद्येश उपयुक्त जलसाठा २३.६२ दलघमी प्रत्यक्ष जलसाठा क्षमतेसह एकूण २६.४८ दलघमी जलसाठा क्षमता निर्माण करणे असा होता. वितरीका (distributaries) लघु (minor) उप लघु (sub minor) यांचे सह ८ किमी उजव्या कालव्याच्या आणि १४.१० किमी डाव्या कालव्याच्या माध्यमातून उपयुक्त जलसाठ्यातून २४८६ हेक्टर जमीन सिंचीत करावयाची होती. नवापूर लाभक्षेत्रातील आदिवासी लोकांना या प्रकल्पाच्या माध्यमातून लाभ पुरवून त्याचे राहणीमान उंचावणे अपेक्षित होते. प्रकल्पाच्या कार्यान्वयात बेसुमार विलंब, कामाच्या व्याप्तीत बदल, भूसंपादनात विलंब इ. मुळे या प्रकल्पाची किंमत जून १९९८ मध्ये रु. ४९.५४ कोटी आणि पुन्हा जुलै २००८ मध्ये रु. ९२.६२ कोटीवर वाढविणेत आली. मार्च २०१५ अखेर या प्रकल्पावर रु. ८१.१९ कोटी खर्च करणेत आला होता.

लेखा परिक्षेस असे निदर्शनास आले की, धरणांच्या कामाकरीता ३९८.०१ हे. जमिनीची आवश्यकता होती. धरणाचे काम जरी १९९० मध्ये सुरू झाले होते तरी भूसंपादन प्रक्रियेतील (जी २००३-०४ पर्यन्त पूर्ण करणेत आली.) विलंब आणि प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राखालील २ गांवातील लोकाच्या पुनर्वसनास झालेला आणखी विलंब जे २००७ पर्यन्त पूर्ण करण्यात आले यामुळे पुनर्वसन संपादन अपेक्षित गतीने होऊ शकले नाही. एप्रिल २०१५ अखेर धरणाचे काम ९८ टक्के आणि द्वार उभारणीचे काम ५८ टक्के पूर्ण करणेत आले. परिणामी २०१२-१३ , २०१३-१४ आणि २०१४-१५ मध्ये अनुक्रम ५.९० दलघमी, ६.२५ दलघमी, ६.७७ दलघमी इतकाच प्रत्यक्ष जलसाठा होऊ शकला.

लेखा परिक्षणात पुढे असेही निदर्शणास आले की, धुळे मध्यम प्रकल्प विभाग क्र. २, नंदुरबार आणि भूधारक यांच्यातील जमीन किमतीच्या देकाराबाबतच्या वादामुळे दोन कालव्यांच्या (डावा व उजवा कालवा) एकूण लांबी २२.१० किमी संपादनासाठी लागणरी १३६.६८ हे. जमिनीपैकी (१० टक्के) जमीन संपादित करता आली. विभागाने १४ कि.मी. पर्यंतच्या डाव्या आणि उजव्या कालव्याचे काम एकूण रु. १२.९१ कोटी किमतीवर बहाल केले. (फेब्रुवारी २००९ आणि मार्च २०१४) तथापी, मार्च २०१५ पर्यंत फक्त २.५ कि. मी. चे कालव्याचे काम रु. २.३८ कोटी रक्कम खर्चून पूर्ण करण्यात आले.

कार्यकारी अभियंता, धुळे मध्यम प्रकल्प विभाग क्र. २, नंदुरबार यांनी नमुद केले (एप्रिल २०१५) की, १३८ घरे असलेल्या २ गावाचा फक्त काही भाग बुडीत क्षेत्राखाली येत होता. २००७ पर्यंत येथील लोकांचे पुनर्वसन करण्यात आले. तथापी, त्या दोन गावाच्या उर्वरीत लोकांनी (बुडीत क्षेत्रात येत नसलेले लोक) धरणाच्या बाधकामास आणि द्वार उभारणीस प्रतिकार केला आणि त्यांच्या पुनर्वसनाची मागणी केली. परिणामी धरणाचे काम आणि द्वार उभारणीस विलंब झाला. कालवा कामाबाबत विभागाने देऊ केलेल्या दराशी भूधारक सहमत नसल्याने जमिन संपादित करता येऊ शकली नाही.

कार्यकारी अभियंता यांचे उत्तर मान्य करणे योग्य नाही, कारण मुख्य घटकांकरीता (धरण आणि कालवे) जमीन उपलब्ध ची खात्री न करता पूर्ण प्रकल्प सुरू करणेत आले जे महाराष्ट सार्वजनिक बांधकाम पुस्तिकेच्या तरतुदीच्या विरुद्ध आहे याशिवाय जो प्रकल्प चार वर्षात (ऑगस्ट १९८८) पूर्ण होणे अपेक्षित होते तो प्रकल्प मार्च २०१५ पर्यन्त २७ वर्षाचा दिर्घावधी लोटल्यानंतरही आणि रक्कम रु. ८१.१९ कोटी खर्चूनही पूर्ण करणेत आला नाही. यापेक्षाही महत्वाचे असे की, नवापूर तालुक्यातील आदिवासी लोक गत २७ वर्षांपासून या प्रकल्पाच्या लाभापासून वंचीत राहीले.

ही बाब महाराष्ट्र शासनास कळविणेत आली (जून २०१५) त्याचे उत्तर प्रतिक्षीत होते. (डिसेंबर २०१५)

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

४.२ नागन मध्यम प्रकल्पाच्या रु. ७०९.१३ लक्ष किंमतीच्या प्रकल्प अहवालास दि. १३.०८.१९८४ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. प्रकल्पासाठी सन १९८७ मध्ये स्वंतत्र उप विभागाची निर्मिती झाल्यानंतर धरणपाया, अनुषंगिक घटकांसाठी भूसंपादन प्रस्ताव तयार करण्यात आले

व दि. ०५.०४.१९९१ रोजी अंतिम निवाडा झाला आहे. त्यानंतर धरणाचे काम सुरू करण्यात आले. आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने प्रकल्प घटकासाठी भूसंपादनाची कार्यवाही करण्यात आली आहे. बुडीत क्षेत्रासाठी सन १९९३ मध्ये संपूर्ण क्षेत्राची संपादन कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. बाधितांचा प्रकल्पास विरोध होणे स्वाभाविक असल्याने बाधितांचा विरोध मावळण्यात काही कालावधी गेला आहे. दि. २५.१२.१९९७ पासून बाधितांनी आंदोलन तीव्र करून कंत्राटदाराच्या कामगारांना मारहाण करून यंत्रसामुग्री जाळण्याचा प्रयत्न केला त्यामुळे कंत्राटदारास काम बंद ठेवणे भाग पडले तत्पुर्वी (सन १९९३) धरणपाया, बुडीतक्षेत्र यासाठीचे संपूर्ण क्षेत्राचा अंतिम निवाडा जाहीर होऊन मोबदला अदायगी झालेली होती.

धरणाच्या विविध घटकांसाठी भूसंपादन कार्यवाही निधीची उपलब्धता व आवश्यकतेनुसार करण्यात आली आहे.

अ. क्र.	बाब	भुसंपादन क्र.	अंतिम निवाडा दि.	क्षेत्र (हे)
१	धरणपाया व बुडीतक्षेत्र	५०/८८	०५. ०४. १९९१	३४. ६०
२	धरणपाया व बुडीतक्षेत्र	११२/८८	१२. ०१. १९९३	१८२. ७२
३	बुडीतक्षेत्र	१११/८९	०२. ११. १९९३	११४. ७६
४	पुच्छ कालवा	४/१९९८	०४. ०२. २००२	१३. १७
५	बुडीतक्षेत्र (गृहसंपादन)	२७/९८	०६. १२. २००१	-
६	बुडीतक्षेत्र (गृहसंपादन)	२६/९८	०७. ०३. २००२	-
७	बुडीतक्षेत्र (गृहसंपादन)	११/२०००	२००५	-
८	पुनर्वसन गावठाणासाठी जमीन	२५/९८	०७. ०९. २००१	९. २५
९	पुनर्वसन गावठाणासाठी जमीन	२२/२०००	२०. ११. २००४	२. ३२
१०	पुनर्वसन गावठाणासाठी जमीन	१०/२०००	१४. ०२. २००५	३. ९३

संपादित एकूण क्षेत्र= ३६०.७५ हेक्टर

वर नमूद केल्याप्रमाणे प्रमुख संपादित घटकांसाठी एकुण क्षेत्र -३६०. ७५ हे. भूसंपादनाची कार्यवाही करण्यात आली आहे. त्यामुळे जमीन उपलब्धतेची खात्री न करता पूर्ण प्रकल्प सुरू करण्यात आले हा आक्षेप योग्य नाही. निधिच्या उपलब्धतेनुसारच घटकभागाचे व भूसंपादनाचे नियोजन करण्याता आले आहे.

यास्तव जमिनीच्या उपलब्धतेची खात्री न करताच सिंचन प्रकल्पाची सुरूवात केली हा मुद्दा वस्तुस्थितीवर आधारित नसल्याने अमान्य करण्यात येत आहे.

मुख्य धरणाचे काम घळभरणीसह जून २००७ अखेर पुर्ण करण्यात येवून २.८६ दलघमी साठा निर्माण करण्यात आला तसेच जून २०१५ अखेर सांडव्याचे बांधकाम व्दार उभारणीसह पुर्ण करण्यात येवून १००% साठा (२६. ४८ दलघमी)निर्मीतक्षम झाला आहे. धरणात १००% साठा झाल्याने धरणाचे खालील बाजुस व कालव्याच्या आजुबाजूच्या परिसरातील भुजल पातळी वाढली आहे व त्यामुळे परिसरातील २०० विहीरी व बोअरवेलच्या माध्यमातून आदिवासी शेतकऱ्यांच्या साधारण ४०० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ होत आहे.

निधीच्या उपलब्धतेनुसार प्रथमतः धरणाचे काम हाती घेण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यादृष्टीने सन १९८७ मध्ये धरण पाया व बुडीतक्षेत्र यासाठीचे प्रस्ताव तयार करण्यात आलेत व या प्रस्तावांचा अंतिम निवाडा दि. ०५.०४.१९९१ व दि. १२.०१.१९९३ रोजी जाहीर करण्यात आलेत दि. ०५.०४.१९९१ रोजी ३४.६० हे. क्षेत्राचा निवाडा जाहिर झाल्यानंतर धरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. सा. क्र. २३१० मी ते २९४६ मी या लांबीतील धरणाच्या कामाची निविदा निश्चित होऊन दि. ०९.०४.१९९० रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेत. प्रस्तुत कामाची निविदा निश्चित करताना त्यासोबतच (Simultaneously) भूसंपादन कार्यवाही महसुल विभागाच्या मदतीने प्रगतीत होती.

प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी ४ वर्षांचा निश्चित करण्यात आला असला तरी प्रकल्पाचे काम अपूर्ण राहण्यात खालील कारणे आहेत :–

- पुरेशा निधीची अनुपलब्धता.
- उपलब्ध निधीनुसार व संकल्पचित्र उपलब्धतेनुसार प्रकल्प घटकांचे काम टप्प्याटप्प्याने हाती घेणे क्रमप्राप्त ठरते.
- सिंचन प्रकल्पांच्या बुडीतामुळे बाधित होणाऱ्यांचा प्रकल्पास होणारा विरोध स्वाभाविक असतो. तसेच पुनर्वसनासंबंधीत मागण्यांची पुर्तता करणे यात वेळ जाणे अपरिहार्य असते.

सन १९९७ मध्ये प्रकल्पग्रस्तांनी कंत्राटदाराचे नुकसान करून काम बंद पाडल्यामुळे कंत्राटदाराने न्यायालयात दावा दाखल केला होता. सन २००६ मध्ये दाव्याचा निकाल लागल्यानंतर जून २००७ अखेर धरणाची घळभरणी पूर्ण करण्यात आली आहे. तथापी, घळभरणीनंतर प्रकल्पग्रस्तांनी अनावश्यक मागण्या करून धरणाचे काम फेब्रुवारी २००८ पासून बंद पाडले होते. दि. २९.०४.२०१२ पर्यंत धरणाचे काम पूर्णतः बंद होते धरणाचे काम अपूर्ण राहण्यात अपूर्ण भूसंपादन हे कारण नसून प्रकल्पग्रस्तांच्या अवास्तव मागण्या होत्या. त्यावर मात करून जून २०१५ अखेर धरणाचे द्वार उभारणी व पुलाचे काम पूर्ण करून १०० % पाणीसाठा निर्मिती करण्यात आली आहे. त्यासाठी वेळोवेळी पोलीस संरक्षण घेण्यात आले आहे.

नागन धरणाच्या बुडीतात केळी व बंधारपाडा ही गावे अंशतः बाधित होत असल्यामुळे शासन निर्णयातील निर्देशानुसार संपूर्ण गावाचे पुनर्वसन करणे शक्य नव्हते. तथापि जे प्रत्यक्षात बाधित होत नव्हते त्यांनी पुनर्वसनाची मागणी कायम ठेवून प्रकल्पाचे काम वेळोवेळी बंद पाडल्याने प्रकल्पाचे काम पूर्णत्वास नेणे शक्य झाले नाही. सद्यःस्थितीत (जून २०१५ अखेर) धरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. धरण १०० % पाणीसाठा निर्मितक्षम झाले आहे.

कालव्याच्या कामासाठी लागणाऱ्या जमिनीची संयुक्त मोजणी सन-२००८ मध्ये करणेत आली. तथापी सरळ खरेदीने जमीन घेण्याचे आदेश व त्यात आदिवासी प्रकल्पग्रस्तांची जमीन असल्याने आदिवासी शेतकऱ्यांची जमीन खाजगी वाटाघाटीने खरेदी करणेची परवानगी महसूल व वन विभागाचे परिपत्रक क्र. आदिवासी/३१-अ/०९/५१५ पत्र क्र. १९६३/एल-९/, दि. १७/७/२००९ अन्वये मिळाली.

दरम्यानच्या काळात शासकीय दराच्या तुलनेत जमिनीच्या दरात बाजारभावाच्या दरात वाढ झाल्यामुळे संबंधीत शेतकऱ्यांनी जमीन देण्यास विरोध केला. तदनंतर सन-२०१२-२०१३ मध्ये शासनाच्या जमिनीच्या दरात वाढ झाल्यामुळे काही शेतकरी जमिनीचा मोबदला घेणेस तयार झाले. त्यानंतर १३. ८१ हे जमीन संपादित करण्यात आली आहे.

डावा व उजवा कालव्यासाठी लागणाऱ्या एकूण. १३६.६८ हेक्टर जमिनी पैकी सद्यास्थितीत डावा कालवा कि. मी. १ साठी २.९१ हेक्टर व उजवा कालवा कि. मी. ० ते ४ साठी १०.९० हेक्टर असे एकूण १३.८१ हेक्टर संपादित केले. तसेच मा. जिल्हाधिकारी यांच्या कडून उजवा कालव्यासाठी उर्वरीत ० ते ४ साठी ३.४२ हेक्टर क्षेत्रास खाजगी वाटाघाटीने खरेदी करण्याची परवानगी मिळालेली असून जमीन खरेदी करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

धरणाच्या विविध घटकांसाठी भूसंपादन कार्यवाही निधीची उपलब्धता व आवश्यकतेनुसार करण्यात आली आहे.

उपरोक्त बाबींचे अवलोकन केले असता निदर्शनास येते कि, जलसंपदा विभागाच्या प्रचलित पद्धतीनुसार प्राधान्य क्रमाने जमीन खरेदी अथवा संपादित करण्यात आली असून वेळोवेळी संपादन प्रक्रिया बदलली गेल्यामुळे जमीन संपादनास वेळ लागला असून व प्रकल्पग्रस्तांनी विरोध केल्यामुळेच प्रकल्पाचे काम लांबले आहे. सद्या अप्रत्यक्षरित्या बाजूचे विहीरीत पाणीसाठा वाढल्याने लाभक्षेत्रातील लाभधारकांना फायदा होत आहे व पुढील दोन वर्षात प्रकल्प पुर्णकरण्याचे नियोजन असल्याने नवापुर तालुक्यातील आदिवासींना सिंचनाचे लाभ मिळणार आहे व झालेला खर्च अनाठायी होणार नाही. वरील विवेचन लक्षात घेता सदर परिच्छेद कृपया निकाली काढण्यात यावा.

महालेखाकार यांचे आक्षेप :-

४.३ १. विभागाने नमूद केलेनुसार १९८४ मध्ये प्रकल्प मंजूर झाला आणि १९९० मध्ये अंमलबजावणी सुरू झाली परंतु भूसंपादन प्रश्न, अपुर्ण निधी, प्रकल्प बांधीतांचे आंदोलन इत्यादी कारणाने प्रकल्प पुर्ण होऊ शकला नाही. हे विभागाचे म्हणणे लेखापरिक्षणाने स्वीकारले नसल्याने लेखापरिक्षणाचा आक्षेप विभागाने मान्य केला आहे. तथापी जमीनीच्या उपलब्धतेविषयी खात्री न करता प्रकल्पाचे काम हाती घेण्याची कारणे नमूद करण्याबाबत कळविले आहे.

२. कालव्याचे काम अजून पूर्ण होणे बाकी आहे. त्यामुळे जून २०१५ मध्ये पुर्ण झालेल्या धरणाच्या बांधकामामुळे सिंचन उद्देशासाठी २७ वर्षांनंतरही लाभ मिळाला नाही. कोणत्या तारखेपर्यत कालवा कामे पूर्ण होऊन प्रकल्पाद्वारे सिंचनाचा फायदा होऊ शकेल अशी तारीख खात्याने लोकलेखा समितीस नमूद करावी.

३. प्रकल्पासाठी वर्षनिहाय उपलब्ध झालेला निधी व खर्च याचा तपशील लोकलेखा समितीस देण्यात यावा.

शासनाचे अनुपालनः-

४.४ १. जा. क्र १६७९ दि. १५/०४/१९८८ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग यांनी भूसंपादन प्रक्रियेस प्रारंभ करण्यात आले. तद्नंतर विशेष भुसंपादन अधिकारी यांनी भुसंपादन कायदा १८९४ च्या कलम ४(१) अन्वये सूचना प्रसिद्धीस देण्यात आल्या. सूचना प्रसिद्ध करण्याच्या दिनांक व स्थळ खालीलप्रमाणे.

१) विशेष भुसंपादन अधिकारी, धुळे यांचे कार्यालय दि. १८/०५/१९९०

२) तहसिल कार्यालय नवापूर- २२/०५/१९९०

३) गावचावडी -१०/०६/१९८९

४) भुसंपादन करावयाच्या जमिनी ५/६/१९९०, ३०/५/१९९०, २७/५/१९९०

भुसंपादन कायदा १९८४ च्या कलम ५(अ) अन्वये वैयक्तिक सूचना दि. २०/०६/१९९० रोजी **भुसंपादन कायदा १९८४ कलम ६ अंतर्गत कलम ९(१)(२) अन्वये खालील ठिकाणी व दिनांकास सूचना प्रसिद्धी देण्यात आली.**

१) विशेष भुसंपादन अधिकारी, धुळे यांचे कार्यालय -२७/९/१९९०

२) तहसिल कार्यालय नवापुर-२८/९/१९९०

३) गावचावडी -५/१०/१९९०

४) भुसंपादन करावयाच्या जमिनी – ५/१०/१९९०

५) स्थानिक वृत्तपत्र – ६/९/१९/१९९०

वरील प्रक्रियेवरुन असे निदर्शनास येते की, भुसंपादन प्रक्रिया १९८८ मध्ये सुरूवात करण्यात आली. भूसंपादन प्रस्ताव तयार करतांना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना भु-धारकांचा प्रकल्पाविषयी सकारात्मक दृष्टीकोन असल्याचे निदर्शनास आले. तसेच प्रकल्पाचे लाभधारक स्थानिक लोक प्रतिनिधी हे प्रकल्प

लवकारात लवकर सुरू करून आदिवासी क्षेत्रास सिंचनाचा लाभ सुरू व्हावा व पाण्याची टंचाई दूर व्हावी यासाठी आग्रही होते. त्यामुळे जमिनीच्या उपलब्धते-बाबत पुरेशी खात्री वाट होती. तसेच अंतिम निवाडा साधारणतः ०१ वर्षात जाहीर होणार असल्याचे महसूल विभागाच्या कार्यवाही वरून निदर्शनास आले. स्थनिक लोकांची पाण्याची निकड लक्षात घेऊन धरणाच्या कामाचे कार्यारंभ आदेश दि. ०९/०४ /१९९० मध्ये देण्यात येवुन कामास सुरूवात करण्यात आली. व तद्नंतर दिनांक ५/४/१९९१ रोजी महसूल खात्याचा अंतिम निवाडा जाहीर झाला. सदर वस्तुस्थितीमुळे प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले आहे.

२. उजवा कालवा एकूण लाबी ७. ७१५ कि. मी. पैकी कि. मी. १ ते ४ चे काम पुर्ण झाले आहे. सदर कालव्यावर सा. क्र. १७७० मी. मधील रेल्वे क्रॉसिंग करणे कामाची निविदा प्रक्रीया प्रगतीत असून सदर काम जून-२०१८ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे. शासनाच्या दि. १३/०१/२०१७ व दि. ०२/०२/२०१७ रोजीच्या धोरणात्मक निणर्यांनुसार नागन प्रकल्पाचा डावा कालवा व वितरीकांची कामे बंदिस्त नलीका वितरण प्रणालीद्वारे करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी आवश्यक असणारे संकल्पन व अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. त्यानुसार येत्या २ वर्षात कालवा व वितरीकांची कामे बंदिस्त पाईपलाईन प्रणालीने पुर्ण करण्याचे नियोजन आहे. सदर कामे पुर्ण झाल्यास पुढील २ वर्षात १७४६ हे. सिंचन क्षेत्र निर्माण होणार आहे. प्रकल्पाचा सन-२००५-०६ च्या दरसुचीवर आधारीत रु. ९२.६२ कोटी कितीचा तृतीय सुप्रमा मंजूर असून प्रकल्पावर एकूण अद्यावत खर्च रु. ८९.५४१० कोटी झाला आहे. सद्यःस्थितीत प्रकल्पाच्या धरणाची उर्वरीत किंमत १.५० कोटी उजव्या कालवा उर्वरीत किंमत ९.९२ कोटी व डावा कालवा (PDN) उर्वरीत किंमत १७.८० कोटी असा एकूण २९.२२ कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर उर्वरित कामे पुर्ण करण्यासाठी प्रकल्पाच्या सुधारित प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता मिळणे आवश्यक आहे.

३. प्रकल्पासाठी वर्षनिहाय उपलब्ध निधी व खर्च खालीलप्रमाणे (रु. कोटी)

प्रकल्पाचे नाव (१)	वर्ष (२)	निधी (३)	खर्च (४)
नागन मध्यम प्रकल्प	१९८४-८५	०	०
	१९८५-८६	०	०
	१९८६-८७	०	०
	१९८७-८८	०. ०३	०. ०३
	१९८८-८९	०. ०७	०. ०७
	१९८९-९०	०. ०८	०. ०८
	१९९०-९१	०. १३	०. १३
	१९९१-९२	०. १२४	०. १२४
	१९९२-९३	०. ४२६	०. ४२६
	१९९३-९४	०. ११४	०. ११४
	१९९४-९५	१. २४६	१. २४६
	१९९५-९६	३. ९३५१	३. ९३५१
	१९९६-९७	२. २७१	२. २७१
	१९९७-९८	०. ८३१२	०. ८३१२
	१९९८-९९	१. ३४५	१. ३४५
	१९९९-२०००	१. ६४९८	१. ६४९८
	२०००-०१	२. ३४६५	२. ३४६५
	२००१-०२	१. ८४१८	१. ८४१८
	२००२-०३	२. ०३८८	२. ०३८८
	२००३-०४	०. ९२८९	०. ९२८९
	२००४-०५	०. ४६४७	०. ४६४७
	२००५-०६	४. ७३३७	४. ७३३७
	२००६-०७	२०. १५८५	२०. १५८५
	२००७-०८	१४. ७३३२	१४. ७३३२

प्रकल्पाचे नाव (१)	वर्ष (२)	निधी (३)	खर्च (४)
	२००८-०९	०. ८८२२	०. ८८२२
	२००९-१०	२. ९७१५	२. ९७१५
	२०१०-११	२. ३१०६	२. ३१०६
	२०११-१२	०. ५३६४	०. ५३६४
	२०१२-१३	६. ७९१६	६. ७९१६
	२०१३-१४	१. ३२०२	१. ३२०२
	२०१४-१५	४. ७८५	४. ७८५
	२०१५-१६	४. २१८२	४. २१८२
	२०१६-१७	२. ५३९६	२. ५३९६
	२०१७-१८	०. ३७११	०. ३७११
	एकूण	**८६. २२४६**	**८६. २२४६**

परिच्छेद क्र. ३. ४ कंत्राटदारास अग्राह्य प्रदान

अमरावती सिंचन विभागाने कंत्राटाच्या खंड-३८ चा चुकीचा अंमल केल्यामुळे आणि कंत्राटाच्या अटीचे पालन न केल्यामुळे कंत्राटदारास रु. १३. ६३ कोटी अग्राह्य प्रदान केले.

४.५ अमरावती जिल्ह्यात जून २००५ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या पंढरी मध्यम सिंचन प्रकल्पाचे बांधकाम एका कंत्राटदारास रु. ११९. ८४ कोटी किमतीवर अंदाजित किमतीच्या (रु. ८८. ७७ कोटी) ३५ टक्के अधिक्याने बहाल करण्यात आले (जानेवारी २००८) हे काम जानेवारी २०१३ पर्यंत पूर्ण करावयाचे होते.

कंत्राटाच्या खंड ३८ नुसार कंत्राटदाराद्वारे निष्पादित अतिरिक्त प्रमाणाची अदायगी निविदा प्रमाणाच्या १२५ टक्के पर्यंत निविदा दराने करावयाची होती आणि १२५ टक्यांच्या वर प्रचलित दर अनुसुचीनुसार, निविदा अधिमुल्य किंवा सवलतीच्या टक्केवारी ने वाढवून अथवा घटवून अदायगी करावयाची होती.

कंत्राटाच्या अनुसूची "ब" नुसार आवरण क्षेत्र तयार करणे आणि त्यावर बंधारा बांधण्यासाठी १७,०५,५०४ घन मीटर काम निष्पादित करावयाचे होते. परंतु प्रकल्प निष्पादनाच्या वेळी धरणाच्या क्षेत्रामधील वाढ आणि कट-ऑफ खंदकाच्या (COT) अधिक खोलीमुळे, निविदेच्या अनुसूची "ब" मध्ये नमुद विविध बाबींच्या परिमाणात ठळक वाढ झाली आणि वाढीव परिमाणाची अदायगी, कार्यकारी अभियंता, अमरावती सिंचन विभाग, अमरावती यांचे व्दारे कंत्राटाच्या खंड ३८ प्रमाणे करण्यात आली.

कंत्राटाच्या खंड ३८ नुसार कंत्राटदारास २१, ३१, ८८०६९ घनमीटर परिमाणासाठी निविदा दर रु ११४. ०८७० प्रति घनमिटरने अदायगी करावयाची होती. परंतु लेखापरिक्षेस असे निदर्शनास आले की, कंत्राटदारास १६, ३१, ७७३ घनमिटर पर्यंतच्या परिमाणासाठी निविदा दर ११४. ०८ प्रति घनमिटर प्रमाणे अदायगी करण्यात आली व त्यापुढे परिमाणासाठी खंड ३८ अंतर्गत चालू दर अनुसूची प्रमाणे रु. ३२१. ८२ घनमिटर दराने अदायगी करण्यात आले. यामुळे कंत्राटदारास रुं १०.३७७१ कोटीचे अग्राह्य प्रदान करण्यात आले.

तसेच, निविदा अटीच्या कलम १A मध्ये विनिर्दीष्ट केले आहे की कंत्राटदाराने सर्व कॉफर (coffer) धरणाचे ७२ नियोजन, बांधकाम आणि देखभाल, प्रवाहाचे वळतीकरण आणि इतर व्यवस्था करावयास पाहिजे जेणे करून धरणाचे बांधकाम क्षेत्र पाणी विरहित राहील. याशिवाय पूर अथवा अति प्रवाहामुळे वळती केलेले कालवे, कॉफर धरण आणि पाया खड्डे यांना होणाऱ्या हानिस रोखण्यासाठी कंत्राटदाराने स्वतः व्यवस्था करावयास पाहिजे.

दस्ताऐवजांच्या तपासणीत (एप्रिल २०१३) असे आढळले की, कंत्राटाच्या तरतुदी विरुद्ध कार्यकारी संचालक, विदर्भ सिंचन विकास महामंडळ, नागपूर यांनी १,३६,८५१ घनमीटर परिमाण कॉफर धरणाच्या निष्पादनासाठी मंजूर केले (ऑक्टोबर २०११) आणि त्याप्रमाणे कंत्राटदारास रु. ३. २६ कोटी प्रदान केले जे अग्राह्य होते.

कार्यकारी अभियंता, अमरावती सिंचन विभाग आणि अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती यांनी वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले (नोव्हेंबर २०१४) की, पुढील कालावधीत वसुली करण्यात येईल. तथापी, कंत्राटदाराकडून कुठलीही वसुली करण्यात आली नव्हती. (डिसेंबर २०१५)

अशा प्रकारे, कंत्राटाच्या खंड ३८ चा अंमल चुकीचा केल्यामुळे आणि कंत्राटाच्या खंडाचे पालन न केल्यामुळे कंत्राटदारास रु. १३. ६३ कोटी अग्राह्य प्रदान करण्यात आले.

ही बाब महाराष्ट्र शासनास कळविण्यात आली (जून २०१५) त्यांचे उत्तर प्रतिक्षित होते. (डिसेंबर २०१५)

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

४.६ निविदेमध्ये आवरण भरावाचे परिमाण १७, ५,५०४ घ. मी. होते. त्यामुळे १२५ टक्के पर्यंत म्हणजे २१३१८८० घ. मी. चे काम निविदा दराने (८४.५० अधिक धरुन ३५%) = ११४.०८ दराने करावयास पाहीजे होते. परंतु २८ व्या देयकामध्ये फक्त १६३१७७७ घमी परिमाणास निविदा दर (११४.०८) व त्यानंतरचे परिमाण कलम ३८ मध्ये म्हणजे ३२१.८२ घमी दराने

निविदेमध्ये आवरण भरावाचे परिमाण १७,०५,५०४,घ.मी. होते. त्यामुळे १२५ टक्के पर्यंत म्हणजे २१३१८८० घ.मी. चे काम निविदा दराने (८४.५० अधिक घरुन ३५%) = ११४.०८ दराने करावयास पाहीजे होते. परंतु २८ व्या देयकामध्ये फक्त १६३१७७७ घ,मी. परिमाणास निविदा दर (११४.०८) व त्यानंतरचे परिमाण कलम ३८ मध्ये म्हणजे ३२१.८२ घमी दराने करण्यात आले त्यामुळे १०.३७ कोटी अग्राह्य प्रदान करण्यात आले.

तसेच कॉफर डॅमचे परिमाण १,३६,८५१,घ,मी, कामाकरीता रु. ३.२६ कोटी अग्राह्य प्रदान केले. अशी एकंदर (१०.३७ + ३.२६) १३.६३ कोटीची वसुली लेखा परिच्छेदानुसार प्रस्तावित आहे.

(अ) तक्ता क्रमांक १ चालू देयक क्रमांक २८ नुसार

क्रमांक (१)	बाब (२)	परिमाण (घ.मी.) (३)	दर प्रती घ. मी. (४)	रक्कम रुपये (५)
१.	निविदेनुसार परिमाण (१७०५५०४ घ. मी.)	१६३१७७३	८४.५० (निविदा दर) ११४.०८ (३५ टक्केअधिक्याने)	१८६१५२६६४
२.	कलम ३८ (i) दर सूची २००८-०९	१६८८९४०	३०६.८० (कलम ३८ चे दर) ३२१.४२ (४.७६६% अधिक्याने)	५४२८५९०९५
३.	कलम ३८ (ii) दरसूची २०१०-११	६३१८०६	२२७.२५ (कलम ३८ चे दर) २३८.०८ (४.७६६% अधिक्याने)	१५०४२०३७३
	एकूण	३९५२५२३	**एकूण रुपये**	८७९४३२१३२
४.	अतिरीक्त बाब	१२०२१०७	२५५.००	३०६५३७२८५
		५१५४६२६	**एकूण रुपये**	११८५९६९८७३

वरीलप्रमाणे लेखा परिच्छेद नुसार निविदेप्रमाणे १२५% परिमाणाचे पर्यंत निविदा दराने भुगतान गृहीत धरुन ३४ वे देयकामध्ये फरकाची रक्कम समायोजित केलेले आहे. व ती पुढीलप्रमाणे आहे.

(ब) समायोजित रकमेनुसार ३४ वे देयक अदा केले त्याचा तपशिल

क्रमांक (१)	बाब (२)	परिमाण (घ.मी.) (३)	दर प्रती घ. मी. (४)	रक्कम रुपये (५)
१.	निविदेनुसार परिमाण	२१३१८८०	११४.०८	२४३२०४८७०
२.	कलम ३८ (i)	१५३८०८८	३२१.४२	४९४३७२२४५
३.	कलम ३८ (ii)	कार्यान्वित झाला नाही	अपूर्ण घळभरणीसह काम पूर्ण करण्यात येईल.	- -
४.	अतिरीक्त बाब	१२०२१०७ ४८७२०७५	२५५.००	३०६५३७२८५
				१०४४११४४००

वरीलप्रमाणे २८ व्या देयकामध्ये आवरण भरावाचे एकुण परिमाण ५१,५४६२६ घ.मी. होते. त्यामध्ये कॉफरडॅमचे परिमाण १३६८५५ घ.मी. अंतर्भूत होते. तसेच १५३०८६ घ.मी. मातीकाम अतिप्रदान केले असुन एकंदर (२८९९३८ घ.मी. काम अतिप्रदान केले होते. त्याप्रमाणे ३४ वे देयकामध्ये अतिप्रदान २८९९३८ घ.मी. मातीकामाचे परिमाण कमी करून ४८६४६८८ घ.मी. येते व सॅडल डॅमचे नंतर केलेल्या मातीकामाचे परिमाण ७३८७ धरुन एकंदर ४८७२०७५ घ.मी. चे भूगतान केलेले आहे. म्हणजे ३४ वे देयकामध्ये समायोजित/वसुली रक्कम (२८ वे देयके तक्ता क्र. १ – ३४ वे देयक तक्ता क्र. २) नुसार रक्कम (११८५९६८७२ –१०४४११४४००) = १४१८५५४७२

करीता वरीलप्रमाणे लेखा परिच्छेदामध्ये दर्शविलेली वसुली रक्कम १३.३७ कोटी अतिप्रदान ऐवजी प्रत्यक्षात येणारी १४.१८५५ कोटी वसुली रक्कम ३४ वे देयकामध्ये समायोजित झालेली आहे.

महालेखाकार यांचे आक्षेप :

४.७ (१) १५३०८६ घमी परिमाणाचे काम झालेले नसताना देयक अदा केल्याचे विभागाने मान्य केले आहे. यामुळे झालेल्या अतिरिक्त प्रदानाची वसुली ३४ वे चालू देयकातून करण्यात आली आहे. काम न करता देयक अदा केल्याप्रकरणी चौकशी करण्याची आवश्यकता आहे.

(२) कॉफर डॅमचे काम कंत्राटदाराने स्वखर्चाने करणे अभिप्रेत होते. तथापि असे न केल्याने कॉफर डॅमच्या परिमाणाकरिता (१३६८५५ घमी) झालेल्या अतिरिक्त देयकाची वसुली ३४ व्या चालू देयकातून करण्यात आलेली आहे. सदर अनियमीत अदायगी बाबत संबंधित कर्मचारी/अधिकारी यांचे विरुद्ध केलेल्या कारवाईचा तपशील लोकलेखा समितीला अवगत करावे.

(३) जरी ३४ वे चालू देयकातून वसुली झाली असली तरी कंत्राटदाराकडे त्या अवधीकरिता रु. १३.६३ कोटी रक्कम ताब्यात असल्याने कंत्राटदारास अग्राह्य लाभ झालेला आहे. सदर प्रकरणी व्याजेच्या वसुलीबाबत विभागाने केलेल्या कारवाईचा तपशील लोकलेखा समितीला अवगत करावे.

शासनाचे अनुपालन :–

४.८ १. काम न करता चुकीचे कंत्राटदारास मो.पु.क्रं. ५५३६२ पा. क्रं. ५७ ते ६०, दिनांक ११ मार्च २०११ अन्वये १५३०८६ घमी दर रु. २२७.२५ घमी रु. ३४७८८७९३ इतके भुगतान करण्यात आले. सदर चुकी करीता दोषी अधिकाऱ्यांवर मुख्य अभियंता, ज.स.वि. अमरावती यांचे पत्र क्र. ५९ दिनांक १४ फेब्रुवारी २०१८ अन्वये कार्यकारी संचालक, वि.पा.वि. महामंडळ, नागपूर यांना दोषारोप पत्रे सादर करण्यात आली आहेत.

२. कॉफर डॅमचे काम कंत्राटदाराने केलेले आहे. कंत्राटदारास १३६८५५ घमी. रु. २२७.२५/घमी. दराने २३ व्या चालू देयक मो. पु. क्र./पा.क्र. २५५०७/२५, २६४७९/४५, ३३६०६/८७, व २६४७१/४७ दिनांक २४ नोव्हेंबर २०११ रोजी ३.२६ कोटी भुगतान करण्यात आलेले आहे. लेखापरिक्षणामध्ये सदर बाब हि कंत्राटदाराने निविदा अटि शर्तीनुसार स्वतःचे खर्चाने करावयास पाहिजे. करीता चालु देयक क्रं. ३४ मधुन सदर रक्कम समायोजित करण्यात आली आहे. सदर चुकी करीता दोषी अधिकाऱ्यांवर मा. मुख्य अभियंता, ज.सं.वि., अमरावती यांचे पत्र क्र. ५९ दिनांक १४ फेब्रुवारी २०१८ अन्वये कार्यकारी संचालक, वि.पा.वि. महामंडळ, नागपूर यांना दोषारोप पत्रे सादर करण्यात आली आहेत.

३. कलम ३८ च्या चुकीच्या वापरामुळे, कॉफर डॅम व आवरण मातीकामाचे एकूण अतिरिक्त प्रदान १३.६३ कोटी ऐवजी रु. १४.१८ कोटी असल्याने चौकशीनंतर निदर्शनास आले तथापि भुगतान २३ व्या चालू देयक दिनांक २४ नोव्हेंबर २०११ मधे करण्यात आले होते, त्यातील अनुक्रमे ३.२६ कोटी ३० व्या चालू देयक दिनांक ३१ मे २०१३ व उर्वरित (१४.१८-३.२६) १०.९२ कोटी ३४ व्या चालू देयक दिनांक १ मार्च २०१७ मध्ये समायोजित करण्यात आले. कंत्राटदारास प्रलंबित भुगतान असल्यास वा अतिरीक्त प्रदान झाल्यास व्याज वसूल करण्याची अट निविदेमध्ये नाही. तथापी प्रारुप दोषारोप पत्रे शासनास प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

परिच्छेद क्र. ३.५ कंत्राटदारास गैरवाजवी आर्थिक लाभ :

रु. ८.६८ कोटी सुसज्जता अग्रिमाचे कंत्राटदारास अनियमित प्रदान तसेच त्यांचा निष्क्रीय शुल्काबाबतचा (Idle Charges) रु. १.४३ कोटीचा दावा स्वीकार करणे आणि पुढे कंत्राटदार आणि विष्णुपूरी प्रकल्प विभाग यांच्यात सुसज्जता अग्रिमावरील व्याज माफ करावयाच्या मोबदल्यात निष्क्रीय शुल्काचा दावा सोडणे अशा प्रकारच्या व्यापार-व्यवस्थेमुळ (Trade-off)रु. ४७.७५ लक्ष व्याजाची कमी वसुली झाली.

४.९ नांदेड जिल्ह्यात गोदावरी नदीवर बळेगांव उच्च स्तरीय बंधाऱ्याचे बांधकाम एका कंत्राटदारास रु. १५८.७८ कोटी किंमतीवर बहाल करण्यात आले (ऑगस्ट, २००९) जे ऑगस्ट, २०१३ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. कार्यकारी अभियंता, विष्णुपूरी प्रकल्प विभाग क्र. २ नांदेड यांनी कंत्राटदारास काम देतेवेळी अवगत केले होते की याच नदीवर दुसऱ्या उच्चस्तरीय बंधाऱ्याच्या (बाभळी बंधारा) बांधकामाबाबतचे वाद प्रकरण भारताच्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे सक्षम अधिकाऱ्यांच्या पुर्व परवानगी शिवाय बळेगांव उच्चस्तरीय बंधाऱ्याचे बांधकाम सुरू करण्यात येऊ नये व कुठलीही यंत्रसामग्री कार्यस्थळावर आणण्यात येऊ नये.

कार्यकारी अभियंता, विष्णुपूरी प्रकल्प विभाग क्र. २, नांदेड यांच्या दस्तऐवजांच्या तपासणीत पुढील बाबी निदर्शनास आल्या.

- कंत्राटात तशी तरतूद नसतांनाही आणि कंत्राटदारास सुसज्जता अग्रिम मंजूर करण्यास राज्य शासनाने प्रतिबंध लावला असतांनाही (मार्च, २०००) कंत्राटदारास रु. १६.०० कोटी सुसज्जता अग्रिम मंजूर करण्यात आले (ऑगस्ट २००९), ज्यापैकी ८.६८ कोटी डिसेंबर, २००९ ते मार्च, २०१० दरम्यान तीन हप्त्यांत वितरित करण्यात आले.

- कंत्राटदाराकडून फेब्रुवारी, २०१२ पर्यंत व्याजसह रु. ८.६८ कोटी वसूल करावयाचे होते. तथापि, डिसेंबर, २०१५ पर्यंत सुसज्जता अग्रिमाच्या परिसमापनाच्या नियत तारखेपासून तीन वर्ष आणि दहा महिन्यांच्या कालावधी लोटल्यानंतरही रु. १.७७ कोटी वसुली होणे बाकी होते.

- नोव्हेंबर २०१० पासून कंत्राटदारास काम सुरू करण्यास संमती देण्यात आली. तथापि, काम सुरू करावयाच्या केवळ एक वर्षातच कंत्राटदाराने कंत्राटाच्या खंड १५ (३) अंतर्गत निष्काम कालावधीकरिता (ऑगस्ट, २००९ ते ऑक्टोबर, २०१०) यंत्रसामग्री आणि कामगार खर्चासाठी रु. १.४३ कोटीचा दावा केला. कंत्राटदाराने असेही प्रस्तावित केले की जर त्याचा निष्क्रिय शुल्काचा (Idle charges) दावा विचारात घेण्यात येणार नसेल तर कामाची प्रत्यक्ष सुरूवात होण्यापूर्वीच्या कालावधीसाठी (डिसेंबर, २००९ ते ऑक्टोबर, २०१०) सुसज्जता अग्रिमावरील व्याज घटक माफ करण्यात यावे. या प्रकरणात काम सुरूच करण्यात आले नसल्यामुळे कंत्राटदाच्या खंड १५ (३) नुसार कंत्राटदार कुठल्याही नुकसानभरपाईच्या दाव्यासाठी पात्र नव्हता. तथापि, अधीक्षक अभियंता, गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळ यांनी कंत्राटदाराच्या विनंतीवर रु. ४७.७५ लक्षाचे व्याज माफ केले (ऑगस्ट, २०१२).

कार्यकारी अभियंता यांनी नमूद केले (डिसेंबर-२०१४) की, व्याज माफ करण्यात आले कारण कंत्राटदाराद्वारे दावा करण्यात आलेल्या निष्क्रिय शुल्काच्या दाव्यापेक्षा व्याज घटक कमी होते.

अशाप्रकारे, कंत्राटदारास '८.६८ कोटी सुसज्जता अग्रिमाची मंजुरी तसेच, त्याचा रु. १.४३ कोटीचा निष्क्रिय शुल्किचा दावा स्वीकृत करणे आणि त्यानंतर कंत्राटदार आणि विभाग यांच्यात करण्यात आलेली व्यापार-व्यवस्था (व्याज घटकाच्या मोबदल्यात निष्क्रीय शुल्क) हे केवळ अनियमितच नव्हते तर त्यामुळे रु. ४७.७५ लक्ष व्याजाची सुद्धा कमी वसुली झाली. ही बाब शासनास कळविण्यात आली (जुलै, २०१५) ; त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (डिसेंबर, २०१५)

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

४.१० बाभळी उच्च पातळी बंधारा या कामास महाराष्ट्र शासनाने शासन परिपत्रक क्र. बाभळी / १०९३ (२५/९३) WRI दि. १०/०३/१९९५ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. दि. ०६/१०/१९७५ च्या लवादानुसार ६० TMC पाणी वापराच्या मर्यादेमधुन २. ७४ TMC पाणी वाटप व ७९९५ हे. क्षेत्र सिंचनासाठी प्रस्तावित केलेले आहे.

आंध्रप्रदेश शासन व महाराष्ट्र शासनाच्या तांत्रिक समिती सदस्यांच्या दि. १९/०५/२००५ रोजी औरंगाबाद येथील बैठकीत तांत्रिक बाबीवर चर्चा व प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी झालेल्या भेटीअंती समितीने बाभळी उच्च पातळी बंधाऱ्यामुळे पोचमपाड धरणाचा १७. १२ दलघमी पाणीसाठा अतिक्रमित होत असल्याचे व लवादाने दिलेल्या मंजुरीचे उल्लघंन होत असल्याचे निदर्शनास आणुन दिले. तद्नंतर आंध्रप्रदेश शासनाने बाभळी उच्च पातळि बंधाऱ्याच्या कामावर आक्षेप नोंदवला.

बाभळी हा बंधारा वरच्या बाजुस ६५ कि. मी. अंतरावर असलेल्या आमदुरा बंधाऱ्यापर्यंतच्या नदी काठावरील ५८ गावांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी व सिंचनासाठी प्रस्तावित करण्यात आलेला होता. पोचमपाड धरणाचा १७.१२ दलघमी पाणीसाठा अतिक्रमीत होतो हे निर्विवाद स्पष्ट झाले असुन तो आंध्रप्रदेश शासनास मागणीप्रमाणे सोडणे क्रमप्राप्त आहे. सदर बाब कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र जा. क्र. गोमपाविमं/ता-४/(१३/२००५)/ ३६१३ दि. २०/०६/२००५ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या निदर्शनास आणुन दिली व त्यासाठी बाभळी बंधाऱ्याचे बांधकाम थांबविणे हा योग्य उपाय नसल्याचे महाराष्ट्र शासनाने मान्य केले. दि. १९/०५/२००६ रोजी नवी दिल्ली येथे केंद्रीय जलआयोग व आंध्रप्रदेश शासनाचे प्रतिनिधी यांच्या संयुक्त बैठकीत महाराष्ट्र शासनाने सदर बाब निदर्शनास आणुन दिली.

पावसाळ्यानंतर ०.६ TMC पाणी आंध्रप्रदेशसाठी सोडल्यास बाभळी ते आमदुरा या भागातील नदीपात्र कोरडे होऊन नदीकाठावरील लोकांना पाण्याची कमतरता भासुन दुष्काळासारख्या परिस्थितीस दरवर्षी सामोरे जावे लागेल. तसेच बाभळी बंधाऱ्याच्या प्रशासकीय मान्यतेच्या अहवालानुसार नदीकाठावरील ५८ गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याबाबतच्या दिलेल्या हमीची पुर्तता होणार नाही व लोकांचा विश्वासघात केल्यासारखे होईल. बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्याचे काम केल्यामुळे वरील सर्व बाबींची व हमीची पुर्तता होईल. त्यामुळे बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्याच्या कामास कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र जा. क्र. गोमपाविमं/तां-३ /बाभळी तृसुप्रमा/८ दि. २५/०८/२००९ अन्वये बाभळी बंधाऱ्याचा भाग म्हणुन प्रशासकीय मान्यता प्रदान केली. तद्नंतर आवश्यक तांत्रिक मान्यता, निविदा प्रक्रिया इत्यादी बाबींची पुर्तता करून कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांनी कामाचे आदेश देण्याबाबत परवानगी दिली. त्याअन्वये पत्र क्र. तां-३/६९०१ दि. २५/०८/२००९ अन्वये खालील अटींच्या अधीन राहुन कामाचे आदेश निर्गमीत करण्यात आले.

"आंध्रप्रदेश शासनाने बाभळी व गोदावरी नदीवरील इतर उच्च पातळी बंधारे बांधण्यासाठी आक्षेप घेऊन मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असुन पुढील आदेशापर्यंत बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्याचे काम सुरू करू नये."

बाभळी बंधारा मा. न्यायालयीन प्रक्रियेत असून वेळोवेळी सुनावणी चालु होती. कोणत्याही क्षणी सुनावणी दरम्यान मा. सर्वोच्च न्यायालयाकडून अंतिम निर्णय होऊ शकण्याच्या टप्प्यात असल्याने व सदर बंधारा आंतरराज्य वादामध्ये असल्याने व अंतिम निर्णयान्वये आंध्रप्रदेश शासनास ०.६० TMC पाणी सोडण्याबाबतची मागणी होण्याची शक्यता असल्याने बळेगांव बंधाऱ्याचे काम सुरू करण्यासाठी कामाच्या ठिकाणी बांधकाम साहित्य, यंत्रणा व इतर यंत्रसामुग्री उभारणे आंतरराज्य प्रकरणात राज्याच्या हिताचा विचार करता आवश्यक होते. त्याअनुषंगाने कामाच्या ठिकाणी सर्व तयारी करण्यात आली. त्यामुळे मनुष्यबळ, साहित्य व यंत्रसामुग्रीची जमवाजमव करण्यासाठीची अग्रीम देण्याबाबतचा मुद्दा उपस्थित झाला व त्यास मा. कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांनी मान्यता दिली.

सदर मुद्दा मा. सर्वोच्च न्यायालयाने मान्य करून बळेगावं बंधारा १.५ TMC (०.६ TMC आंध्रप्रदेशास सोडण्यासाठी व ०.९० TMC विष्णुपुरी प्रकल्पातील शिल्लक असलेल्या वापरातुन) क्षमतेचा बांधण्यास त्यांच्या अंतिम निर्णयात फेब्रुवारी, २०१३ अन्वये परवानगी दिली. सद्या बंधाऱ्याचे काम पुर्ण झाले असून सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे.

कार्यकारी अभियंता व कंत्राटदार यांच्यातील निविदेच्या करारानुसार कंत्राटदारास खालीलप्रमाणे तीन टप्प्यात अग्रीम प्रदान करण्यात आले आहे.

(i)	दि. १४/१२/२००९ रोजी	रू. ४००. ०० लक्ष
(ii)	दि. १८/०१/२०१० रोजी	रू. २५०. ०० लक्ष
(iii)	दि. १०/०३/२०१० रोजी	रू. २१८. ०० लक्ष
	एकूण	**रू. ८६८. ०० लक्ष**

निविदेतील अटी व शर्तीनुसार दिलेले अग्रीम व त्यावरील व्याज २४ हप्त्यात वसुल करणे आवश्यक होते. त्यान्वये तीन टप्प्यात दिलेली अग्रीम रक्कम रु. ८६८००००/- व त्यावरील व्याज रु. ११५०६८८०/- अशी एकुण रक्कम रु. ९८३०६८८०/- ही २४ महिन्यात वसुल करणे आवश्यक होते.

प्रत्यक्ष वसुली ही हप्त्या हप्त्याने रु. १२११८४७५/- व कामाचे देयकातून रु. ८१४१३४०५/- अशी एकुण रक्कम रु. ९३५३१८८०/- ची वसुली दिलेल्या मुदतीतच म्हणजे २४ महिन्यांच्या आतच करण्यात आली आहे. (डिसेंबर २०११ पर्यंतच).

दरम्यानच्या काळात कंत्राटदारांनी त्यांचे पत्र दि. २८/११/२०११ अन्वये निविदा कलम १५ नुसार दि. ३०/०८/२००९ ते १५/११/२०१० या काम बंद काळातील मनुष्यबळ व यंत्रसामग्री रिकामी राहिल्याने विनावापर आकार (Idle Charges) रू. १४३.०० लक्ष नुकसान भरपाईची मागणी केली. किंवा सदर नुकसान भरपाई च्या मोबदल्यात कंत्राटदारानी साहित्य, यंत्रसामग्री इ. जमवाजमव करण्यासाठी घेतलेल्या अग्रीमावरील काम बंद कालावधीतील व्याज रू. ४७.७५ लक्ष माफ करण्याबाबत विनंती केली. त्यानुसार मा. कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र जा. क्र. ८८५२ दि. २३/०८/२०१२ अन्वये काम बंद कालावधीतील अग्रीमावरील रू. ४७.७५ लक्ष इतके व्याज रू. १४३.०० लक्ष विनावापर आकार मोबदल्यात माफ केले. कंत्राटदाराकडून वसूल केलेली रक्कम रु. ९३५३१८८०/- व माफ केलेले व्याज रु. ४७.७५ लक्ष अशी एकूण रु. ९८३०६८८०/- एवढी रक्कम येते जी निविदा शर्तीनुसार वसूल करणे आवश्यक होते तेवढीच आहे.

अग्रीमाची वसुली पहिल्या चार महिन्यात सुरळीत होती. परंतु काम बंद असल्याने पुढे दरमहा अग्रीमाची वसुली झाली नसल्याने थकीत हप्त्यावरील चक्रवाढ व्याज व लेखा परिक्षकाने अमान्य केलेली व्याजाची माफीची रक्कम रु. ४७.७५ लक्ष अशी एकूण रु. १.७१ कोटी वसुली करण्याबाबत आक्षेप घेतला आहे.

कंत्राटदारासोबत झालेल्या करारातील अट क्र. ७ अन्वये गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद च्या अधिकारान्वये कोणतीही मुदतवाढ न देता हप्त्याने अथवा एकरकमी व्याजासह वसुलीबाबत पुर्नरचना करू शकते.

तरी कृपया सदर लेखा आक्षेप वगळावा, ही विनंती.

महालेखाकार यांचे आक्षेप :-

४.११ १) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या पूर्व परवानगी शिवाय बांधकाम सुरू करण्यात येऊ नये व कार्यस्थळावर यंत्र सामुग्री आणण्यात येऊ नये. या अटीसह ऑगस्ट, २००९ मध्ये कार्यरंभ आदेश देण्यात आले होते. अशी वस्तुस्थिती असून देखील ऑगस्ट २००९ मध्ये सुसज्जता अग्रीम मंजूर करण्यात आला. तसेच निविदेमध्ये असा अग्रीम देण्याबाबत कोणतीही तरतूद नसतांना देखील अग्रीम मंजूर करण्यात आला.

२) कंत्राटदारास नोव्हेंबर २०१० मध्ये काम सूरू करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. अशा परिस्थितीमध्ये त्यांची डिसेंबर २००९ ते ऑक्टोंबर २०१० या कालवधीत विना वापर यंत्र सामूग्रीच्या नुकसान भरपाईची मागणी मान्य करणे. ही बाब अनियमितता आहे. कार्यारंभ आदेशामध्ये गो. म. पा. वि. म. औरंगाबाद पूर्वपरवानगी शिवाय कार्यस्थळावर यंत्रसामुग्री आणण्यात येऊ नये असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते.

३) विभागाने उत्तरात नमूद केले होती की, मा. सर्वोच्य न्यायालयाच्या निर्णयामुळे उद्‌भवणाऱ्या परिस्थितीचे निवारण करण्यासाठी कार्यस्थळावर यंत्र सामूग्री व मनुषबळ तयार असणे बंधनकारा होते. कार्यरंभ आदेश ऑगस्ट २००९ मध्ये देण्यात आले होते व मा. सर्वोच्य न्यायालयाचा निकाल फेब्रुवारी २०१३ मध्ये जाहीर झाला असल्याने हा खुलासा स्विकारार्ह नाही.

४) विभागाने उत्तरात नमूद केले होती की, अग्रीमाची नियमीतपणे वसूली करण्यात आली व एकूण ९.८३ कोटी(माफीच्या रू. ४७.७५ लक्ष रकमेसह वसूल करण्यात आली आहे. हा खुलास स्वीकारार्ह नाही कारण सुसज्जता अग्रीम २४ समान वसुलीच्या अटीसह डिसेंबर २००९ (रु. ४ कोटी), जानेवारी २०१० (रु. २.५० कोटी), मार्च २०१० (रु. २.१८ कोटी) असा वितरीत करण्यात आला. तथापी जानेवारी २०१० ते एप्रिल २०१० मध्ये रु. १.२१ कोटी, डिसेंबर २०११ मध्ये ८. १४ कोटी अशी वसूली करण्यात आली. मे, २०१० ते नोव्हेबर, २०११ या कालवधीमध्ये कोणतीही वसूली करण्यात आली नाही. अशा प्रकारे विभागाने मे २०१० ते नोव्हेबर २०११ या कालावधितील व्याजाची परिगणना योग्या प्रकारे केलेली नाही. ती रू. ८.६८ कोटी अग्रीम व रू. २.४४ कोटी व्याज अशी आहे. अशा प्रकारे वसुली करावयाची रक्कम रु. १.७७ कोटी आहे. (रु. ८.६८ कोटी अ २.१४ कोटी द्व ९.३५ कोटी)

५) लेखापरिक्षणामध्ये उपलब्ध माहितीनुसार प्रकल्प डिसेंबर, २०१५ अखेर पूर्ण झालेला नव्हता. प्रकल्पाची अद्यावत सद्यःस्थिती लोकलेखा समितीस सादर करण्यात यावी.

शासनाचे अनुपालन :-

४.१२ १) "गोदावरी नदीवरील बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्याचे बांधकाम या कामाचा कार्यारंभ आदेश दि. २५/०८/२००९ रोजी देण्यात आला. सदर कामाचे कार्यारंभ आदेश देतांना कामे सुरू न करणे, यंत्र सामूग्री साईटवर न आणणे अशा स्वरूपाच्या कोणत्याही अटी कार्यारंभ आदेशात नमूद केल्या नाहीत. तथापि गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र. गोमपाविम/तां-३/नांपामं/बळेगांव उपाबं/ब-१/निकाआ/६९२८/सप्र दि. २६/०८/२००९ अन्वये सांकेतांक क्रमांक देतांना खालील अट नमूद केली आहे.

"बाभळी बंधाऱ्याच्या संदर्भात आंध्रप्रदेश शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या दाव्याच्या सुनावणीमध्ये गोदावरी नदीवरील इतर बंधाऱ्यांच्या कामावर आक्षेप घेतला आहे. तरी महामंडळाने परवानगी देईतोपर्यंत कार्यक्षेत्रावर प्रत्यक्ष कामास सुरू करू नये. याबाबत संबंधित अभिकरणास लेखी कळवून त्यांची पाच प्राप्त करावी व या कार्यालयास त्याची छायांकीत प्रत पाठवावी." या अटीनुसार विभागीय कार्यालयाचे पत्र क्र. विप्रवि-२/लेखा/३३४५ दि. ३१/०८/२००९ अन्वये बंधाऱ्याचे काम प्रत्यक्ष सुरू करू नये अशा सूचना कंत्राटदारास देण्यात आल्या. तथापि कंत्राटदाराने काम सुरू करण्याच्या दृष्टीने यंत्रसामूग्री, मनुष्यबळ, बॅचींग प्लॅन्ट, खडीसाठी क्रशर या सारखी तयारी केल्याचे कार्यकारी अभियंता / अधीक्षक अभियंता यांचे अहवालानुसार दिसून येते.

कार्यकारी अभियंता यांचे निर्देशानुसार कंत्राटदाराने प्रत्यक्ष कामास सुरूवात केली नाही तथापि बांधकामाचे ठिकाणी यंत्रसामुग्री, बॅचींग प्लॅन्ट, खडीसाठी क्रशर व मनुष्यबळ कार्यस्थळावर उपलब्ध करण्यात आले होते. त्यामुळे कंत्राटदाराने अग्रीमाची मागणी केली होती. बाभळी बंधाऱ्याच्या संदर्भात गोदावरी पाणी तंटा लवादाचा महाराष्ट्र शासन भंग करत असलेबाबत आंध्रप्रदेश सरकारने मा. सर्वोच्च न्यायालयात दि. ०३/०७/२००६ रोजी याचीका दाखल केली होती. सदरिल याचिकेची वेळोवेळी सुनावनी होवून अंतीम सुनावनी दि. २४/०३/२००९ रोजी घेण्याचे मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले होते. तथापि या तारखेला सुनावनी न होता, वेळोवेळी सुनावणीच्या तारखा वाढविण्यात आल्या. कोणत्याही क्षणी सुनावनी दरम्यान मा. सर्वोच्च न्यायालयाकडून अंतिम निर्णय होवू शकण्याच्या टप्प्यात असल्याने व सदर बंधारा आंतरराज्य वादामध्ये असल्याने व अंतिम निर्णयान्वये आंध्रप्रदेश शासनास ०. ६० TMC पाणी सोडण्याबाबतची मागणी होण्याची शक्यता असल्याने बळेगांव बंधाऱ्याचे काम सुरू करण्यासाठी कामाच्या ठिकाणी बांधकाम साहित्य यंत्रणा व इतर सामूग्री उभारणे आंरराज्य प्रकरणात राज्याच्या हिताचा विचार करता आवश्यक होते. त्या अनुषंगाने कामाच्या ठिकाणी सर्व तयार करण्यात आली.

उपरोक्त पार्श्वभूमी लक्षा घेता प्रत्यक्ष काम सुरू न करता बांधकामची संपूर्ण तयारी करणे आवश्यक झाले होते. त्यामुळे मनुष्यबळ, साहित्य व यंत्रसामूग्रीची जमवाजमव करण्यासाठी अग्रीम देण्याबाबत कामाचे कंत्राटदार यांनी दि. २६/०८/२००९ रोजी अग्रीम रक्कम मिळणे बाबतची मागणी केली. त्याअनुषंगाने प्रस्तावित निविदेत मोबीलायझेशन ॲडव्हान्सची तरतूद नाही. तथापि कार्यकारी अभियंता / अधीक्षक अभियंता यांनी मोबीलायज्रेशन ॲडव्हान्स इतकीच रक्कम बँक हमीच्या स्वरूपात घेऊन अग्रीम मंजूर करण्याची शिफारस केली आहे. निविदेअंतर्गत काम त्वरित सुरू करण्यासाठी अग्रीम रक्कम देण्यास मा. अध्यक्षांच्या परवानगीने मा. कार्यकारी संचालक यांचे पत्र क्र. गोमपाविम/तांशा-३/नांपामं/बळेगांव / उपाबं/ब-१/अग्रीम /७१३९ दि. ३१/०८/२००९ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली.

२) बळेगांव बंधाऱ्याचे काम सुरू करणे बाबत कंत्राटदारास कार्यारंभ आदेश दिनांक २५/०८/२००९ रोजी देण्यात आले होते. त्यामध्ये काम बंद ठेवणे किंवा यंत्रसामूग्री कार्यक्षेत्रावर न आणणे या संदर्भात अशा स्वरूपाचा कोणताही उल्लेख नाही. वरील परिच्छेदात नमूद उद्‌भवलेल्या अनिवार्य परिस्थितीमुळे जरी बंधाऱ्याचे प्रत्यक्ष काम चालू करावयाचे नसले तरी काम चालू करण्याच्या दृष्टीने सर्व तयारी करणे आवश्यक झाले होते.

निविदेतील कलम १५ (३) खालीलप्रमाणे आहे.

Where the Engineer-in-charge require the contractor to suspend the work for a period in excess of 30 days at any time or 60 days in the aggregate, the contractor shall be entitled to apply to the Engineer within 30 days of resumption of work after such suspension for payment of compensation to the extent of pecuniary loss suffered by him in respect of working machinery rendered idle on the site or on account of his having had to pay the salary wages of labour engaged by him during the said period of suspension, provided always that the contractor shall not be entitled to any claim in respect of any such working machinery salary or wages for the first 30 days whether consecutive or in the aggregate of such suspension or in respect of any suspension whatsoever occasioned, by unsatisfactory work or any other default on his part. The decision of the Engineer-in-charge in this regard shall be final and conclusive against the contractor.

वरील निविदा शर्तीत नमूद केल्याप्रमाणे बंधाऱ्याचे काम दि. ३१/०८/२००९ ते १५/११/२०१० या कालावधीत बंद होते. म्हणजेच ३० दिवसांपेक्षा जास्त दिवस काम बंद ठेवण्यात आले होते. प्रकल्पस्थळी संधानक बॅचींग प्लान्टची उभारणी तसेच लोडर, पोकलेन, टिप्पर इ. यंत्रसामुग्री आणली तसेच स्टोन क्रशरची उभारणी केली. याबाबतचा अहवाल विभागीय कार्यालयामार्फत सादर करण्यात आला.

वरीलप्रमाणे निविदेतील तरतूद, न्यायालयीन घडामोडी, कामावरील प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेता कंत्राटदारास काही प्रमाणात दिलासा देण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. त्यामुळे कंत्राटदाराने मागणी केलेल्या रु. १,४३,१२,७७६/- ऐवजी रु. ४७,७५,०००/- माफीच्या स्वरूपात देण्याचा निर्णय कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी निविदेतील कलम १५ (३) ला अनुसरून घेतल्याचे दिसून येते. या निर्णयामुळे शासनाची रु. ९५,३७,७७६ इतकी बचत झाली.

३)गोदावरी नदीवरील बाभळी उच्च पातळी बंधाऱ्यास जलसंपदा विभागाने दि. १०/०३/१९८५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली होती. त्यानुसार बाभळी बंधाऱ्याचे बांधकाम जानेवारी – २००५ मध्ये सुरू करण्यात आले होते. हा बंधारा महाराष्ट्र राज्याच्या सिमेपासून ७ कि. मी. वर असून महाराष्ट्र राज्याच्या हद्दीमध्ये बांधण्यात आला होता. सदर बंधाऱ्याच्या निम्न बाजूस आंध्र प्रदेशाचे पोचमपाड येथे मोठा प्रकल्प आहे. महाराष्ट्र राज्याने बाभळी बंधाऱ्याचे बांधकाम सुरू करण्यास आंध्रप्रदेश शासनाने विरोध केला व केंद्रीय जल आयोगाकडे तक्रार केली. यावरील सर्वसामान्य तोडगा काढण्यासाठी वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या. या बैठकीमधील तोडगा आंध्र प्रदेश शासनाने आमन्य करीत दि. ०३/०७/२००६ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयात दावा क्र. १/२००६ दाखल केला. बाभळी बंधाऱ्याचे बांधकाम बंद करण्याच्या संबंधात खालीलप्रमाणे आंध्र प्रदेशाची तीव्र निदर्शने झाली.

- बाभळी बंधाऱ्याच्या विरोधात आंध्र प्रदेशात दि. ११/०४/२००७ रोजी तेलंगणा भागात बंद पुकारला होता.
- दि. २४/०४/२००७ रोजी तेलगु देशम पक्षाने सर्व पक्षीय बैठक बोलावून निषेध मोर्चा काढला होता. त्यास आंध्र प्रदेश शासनाने कोणतीही प्रतिबंधात्मक कार्यवाही केली नाही.
- दि. १६/०७/२०१० रोजी तेलगु देशम पक्षातर्फे बंधाऱ्याच्या विरोधात बसयात्रा काढण्यात आली. २५ बस, ३०० इतर वाहनांचा ताफा घेऊन महाराष्ट्र सिमेवर आले. खासदार, आमदार व समर्थक मिळून जवळपास १००० व्यक्तींचा ताफा सिमेवर आला.
- श्री चंद्राबाबु नायडू व इतर यांनी धरणे आंदोलन करून महाराष्ट्र शासनाविरुद्ध घोषणा दिल्या. प्रतिबंधात्मक आदेशा धुडकावून महाराष्ट्र सिमेत प्रवेश केला.
- महाराष्ट्र पोलिसांनी श्री. चंद्राबाबू नायडू यांच्यासह ६६ इतर पक्ष कार्यकर्त्यांना अटक केली. यानंतर आंध्र प्रदेशात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.
- महाराष्ट्र राज्यातर्फे पोलीस प्रमुख व उप प्रमुख यांनी श्री नायडू व समर्थकांचे बंधाऱ्याच्या भेटीपासून मन वळविण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनी नकार दिला. त्यामुळे त्यांना अटक करून दोन दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली.
- दि. १९/०७/२०१० रोजी पक्ष नेत्यांच्या अटकेविरुद्ध आंध्र प्रदेशात राज्यभर हरताळ व बंद पुकारण्यात आला.
- मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार मा. ना. आर. आर. पाटील गृहमंत्री यांनी तणाव परिस्थिती निवळण्यासाठी श्री. चंद्रबाबु नायडु व पक्ष सदस्य यांच्या विरुद्ध सर्व आरोप मागे घेतल्याची घोषणा केली व व त्यांच्याशी चर्चेअंती या सर्व नेत्यांना सन्मानाने आंध्र प्रदेश सिमेवर सोडण्यात आले.
- दि. ०४/०८/२०१० रोजी तेलगू देशम पक्ष सदस्यांनी बाभळी बंधाऱ्याच्या विरोधाच्या गोंधळामुळे अर्धा तास लोकसभा तहकुब करण्यात आली. अशा प्रकारे आंध्र प्रदेश राज्यातील राजकीय पक्ष बाभळी बंधार वादाचा राजकीय लाभ उठविण्याचा प्रयत्न करीत होते.
- या व्यतिरिक्त आंध्र प्रदेशात वेळोवेळी आंदोलने करण्यात आले तसेच दि. १९/११/२००८ रोजी आंध्र प्रदेशातील लोकप्रतीनिधीनी वार्ताहार व फोटोग्राफर गोदावरी नदीपात्रातून बोटीद्वारे बंधारा स्थळी येण्याचा प्रयत्न केला होता. परंतू सदरील सर्व लोकप्रतिनिधींना पोलीस अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र सिमेवर संगम या गावाजवळ गोदावरी नदीमध्ये आडविले आणि कायदा व सुव्यवस्थेचा विचार करता प्रतिबंध केला व सर्व लोकप्रतिनिधींना नदीकाठावर आणले. सर्व परिस्थिती निदर्शनास आणली व लोकांच्या भावना तिव्र आहेत असे सांगून परत जाण्याची विनंती केली. लोकप्रतिनिधींना परत पाठविण्यात आले.

याच बरोबर मा. सर्वोच्च न्यायालयातसुद्धा या बाबात वेळोवेळी सुनावण्या झाल्या. या सुनावणी दरम्यान दि. २८/०३/२००६ रोजी श्री मधु यासकी गौड यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका क्र. १३४/२००६ दाखल केली. तसेच दि. १७/०४/२००७ – श्री इरोबेल्ली दयाकरराव आणि इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात याची क्र. २०७/२००७ दाखल केली. दि. १८/४/२००७ द्व श्री बी. विनोदकुमार आणि इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात याचीका क्र. २१०/२००७ दाखल केली.

दि. ०८/१२/२००८ रोजी सुनावणी दरम्यान महाराष्ट्र राज्याच्या वतीने सर्व याचिकांची एकत्र सुनावणी घेवून प्रकरण त्वरीत निकाली काढण्याची विनंती केली. त्यानुसार सविस्तर अंतिम सुवनावणी दि. २४/०३/२००९ रोजी घेण्याचे आदेश दिले. यानंतर वेळोवेळी सुनावणीच्या तारखा देऊनही प्रत्यक्ष सुनावणी झाली नाही. दि. ०८/११/२०१२ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयात सर्व याचिकांची अंतिम सुनावणी होऊन निकाल राखून ठेवण्यात आला. त्यानंतर दि. २८/०२/२०१३ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने बाभळी बंधाऱ्याबाबत निर्णय दिला.

बाभळी प्रकल्पांतर्गत (१) बाभळी उच्च पातळी बंधारा व (२) बळेगांव उच्च पातळी बंधारा या दोन बंधाऱ्यांचा समावेश आहे.

बाभळी बंधारा हा राज्य सिमेपासून ७ कि. मी. उर्ध्व बाजूस गोदावरी नदीवरी आहे. बाभळी बंधाऱ्याच्या उर्ध्व बाजुस ३४ कि. मी. अंतरावर बळेगांव उच्च पातळी बंधारा आहे. तसेच, बाभळी बंधाऱ्याच्या निम्न बाजूस ७० कि. मी. अंतरावर पोचमपाड हे मोठे धरण आहे.

बाभळी बंधाऱ्यामुळे पोचमपाड धरणातील १७.१२ द. ल. घ. मी. पाणी साठा (०.६० TMC) पाणीसाठा बाभळी बंधाऱ्यात अधिक्रमीत होतो. मा. सर्वोच्च न्यायालयाने उपरोक्त याचिकांमध्ये ०.६० TMC पाणी देण्याचे आदेश होण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील जनतेमध्ये सुद्धा असंतोष निर्माण झाला होता.

उन्हाळ्यात ०.६ TMC पाणी आंध्रप्रदेशसाठी सोडल्यास बाभळी ते आमदुरा या भागातील नदीपात्र कोरडे होऊन नदीकाठावरील लोकांना पाण्याची कमतरता भासुन दुष्काळासारख्या परिस्थितीस दरवर्षी सामोरे जावे लागेल. तसेच बाभळी बंधाऱ्याच्या प्रशासकीय मान्यतेच्या अहवालानुसार नदीकाठावरील ५८

गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याबाबतच्या दिलेल्या हमीची पूर्तता होणार नाही. बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्याचे काम केल्यामुळे वरील सर्व बाबींची व हमीची पुर्तता होईल. ही ०.६० TMC ची तूट भरून काढण्यासाठी बळेगाव बंधाऱ्याचे काम करणे आवश्यक झाले होते. त्यानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाने ४ मार्च २०१३ रोजी दिलेल्या निकालातील ८३ (f) नुसार बळेगाव बंधाऱ्याची क्षमता १.५० TMC असून यापैकी ०.९० TMC हे विष्णुपूरी प्रकल्पातील समायोजित साठा व बाभळी बंधाऱ्याच्या ०.६० TMC साठा असल्याचे नमूद केले आहे.

उपरोक्तप्रमाणे न्यायालयीन घडामोडी, पोचमपाड धरणासाठी बाभळी बंधाऱ्यातून सोडावे लागणारे ०.६० TMC पाणी, महाराष्ट्रातील जनतेचा तीव्र रोष लक्षात घेता, बळेगांव बंधाऱ्याचे काम तातडीने सुरू करणे आवश्यक होते. त्यामुळे त्याची तयारी करण्यासाठी कार्यस्थळावर संयत्रे व मनुष्यबळ कोणत्याही क्षणी तयार ठेवण्याची गरज निर्माण झाली होती.

(४) मा. लेखापरिक्षक यांचे आक्षेपानुसार कंत्राटदाराकडून मुद्दल रू. ८. ६८ कोटी व व्याज रू. २. ४४ कोटी असे एकूण ११. १२ कोटी वसूल करणे आवश्यक होते असे नमूद केले आहे.

तथापि सदरच्या व्याजाची गणना चक्रवाढ व्याज (Compound interest) पद्धतीने केली आहे. ही गणना प्रत्येक महिन्यासाठी केली असून महिना अखेर व्याज, परतफेड, दिलेली आगावू रक्कम याचा विचार करून शिल्लक दर्शविली आहे. या नंतरच्या लगतच्या महिन्याचा सुरूवातीस ही शिल्लक रक्कम विचारात घेऊन व्याज लावले आहे. अशा पद्धतीने नंतरच्या सर्व महिन्यांत व्याजावर व्याज गृहीत धरण्यात आले आहे. तसेच उर्वरित व्याजाचे रक्कमेवर दि. २०/१२/२०११ नंतरही (करारनाम्यानुसार संपूर्ण परतफेड झालेल्या तारखेच्या नंतर) दि. ३०/०६/२०१६ पर्यंत व्याजाची गणना केली आहे. त्यामूळे आक्षेपानुसार रू. २.४४ कोटी व्याज दिसून येते तथापि कंत्राटदार व कार्यकारी अभियंता यांच्या दरम्यान झालेल्या करारनाम्यातील मुद्दा क्र. ७ खालीलप्रमाणे आहे.

The GMIDC may reschedule, at its complete discretion, the installments due without extending the ultimate time limit for full repayment of this advance together with all interest there on and costs incurred by the GMIDC in connection with this advance in which case the contractor shall be liable to adhere to such rescheduling as prescribed by the GMIDC without demur.

उपरोक्त करारनाम्यानूसार प्रतीमाह मुद्दल रुपये ३६१६६६७ व व्याज रू. ४७९४५३ असे एकूण रू. ४०९६१२० वसूल करावयाचे असल्याचे नमूद आहे. अशा पद्धतीने २४ महिन्यात मुद्दल रू. ८६८००००० व व्याज रू. ११५०६८८० वसूली करायाचे ठरले होते. करारनाम्यातील व्याजाची गणना करतांना सरळ पद्धतीने व्याज (Simple Interest) विचारात घेतले आहे.

आक्षेपानुसार चक्रवाढ व्याज (Compound interest) व बंद कालावधीतील व्याज व करारनाम्यातील अंमित मुदतीनंतरही व्याजावर व्याज यामुळे संपूर्ण व्याजाची रक्कम रू. २.४४ कोटी दर्शविली आहे.

(१)चक्रवाढ व्याज (Compound interest) :– सर्वसामान्यपणे कंत्राटदारास दिलेल्या सुज्जजता अग्रीमाची वसुली सरळ व्याजाने (Simple Interest) करण्यात येते. केंद्रिय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (CPWD) works mannual २००३ पॅरा क्र. ३१.६ नूसार सुसज्जता अग्रीमावर सरळ व्याज आकारणे बाबत नमूद केले आहे.

(२) काम बंद कालावधीतील व्याजः- बळेगाव बंधाऱ्याचे बांधकाम दि. ३१/०८/२००९ ते १५/११/२०१० काम बंद होते. त्यामुळे या कालावधीतील व्याजाची रक्कम रु. ४७.७५ लक्ष कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी निविदेतील कलम १५ (३) नूसार अनुज्ञेय असलेल्या Idle charges च्या मोबदल्यात माफ केले आहे.

(३) करारनाम्यानूसार अंतिम मुदतीनंतर आकारणी केलेले व्याज :- करारनाम्यानुसार अग्रीम व व्याजाची संपूर्ण वसुली दि. ३०/१२/२०११ पर्यंत झाली आहे. तथापि उपरोक्त दोन कारणामुळे व्याज वसूल करणे शिल्लक दिसून येते. या शिल्लक रक्कमेवर दि. ३०/१२/२०११ पासनू दि. ३०/०६/२०१६ पर्यंत च्रकवाढ पद्धतीने व्याज लावेले आहे. प्रत्यक्षात करारनाम्यानुसार संपूर्ण वसूली झालेली असल्याने या कालावधीतील व्याज देय होत नाही.

उपरोक्त बाबीचे अवलोकन केले असता आक्षेपानूसार परिगणना केलेल्या व्याजाची रक्कम रु. २.४४ कोटी ऐवजी करारनाम्यानूसार वसूल केलेल व्याज रु. ६७,३१,८८०/- आहे व माफ केलेले व्याज रु. ४७,७५,०००/- अशी एकूण रु. १,१५,०६,८८०/-अशी व्याजाची संपूर्ण वसुली झाली आहे.

(५) बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्याचे प्रत्यक्ष बांधकाम दि. १६/११/२०१० रोजी सुरू झाले. बंधाऱ्याचे सर्व स्थापत्य व यांत्रिकी कामे पुर्ण झाली असून ऑक्टों. २०१५ पासून बंधाऱ्यात प्रत्यक्ष पाणीसाठा झाला. सन २०१५-१६ मध्ये पर्जन्यमान कमी असल्यामुळे बंधारा पुर्ण क्षमतेने भरला नाही. प्रत्यक्षात २.९२ द. ल. घ. मी. पाणी आले.

तद्नंतर २०१६-१७ या वर्षी प्रकल्पात २८.२६ द. ल. घ. मी. पाणीसाठा झाला व १६०४ हेक्टर लाभक्षेत्रावर प्रत्यक्ष सिंचन झाले.

चालू वर्षी सन २०१७-१८ मध्ये ३२. २५ द. ल. घ. मी. पाणीसाठा निर्माण झाला. बंधाऱ्यावरील किरकोळ कामे उदा. मेन्टनंन्स प्लॅटफॉर्म, जनित्र कक्षचे, स्वच्छतागृहाचे बांधकाम इ. किरकोळ कामे चालू असून एप्रिल २०१८ पर्यंत पूर्ण करणे नियोजित आहे. या बंधाऱ्याच्या बुडीत क्षेत्रातील १७१. ८६ हेक्टर जमिनीचे संपादन करणे आवश्यक आहे. सद्य स्थितीत ४१. ३६ हेक्टर जमिनीचे भुसंपादन झाले असून उर्वरीत भुसंपादन करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच बुडीत क्षेत्रातील ११ पुलांची बांधकामे प्रस्तावित आहेत. सद्य स्थितीत अंशतः पाणीसाठा करण्यात येत असून त्याद्वारे प्रत्यक्ष सिंचनास लाभ क्षेत्रास मिळत आहे. तसेच जिल्हाधिकारी, नांदेड यांनी केलेल्या पिण्याच्या पाण्याच्या आरक्षणानुसार ग्रामीण भागास पिण्याच्या पाण्याचा लाभ मिळत आहे.

साक्ष :-

परिच्छेद क्रमांक ३. ३ मध्यम प्रकल्प पूर्व करण्यास गैरवाजवी विलंब

५.१ महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २१ फेब्रुवारी, दिनांक २४ एप्रिल व दिनांक ३० मे, २०१८ रोजी जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव व विभागीय प्रतिनिधीची साक्ष घेतली साक्षीच्यावेळी नागन मध्यम प्रकल्प पूर्ण करण्यास गैरवाजवी विलंब झाला आहे. त्याबद्दल समितीला माहिती देण्यात यावी अशी समितीने विचारणा केले असता, नागन मध्यम हा प्रकल्प नंदुरबार जिल्ह्यामध्ये नवापूर तालुक्यामधील आहे या प्रकल्पास सन १९८४ मध्ये मान्यता मिळालेली होती. त्यानंतर ९२ कोटी रुपयांची वित्तिय सुधारित प्रशासकीय मान्यता सन २००८ ला देण्यात आलेली आहे. या प्रकल्पाची पाणी साठवण क्षमता २६.४८ द.ल.घ.मी. असून सन २०१५ ला २६.४८ दलघमी पाणीसाठा झालेला आहे. या धरणाचे सिंचन क्षेत्र हे २४८६ असून या धरणाला डावा आणि उजवा असे दोन कालवे आहेत. उजव्या कालव्याचे ७.५० कि. मि. पैकी ४.५० कि. मी. चे काम झालेले आहे. तथापि डाव्या कालव्याला शेतकऱ्यांचा विरोध असल्यामुळे शासनाने पी. डी. एन. चे धोरण राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या धरणाला प्रथम प्रशासकीय मान्यता सन १९८४ मध्ये जरी मिळालीअसली तरी प्रत्यक्षात या कामाची सुरूवात सन १९९० मध्ये निविदा काढून करण्यात आलेली आहे. तत्पुर्वी यामध्ये भूसंपादन न करता निविदा काढण्यात आलेली आहे, असा आक्षेप घेण्यात आलेला होता. परंतु अशाप्रकारची वस्तुस्थिती नाही. सन १९८८ मध्ये डॅमचे आणि सब मरिनचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आले होते. सन १९९३ पर्यंत धरणाच्या सब मरिनसाठी लागणारी जमीन शासनाच्या ताब्यामध्ये होती. परंतु या प्रकरणामध्ये सन १९९७ मध्ये काम सुरू असताना त्या ठिकाणची दोन गावे अंशतः २५ टक्के बुडीत होत होती. त्या गावांचे संपूर्ण पुनर्वसन करण्यात यावे, अशी तेथील रहिवाश्यांची मागणी होती. परंतु तत्कालीन नियमांप्रमाणे अशाप्रकारचे पुनर्वसन करता येणे शक्य नव्हते. म्हणून स्थानिक लोकांनी धरणाचे काम करणाऱ्या कंत्राटदाराच्या मशिन्स पेटून दिल्या होत्या. त्यामुळे सन १९९७ पासून ते सन २००७ पर्यंत सदर काम बंद होते. त्यानंतर सदर धरणामध्ये अंशतः पाणी साठा उपलब्ध झाला होता. सन २०१५ मध्ये सदरहू धरणामध्ये संपूर्ण पाणी साठा उपलब्ध झालेला आहे. आता धरणाचे काम पूर्ण झाले असून कालव्याचे काम सुरू आहे. कालव्याचे काम करण्यासाठी ५१४ हेक्टर जमीन लागणार आहे. त्यापैकी ३९० हेक्टर जमीन शासनाने ताब्यामध्ये घेतलेली आहे. उर्वरित १२४ हेक्टर जमिनीपैकी उजव्या कालव्यासाठी ३७ हेक्टर आणि डाव्या कालव्यासाठी ८५ हेक्टर जमीन लागत आहे. शेतकऱ्यांचा विरोध लक्षात घेऊन डावा कालवा हा पी. डी. एन. करण्यात येत असल्यामुळे सदर जमीन ताब्यात घेण्यात येणार नाही. परंतु उजव्या कालव्याचे ३७ हेक्टर जमिनीचे प्रस्ताव तयार करण्यात आलेले असून चार किमी पर्यंतचे काम सुरू झालेले आहे. या माध्यमातून सिंचनाचा फायदा शेतकऱ्यांना देऊन २०० हेक्टर पर्यंतचे पाणी देण्यात आले आहे. यामुळे सब मरिनच्या बाजूला असलेल्या विहिरींना पाणीपुरवठा करण्यात आलेले आहे. या प्रकल्पाच्या कालव्याचे काम सन २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

शासनाच्या अभिप्रायामध्ये, निधीच्या उपलब्धतेनुसार घटक भागाचे व भूसंपादनाचे नियोजन करण्यात आलेले आहे. यास्तव जमिनीच्या उपलब्धतेची खात्री न करता सिंचन प्रकल्पाची सुरूवात करण्यात आली आहे, हा मुद्दा वस्तुस्तिला आधारित नसल्यामुळे अमान्य करण्यात येत आहे, असे म्हटले आहे. शासनाच्या अभिप्रायाबाबत सचिवांनी खुलासा करावा असे समितीला सूचित केले असता, एप्रिल, १९९० मध्ये कार्यादेश देण्यात आलेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले. जमिनीचा प्रस्ताव दिनांक १५ एप्रिल, १९८८ रोजी नियम ४ (१) साठी पाठविण्यात आलेला आहे. असे विभागीय प्रतिनिधीने समितीस अवगत केले.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तीका, १९८४ मधील नियम २५१ नुसार जमिनीचा पूर्ण ताबा घेतल्याशिवाय तसेच कामाच्या निविदा स्वीकारण्यात आल्यानंतर जमीन संपादित केली नसेल तर जिल्हाधिकाऱ्यांकडून याबाबत निश्चिती करून घ्यावयास पाहिजे. त्यामुळे तत्कालिन जिल्हाधिकारी यांनी सदरहू जमिनीचा ताबा निश्चित करून दिला होता काय ? अशी समितीने विचारणा केली असता, यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, पुर्वीच्या काळामध्ये लोकांच्या संमतीने भाडेपट्टा देऊन काम करण्यात आले. त्यानुसारच काम केलेले आहे. भूसंपादनाची प्रक्रिया सन १९८८ ते १९९३ या कालावधीत करण्यात आलेली आहे. सन २००६ पूर्वी सरळ खरेदी अस्तित्वात नव्हती. पूर्वी संमतीपत्राने जमीन ताब्यात घेण्यात येत असे. त्यामुळे अशा प्रकारची जमीन शासनाच्या ताब्यामध्ये होती. सदर जमिनीचा भाडेपट्टा दिलेला होता.

जर जमीन शासनाच्या ताब्यामध्ये असेल तर त्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाचा पुरावा विभागाकडे उपलब्ध आहे काय ? अशी समितीने विचारणा केली. असता संमतीपत्र देऊन जमीन भाडेपट्टयाने ताब्यात घेण्यात येते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीच्या निदर्शनास आणून दिले. संमती घेऊन शेतकऱ्यांना मूर्ख बनविण्याचे प्रकार ठेकेदार करीत असतात असे मत समितीने मांडले असता, या प्रकल्पासाठी ठेकेदार नव्हते. एप्रिल, १९९० नंतर ठेकेदारांना या प्रकल्पाचे काम देण्यात आलेले आहे असे विभागीय प्रतिनिधीने समितीस अवगत केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जमिनीचे निश्चितीकरण करणे बंधनकारक असताना सदरहू जमिनीचा ताबा तत्कालिन जिल्हाधिकारी यांच्याकडे असल्याचा पुरावा समितीला सादर करण्यात यावा अशी समितीने सूचना केली.

विभागाकडे संमतीपत्र आणि भाडेपट्टयाची सर्व माहिती उपलब्ध असल्याचे विभागीय प्रतिनिधीनी समितीस अवगत केले.

धरणाच्या कामासाठी सुरूवात करण्यात आलेली आहे. कालव्याचे काम अद्यापपर्यंत अपूर्ण आहे. उजव्या कालव्यासाठी १३ हेक्टर जमीन संपादित केलेली आहे. त्याचप्रमाणे १ कि. मि. डाव्या कालव्यासाठी जमीन संपादित केलेली आहे. आता डाव्या कालव्यासाठी पी. डी. एन. करण्यात येणार आहे अशी समितीने विचारणा केली असता, उजव्या कालव्यासाठी ३७ हेक्टरच्या जमिनीचे प्रस्ताव पाठविण्यात आलेले असून त्यापैकी १५ हेक्टरचे प्रस्ताव अंतिम टप्प्यामध्ये आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

१९९० पासून धरणाचे काम सुरू आहे. सन २०१५ मध्ये धरणामध्ये पाणीसाठा जमा झाला आहे. परंतु महालेखापालांचे असे मत आहे की, सन २०१५ पर्यंत धरणामध्ये पाणीसाठा झालेला नाही. असे असताना देखील मागील २८ वर्षांपासून धरणाच्या कालव्याचे काम पूर्ण झालेले नाही. डाव्या कालव्याचे पी. डी. एन करण्यात येणार असेल तर उजव्या कालव्यासाठी देखील विभागाकडे जमीन उपलब्ध नाही असे मत समितीने व्यक्त केले.

उजव्या कालव्याची ७. ५० कि. मि. लांबी असून त्यापैकी ४ कि. मि. चे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित कालव्यासाठी ३७ हेक्टर जमीन लागणार आहे. कॅनॉल आणि धरणाचे काम एकाच वेळेस सुरू करता येत नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

कॅनॉलचे नियोजन केव्हा करण्यात आले ? त्याचप्रमाणे कॅनॉलसाठी जागा ताब्यात घ्यावयास पाहिजे अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी प्रकल्पासाठी मिळणाऱ्या निधीनुसार जागा ताब्यात घ्यावयास पाहिजे. केवळ जागा ताब्यात घेतली तर काम करण्यासाठी निधी शिल्लक राहत नाही असे समितीस सांगितले.

सन २००६ पासून ते सन २०१८ पर्यंतही विभाग उजवा कालवा पूर्ण करू शकला नाही, कारण त्या जागेच्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. याबाबतचे विभागाचे नियोजन ढिसाळ आहे, यावरच महालेखाकारांचा परिच्छेद आहे. ए. जीं. चे म्हणणे एवढेच आहे की, जागेचे नियोजन नाही, काम वेळेवर झाले नाही. ग्राऊंडवर जी अडचण आली ती समिती देखील मान्य करते. त्यामुळे सन २००६ नंतर पैसे मिळाले नाही त्यामुळे विलंब झाला ते देखील मान्य समितीस आहे. मात्र जेव्हा धरण बांधता त्यावेळेस पुढच्या कालखंडामध्ये कालव्याची व्यवस्था करण्याबाबतही विचार केला पाहिजे. आपल्या राज्यामध्ये फक्त धरण बांधण्याचे काम झाले. कालव्याबाबतची काळजी घेतली गेलीच नाही, मग पाणी साठवून काय उपयोग आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, धरणाचे जे काम झाले आहे ते देखील विभागाने पूर्णपणे पोलीस प्रोटेक्शनमध्ये केले आहे. सन २००७ नंतरसुद्धा धरणाला इतका विरोध होता की, गेट बसविणे वगैरे सर्व काम पोलीस प्रोटेक्शनमध्ये पूर्ण केले. लोकांचा कालव्याकरिता भूसंपादनाचाही विरोध होता. त्यामुळे विभाग पी. डी. एन. कडे स्वीच ओव्हर झाले असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

मशिनरी जाळल्यानंतर जवळजवळ १० वर्षे आपण स्टँड-स्टिल पोझिशनमध्ये होता. त्यावेळेस काही प्रयत्न झाले नाहीत काय ? १० वर्षांमुळे कॉस्टमध्ये खूप मोठी वाढ झाली असेल अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी कलेक्टर, कमिशनर, मंत्री महोदय अशा सर्व पातळ्यांवर बैठका घेण्यात आलेल्या आहेत, असा खुलासा केला.

सन २०१३ मध्ये भूसंपादनाचा नवीन कायदा येणार होता. त्याच्या आधीची २-३ वर्षे व त्यानंतरची २-३ वर्षे यामध्ये संदिग्धता होती. लोकांना वाढीव पैशांची अपेक्षा होती. लोकांना त्याच वेळेस हे माहीत होते की, हा कायदा येत आहे. त्यामुळे सर्वच प्रकल्पांना विरोध झाला, तो याच प्रकल्पाला झाला असे नाही. सन २००८-२००९ पासून ते सन २०१३-२०१४ मध्ये जेव्हा पॉलिसी झाली तोपर्यंत राज्यात अत्यंत कमी भूसंपादन झाले असल्याचे समितीस अवगत केले.

नवीन भूसंपादन कायद्याप्रमाणे आता विभागाने पूर्ण जमीन ताब्यात न घेता धरण रेषेवरील जमीन सरळ खरेदीने करावी व बाकीची भूसंपादन करावे असे मत मांडले असता विभागीय प्रतिनिधींनी एखाद्या प्रकल्पाचा १० हजार हेक्टरचा सबमर्जन्स असेल व आपण १० हजार हेक्टर क्षेत्र आताच खरेदी करून ठेवले, त्या १० हजार हेक्टर क्षेत्राची किंमत १० लाख अशी आजचा हिशोब काढली तरी, १००-१५० कोटी रुपये विभागाला त्याकरिता द्यावे लागतील. धरणाच्या कामाला लागणारा वेळ व त्याबरोबरच ॲक्विजिशन असे चालले तरच ते इकॉनॉमिकल होऊ शकते. नाहीतर लोक जमिनी तर कसतच राहणार असे समितीस अवगत केले. विभागाचा मुद्दा मान्य आहे. परंतु, हीच कारणे सांगून पुढची भूसंपादनाची प्रक्रिया लांबविली जाते. त्याचे जस्टिफिकेशन विभाग आता येथे देत आहेत. वेगवेगळी कारणे देऊन भूसंपादनाला उशीर होतो, काही अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे प्रकल्प लांबले हे विभागाचे कधीच मान्य करत नाही. लँडबाबत ॲशुरन्स नसताना विभाग कालव्याबाबत आतापर्यंत भांडत आहेत. धरणाकरिताही सन १९९७ पर्यंत लँड ॲक्विजिशनची प्रोसेस करावी लागली. मधली ९-१० वर्षे काम बंद होते. या ७ कोटी किंमतीच्या प्रकल्पावर आतापर्यंत ८६ कोटी रुपये खर्च झाल्यानंतरही पाईपलाईनकरिता २९ कोटी रुपयांची मागणी आहे हा महालेखाकारांचा मुख्य आक्षेप आहे. असे मत समितीने मांडले. पाईपलाईनकरिता १७ कोटी रुपये व पुढच्या बॅलन्स वर्ककरिता १२ कोटी रुपये अशाप्रकारे एकूण २९ कोटी रुपये लागणार असल्याचे विभागीय प्रतिनिधीने समितीस अवगत केले.

पाईपलाईनचे २९ कोटी रुपये व आतापर्यंत खर्च झालेले ८६ कोटी रुपये यांची बेरीज ११५ कोटी रुपये होते. You started the project without considering non-availability of funds and support of the local people, असा ए. जीं. चा मुद्दा आहे असे समितीने मत व्यक्त केले. सन १९८४-१९८५ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली परंतु, प्रकल्पाचे याला काम करण्याजोगा निधी हा साधारणतः सन २००५-२००६ नंतर सुरू झाला. ए. जीं. चा हा मुद्दा बरोबर आहे. ए. जीं. चा हा मुद्दा मान्य आहे की, यामध्ये निधी कमी आला. याचे कारण म्हणजे हा प्रकल्प तापी मधील आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

नागन मध्यम प्रकल्पावर जवळपास ८० कोटी रुपयांचा खर्च झालेला आहे. त्याचे युटिलायझेशन किती झालेले आहे ते सांगावे. असे प्रधान महालेखाकार यांनी विचारणा केली असता, सन २०१५ मध्ये पूर्ण साठा झालेला आहे. त्यानंतर दोनच सिझन झालेले आहेत. हा सन २०१७-२०१८ चा दुसरा सिझन आहे. पहिल्या सिझनमध्ये आपण उजव्या कालव्याचे पाणी पहिल्या ४ कि. मी. मधील २०० हेक्टर क्षेत्राला दिलेले आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

प्रकल्पाची सिंचन क्षमता किती हेक्टरची आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी २४०० हेक्टर सिंचन क्षमता आहे असे समितीस अवगत केले.

मुख्य आक्षेप असे आहेत की, विभागाने जागेचे पूर्ण नियोजन न करता प्रकल्प हाती घेतला. ७ कोटी रुपयांच्या या प्रकल्पाची किंमत आता ११५ कोटी रुपयांवर गेलेली आहे. प्रकल्प पूर्ण होईपर्यंत त्याची किंमत अजून किती वाढेल हे विभागालाही माहीत आहे. उजवा कालवा भूसंपादन करून किती दिवसांच्या आत पूर्ण करणार ? अशी समितीने विचारणा केली असता, उजवा कालवा हा जून, २०१८ पर्यंत पूर्ण करणार आहोत. त्याचे काम सुरू असून केवळ ३ कि. मी. चे काम बाकी आहे. त्या कामाचे टेंडर झाले असून कामही सुरू आहे.

उजव्या कालव्याचे ६७ हेक्टरचे प्रस्ताव ॲवॉर्ड स्टेजवर आहेत. त्याचे प्रपोजल केव्हाच गेलेले होते. ३ वर्षांपासून ते इन प्रोसेस आहेत. उजव्या कालव्याचा प्रश्न नाही. उजवा कालवा जून, २०१८ पर्यंत होईल. डावा कालवा जो पी. डी. एन. करावयाचा आहे. जून, २०१९ पर्यंत पूर्ण होईल असे समितीस अवगत केले.

परिच्छेद क्रमांक ३. ४ :- " कंत्राटदारास अग्राह्य प्रदान "

५.२ अमरावती सिंचन विभागाने कंत्राटाच्या खंड - ३८ चा चुकीचा अंमल केल्यामुळे आणि कंत्राटाच्या अटीचे पालन न केल्यामुळे कंत्राटदारास रु. १३. ६३ कोटी अग्राह्य प्रदान केले. याबाबत सद्य:स्थितीची समितीने विचारणा केली असता, पांढरी मध्यम प्रकल्पाची १७९ कोटी रुपयांसाठी मूळ प्रशासकीय मान्यता दिनांक १५ जून, २००५ रोजी झाली. या प्रकल्पाच्या धरणाचे काम सन २००८ मध्ये सुरू केलेले आहे. हा प्रकल्पासाठी ता. वरुड, जि. अमरावती येथील मिडियम प्रकल्प असून तो सिंचनासाठी आहे. वर्धा नदीवर एक डायव्हर्शन वेअर बांधून वर्धा नदीचे पाणी या धरणामध्ये घेतलेले आहे. हे पंढरी धरण शक्ती नदीवर आहे. वर्धा नदीचे पाणी यामध्ये डायव्हर्ट करून पुढे कालव्याद्वारे सिंचनाचा प्रस्ताव आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

महालेखापालांनी परिच्छेद काढला म्हणून विभागाने कॉंट्रॅक्टरला जे जास्तीचे पैसे दिले त्यांचे समायोजन केले. ए. जी. काही सर्वच परिच्छेद पाहत नाहीत. ते १० टक्के परिच्छेद पाहत असतील तर लोकलेखा समिती १ टक्के परिच्छेद पाहते. ए. जीं. नी हा परिच्छेद काढला नसता तर काय झाले असते, यावर चेक कुठे आहे ? विभागाच्या कामामध्ये चेक कोठे आहे की, जेणेकरून अशा चूका वारंवार होणार नाहीत. विभागाने टेंडर प्रमाणे १२५ टक्के पर्यंत पैसे दिले पाहिजेत. त्याकरिता ३८ क्लॉज लावून १०० टक्क्यांच्या नंतर सर्व पैसे दिले हा एक मुद्दा आहे. कॉफर डॅमच्या बाबतीतील मुद्दा होता ते देखील कॉंट्रॅक्टरलाच करायचे होते. विभागाने ते पैसेही ॲड केले. यावर कोठे चेक आहे की नाही ? ए. जीं. नी पाहिले नाही तर शासनाचे पैसे असेच जाणार काय, हा समितीचा मूळ मुद्दा आहे. ए. जीं. नी सांगितले विभागाने पैसे समायोजित केले. विभागाने रिॲडजस्टमेंट केली. मात्र याबाबत विभागाच्या सिस्टममध्ये काही नियंत्रण आहे की नाही, असल्यास काय आहे ते थोडक्यात सांगावे अशी समितीने विचारणा केली.

विभागाने नियंत्रणाकरिता यंत्रणेची नियुक्ती केलेली आहे. टेक्नीकल ऑडिट ही कन्सेप्ट आता मांडलेली आहे. प्रकल्पाचे तांत्रिक परीक्षण करीत आहोत. क्लॉज ३८, एक्स्ट्रा आयटम्स याच्या अनुषंगाने जे दायित्व निर्माण होते त्या प्रस्तावांचे तांत्रिक परीक्षण व्हिजीलन्सकडून करून घेत आहोत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

ही तपासणी आपण सॅम्पल करता की, सर्वांची करता ? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी आता आपण सर्वांचीच करायला सुरूवात करणार आहोत असे सांगितले.

तत्कालीन इंटनरल चेक सिस्टम अस्तित्वात होती की नाही हा समितीचा स्पेसिफिक प्रश्न आहे असे समितीने सांगितले असता, तत्कालीन सिस्टम अस्तित्वात होती. विभागीय लेखापाल विभागात असतात. त्यांनी याचे जे इंटरप्रिटेशन केले आहे, क्लॉज ३८ हा १२५ टक्के क्वांटिटी होण्याच्या आतच त्यांनी वाढीव दर देण्यास सुरूवात केली. सेल्फ नियंत्रण हेच महत्त्वाचे होते. तत्कालीन कार्यकारी अभियंता किंवा विभागीय लेखापाल जे जबाबदार अधिकारी आहेत त्यांच्या नावाचा प्रस्ताव व्ही. आय. डी. सी. कडून विभागाकडे १४ फेब्रुवारीला आलेला आहे. त्यांची विभागीय चौकशी करण्यात येणार असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

ए. जीं. नी ऑडिट परिच्छेद काढल्यानंतर प्रस्ताव आला. ए. जीं. नी ऑडिट परिच्छेद कधी काढला ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांचा महालेखापालचा ऑडिट परिच्छेद हा सन २०१४-२०१५ मधील आहे. सदर परिच्छेद सन २०१६ मध्ये आला. अधिकाऱ्यांनी ए. जीं. नी पॉईंट आऊट केल्यानंतरच रिकव्हरीची ॲक्शन प्रो-ॲक्टिव्हलीच घेतली असल्याचे समितीस अवगत केले.

विभागाने ए. जीं. कडून वेटिंग करून घेतले आहे काय ? असे समितीने विचारले असता, विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले.

समितीने प्रधान महालेखाकार यांनी वेटिंग झाले आहे काय ? अशी विचारणा केली असता, प्रधान महालेखाकार यांनी त्याचे समर्थन केले.

ए. जीं. चा आणखी एक मुद्दा असा आहे की, विभागाकडून व्याजाची वसुली का करण्यात येत नाही ? What is the provision ? समितीच्या माहितीप्रमाणे विलंब पेमेंट करिता व्याज देण्यात येत नाही, There is no provision, ती असली पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले.

निविदेमध्ये याबाबत स्टँडर्ड क्लॉज असतो. कारण बऱ्याच वेळेस कॉंट्रॅक्टरला पेमेंट देणे अपेक्षित असते. कॉंट्रॅक्टरकडून रिकव्हरी होणे हा प्रकार तसा कमी असतो. परंतु, विभागाकडून जो विलंब होतो म्हणजे काम झालेले आहे परंतु, निधी उपलब्ध न झाल्यामुळे काही वेळा ५-६ महिने इतका विलंब होतो. त्यावेळेस व्याज देण्यात येत नाही. त्यामुळे सर्व निविदांमध्ये असा स्टँडर्ड क्लॉज आहे की, "No interest is payable to the contractor on any money due from the Government" असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

What about any money due from the contractor ? अशी समितीने विचारणा केली असता, निविदेमध्ये त्याबाबत उल्लेख नाही. परंतु, आता असे झाले आहे की, आता जर आपण याची छाननी केली तर काही इन्स्टन्सेस असे दिसतील की, विभागाकडूनही ठेकेदारांनी केलेल्या कामाचे पेमेंट देण्यास विलंब झालेला आहे. विभागाने जर रिकव्हरी प्रस्तावित केली तर, ठेकेदार त्यांना उशिराने पेमेंट केलेल्या रक्कमेवर व्याज मागेल अशी शक्यता असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. विभागाने ठेकेदाराला पेमेंट केले व परत समायोजन केले यामध्ये किती दिवसांचा डिफरन्स आहे, त्याचा पिरियड किती आहे ? दोन्ही विषयांबाबतची डेट ऑफ पेमेंट व डेट ऑफ समायोजन सांगावी. अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी साधारणतः जून २०११ मध्ये कॉंट्रॅक्टरला पेमेंट झाले व जून, २०१३ मध्ये वसूल केलेले आहेत. मध्ये २ वर्षांचा काळ गेलेला आहे असे समितीस अवगत केले. जून, २०१३ मध्ये वसुली कशी झाली ? ए. जीं. चा परिच्छेद तर आता आला आहे. ठेकेदारांने पेमेंट ड्यू होते हे आपल्या सन २०१३ मध्ये कसे लक्षात आले ? अशी समितीने विचारणा केली.

ठेकेदारांनी केलेल्या कामाचे बिल दिलेले नाही. त्याचे जे ड्यू पेमेंट होते त्यातून त्याचे समायोजन केले. त्याबाबत ए. जीं. चे ऑब्जेक्शन होते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

कॅगने ऑब्जेक्शन काढल्यानंतर हे विभागाच्या लक्षात आले. फार मोठ्या प्रमाणावर पेमेंन्ट दिले गेले आहे मात्र ते त्याला देय नाही. दुसरे म्हणजे विभागाला जेव्हा १७ लाख ५ हजार क्यूबिक मीटरचे एक्सलेशन करावयाचे होते ते फायनली किती झाले ? टेंडर काढले त्यावेळेस एस्टिमेटेड एस्कलेशन हे १७ लाख ५०४ क्यूबिक मीटर होते. फायनल पेमेंट किती क्यूबिक मीटरचे झाले अशी समितीने विचारणा केली असता, डॅमच्या निविदेमध्ये १७ लाख क्वांटिटी होती. ती क्वांटिटी ३३ लाखांनी वाढली आहे व ती आता एकूण ५० लाख आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली.

टेंडर कॉल केले गेले त्यावेळेस १७ लाखांचे एस्टिमेट केले होते. ते ५० लाखवर गेले. ते १७ लाख ऐवजी ५० लाख असे एकदम तिप्पट कसे झाले ते सांगावे ? अशी समितीला विचारणा केली तेव्हा अगोदरचे डिझाईन हे एम. आय. मॅन्युअल प्रमाणे डिझाईन केले गेले होते. ही केस सी. डी. ओ. ला गेली तेव्हा त्याच्या मधील सेक्शनचे व्हेरिएशन झाले. दुसरे फ्लडमध्ये व्हेरिएशन आहे.

अजून एक गॉर्ज व्हायचे आहे. त्यामध्ये अजून लाख क्युबिक मीटर क्वांटिटी कन्झ्युम व्हायची आहे. ते पूर्ण झाल्यावर ५० लाख ७४ हजार होईल. असे विभागीय प्रतिनिधींने समितीस अवगत केले.

१७ लाखचे एस्टिमेट असताना ते फायनल ५१ लाखाचे झाले. यामध्ये तिप्पट वाढ झालेली आहे. ओरिजनल टेंडर कमी काढण्यात आले व नंतर ३८ क्लॉज लावून करंट रेट लावता हे चुकीचे एस्टिमेशन नाही काय ? असा प्रश्न समितीने केला.

एम. आय. मॅन्युअल प्रमाणे डिझाईन केले गेले होते. त्यानंतर सी. डी. ओ. यांच्याकडून जेव्हा डिझाईन प्राप्त झाले तेव्हा डॅमची टॉप विड्थ ही साडेचारच्या ऐवजी साडेसहा ठेवावी लागली. साईड स्लोप ३ x १ होते ते ३.५ x १ करावे लागले. बर्नची साईजही चेंज झाली ती, ७ मीटर होती ती १२ मीटर करावी लागली अशी माहिती विभागीय प्रतिनिधींने दिली.

एम. आय. चे पूर्ण डिझाईन चेंज झाले असे विभागाचे म्हणणे दिसते. असे प्रधान महालेखाकार यांनी विचारणा केली, त्यावर डॅमसाठी जो स्ट्रिपिंग पोर्शन होता तो जनरली ०.६६ करतो. परंतु, हा जो पट्टा आहे तो ऑर्चड आहे, तेथे संत्रा बागा होत्या. तेथे रुटस डीप सिटेड होत्या. हे सर्व काढताना साईड कंडिशनमुळे लोकांना दीड मीटर एवढे खोदावे लागले. हा एक फॉल होता. दुसरे म्हणजे डॅम करताना त्याची लांबी व रुंदी मोठी असल्याने तेथे अँगल अप टर्निंग टेबल व गेट इरेक्शनसाठी रॅम तयार करावे लागले, त्याची क्वांटिटी वाढली. नंतर एक सॅडल डॅम होता जो यामध्ये गृहीत धरला गेला नव्हता ते प्लग करावे लागले साडेसात हजार त्यामध्ये आले असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

समितीचे म्हणणे एवढेच आहे की, सुरूवातीलाच एस्टिमेशन तसेच सी. डी. ओं. कडील विषय झाले असते तर आपल्याला हे वाढीव दर देण्याची गरज पडली नसती.

हे रिअलिस्टिक झाले असते तर विभागाला क्लॉज ३८ प्रमाणे डबल रेट द्यावे लागले नसते, ११४ चा रेट ३२१ वर गेला. तो ट्रिपल झालेला आहे. एवढाच मुद्दा आहे असे समितीचे मत आहे.

या प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता शासनस्तरावर झालेली आहे. ती व्ही. आय. डी. सी. ची नाही. हा प्रकल्प शासनानेच मंजूर केलेला आहे. सन २००५-२००६ मध्ये अनुशेषाच्या प्रकल्पांसाठी म्हणून सर्व बी. सी. रेशिओ १.०५ इतके कमी आहेत. एस. एल. टी. सी. च्या काही प्रकल्पांमध्ये ०.५ चे सुद्धा बी. सी. रेशिओ दिलेले आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

सन २०१४ पासून ते २०१७ पर्यंत पांढरी मध्यम सिंचन प्रकल्पाचे काम बंद होते पर्यावरणाचा मुद्दा पुढे उपस्थित केला होता.

सन १९८६ चा पर्यावरण संरक्षण कायदा आहे. सन १९९४ मध्ये पहिली अधिसूचना निघाली होती. या अधिसूचनेनुसार फक्त मोठ्या प्रकल्पांनाच पर्यावरणाची मान्यता घेणे अनिवार्य होते. त्यानंतर दिनांक १४ सप्टेंबर २००६ ला जी अधिसूचना निर्गमित करण्यात आली त्यानुसार सर्वच पाटबंधारे प्रकल्पांना मग तो अल्प पाटबंधारे प्रकल्प असला तरी सुद्धा त्याला पर्यावरण मंत्रालयाची मान्यता घेणे अनिवार्य करण्यात आले होते. त्यानंतर दिनांक २५.६.२०१४ ला पुन्हा अधिसूचना काढण्यात आली आहे की, त्यानुसार एमआय प्रकल्प उघडले आणि २००० हेक्टरपेक्षा जास्त सिंचन क्षमतेच्या प्रकल्पांना पर्यावरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

केंद्र शासनाचे **राजपत्रामध्ये** असे नमूद केले आहे की, जे प्रकल्प १० हजार हेक्टरपेक्षा अधिक जमिनीवर असतील त्याला परवानगी घेण्यात यावी. मात्र दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नंतर अशी परवानगी घ्यावी लागेल असे ते **राजपत्र** आहे. पांढरी मध्यम सिंचन प्रकल्प दिनांक १४ सप्टेंबर २००६ पूर्वी सुरू झाला होता. मग या प्रकल्पाला जर पर्यावरणाची मान्यता आवश्यक नव्हती तर विभागाने प्रस्तुत प्रकल्पाला पर्यावरणाची मान्यता घेण्यासाठी अनावश्यक पत्र महाराष्ट्र शासनाकडे कशाला पाठविले होते अशी समितीकडून विचारणा करण्यात आली असता, प्रिकॉशनरी मेजर म्हणून हे केले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी नमूद केले.

Either you go by the book or go by the norms. **राजपत्रापेक्षा** प्रिकॉशनरी मेजर्स काय घेत आहात ? विभागाला जर मागितले नसेल तरी सुद्धा पत्र देत आहात आणि त्यामुळे ३ वर्षे प्रकल्पाचे काम अडकून पडले. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर वरुडच्या कोर्टामध्ये केस दाखल झाली. त्यांना अरेस्ट होईपर्यंत कार्यवाही झाली. त्या प्रकल्पाला मान्यता घेण्याची गरजच नव्हती. कारण तो प्रकल्प सन २००६ पूर्वी सुरू झाला होता आणि त्यावर निधी सुद्धा खर्च झाला होता. ३ वर्षे प्रकल्पाचे काम थांबले ते फक्त विभागीय अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे त्यामुळे या अनुषंगाने चौकशी करा की गरज नसताना हे पत्र का पाठविले आणि त्यामध्ये जबाबदार अधिकारी कोण होते ? ३ वर्षात त्या प्रकल्पाचे एक्सेलेशन झाले, त्या प्रकल्पाची किंमत वाढली, त्या भागातील लोक पाण्यावाचून राहिले आणि या सर्वांसाठी जे अधिकारी जबाबदार होते त्यांच्याविरुद्ध आपण कोणती कार्यवाही करण्याचा निर्णय घेणार आहोत ? याबाबत चौकशी करून समितीला अहवाल द्यावा असे समितीने निदेश दिले.

समितीकडे रेकॉर्डवर जे आर. ए. बिल आहे हे सन २०१७ चे आहे तर अशा परिस्थितीत ते आर. ए. बिल सन २०१३ चे आहे असे कसे म्हणू शकता ? असे समितीने विचारणा केली असता त्यामध्ये अपडेट केले आहे. कॉफर डॅमची रिकव्हरी होती ती सन २०१३ मध्ये झाली आणि एप्रिल २०१७ मध्ये अपडेट करताना जे एक्सेस पेमेंट झाले. त्याचे जे बिल तयार केले गेले त्याच्यामध्ये या सर्व क्वॉन्टीटी रिक्युप केल्या गेल्या आणि एक्सेस जे रु. १३. ६७ कोटी दाखविले होते त्याऐवजी रक्कम रु. १४. १८ कोटी असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

याचा अर्थ विभागाने दोन वेळा समायोजन केले आहे अशी समितीने विचारणा केली असता त्यास विभागीय प्रतिनिधींनी होकारार्थी उत्तर दिले.

समितीकडे विभागाने सादर केलेल्या उत्तरामध्ये ३४ वे आर. ए. बिल असल्याचे म्हटले आहे आणि विभागाने असे दाखविले आहे की, ए. जी. चा परिच्छेद येण्यापूर्वीच विभागाने ते वेळेवर केले आहे. जर विभागाने सन २०१३ मध्ये कॉफर डॅमचे पेमेंट केले असेल तर तेव्हा ए. जी. ला का सांगितले नाही ? ए. जी. चा परिच्छेद येण्याची वाट का पाहिली ? तसेच मागील दोन तीन साक्षीच्या वेळी सांगितले की सन २०१३ मध्ये समायोजन केले आहे. असे असते तर मग ए. जी. ने आपला परिच्छेद का काढला असता ? विभागाने सन २०१७ मध्ये समायोजन केले हे आम्हाला मान्य आहे.

याबाबतीत कोणकोणत्या दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही करणार आहात ते रेकॉर्डवर येऊ द्यावे. असे समितीने व्यक्त केले असता, मुख्य अभियंता यांनी जी नावे कळविली होती त्यामध्ये संबंधित कार्यकारी अभियंता व इतर नावे कळविली आहेत. १. श्री. ना. पा. जाधव कार्यकारी अभियंता, २. श्री. काकपुरे, उप विभागीय अभियंता, ३. श्री. पी. जी. पाटील, सहायक अभियंता, श्रेणी-२, ४. श्री. गावंडे, शाखा अभियंता, ५. श्री. वाडेकर, शाखा अभियंता हे अधिकारी आहेत. तथापि, यांच्यापैकी श्री. पी. जी. पाटील सोडून इतर सर्वजण सेवानिवृत्त झाले आहेत. पण या लोकांना जेव्हा हे प्रकरण उघडकीस आले होते त्यावेळी त्यांना कारणे दाखवा नोटीसा दिल्या होत्या असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

याबाबत "जो काम करना था वह काम तो हुआ ही नहीं था. इस काम की पेमेंट हो गई. अनड्यू बेनिफिट चला गया. अब इसकी रिकवरी करनी है तो क्या इस बारे में ब्याज लेना है या नहीं लेना है, इसके बारे में विभाग के रुल में क्लॅरिटी है या नहीं है ? Because the work was not executed." असे महालेखाकार यांनी मत व्यक्त केले.

ए. जी. साहेबांचे म्हणणे असे आहे की, व्याज घेण्याबाबत क्लॉज टाकण्याच्या बाबतीत लोकलेखा समितीने निर्णय करावा. त्यावर विभागाचे सचिवांनी सांगितले की, the contract should be a balancing one. You cannot impose unilaterally. Whenever any amount is due from the contractor we charge interest and we will not pay any interest on any payment due from our side such clause cannot be in the Agreement.

समितीने आता काम सुरू आहे काय आणि असेल तर ते काम कधी पूर्ण होईल ? फिडर कॅनलचे काम झाले आहे काय ? अशी विचारणा केली असता, विभागाने फिडर कॅनलचे टेंडर काढलेले आहे. मार्च २०२० पर्यंत काम पूर्ण होईल असे समितीस अवगत केले.

परिच्छेद क्रमांक ३.५ कंत्राटदारास गैरवाजवी आर्थिक लाभ

५.३ उक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक २१ फेब्रुवारी, २४ एप्रिल व ३० मे, २०१८ रोजी जलसंपदा विभागाचे सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली त्यावेळी, बळेगाव उच्च पातळी बंधारा या निविदेंतर्गत जो काही सुसज्जता अग्रीम दिला आहे त्या अग्रीमानंतर त्याच्या व्याजाची वसुली माफ करणे या अनुषंगाने महालेखाकारांनी काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. बळेगाव उच्च पातळी बंधारा हा बाभळी बंधारा प्रकल्प महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेश राज्याच्या सीमेवर आहे. आता तो भाग तेलंगणा राज्यात आहे. या ठिकाणी दोन बंधाऱ्यांचा समावेश असलेला हा प्रकल्प आहे. त्यामध्ये बाभळी बंधारा हा प्रकल्प सीमेपासून ७ कि.मी. अंतरावर आहे तर बळेगाव बंधारा हा प्रकल्प सीमेपासून साधारणपणे ३५ कि.मी. वरच्या बाजूला आहे. यामध्ये निविदेमध्ये तरतूद नसताना सुसज्जता अग्रीम दिले असा महालेखाकारांचा आक्षेप आहे. पण ते अग्रीम महामंडळाच्या स्तरावर माननीय अध्यक्षांच्या मान्यतेने देण्यात आले आहे. त्याबाबतची नस्ती सुध्दा विभागाकडे उपलब्ध आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

एक वर्षाच्या आत व्याजावरील व्याज काढावे लागते. विभागाने सुसज्जता अग्रीमाचे नियम आधीच ठरविलेले आहेत. त्याच्या इन्डेक्स दर महिन्याला तपासावा लागतो आणि ते काम एक वर्षाच्या आत पूर्ण करावे लागते असे समितीने निदर्शनास आणले असता, साधारणतः त्यामध्ये ५० टक्के काम पूर्ण होईपर्यंत वसुली करणे अपेक्षित असते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

गो. म. पा. वि. महामंडळाने दिलेल्या पत्रातील दुसऱ्या परिच्छेदात नमूद केले आहे की, "मागणी करण्यात आलेली अग्रीम निविदा किमतीच्या १० टक्के असावी. मागणी केलेल्या रकमेवर १३ टक्के व्याज आकारावे. मंजूर केलेल्या अग्रीमाची रक्कम ही प्रत्येक देयकातून संपूर्ण रक्कम वसूल करण्यात यावी व मुद्दल हे अग्रीम दिल्यापासून १२ महिन्यात वसूल करण्यात यावे. हे गो. म. पा. वि. महामंडळाच्या अध्यक्षांचे पत्र असून त्यावर त्या अध्यक्षांच्या स्वाक्षऱ्या आहेत. महामंडळातर्फे अग्रीम देण्याबाबतचे नियम हे विभागानेच केलेले आहेत. एक तर सुसज्जता अग्रीम देण्याची अट नव्हती काय किंवा विभागाने हे स्वेच्छेने केले आहे काय, की कंत्राटदाराने मागणी केली वा माननीय मंत्री महोदयांनी आदेश दिला आहे काय, याबाबत नस्तीवर काय तपशील आहे याबाबत समितीला अवगत करण्यास सूचित केले असता, कंत्राटदाराची मागणी होती. त्याने विभागाला अर्ज केला आणि विभागाकडून अधिक्षक अभियंता यांनी शिफारस केली, मुख्य अभियंत्यांकडून महामंडळाकडे प्रस्ताव आला असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे. प्रस्तुत निविदेत Moblisation Advance ची तरतूद नाही. तथापि कंत्राटदारांनी दिनांक २६/८/२००९ रोजी अग्रीम मिळणे याबाबतची मागणी केली. त्या अनुषंगाने संबंधित कार्यकारी अभियंता/अधीक्षक अभियंता/मुख्य अभियंता यांनी Moblisation Advance इतकीच रक्कम बँक हमीच्या स्वरुपात घेऊन अग्रीम मंजूर करण्याची शिफारस केल्यानुसार कार्यालयीन टिप्पणी क्र. तांशा-३/२८७, दिनांक २९/८/२००९ अन्वये मा. अध्यक्ष, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या मान्यतेने Moblisation Advance मंजूर करण्यात आला आहे.

करारामध्ये सुसज्जता अग्रीम देण्याची अट नसताना कंत्राटदाराच्या अर्जावर निर्णय होऊन त्याप्रमाणे विभागाने त्याला अग्रीम रक्कम दिली आहे. त्याला ८ कोटी ६८ लाख रुपये दिले आहेत. सन २००९ मध्ये विभागाने या प्रकल्पाची निविदा दिली. त्याने सन २०१० मध्ये काम सुरू केले. मध्यंतरीच्या काळात कंत्राटदाराला कार्यस्थळावर यंत्रसामुग्री परवानगीशिवाय ठेवण्यास मनाई होती. तरी पण त्याने यंत्रसामुग्री तेथे उभी केली आणि त्याबाबतचे पैसे त्याने मागणी केले. या सर्व बाबी नियमानुकूल आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, निविदेच्या बाबतीत जो कार्यारंभ आदेश देण्यात आला त्यामध्ये यंत्रसामुग्री आणू नये असा उल्लेख नव्हता. पण जेव्हा महामंडळाने या कामासाठी संकेतांक मंजूर केला त्यावेळी त्यामध्ये ही अट घातली होती. कारण बाभळी बंधारा प्रकल्पाचे प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झाले होते आणि महाराष्ट्र शासन पुन्हा नियमांचे उल्लंघन करते किंवा पुन्हा काम सुरू करते असा संदेश मा. सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊ नये आणि शासनाची बाजू न्यायालयात कमकुवत होऊ नये या दृष्टीने तशी अट कार्यकारी संचालकांनी त्यामध्ये घातली होती. पण दरम्यानच्या काळात त्यामध्ये फार मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या. एवढेच नाही तर आताचे आंध्रप्रदेशचे जे मुख्यमंत्री आहेत त्यांनी सुद्धा तेथे मोर्चा आणला होता व त्यांना त्यावेळी अटक करावी लागली होती. त्यामध्ये खूप राजकीय घडामोडी घडल्या व त्यामध्ये राज्याचे नुकसान होऊ नये या दृष्टीने ही पूर्व तयारी करण्यात आली होती. कारण मा. सर्वोच्च न्यायालयात ही समांतरपणे ३ वर्षे सुनावणी सुरूच होती आणि कोणत्याही क्षणी निकाल येणे अपेक्षित होते आणि तो निकाल आल्यानंतर लगेच आपल्या वाट्याचे पाणी मिळविण्यासाठी काम सुरू करावे व पुन्हा त्यामध्ये काही हस्तक्षेप होऊ नये किंवा राज्याला पुन्हा आंध्रप्रदेश राज्याने वेगळी याचिका दाखल करून प्रतिबंधित करू नये म्हणून ही तयारी ठेवली होती. त्या ठिकाणी यंत्रसामुग्री आणून सुसज्ज स्थितीची तयारी केली होती.

यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे. बाभळी बंधाऱ्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिकेचा निकाल लागताच कोणत्याही क्षणी काम सुरू करण्याची निकड असल्याने यंत्रसामुग्री प्रकल्पस्थळी असणे आवश्यक झाले होते. कार्यकारी अभियंता यांचे निर्देशानुसार कंत्राटदाराने प्रत्यक्ष कामास सुरूवात केली नाही तथापि बांधकामाचे ठिकाणी यंत्रसामुग्री, बॅचींगप्लॅन्ट, खडीसाठी क्रशर व मनुष्यबळ कार्यस्थळावर उपलब्ध करण्यात आले होते. त्यामुळे कंत्राटदाराने अग्रीमाची मागणी केली होती. बाभळी बंधाऱ्याच्या संदर्भात गोदावरी पाणी तंटा लवादाचा महाराष्ट्र शासन भंग करत असले बाबत आंध्रप्रदेश सरकारने मा. सर्वोच्च न्यायालयात दिनांक ३/७/२००६ रोजी याचिका दाखल केली होती. सदरील याचिकेची वेळोवेळी सुनावणी होवून अंतिम सुनावणी न होता, वेळोवेळी सुनावणीच्या तारखा वाढविण्यातआल्या. कोणत्याही क्षणी सुनावणी दरम्यान मा. सर्वोच्च न्यायालयाकडून अंतिम निर्णय होवू शकण्याच्या टप्प्यात असल्याने व सदर बंधारा आंतरराज्य विवादा मध्ये असल्याने व अंतिम निर्णयान्वये आंध्र प्रदेश शासनास ०.६० TMC पाणी सोडण्याबाबतची मागणी होण्याची शक्यता होती. तसेच या दरम्यान आंध्र प्रदेशातील लोकप्रतिनिधीं व जनतेची तीव्र आंदोलने झाली.

१) दिनांक १६/७/२०१० रोजी तेलगु देशम पक्षातर्फे बंधाऱ्याच्या विरोधात बस यात्रा काढण्यात आली. खासदार, आमदार व समर्थकासह २५ बस व इतर ३०० वाहनांसह १००० व्यक्तींचा ताफा महाराष्ट्र सीमेवर पोचला.

२) श्री. चंद्राबाबु नायडू व इतर यांनी धरणे आंदोलन करून महाराष्ट्र शासन विरुद्ध घोषणा दिल्या प्रतिबंधात्मक आदेश धुडकावून सीमेत प्रवेश केला.

३) महाराष्ट्र पोलीसांनी श्री. चंद्रबाबु नायडू यांच्यासह ६६ इतर पक्ष कार्यकर्त्यांना अटक केली. यानंतर आंध्र प्रदेशात रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

४) महाराष्ट्र राज्यातर्फे जिल्हा पोलीस प्रमुख व उप प्रमुख यांनी श्री. नायडू व समर्थकांचे बंधाऱ्यांच्या भेटी पासून मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनी नकार दिला. त्यामुळे त्यांना अटक करून दोन दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली.

५) महाराष्ट्र शासनातर्फे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धर्माबाद व विश्रामगृह, धर्माबाद या ठिकाणी अनुक्रमे पुरुष व महिलांसाठी तात्पुरत्या खास कारागृहाची दिनांक १७/७/२०१० च्या अधिसूचनेद्वारे घोषणा करण्यात आली.

६) दिनांक १८/७/२०१० रोजी कारागृहातून मुक्त करण्याकरिता निर्देशाकांची वैयक्तिक बंधपत्रावर सही करण्यास नकार दिला.

७) दिनांक १९/७/२०१० रोजी पक्ष नेत्यांच्या अटके विरुद्ध आंध्र प्रदेशात राज्यभर हरताळ व बंद पुकारण्यात आला.

८) दिनांक १९/७/२०१० रोजी बाभळी बंधाऱ्यांच्या भेटीचा आग्रह धरून या नेत्यांनी जामीन नाकारला.

(९) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार मा. ना. श्री. आर. आर. पाटील, गृहमंत्री यांनी तणाव परिस्थिती निवळण्यासाठी दिनांक २०/७/२०१० श्री. चंद्राबाबू नायडू व पक्ष सदस्य यांच्या विरुद्धचे सर्व आरोप मागे घेतल्याची घोषणा केली व त्यांच्याशी चर्चेअंती या सर्व नेत्यांना सन्मानाने आंध्र प्रदेश सिमेवर सोडण्यात आले.

(१०) दिनांक ४/८/२०१० रोजी तेलगू देशम पक्ष सदस्यांनी बाभळी बंधाऱ्याच्या विरोधाच्या गोंधळामुळे अर्धा तास लोकसभा तहकुब करण्यात आली.

सदर परिस्थिती लक्षात घेता बळेगांव बंधाऱ्याचे काम सुरू करण्यासाठी कामाच्या ठिकाणी बांधकाम साहित्य यंत्रणा व इतर सामुग्री उभारणे आंतरराज्य प्रकरणात राज्याच्या हिताचा विचार करता आवश्यक होते. त्या अनुषंगाने कामाच्या ठिकाणी सर्व तयारी करण्यात आली.

उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता प्रत्यक्ष काम सुरू न करता बांधकामाची संपूर्ण तयारी करणे आवश्यक झाले होते. त्यामुळे मनुष्यबळ, साहित्य व यंत्रसामुग्रीची जमवाजमव करण्यासाठी अग्रीम देण्याबाबत कामाचे कंत्राटदार यांनी दिनांक २६/८/२००९ रोजी अग्रीम रक्कम मिळणेबाबतची मागणी केली. त्या अनुषंगाने प्रस्तावित निविदेत मोबालायझेशन ॲडव्हान्सची तरतूद नाही. तथापि, कंत्राटदाराची मागणी व उपरोक्त पार्श्वभूमीच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता/अधीक्षक अभियंता यांनी मोबीलायझेशन ॲडव्हान्स इतकीच रक्कम बँक हमीच्या स्वरुपात घेऊन अग्रीम मंजूर करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार मा. अध्यक्ष, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या मान्यतेने महामंडळाचे पत्र क्र. गोमपाविम/तांशा-३/नांपामं/बळेगांव/उपाबं/ब-१/अग्रीम/७१३९ दिनांक ३१/८/२००९ अन्वये सुसज्जता अग्रीम मंजूर करण्यात आला.

मा. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लागल्यानंतर सदर काम सुरू केल्यामुळे राज्याचे हितसंबंध जोपासले गेले आहे. ०.६०० एमसीएफटी एवढे पाणी पोचमपाड येथे राखीव आहे. त्यांचे तेवढे पाणी अडवित असल्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले आहे. तेवढे पाणी तेलंगणा राज्याला सोडायचे व उर्वरित दीड टीएमसी पाणी अडविण्यासाठी शासनाला मान्यता मिळाली आहे. अशाप्रकारे सर्वोच्च न्यायालयात शासनाच्या बाजूने निकाल लागलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने या संदर्भात राज्याच्या हितासाठी प्रयत्न केल्याची बाब समितीला मान्य आहे. यासंबंधी विभागाने अटी व शर्ती केलेल्या आहेत. त्यानुसार कार्यादेश घेतल्यानंतर कंत्राटदाराने एक महिन्याच्या आत सुसज्जता अग्रीम मागितला पाहिजे. त्याकरिता १३ टक्के व्याज असले पाहिजे व त्यांनी ते वेळोवेळी भरले पाहिजे. यात सुसजता अग्रीमाची अट नव्हती. सुसजता अग्रीम द्यावयाचा असल्यास त्याकरिता कोणती प्रक्रिया आवश्यक आहे हे त्यात नमूद आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, निविदेत त्यासंबंधी तरतूद केली असल्यास त्या सर्व अटी लागू होतात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे. प्रस्तुत निविदेत Mobilisation Advance ची तरतूद नाही. कंत्राटदाराने कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या आत Mobilisation Advance ची मागणी केली. संबंधित कार्यकारी अभियंता/अधीक्षक अभियंता/मुख्य अभियंता यांनी Mobilisation Advance इतकीच रक्कम बँक हमीच्या स्वरुपात घेऊन अग्रीम मंजूर करण्याची शिफारस केली. त्यानुसार मा. अध्यक्ष, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या मान्यतेने Moblisation Advance मंजूर करण्यात आला आहे.

मा. मंत्री महोदयांकडे सुसज्जता अग्रीमाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला होता त्यात तो देण्याची अट नाही असा उल्लेख केला होता का ? अशी विचारणा समितीने केली असता, निविदेत अशा प्रकारची तरतूद नाही अशा प्रकारचा उल्लेख केलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विषयांकित सर्व कामांच्या स्वीकृत निविदेत कंत्राटदारास कोणत्याही स्वरुपाचे अग्रीम देण्याची तरतूद नाही. तथापि जर द्यावयाचे असल्यास सदर नियम आहेत. त्यावर कनिष्ठ लिपिक, लेखा परीक्षक, मुख्य लेखा वित्तीय अधिकारी, कार्यकारी संचालक, व्यवस्थापकीय संचालक तसेच अध्यक्ष यांच्या त्यावर स्वाक्षऱ्या आहेत. कोणत्याही निविदेमध्ये सुसज्तता अग्रीम देण्याची तरतूद नाही. तसेच तो द्यावयाचा असल्यास त्यानुसार कार्यवाही करावी अशाप्रकारे विभागाने नियम तयार केलेले आहेत. समितीचा असा प्रश्न आहे की, विभागाने यानुसार कार्यवाही केली आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, या संदर्भात झालेल्या एमओयूमध्ये २४ हप्त्यात रक्कम वसूल करावी असे नमूद केलेले आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

या संदर्भात विभागाने वाटाघाटी करून सेटल केलेला दावा योग्य आहे का ? अशी विचारणा केली असता, दीड वर्षांच्या काळात कंत्राटदाराची यंत्रसामूग्री बंद राहिल्यामुळे त्या काळासाठी कंत्राटदाराने १.४३ कोटी रुपयांचा दावा दाखल केला होता. त्या स्टॉपेज पीरिएडसाठी ४७.७५ लक्ष रुपयांचे व्याज होत होते. त्या संदर्भात तत्कालीन कार्यकारी संचालकांनी वाटाघाटी करण्याचा प्रयत्न करून त्यांना सांगितले की, व्याजाची रक्कम माफ करतो. यासंबंधी केलेले दावे मागे घ्यावेत. ही बाब रेकॉर्डवर आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर वाटाघाटीमध्ये शासनाचा फायदा झाला आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर दावा १. ४३ कोटी रुपयांचा होता. त्यात शासनाचा ९५ लक्ष रुपयांचा फायदा झाला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कंत्राटदाराने निष्काम कालावधीकरिता यंत्रसामग्री खर्चासाठी केलेला दावा नियमानुसार आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, निविदेतील कलम १५(३) मध्ये असे नमूद केले आहे की, ६० दिवसांपेक्षा जास्त काळ काम बंद राहिल्यास कंत्राटदार निष्काम कालावधीकरिता यंत्रसामग्री आणि कामगार खर्चासाठी दावा करू शकतो. त्यांना ३० दिवसांपेक्षा जास्त काळाची रक्कम अनुज्ञेय ठरते. त्यानुसार कंत्राटदाराने सदर दाव्याची मागणी केली होती. तसेच याला दावा म्हणता येणार नाही. कंत्राटदाराने निविदा शर्तीनुसार सदर मागणी केली होती. परंतु रेकार्डवरुन तो दावा म्हणून ठरला गेला असे दिसत आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे. निविदेतील कलम १५ (३) खालीलप्रमाणे आहे.

where the Engineer-in-charge require the contractor to suspend the work for a period in express of 30 days at any time or 60 days in the aggregate, the contractor shall be entiled to apply to the Engineer within 30 days of resumption of work after such suspension for payment of compensation to the extent of pecuniary loss suffered by him in respect of working machinery rendered idle on the site or on account of his having had to pay the salary wages of labour engaged by him during the said period of suspension. provided always that the contractor shall not be entitled to any claim in repect of any such working machinery salary or wages for the first 30 days whether consecutive or in the aggregate of such suspension or in respect of any suspension whatsoever occusioned. by unsatisfactory work or any other default on his part. The decision of the Engineer-in-charge in this regard shall be final and conclusive agaist the contractor.

वरील निविदा शर्तीत नमूद केल्याप्रमाणे बंधाऱ्याचे काम दिनांक ३१/८/२००९ ते १५/११/२०१० या कालावधीत बंद होते. म्हणजेच ३० दिवसांपेक्षा जास्त दिवस काम बंद ठेवण्यात आले होते. प्रकल्पस्थळी संचालक बॅचींग प्लान्टची उभारणी तसेच लोडर, पोकलेन, टिप्पर इ. यंत्रासामूग्री आणली तसेच स्टोन क्रशरची उभारणी केली. याबाबतचा अहवाल विभागीय कार्यालयामार्फत सादर करण्यात आला.

वरीलप्रमाणे निविदेतील तरतूद, न्यायालयीन घडामोडी, कामावरील प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेता कंत्राटदाराने काम बंद कालावधीतील आयडल चार्जेसची केलेली मागणी रु. १,४३,१२,७७६ ऐवजी त्या कालावधीतील व्याज रु. ४७,७५,०००/- माफीच्या स्वरुपात देण्याचा निर्णय कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी निविदेतील कलम १५ (३) ला अनुसरुन घेतल्याचे दिसून येते. या निर्णयामुळे शासनाची रु. ९५,३७,७७६ इतकी बचत झाली.

सन २००९ मध्ये निविदा अटींमध्ये सुसज्जता अग्रीम देण्याची तरतूद नसल्याची बाब विभागाने मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर सुद्धा विशेषतः या प्रकरणात सन २००९ मध्ये कोणतेही काम सुरू होणार नव्हते. सन २०१३ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले. त्यानंतर काम करता आले. त्यामुळे इतकी वर्षे आगाऊ सुसज्जता अग्रीम देण्याचा उद्देश काय होता ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१३ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला असला तरी सदर प्रकरण त्यापूर्वी सुरू झाले होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे. न्यायालयीन प्रकरणाची पार्श्वभूमी व आंध्र प्रदेशातील लोकप्रतिनिधी व जनतेची चालू असलेली आंदोलने लक्षात घेता कार्यारंभ आदेश दिल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरू करण्यासाठी मजुरांच्या छावण्या, सोई-सुविधा, आवश्यक मनुष्यबळ व यंत्र सामुग्री प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर उपलब्ध करणे आवश्यक होते. त्यानुसार मा. अध्यक्ष, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या मान्यतेने Mobilisation Advance मंजूर करण्यात आला. हा Advance दिनांक १४/१२/२००९ रोजी रु. ४०० लक्ष, दिनांक १८/०१/२०१० रोजी रु. २५० लक्ष, दिनांक १०/०३/२०१० रोजी रु. २१८ लक्ष असा एकूण रु. ८६८ लक्ष असा देण्यात आला तसेच बंधाऱ्याच्या कामास दिनांक १६/११/२०१० पासून म्हणजेच मा. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लागणेपूर्वीच प्रत्यक्ष सुरूवात झाली. मा. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लागण्यापूर्वी (फेब्रुवारी-२०१३) बंधाऱ्याचे निविदा किंमतीच्या ६०% पूर्ण झालेले होते.

काम सुरू झाले नसताना सुसज्जता अग्रीम का दिला हा मूळ प्रश्न आहे अशी विचारणा समितीने केली तसेच महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून, निविदा अटींमध्ये सुसज्जता अग्रीम देण्याची तरतूद नसताना सदर अग्रीम देण्यात आला. शासन या बाबीचे समर्थन करीत आहे का ? अशी विचारणा केली असता, तरतूद नसताना सुसज्जता अग्रीम देण्याची कृती चुकीची होती. त्यावेळी सुसज्जता अग्रीम देणे अनुज्ञेय होता. तो देण्यासाठी शासनाने कोणतीही बंदी आणली नव्हती. या संदर्भात त्यांना निविदेत सदर तरतुद करता आली असती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे. प्रस्तुत निविदेत Mobillisation Advance ची तरतूद नाही. तथापि त्यावेळी मोबोलयझेशन ॲडव्हान्स देणे बाबत शासनाची कोणतीही बंदी नव्हती. तसेच कंत्राटदारास दिलेल्या अग्रिमाची रक्कम महामंडळामार्फत मुदत ठेवीमध्ये ठेवली असली तरी जास्तीत जास्त ९% दराने व्याज मिळाले असते. हीच रक्कम अग्रिम स्वरुपात कंत्राटदारास १२.२५% व्याज दराने दिल्याने शासनाचा + ३.२५% इतका फायदा झालेला आहे. त्यामुळे शासनाचे कोणतेही नुकसान झालेले नाही.

महालेखाकारांचा मूळ मुद्दा असा आहे की, the matter is subjudice, the work cannot be started till the Court gives verdict. This was the situation. In that situation, why you gave Mobilization Advance? अशी विचारणा समितीने केली असता, बाभळी बंधारा प्रकल्पाला स्थगिती देण्यात आली होती. दोन प्रकल्प व दोन बॅरेज मिळून सदरचा प्रकल्प आहे. हा प्रकल्प बाभळी बंधारा प्रकल्पाच्या अंतर्गत होता. बाभळी बंधारा प्रकल्प महाराष्ट्राच्या सीमेलगत आहे. मुख्य आक्षेप बाभळी प्रकल्पावर होता. बळेगाव बंधारा हा बाभळी प्रकल्पाचा एक भाग आहे. बाभळी प्रकल्पाचे पाणी आंध्रप्रदेशला सोडावे लागल्यामुळे बंधाऱ्याच्या काठावर असलेल्या शेतीला पाणी कमी पडत होते. त्यामुळे बळेगाव बंधाऱ्याची तरतूद करण्यात आली होती. त्यामुळे सदर कामाला स्थगिती नव्हती असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे. न्यायालयीन प्रकरणाची पार्श्वभूमी लक्षात घेता प्रत्यक्ष काम सुरू न करता बांधकामाची संपूर्ण तयारी करणे आवश्यक होते. तसेच बळेगांव बंधाऱ्याचे काम करू नये असे न्यायालयाचे आदेश नव्हते. त्यामुळे मोबीलायाझेशन अडव्हान्स देण्याकरीता मान्यता प्रदान करण्यात आली.

सदर काम कधी सुरू करण्यात आले ? सन २०१३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयापूर्वी २०१० मध्ये काम सुरू केले होते का ? विभागाने यासंबंधी कार्यादेश दिले हा वेगळा मुद्दा आहे. अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१० मध्ये निविदा प्रक्रिया झाल्यानंतर काम सुरू करण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाची सदर कामाला स्थगिती नव्हती. सर्व यंत्रसामग्री जागेवर आणून कामाची पूर्वतयारी केली होती. दिनांक १५ नोव्हेंबर, २०१० मध्ये प्रत्यक्षात काम सुरू झाले होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे. विष्णुपूरी प्रकल्पाच्या सुधारित जलनियोजनाअंतर्गत बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्याच्या जलनियोजनास महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-२००९/१२२८/(४५२/२००९)/मोप्र-२ दिनांक १६/१०/२०१० अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली. त्यामुळे मा. कार्यकारी संचालक, गोमपाविम औरंगाबाद यांनी पत्र क्र. जा. क्र. गोमपाविम/तांशा-३/९०६३ दिनांक २५/१०/२०१० नुसार बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्याचे काम सुरू करण्यास मान्यता कळविली. त्या अनुषंगाने विभागीय कार्यालयाचे पत्र क्र. जा. क्र. विप्रवि-२/लेखा/बळेगांव-३३३९ दिनांक १५/११/२०१० नुसार बंधाऱ्याचे काम सुरू करण्यास कंत्राटदारास कळविण्यात आले होते. त्यानुसार दिनांक १६/११/२०१० रोजी प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली. त्यानुसार प्रथम देयक दिनांक १५/०२/२०११ रोजी नोंदविण्यात आले आहे. म्हणजेच उक्त कामे त्यापुर्वी झाली आहेत. तसेच, पुढील देयके साधारणतः १ महिन्याच्या अंतराने म्हणजेच दिनांक २५/०३/२०११, ०८/०४/२०११ व २८/०५/२०११ रोजी झाल्याचे दिसतात. याचा अर्थ ही कामे वेगाने चालू होती असे दिसून येते. बंधाऱ्याचे काम भौतिकदृष्ट्या पुर्ण करून बंधाऱ्याचे सर्व दरवाजे प्रथमतः दिनांक ३/९/२०१५ रोजी बंद करून दिनांक २५/९/२०१५ पर्यंत बंधाऱ्यात २. ९२ दलघमी पाणीसाठा निर्माण झाला. त्यानंतर ऑक्टोबर २०१६ मध्ये २९. ९८ दलघमी व ऑक्टोबर २०१७ मध्य ३३. ९७ दलघमी पाणीसाठा करण्यात आला.

महालेखाकारांचे असे म्हणणे आहे की, काम सुरू नसताना सुसज्जता अग्रीम का देण्यात आला ? तसेच महालेखाकारांच्या रेकॉर्डनुसार सदर काम सन २०१० मध्ये सुरू झालेले नाही अशी विचारणा समितीने केली असता, मेजरमेंट बुकमध्ये काम केल्याची तारीख नमूद केलेली असते. ज्या दिवशी कामाचे इनीशिएली मेजरमेंट रेकॉर्ड झाले असेल, ती तारीख कामाची अंतिम तारीख असू शकते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

लेखी स्पष्टीकरणातील पृष्ठ क्रमांक ७ मध्ये असे नमूद केले आहे की, "मा. लेखा परीक्षक यांच्या आक्षेपानुसार कंत्राटदाराकडून मुद्दल रु. ८.६८ कोटी रुपये व व्याज रु. २.४४ कोटी असे एकूण ११.१२ कोटी रुपये वसूल करणे आवश्यक होते. तथापि, सदर व्याजाची गणना चक्रवाढ व्याज पद्धतीने केली आहे. ही गणना प्रत्येक महिन्यासाठी केली असून महिना अखेर व्याज, परतफेड, दिलेली आगाऊ रक्कम याचा विचार करून शिल्लक दर्शविली आहे. यानंतरच्या लगतच्या महिन्याच्या सुरुवातीस ही शिल्लक रक्कम विचारात घेऊन व्याज लावले आहे. अशा पद्धतीने नंतरच्या सर्व महिन्यांत व्याजावर व्याज गृहीत धरण्यात आले आहे. तसेच उर्वरित व्याजाच्या रकमेवर दिनांक २०/१२/२०११ नंतरही (करारनाम्यानुसार संपूर्ण परतफेड झालेल्या तारखेच्या नंतर) दिनांक ३०/६/२०१६ पर्यंत व्याजाची गणना केली आहे. त्यामुळे आक्षेपानुसार रु. २.४४ कोटी रुपये व्याज दिसून येते. तथापि, कंत्राटदार व कार्यकारी अभियंता यांच्या दरम्यान झालेल्या करारनाम्यातील मुद्दा क्रमांक ७ खालील प्रमाणे आहे.

The GMIDC may reschedule, at its complete discretion, the installments due without extending the ultimate time limit for full repayment of this advance together with all interest there on and costs incurred by the GMIDC in connection with this advance in which case the contractor shall be liable to adhere to such rescheduling as prescribed by the GMIDC without demur.

उपरोक्त करारनाम्यानुसार प्रतिमहा मुद्दल रु. ३६,१६,६६७ व व्याज रु. ४,४९,४५३ ३ असे एकूण रु. ४०,६६,१२० वसूल करायचे असल्याबाबत नमूद केलेले आहे. अशा पद्धतीने २४ महिन्यात मुद्दल रु. ८,६८,००,००० आणि व्याज रु. १,१५,०६,८८० वसुली करायचे ठरले होते. करारनाम्यातील व्याजाची गणना करताना सरळ पद्धतीने व्याज विचारात घेतले आहे. "या संदर्भात मुद्दल व व्याज वसूल करण्यासंबंधी करारनामा झाल्यामुळे त्या संदर्भात कार्यवाही करण्यासाठी कोणती अडचण येत आहे ? कंत्राटदाराने करारमान्यानुसार पैसे देणे अत्यावश्यक आहे अशी विचारणा समितीने केली असता, १. १५ कोटी रुपयांची व्याजाची वसुली पूर्ण झाली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकारांनी काढलेल्या परिच्छेदानुसार १. ७१ कोटी रुपयांची वसुली करायची आहे. परंतु लेखी स्पष्टीकरणात असे नमूद केले आहे की, गो. म. पा. वि. महामंडळाला सर्व अधिकार आहेत. दुसरा मुद्दा असा आहे की, माहे डिसेंबर, २००९ मध्ये अग्रीम देण्यात आला. परंतु माहे नोव्हेंबर, २०१० मध्ये काम सुरू केले आहे. अशा प्रकारे काम सुरू करण्यापूर्वी एक वर्ष अगोदर अग्रीम दिलेला आहे. अग्रीम देण्यासंबंधी काही पद्धती आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, कार्यादेश झाल्यानंतर कंत्राटदारांकडून अग्रीमाची मागणी केली जाते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे. आक्षेपानुसार चक्रवाढ व्याज (Compound interest) व बंद कालावधीत व्याज व करारनाम्यातील अंतिम मुदतीनंतरही व्याजावर व्याज यामुळे व्याजाची रक्कम रु. २. ४४ कोटी दर्शविली आहे. बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्याचे बांधकाम या कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक २५/८/२००९ रोजी देण्यात आला. त्या अनुषंगाने कंत्राटदाराने दिनांक २६/८/२००९ रोजी अग्रीम मिळणे बाबतची मागणी केली. बळेगांव बंधाऱ्याचे काम सुरू करण्यासाठी कामाच्या ठिकाणी बांधकाम साहित्य, मजुराच्या छावण्या, सोयी सुविधा, मनुष्यबळ व इतर यंत्रसामूग्री उभारणे आंतरराज्य प्रकरणात राज्याच्या हिताचा विचार करता आवश्यक होते. त्या अनुषंगाने मा. अध्यक्ष, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या मान्यतेने Mobilisation Advance मंजूर करण्यात आला.

You gave him an Advance and one year later you told him to go ahead with the work असे मत महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून व्यक्त केले. तसेच उर्वरित व्याजाची रक्कम घेण्यासंबंधी विभागाची नेमकी भूमिका काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, व्याजाची १. १५ कोटी रुपयांची पूर्ण वसुली झाली आहे. तसेच मुद्दलाची वसुली सुद्धा झाली आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे. कार्यकारी संचालक, गो. म. पा. वि. महामंडळ, औरंगाबाद यांचे वतीने कार्यकारी अभियंता व कंत्राटदार यांच्यातील झालेल्या करारनाम्यानुसार मुद्दल रु. ८.६८ कोटी व सरळ पद्धतीने व्याज रु. १.१५ कोटी असे एकूण रु. ९.८३ कोटी वसुल करावयाचे होते. त्यापैकी हप्त्या हप्त्याने रु. १.२१ कोटी व चालु देयकातुन रु. ८.१४ कोटी व निविदेतील कलम १५(३) नुसार काम बंद कालावधीतील आयडल चार्जेसच्या तुलनेत बचत होत असल्यामुळे माफ केलेले व्याज रु. ४७.७५ लक्ष असे एकूण रु. ९.८३ कोटी कंत्राटदारांकडून वसुल करण्यात आले आहे. सदर वसूल केलेली रक्कम रु. ९.८३ कोटी ही झालेल्या करारनाम्यानुसार अग्रीम दिलेल्या तारखेपासून (डिसेंबर २००९) २४ महिन्यांच्या आत (दिनांक ३०/१२/२०११) वसूल करण्यात आले.

चक्रवाढ व्याज (Compound interest):– सर्वसामान्यपणे कंत्राटदारास दिलेल्या सुझता अग्रीमाची वसुली सरळ व्याजाने (Simple Interest) करण्यात येते. केंद्रिय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (CPWD) works mannual २००३ पॅरा क्र. ३१.६ नुसार सुसज्जता अग्रीमावर सरळ व्याज आकारणे बाबत नमूद केले आहे.

काम बंद कालावधीतरिल व्याज:- बळेगाव बंधाऱ्याचे बांधकाम दिनांक ३१/८/२००९ ते १५/११/२०१० काम बंद होते. त्यामुळे या कालावधीतील व्याजाची रक्कम रु. ४७.७५ लक्ष कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी निविदेतील कलम १५(३) नुसार अनुज्ञेय असलेल्या Idle Charges च्या मोबदल्यात माफ केले आहे.

करारनाम्यानुसार अंतिम मुदतीनंतर आकारणी केलेले व्याज:- करारनाम्यानुसार अग्रीम व व्याजाची संपूर्ण वसुली दिनांक ३०/१२/२०११ पर्यंत झाली आहे. तथापि उपरोक्त दोन कारणामुळे व्याज वसूल करणे शिल्लक आहे असे नमूद आहे. या शिल्लक रक्कमेवर दिनांक ३०/१२/२०११ पासून दिनांक ३०/६/२०१६ पर्यंत चक्रवाढ पद्धतीने व्याज लावलेले आहे. प्रत्यक्षात करारनाम्यानुसार संपूर्ण वसुली झालेली असल्याने या कालावधीतील व्याज देय होत नाही.

सुसज्जता अग्रीम थेट कंत्राटदाराला दिला जातो की महामंडळामार्फत दिला जातो? अशी विचारणा समितीने केली असता, अग्रीम महामंडळाच्या अध्यक्षांकडून मंजूर झाल्यानंतर त्याची एलओसी रिलिज केली जाते. विभागाकडून कार्यकारी अभियंत्यामार्फत कंत्राटदाराला अग्रीमाचा धनादेश दिला जातो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

लेखी स्पष्टीकरणात असे नमूद केले आहे की, कंत्राटदाराने कार्यस्थळावर काही गोष्टी आणू नयेत. परंतु यासंबंधी शासनाने कोणत्याही अटी टाकलेल्या नव्हत्या असे समितीने निदर्शनास आणले असता, कामाच्या कार्यादेशामध्ये तशाप्रकारच्या कोणत्याही अटी नव्हत्या. विभागीय स्तरावर कार्यकारी अभियंत्यांचा कामाशी दैनंदिन संबंध येत असतो. त्यांच्याकडून कामासंबंधी सर्व पत्रव्यवहार केला जातो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महामंडळाने काढलेले आदेश कार्यकारी अभियंत्यांना मिळाले असणार. त्यामुळे या संदर्भात कार्यस्थळावर अमुक गोष्टी आणू नयेत यासंबंधी स्वतंत्र आदेश का काढण्यात आले? अशी विचारणा समितीने केली असता, महामंडळाने कामासाठी सांकेतांक मंजूर केला होता त्यावेळी ते नमूद करण्यात आले होते. त्यावेळी बाभळी बंधाऱ्याचे सर्वोच्च न्यायालयात प्रकरण सुरू होते. बाभळी बंधाऱ्याच्या प्रकल्पात बळेगाव प्रकल्पाचा समावेश आहे. तसेच न्यायालयात प्रकरण सुरू असताना महाराष्ट्र शासनाने सदर प्रकल्पाचे काम सुरू ठेवल्याची बाब तेलंगणा राज्याने न्यायालयाच्या निदर्शनास आणली असती. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेत अडचण निर्माण होऊ नये यासाठी सांकेतांक मंजूर करताना ती गोष्ट नमूद करण्यात आली होती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सुसज्जता अग्रीमाची व्याजासह कशी वसुली करायची हा मूळ प्रश्न आहे. कारण त्यात गैरव्यवहार झाल्याची बाब सत्य आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, माहे नोव्हेंबर, २०१० पासून काम सुरू केल्यानंतर त्याचा वापर झाला आहे. कंत्राटदाराने कार्यस्थळावर सर्व यंत्रसामुग्री आणली होती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

बाभळी बळेगाव प्रकल्पासंदर्भात सन २०१० साली आंध्रप्रदेश आणि महाराष्ट्र राज्यामध्ये वाद निर्माण झाला होता. हा प्रकल्प होऊ नये तसेच टर्मीनल स्टोरेजसंदर्भात ते न्यायालयात गेले होते. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी विभागाला आदेश दिले होते की, न्यायालयात जे प्रकरण चालले आहे त्याच्या अधीन राहून सर्व तयारी ठेवा. तेथे साधनसामुग्री मनुष्यबळ तयार ठेवा. न्यायालयाने पाणी अडविण्यासाठी अल्प कालावधी दिला तर त्यासाठी विलंब होता कामा नये. ताबडतोब काम सुरू झाले पाहिजे. त्यादृष्टीने कार्यस्थळावर सर्व यंत्रसामुग्री ठेवली गेली. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे तत्कालिन अध्यक्ष यांच्या मान्यतेने ही सर्व तयारी करण्यात आली. जेणेकरून सदरहू प्रकल्पाचे काम जलद गतीने सुरू व्हावे यासाठी राज्याचा पाण्याचा जो वाटा आहे तो अडविण्यासंदर्भात नुकसान होऊ नये म्हणून सर्व तयारी करून ठेवली होती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २००० मध्ये विभागाने धोरणच तयार केले की, अग्रीम द्यावयाचा नाही. अग्रीम बंद करण्याचा निर्णय शासनातर्फे झाला होता की, कार्यकारी संचालकांमार्फत झाला होता की मुख्य अभियंत्यांनी घेतला होता? अशी विचारणा समितीने केली असता, मार्च, २००० मध्ये महालेखाकारांच्या कार्यालयाच्या परिच्छेदामध्ये उल्लेख आहे. मार्च, २००० मध्ये अग्रीम देऊ नये असे परिपत्रक काढले असले तरी जुलै, २००० मध्ये ते परिपत्रकक रद्द केलेले आहे. सन २०१० पर्यंत अग्रीम देण्याची तरतूद होती त्यानंतर हा अग्रीम कायमस्वरुपी बंद केलेला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर निविदेत अग्रीम देण्याची तरतूद होती का? अशी विचारणा समितीने केली असता, सदर निविदेत अग्रीम देण्याची तरतूद नव्हती असे विभागीय सचिवांनी सांगितले. गोदावरी पाटबंधारे महामंडळाचे तत्कालिन अध्यक्ष यांच्या मान्यतेने हा निर्णय झालेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

गोदावरी म. पा. वि. महामंडळाच्या अध्यक्षांना असे निर्णय घेण्याचे अधिकार आहेत का? निविदेमध्ये ज्या अटी व शर्ती घातल्या त्या डावलून विभागाने अग्रीम दिला असेल तर महालेखाकार आक्षेप घेणारच असे समितीने विदित केले असता, तत्कालिन अधिकाऱ्यांशी चर्चा केली. सन २०१० मध्ये जे मुख्य अभियंता होते त्यांना विचारले होते. त्यावेळी अशी परिस्थिती होती की, आंध्रप्रदेश राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. चंद्रबाबू नायडू यांनी महाराष्ट्रात प्रवेश करून उपोषण पुकारले होते आणि त्यांनी या प्रकल्पाला विरोध केला होता. त्यांनी सांगितले होते की, हा प्रकल्प होऊ देणार नाही. शासनाच्या हक्काचे टर्मिनल स्टोरेज वेळेवर होईल या पार्श्वभूमीवर तत्कालिन मा. मुख्यमंत्र्यांनी सूचना केली की, सर्व तयारी ठेवा आणि प्रकल्प पूर्ण करा असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मूळ निविदेमध्ये तरतूद नसताना कंत्राटदाराला तत्कालीन अध्यक्षांनी अग्रीम दिला. त्यावेळी गोदावरी म. पा. वि. महामंडळाचे अध्यक्ष कोण होते? अशी विचारणा समितीने केली असता, गोदावरी म. पा. विकासमहामंडळाचे अध्यक्ष त्यावेळी श्री. अजित पवार होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यावेळी २४ तासात मोठ मोठे निर्णय जलसंपदा विभागाने घेतलेले आहेत. हा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवून प्रक्रिया करता आली असती. एका दिवसातनस्ती खालपासून वरपर्यंत क्लिअर झालेली आहे. अशा प्रकारचा प्रस्ताव राज्य सरकारकडे येऊन त्याला मान्यता मिळाली असती असे समितीने विदित केले असता, विभागाचे अधिकारी त्यावेळी होते. त्यांनी स्वतःच्या स्तरावर निर्णय घेतलेला नाही. अध्यक्षांकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आणि अध्यक्षांनी निर्णय घेतला असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

या महामंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष जलसंपदा मंत्री असतात तरीसुद्धा हा निर्णय शासनस्तरावर झालेला नाही असे विभागाला म्हणायचे आहे का? अशी विचारणा केली असता, हा गो. म. पा. वि. महामंडळाचा निर्णय असून हा शासनाचा निर्णय नाही. शासनाकडे जेव्हा एखादा प्रस्ताव येतो तेव्हा जलसंपदा विभागात त्याची छाननी होते. त्या प्रस्तावावर अवर सचिव, उप सचिव, सह सचिव आणि सचिव त्यावर अभिप्राय देतात. गरज पडली तर विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात येतात असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

सदर महामंडळाच्या अध्यक्षांना असा निर्णय घेण्याचा अधिकार होता का? अशी विचारणा समितीने केली असता, कायद्यामध्ये तसा अधिकार नव्हता असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

महामंडळाचा अधिनियम आहे, त्यामध्ये कलम १९(१) मध्ये असे नमूद केले आहे की, "The Corporation shall have the powers to accord technical sanction of acceptance of all tenders, sanctioning of all budget, making financial provisions, settling disputes arising out of contracts and any other thing which may be necessary for expedient for the purpose of carrying out of function under it. " असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

यामध्ये अग्रीम देण्याची तरतूद कोठे आहे? सचिवांनी कोणत्या राजकीय परिस्थितीमध्ये हा निर्णय घेतला ते सांगितले. दोन राज्याच्या अतिशय संवेदनशील विषयावरील तो परिच्छेद आहे. त्यामध्ये महाराष्ट्राचा इंटरेस्ट होता, ही सर्वात महत्वाची बाब आहे. संबंधित खात्याच्या सचिवांनीते वाचून दाखविले. महामंडळाचे अध्यक्ष यांना पूर्ण अधिकार असतात. तो प्रकल्प पूर्ण करावयाचा असेल तर योग्य निर्णय घेण्याचे त्यांना पूर्ण अधिकार असतात. त्यामध्ये वित्त, नियोजन या सर्व विभागाचे सचिव असतात. त्यांचे प्रतिनिधी असतात. त्यांच्या समोर हे निर्णय होतात. त्या परिस्थितीमध्ये घेतलेला तो निर्णय होता. एखाद्या राज्याचे मुख्यमंत्री जेव्हा उपोषणाला बसले आहेत तेव्हा घेतलेला हा निर्णय आहे. ज्या बाबी निविदेमध्ये नमूद नव्हत्या, त्या ठरविण्याचे अधिकार कॅबिनेटच्या उच्चाधिकार समितीला सुद्धा नाहीत अशी विचारणा समितीने केली असता, महामंडळाच्या अध्यक्षांना असे अधिकार आहेत असे विभागाच्या सचिवांनी समितीस सांगितले.

वित्तीय अधिकाराच्या संदर्भात अशा गोष्टी होत नाहीत. ज्या गोष्टी कंत्राटामध्ये नाहीत त्यासंदर्भात माननीय उच्च न्यायालयाचे जज्जमेंट आलेले आहेत. जे अधिकार नमूद नाहीत ते अधिकार त्यांना नाहीत. कलम १९(१) अन्वयेअसे अधिकार अध्यक्षांना आहेत, हे उत्तरामध्ये का छापले नाही? महालेखाकार कार्यालयाने आपल्या उत्तरावर आक्षेप काढला आहे. उत्तरामध्ये असे नाही आहे. हा शासनाचा निर्णय कसा होणार नाही? ज्या अटी, शर्तीवर महामंडळाची

स्थापना होते, त्या अटी, शर्तीवर हे महामंडळ आहे. त्यांचे वेगवेगळे कॉलम वरती, खाली असून शकतात. मंत्री या मंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत. साध्या महामंडळाच्या अध्यक्षांना असे अधिकार बहाल करतो का? गोदावरी महामंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष मंत्री महोदय होते, त्यामुळे त्यांचा निर्णय म्हणजे शासनाचा निर्णय होता असे म्हणू शकता. मंत्री महोदय त्या महामंडळाचे अध्यक्ष आहोत म्हणून त्यांना हे अधिकार आहेत. याप्रमाणे बाकीच्या महामंडळांना असे अधिकार बहाल करणार का? या प्रकरणात सर्वच अधिकार प्रकल्प अंमलात आणण्यासाठी महामंडळाला आहेत. सर्व प्रकल्पांच्या नस्ती सुप्रमासाठी मंत्रालयात का येतात, उच्चाधिकार समितीकडे कशासाठी जातात? याबाबत समितीला अवगत करावे, असे अधिकार महामंडळाला असतील तर मग राज्य शासनाकडे सुप्रमाचे प्रस्ताव का येतात? प्रकल्प पूर्ण करण्यासाठी महामंडळाला अधिकार आहेत तर सुप्रमासाठी राज्य शासनाकडे वारंवार का येतात? अशी विचारणा समितीने केली असता, सन २००३ मध्ये महामंडळाला अधिकार होते. त्यानंतर सरकारने सुप्रमा देण्याचे अधिकार काढून घेतले असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

शासनाने कोणते अधिकार काढून घेतले अशी विचारणा समितीने केली असता, सुप्रमा देण्याचे अधिकार काढून घेतले असे विभागाच्या सचिवांनी सांगितले. सचिवांनी सांगितले की, या कलमान्वये अध्यक्षांना अधिकार आहेत त्यामुळे त्याचे स्पष्टीकरण त्यांना द्यावेच लागेल. सुप्रमासाठी शासनाकडे यावे लागते तर यासाठी का आले नाही? सचिवांनी सांगितले की, सन २००३ पर्यंत महामंडळाकडे हे अधिकार होते, त्यानंतर आता शासनाकडे गेले आहेत. सन २००३ मध्ये महामंडळाचे कोण कोणते अधिकार काढले, याबाबत कृपया खुलासा करावा असे समितीने सूचित केले असता, सन २००१ पर्यंत तापी आणि कृष्णा महामंडळाला सुप्रमा देण्याचे संपूर्ण अधिकार होते. सन २००१ मध्ये माननीय राज्यपालांनी निर्देश दिले की, इतर महामंडळांनाही हे अधिकार द्यावेत म्हणून सन २००३ ला शासनाने कलम २५ चे अधिकार वापरून "Government can give any direction of any other to corporation" असे जे नमूद आहे कायद्यामध्ये ते अधिकार काढून घेतले असा खुलासा विभागाच्या सचिवांनी केला.

शासनाने कोणकोणते अधिकार काढून घेतले अशी विचारणा समितीने केली असता, शासनाने सुप्रमा देण्याचे अधिकार काढून घेतले. माननीय राज्यपाल महोदयांच्या सांगण्यावरून सन २००३ मध्ये दिलेत आणि सन २००९ पर्यंत हे अधिकार कायम राहिलेत. सन २००९ ला हे अधिकार काढून घेतले असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

सन २००३ ला बाकी महामंडळांना हे अधिकार दिलेत. सुप्रमाचे अधिकार त्यावेळेस या महामंडळांना नव्हते असे समितीने विदित केले असता, सन २००९- २०१० या आर्थिक वर्षातील ही बाब आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अग्रीम देण्याचे अधिकार महामंडळाच्या स्तरावर होते का असे समितीला म्हणायचे आहे. विशिष्ट परिस्थितीमध्ये या प्रकल्पाचा वेगळा विचार करावा. पण बाकीच्या ठिकाणी निविदेतील अटीशिवाय सुसज्जता अग्रीमाचे समर्थन करतात. त्यामुळे याला कोठेतरी थांबवावे लागणार आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, माननीय सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलेले आहे की, "Discretion has to be used very judiciously". म्हणजे 'Discretion' हे 'Arbitrarily' वापरता येत नाही. इतर ठिकाणी असा अग्रीम दिला असता तर त्याचे समर्थन केले नसते. परंतु या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात प्रकरण असल्यामुळे तसेच असते. आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रात उपोषण सुरू केले. त्यावेळी राज्याच्या पाण्याच्या वाटयाला धोका निर्माण झाला असता म्हणूनया वाक्याला समर्थन करायला हरकत नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या प्रकरणाबद्दल समितीने सुरूवातीपासूनच सांगितले आहे. परंतु दुसरा मुद्दा असा आहे की, विभागाच्या अधिकारक्षेत्रात असल्याचे जे सांगितले ते स्पष्ट होत नाही असे समितीने विदित केले असता, प्रत्येक गोष्ट डिफाईन करता येत नाही. There has to be discretion and the Honuble Supreme Court has said that, use it judiciously. म्हणजे आर्बिटरली कोणतीही डिस्क्रीशन पॉवर यूज करू नयेत. विभागाला वाटते या ठिकाणी त्यांनी डिस्क्रीशन पॉवर यूज केली आहे व ती योग्य वाटते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

दुसरा विषय असा आहे की, व्याजाबाबत सांगितले. पूर्ण व्याज घेतले असे विभागाचे म्हणणे आहे. परंतु महालेखाकारांचे म्हणणे आहे की, १ कोटी ७१ लाख रुपये कमी घेतले आहेत. याबाबत विचार करून योग्य उत्तर द्यावे. कारण समितीने या विषयाचा अभ्यास केलेला आहे असे समितीने सूचित केले असता, यामध्ये सरळव्याज आकारण्यात आले. चक्रवाढव्याज हा मुळ मुद्दा आहे असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

महालेखाकारांचे म्हणणे आहे की, १ कोटी ७१ लाख रुपये कमी मिळाले आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, यामध्ये पहिला मुद्दा असा आहे की, याच्या वसुलीबाबत ज्यावेळी एकूण रक्कम ठरली त्यावेळी महामंडळाने बँकेकडे पत्र पाठविले की, "आम्हाला सरळ व्याजाप्रमाणे हप्ते पाडून द्या" त्यानंतर जे हप्ते पाडून दिले ते एम. ओ. यू. मध्ये आलेले आहेत. यामध्ये नमूद केलेले नसले तरीही याचा अभ्यास केला तर हे स्पष्ट होते की, सदर हप्ते सरळव्याजानुसार पाडले गेले आहेत. ज्या एम. ओ. यू. मध्ये किती टक्के व्याज आकारायचे याबाबत नमूद आहे त्याच एम. ओ. यू. मध्ये हे हप्त पाडले गेले असून ते रेकॉर्डवर आहे. त्या ठिकाणी यंत्रसामुग्रीदेखील आणून ठेवली होती. निष्क्रीय शुल्काचे (Idle Charges) ४७ लाख रुपये वजा केले आहेत असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

४७ लाख रुपये वजा केल्याचे समिती मान्य करते. तरीदेखील सदरील महामंडळाचा अधिनियम आहे, त्यामध्ये कलमम १९(१) मध्ये असे नमूद केले आहे की, "calculation of interest" हे बरोबर नाही. एकदा विभागाने म्हटले की, १४३ लाखांच्या अगेन्स्ट ४७ लाखांमध्ये सेटल केले. विभागाची भूमिका अशी आहे की, फायदा करून घेतला. एक तर त्यांना देण्यात आलेल्या कार्यादेशामध्ये तेथे यंत्रसामुग्री आणू नयेत, असे लिहिले नाही. परंतु संकेतांक होता की, तेथे यंत्रसामुग्री आणायची नाही. तसेच हे काम कधी सुरू करता आले पाहिजे यादृष्टीने ही बाब आवश्यक असल्याचे सांगत आहात. ते निष्क्रीय राहिले व निष्क्रीय शुल्काचे सेटलमेंट केले. त्यामध्ये १४३ लाख रुपयांच्या अगेन्स्ट ४७ लाख रुपयांमध्ये मध्ये निश्चित केले. Let us agree on this point. Then the charges which you have settled to pay in installment, the installments were not paid on time. विभागाने तेच पाहिले नाही.

दीड वर्षापर्यंत त्याने हप्ता दिलाच नाही. मे, २०१० ते नोव्हेंबर, २०११ पर्यंतचे १८ ते १९ हप्ते एकत्रित दिले. यामध्ये व्याजाचे नुकसान झाले नाही का, याचे कसे समर्थन करता ? एकदम सोपा विषय होता. परंतु याचे समर्थन करताना विभागाने झाले असल्याचे सांगितले. काय झाले आहे ? ९.८३ कोटी रुपयांमध्ये विभागाने ४७ लाख रुपये कमी करून ९.३५ कोटी रुपये वसूल केले. समितीचा मुद्दा असा आहे की, हप्ते वेळेवर आले असते तर विभागाचे म्हणणे बरोबर असते. परंतु दीड वर्षापर्यंत हप्तेच आले नाहीत. सर्व एकत्रित देण्यात आले. याचे व्याज का दिले नाही ? दीड वर्ष हप्ते दिले नसल्याचे विभागाचे उत्तर आहे असे असतानाही पैसे आले असे सांगून त्याचे समर्थन करीत आहात असे समितीने निदर्शनास आणले असता, ज्यावेळी विभागाने अग्रीम दिले त्यावेळी ॲग्रीमेंट केले. त्यामध्ये असे सांगितले की, "मुद्दल रक्कम व व्याजाची पूर्ण रक्कम दोन वर्षांच्या आत वसूल केली पाहिजे" त्यानुसार त्यामध्ये आकडेवारी दिली होती. यामध्ये दोन वर्षांमध्ये पूर्ण व्याज वसूल झाले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

विभागाने एकूण २४ हप्ते निश्चित केले होते. संबंधित व्यक्तीने सुरूवातीला एक हप्ता देऊन नंतर एकूण रक्कम २४ महिन्यांच्या आत दिली. सरळव्याज किंवा चक्रवाढ व्याजाबाबत पुन्हा बोलत नाही. परंतु विभागाने जे ठरविले ते मिळालेच नाही. विभागाला दीड वर्षे पैसेच मिळाले नाही. मे, २०१० ते नोव्हेंबर, २०११ पर्यंत त्यांनी हप्ते भरलेच नाहीत जर वेळेवर हप्ते दिले नाहीत तर संबंधिताकडून व्याज घेतले पाहिजे. ही आठ-नऊ कोटी रुपयांची रक्कम आहे. यामध्ये कंत्राटदार कोण आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, शारदा कन्स्ट्रक्शन, नांदेड असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

दिनांक ३१.०८.२००९ रोजी कार्यकारी अभियंता, विष्णुपुरी प्रकल्प, विभाग क्रमांक २ यांनी दिलेल्या कार्यादेशामध्ये नमूद केले की, "कार्यारंभ महामंडळाची पूर्वपरवानगी मिळेपर्यंत प्रत्यक्ष कामास सुरूवात करू नये, कोणत्याही प्रकारची यंत्रसामुग्री घेऊ नये." असे असतानाही १४३, ४७ चे लिटिगेशन बाजूला ठेवले तरीही दीड वर्षांच्या लॅप्सेसचे व्याज घेतले पाहिजे की नाही ? If you reply on this point, the audit para will be closed. प्रकरण अगदी स्पष्ट आहे असे समितीने विदित केले असता, दिनांक ३१.०८.२००९ ते दिनांक १५.११.२०१० दरम्यान काम बंद होते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

काम बंद होते व त्यामुळे विभागाने त्यांना निष्क्रीय शुल्काबाबतचे (Idle Charges) ४७ लाख रुपये दिले आहेत. त्यांना अग्रीम दिले, अग्रीमाचे हप्ते पाडून दिले, हप्त्यांचे पैसे वेळेवर मिळाले नाहीत. त त्यामुळे महालेखाकारांचे म्हणणे आहे की, त्याचे व्याज दिले पाहिजे असे समितीने सूचित केले असता, निष्क्रीय शुल्क १.४ कोटी रुपये असताना केवळ ४७ लाख रुपये पकडले यामध्ये सुमारे ९१ लाख रुपये वाचले असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

समितीचा मुद्दा एवढाच आहे की, दीड वर्ष हप्ते मिळाले नाहीत. They were committed to give the installment in every month. जर वेळेवर हप्ते न भरता दीड वर्षाने संपूर्ण पैसे भरले तर दरम्यानच्या कालावधीचे व्याज वसूल करणार नाहीत का ? त्याच्याकडून व्याजाचे पैसे घेतले पाहिजेत ते सोडता कामा नये अशी विचारणा समितीने केली असता, येणाऱ्या देयकांमधून हप्ते कपात करण्याची पद्धत आहे. परंतु दरम्यानच्या १३ महिन्यांमध्ये देयके आलीच नाहीत. असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

विभागाने केलेला खुलासा व लेखी दिलेले उत्तर यामध्ये विसंगती आहे. आता ज्या बाबीचे समर्थन करीत आहात तीच बाब विभागाने लेखी उत्तरामध्ये देखील नमूद करायला पाहिजे होती. तसे केले असते तर हा प्रश्नच आला नसता विभागाचे म्हणणे आहे की, अग्रीम घ्या व काम बंद असल्यामुळे व्याज देऊ नका. काम बंद असताना २४ महिन्यांच्या आत कशाला पैसे घेतले ? विभागाने सांगितले पाहिजे होते की, आणखी एक-दीड वर्ष वाढवून घ्या असे समितीने विदित केले असता, नंतर काम सुरू झाले होते असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

समितीचा मुद्दा केवळ देण्यात आलेल्या ८ कोटी ६० लाख रुपयांपर्यंतच आहे. अग्रीम दिल्यानंतर २४ महिन्यांचा नियम पाळला आहे. २४ महिन्यांमध्ये पूर्ण पैसे घेतले. काम सुरू झाले की नाही हे पाहिले नाही. १८ महिने गप्प बसले. ४७ लाखांमध्ये सेटलमेंट केल्याचे समिती मान्य करते. Despite of condition in order that they will not put the machinery. परंतु जी परिस्थिती सांगितली की, त्यादृष्टीने विभागाने तयारी केली त्याबद्दल समितीची हरकत नाही. परंतु व्याजाचे पैसे विभागाने वसूल केले पाहिजेत. जर ते वसूल झाले नाहीत तर ज्यांच्याकडे जबाबदारी होती त्यांच्याकडून वसुली करून समितीला तसे कळवावे असे समितीने सूचित केले असता, विभागाने कार्यादेश दिले त्यावेळी त्यांनी तात्काळ काँक्रीट बॅचिंग प्लांट, यंत्रसामुग्री वगैरे सर्व सुसज्ज केले. त्यानंतर जर दीड-दोन वर्ष कामच होऊ शकले नाही. त्यामुळे देयकामधून वसुली केली नाही. ज्यावेळी काम सुरू झाले त्यावेळी तात्काळ वसुली केली. हे फक्त २४ महिन्यांमध्ये पूर्ण केले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एका व्यक्तीला दोन फायदे कसे देणार ? शासनाच्या पैशांमधून त्याने सर्व उभे केले. काम सुरू झाले नाही म्हणून विभागाने व्याज घेतले नाही. दुसऱ्या बाजूला ४७ लाख रुपयेदेखील माफ करीत आहात अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने ९५ लाख रुपये वाचविले असे विभागाच्या सचिवांनी समितीस सांगितले.

त्या व्यक्तीने शासनाच्या पैशांनीच सर्व उभे केले. त्याला निष्क्रीय शुल्क (Idle Charges) देत आहात, बिनव्याजी रक्कम दिली जाते. या दोन्ही गोष्टी योग्य नाहीत. एकतर ४७ लाख रुपये दिले नसते तर व्याज देऊ नका असे म्हटले असते. परंतु ४७ लाख रुपयेदेखील देत आहात व व्याजदेखील घेत नाहीत. ही बाब योग्य नाही. शासनाच्या निधीमधून त्याने सर्व उभारले आहे असे समितीने विदित केले असता, Delayed payment is on account of stoppage of work. एवढा उशीर होऊनदेखील दोन वर्षांच्या आत पूर्ण वसुली झालेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे काम कधी सुरू झाले ? अशी विचारणा समितीने केली असता, १३ महिन्यांनंतर काम सुरू झाले. असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

काम सुरू झाल्यानंतर त्यांनी पैसे दिले, याबाबत विभाग सहमत आहे का ? त्याने तेथे जी रचना उभी केली ती रक्कम शासनाच्या ८ कोटी ६० लाख रुपये निधीमधून उभी केली. विभागाचे म्हणणे आहे की, "सुसज्जता अग्रीम घेऊन त्याने हे केले आहे" तो याचे निष्क्रीय शुल्क (Idle Charges) देखील घेणार व विभागाने त्याच्याकडून व्याजदेखील घेतले नाही. How you can give double benefit for one cause? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये डबल बेनिफिट नाही. रिपेमेंटमध्ये त्याने काहीही बुडविलेले नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्याने १८ महिने व्याज न देता पैसे वापरले आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाच्या कारणामुळे ते निष्क्रीय होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याबाबत समिती सहमत आहे. जर निष्क्रीय शुल्क दिले तर व्याज घ्या असे मत समितीने व्यक्त केले असता, निष्क्रीय शुल्क (Idle Charges) दिलेले नाही. यामध्ये १ कोटी ४३ लाख रुपये निष्क्रीय शुल्क (Idle Charges) असताना विभागाने केवळ ४७ लाख रुपये दिले. यातील ९१ लाख रुपये दिलेले नाहीत. जर हे पैसे दिले असते तर डबल बेनिफिटचा मुद्दा आला असता असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

विभागाने ४७ लाख रुपयांमध्ये सेटल करून त्यांना पेमेंट केले. हे पैसे सुरूवातीला ठरलेल्या व्याजामधून ४७ लाख रुपये कमी केले. १८ महिने त्यांनी पैसेच दिले नाही. हप्ते वेळेवर दिले नाहीत ते रुल्ड आउट करून आणखी ४७ लाख रुपये दिले. हे सर्व पैसे तेथेच गुंतविले असे विभागाचे म्हणणे आहे. याच प्रकारे त्याला व्याजाची सूट दिली तसेच निष्क्रीय शुल्काबाबतचेदेखील ४७ लाख रुपये दिले. एकाच कामाला या दोन्ही गोष्टी देणे योग्य नाही, अशी समितीची भूमिका आहे. Either or one benefit should be withdrawn from the contractor or whoever is responsible in this case अशी विचारणा समितीने केली असता, जेवढा निष्क्रीय (Idle) कालावधी होता तेवढ्याच कालावधीचे व्याज माफ केलेले आहे. त्याचा काहीच क्लेम दिला नाही. निष्क्रीय कालावधीचेच ४७ लाख रुपये एवढे व्याज वसूल केलेले नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने ४७ लाख रुपये व्याज माफ केले. परंतु १८ महिने उशिरा हप्ते भरल्याचे व्याज अंदाजे १ कोटी २५ लाख रुपये एवढे होते असे मत समितीने केले असता, उशिरा भरलेल्या हप्त्यांमुळे रक्कम येते ६७. ५५ लाख रुपये त्यांच्याकडून ९१ लाख रुपये डिस्काउंट घेतला. तरीदेखील शासनाचा फायदा आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१ कोटी ४३ लाख रुपयांसाठी सहमत झाले का ? वारंवार ९१ लाख रुपयांचा उल्लेख करू नका. विभागाने हे चांगले काम केले हे समितीने सांगितले आहे. त्याला १ कोटी ४३ लाख रुपयांपैकी ४७ लाख रुपयांमध्ये सेटल केले. ६८ लाख रुपये वसूल केले पाहिजे होते, एवढेच समितीचे म्हणणे आहे. समितीची भूमिका अशीच असून विभागाने याबाबत निर्णय घ्यावा. एकतर विभागाने ही रक्कम वसूल केली पाहिजे किंवा The responsible person who has not recovered the interest should be punished. त्यांनी यंत्रसामुग्रीदेखील शासनाकडूनच घ्यायची व निष्क्रीय शुल्क (Idle Charges) देखील शासनाकडूनच घ्यायचे. विभागाने १ कोटी ४३ लाख रुपये मान्य केले होते का ? विभागाने ते मान्यच केले नाही. पुढील लिटिगेशनला टाळण्यासाठी त्यांच्याबरोबर बसून ४७ लाख रुपयांमध्ये हे सेटल केले असे समितीने विदित केले असता, त्यावेळचे १ कोटी ४३ लाख रुपये निष्क्रीय शुल्क (Idle Charges) व ६७ लाख रुपये व्याजाच्या फरकाची रक्कम हे दोन्ही मुद्दे समोर होते. विभागाने त्याला १ कोटी ४३ लाख रुपयांपैकी केवळ ४७ लाख रुपये दिले. ९१ लाख रुपये सेव्हिंग करून ६७ लाख रुपये ॲडजस्ट झाले. यामध्ये शासनाचा फायदा झालेला आहे असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

विभाग असे कसे म्हणत आहे. जर हे निष्क्रीय (Idle) राहिले नसते तर ४७ लाख रुपये देखील द्यावे लागले नसते अशी विचारणा समितीने केली असता, निष्क्रीय (Idle) राहण्यामध्ये त्यांची चूक नसून शासनाची चूक आहे. विभागाने त्यांना कार्यादेश दिले नाहीत. कार्यादेशामध्ये होते की, "आम्ही आदेश देईपर्यंत काम सुरू करू नये" याबाबत न्यायालयाच्या आदेशाची वाट पाहत होतो. The contractor is not responsible असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Committee is not asking about idle charges, even A.G. has objected on that point. A. G. has shown us the paper. Despite of that, taking into consideration the situation on the spot, we have not objected for idle charges whatever you settled. u In your settlement you have not mentioned that, हे व्याजदेखील सोडतो. कारण ते परिगणना करण्यास तयार नव्हते. आतापर्यंत म्हणत होते की, "आम्हाला पैसे मिळाले" ६८ लाख रुपये सोडल्याचे विभागाने कधीच सांगितले नाही. हे महालेखापालांनी सांगितले. विभाग समर्थन करताना सांगत आहे की, ६८ लाख रुपये सोडले. ९१ लाख रुपयांबद्दल विभागाचे समितीने अभिनंदन केले असे समितीने विदित केले असता, देयक आल्याशिवाय हप्ता कपात करीत नाहीत. १३ महिने देयक आले नाही असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

समिती सहमत आहे. समिती तेच म्हणत आहे की, चालू देयकामधून कपात करण्याचे ठरले होते. चालू देयकामध्ये कपात केली नाही कारण शासनाच्या पैशांमधून त्यांनी हे सर्व रचना उभी केली. एका बाजूला कार्यादेशामध्ये सांगता की, तेथे काहीही यंत्रसामुग्री घेऊन जाऊ नका. दुसऱ्या बाजूला तोंडी सांगता की, घेऊन जा. त्यानंतर तेथे यंत्रसामुग्री घेऊन गेले. त्यांना ४७ लाख रुपये देण्यात आले तसेच व्याजामध्येदेखील सूट देण्यात आली. तसेच ६८ लाख रुपयांची सूट देऊन एकूण १ कोटी १५ लाख रुपयांची सूट दिली असे समितीने विदित केले असता, यामध्ये ४७ + ६८ असे नाही. ४७ लाख रुपयांच्या ऐवजी ६८ लाख रुपये झालेले असतील असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

याचे अकाउंटस् पाहून घ्या. विभागाने ४७ लाख रुपयेदेखील सोडले व ६८ लाख रुपयांची देखील कल्पना केली नाही असे समितीने विदित केले असता, नाही. ४७ लाख रुपयांऐवजी ६८ लाख रुपये असे आहे. एकूण ८ कोटी ६८ लाख रुपये होते. निष्क्रीय शुल्काची (Idle Charges) रक्कम १ कोटी ४३ लाख रुपये एवढी होती. विभागाने त्यांच्याकडून ४७ लाख रुपये वेव्ह ऑफ करून घेतले. ४७ लाख रुपये डिस्काउंट घेतले नसते तर ६७ लाख रुपयांचा मुद्दा आला असता. विभाग इएमआय कपात करीत नाही. आता तेरा महिने देयकच आले नाही असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

समिती याबाबत सहमत आहे. समिती तेच म्हणत आहे की, चालू देयकामधून कापायचे असे ठरले होते. विभागाने चालू देयकामधून कापले नाही कारण त्यांनी या पैशातून ही सर्व रचना उभी केली होती. एका बाजूला आपल्या कार्यादेशामध्ये सांगतात की, तेथे काही यंत्रसामुग्री घेऊन जाऊ नका, दुसऱ्या बाजूला सांगतात की, घेऊन जा, तेथे यंत्रसामुग्री घेऊन गेले. त्याचे ४७ लाख रुपये पण त्याला आणखी दिले, व्याजामध्ये सूट दिली ६८ लाख रुपयेची आणखी सूट दिली. असे करून विभागाने त्याला १,१५,००,००० रुपयांची सूट दिली. अकाऊंट बघून घ्यावे. ४७ लाख रुपये पण सोडले आणि ६८ लाख रुपयेची कल्पना केलेली नाही अशी विचारणा समितीने केली असता, ४७+६७ अशी नाही तर ती ४७ च्या ऐवजी ६८ झाली. ४७ लाखच्या ऐवजी ६८ लाख झाले असते. लोकसंख्यावाढ ८.६८ लाख होते. त्यांनी निष्क्रीय शुल्काची (Idle Charges) रक्कम काढली होती. ती १,४३,००,००० रुपये इतकी होती. त्यांच्याकडून व्हिव ऑफ ४७ लाखाचा करून घेतला होता. ४७ लाख डिस्काऊंट घेतला होता. डिस्काऊंट घेतला असता तर हे ६७ लाख इश्यू झाले असते असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

विभागाने त्यांच्याकडून ९.३५ लाख रुपये वसूल केले, ४७ लाख रुपये वेव्ह ऑफ केले. एकूण ९.८३ लक्ष रुपयांची वसूली विभागाने दाखविलेली आहे. ही वसूली ९.८३ लाख रुपयांची विभागाची इनिशियली कमिटमेंट आहे, त्याप्रमाणे ती पूर्ण झालेली आहे. ६८ लाख रुपयांच्या जे व्याजाचे ओव्हरसाईट केले, हे पैसे घ्यायचेच नाही, कारण आपले आरए बिल झालेले नाही. ६८ लाख रुपये ओव्हरसाईट घेतले, ते जरा तपासून घ्यावे. विभागाकडे सपोर्टिंग माहिती काहीच नाही का ? समितीच्या साक्षीकरिता केवळ उपस्थित राहून उपयोग नाही, मुद्दयांच्या अनुषंगाने समर्पक माहिती देणे अपेक्षित आहे. ८,१४,१३,४०५ रुपये डिसेंबर, २०११ मध्ये भरलेले आहेत. बाकीचे उरलेले पैसे आधी भरले होते, असे करून विभागाने ०९,३५,३१,८८० रुपये भरून घेतलेले आहेत. ते सर्व रोखीने भरलेले आहेत. ४७ लाख रुपये विभागाची ॲडजस्टमेंट झाली, असे ९.८३ कोटी रुपये वसूल झालेले आहेत. ९.८३ कोटी रुपये क्रेडिट केले. त्या ०८,१४,१३,४०५ रुपयांवरील कोणत्याही व्याजाची वसूली विभागाने केलेली नाही असे समितीने विदित केले असता, हे प्रोजेक्ट एक्स्ट्रॉ असून यामध्ये राज्याचा इंटरेस्ट इन्व्हॉल्व्ह नव्हता, या विषयाबद्दल कोणतेही भाष्य केले नाही. कोणतीही वेव्ह ऑफ मागितली नाही. ज्याप्रमाणे आपण ४७ लाख रुपयांबद्दल सांगितले, मशिनरीजचे जस्टीफिकेशन सांगितले. आपण तर आतापर्यंत ही कॅल्क्यूलेशन करू शकले नाही की ६८ लाख रुपये आपल्याला देत होते, ते आपण सोडलेले आहेत. १८ महिने एकही हप्ता घेतलेला नाही. ६८ लाख रुपयांच्या राजस्वाची हानी कॅल्क्यूलेशनप्रमाणे झालेली आहे. महालेखाकार यांचे कॅल्क्यूलेशन जास्त आहे. आम्ही तुमच्या कॅल्क्यूलेशनप्रमाणे मान्य करून देऊ. याकरिता विभागाला पंधरा दिवस वेळ द्यावा, याचा परत पुन्हा पूर्ण अभ्यास करतो. देय वसुली असेल तर त्याप्रमाणे निर्णय घेण्यात येईल असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

ठीक आहे. समिती याबाबत सहमत आहे. विभागाने एकदा ६८ लाखांचे जे कॅल्क्यूलेशन आहे, महालेखाकार यांच्या बरोबर कॅल्क्यूलेट करून घ्यावे. रिडयूसिंग बॅलन्सचे व्याज लागणार आहे. त्याला आता ८.१४ लाख रुपयांचे व्याज लागेल. रिडयूसिंग बॅलन्सचे व्याज कमी लागेल असे मत समितीने व्यक्त केले असता, याचा अभ्यास करून पंधरा दिवसात निष्कर्षावर येऊ असे विभागाच्या सचिवांनी सांगितले.

सदर महामंडळाच्या अध्यक्षांच्या अधिकारांची माहिती समितीला देण्यात यावी. केवळ एप्रिल, २०१८ मध्ये किरकोळ काम पूर्ण करणे अपेक्षित आहे असे यामध्ये दिलेले आहे. एप्रिल, २०१८ संपत आहे. या कामांची सद्यस्थिती काय आहे? ११ पुलांचे बांधकाम प्रस्तावित आहे, ते कधी पूर्ण होणार? व्याजाच्या परिगणनेबाबत विभागाची काय भुमिका आहे? अशी विचारणा समितीने केली असता, त्याच्यामध्ये काही कामे अपूर्ण आहेत किंवा त्याचे जे गँटरींग क्रेन आहे, त्याचे थोडेसे काम राहिलेले आहे, परंतु त्याच्या बुडित क्षेत्रातील ज्या जमिनी आहेत. त्या जमिनीचे संपादन काही प्रमाणात राहिलेले आहे. काही बुडित क्षेत्रामुळे काम राहिलेले आहे. ही कामे जून पर्यंत पूर्ण होणार आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदरहू परिच्छेद प्रकरणी शासनाचे मत आहे की, १.१५ कोटी रुपये व्याजाची रक्कम होते. महालेखाकारांनी २.४४ कोटी रुपये रक्कमचक्रवाढ व्याज पद्धतीने गणना करून काढली आहे. आकारलेला व्याज दर किती होता ? २ वर्षांच्या चक्रवाढ व्याज रकमेने दुप्पट फरक पडत नाही. विभागीय अधिकाऱ्यांनी काढलेली व्याज दराची रक्कम तपासून घेण्याची गरज आहे. महालेखाकार यांनी २.४४ कोटी रुपये एवढी रक्कम वसूल करणे आवश्यक आहे, असे नमूद केले आहे. विभागाचे म्हणणे आहे की, सरळ व्याज पद्धतीने १.१५ कोटी रुपये रक्कम वसूल करणे आहे. सदरहू व्याजाची गणना कशा पद्धतीने गणना केली, याबाबत समितीला अवगत करण्यास सांगितले असता, कंत्राटदारास ८.६८ कोटी रुपये रक्कम ॲडव्हान्समध्ये माहे डिसेंबर, २००८ ते माहे जानेवारी, २००९ या कालावधीच्या दरम्यान दिली होती. सामंजस्य करार करण्यापूर्वी विभागीय अधिकाऱ्यांनी बँकेला पत्र पाठवून विनंती केली होती की, इंटरेस्ट + मूळ रक्कम यांचे हप्ते पाडून द्यावेत. त्यांनी हप्ते पाडून दिल्यानंतर सामंजस्य कराराचा भाग करून सामंजस्य करार करण्यात आला. त्याचा अभ्यास केला तर सदरहू हप्ते सरळ व्याज दराप्रमाणे होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

व्याजाचादर किती आहे, सरळ व्याज ३ महिन्यांनुसार आकारण्यात आले की १२ महिन्यानुसार आकारण्यात आले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, बँकेने इएमआयचे हप्ते पाडून दिले होते तो सामंजस्य कराराचा भाग होता. व्याज दर १२.५ टक्के दराने आकारण्यात आला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२ वर्षाचे सरळ व्याज गृहीत धरले तरी वसुलीची रक्कम १.१५ कोटी रुपये येत नाही. ८ कोटी रुपयांचे सरळ व्याज किती होते ? अशी विचारणा समितीने केली असता, १.१५ कोटी रुपये सरळ व्याज होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

८ कोटी रुपये रकमेवर १२.५ टक्के दराने वार्षिक व्याजाची रक्कम १ कोटी रुपये होते असे समितीने निदर्शनास आणले.

८.६८ कोटी रुपये रक्कम ॲडव्हान्स देण्यात आली होती. त्यावर १.१५ कोटी रुपये व्याजाची गणना इएमआयनुसार केली आहे. १२.५ टक्क्यानुसार दरमहा रिड्युसिंग बॅलन्सवर व्याज आकारावे लागत होते. त्यानुसार १.२१ लाख रुपये याप्रमाणे ४ हप्ते वसूल करण्यात आले. त्यानंतर २० हप्त्यांची रक्कम कंत्राटदाराने अदा केली नाही. शेवटी १.१५ कोटी रुपये व्याज दराची रक्कम एक रकमी भरुन सेटलमेंट केली. अशी माहिती त्यावेळी विभागाने दिली होती. परंतु कंत्राटदाराकडून २० हप्त्यांचे व्याज वसूल करणे आवश्यक होते. विभागाने उत्तरामध्ये नमूद केले आहे की, काम बंद असल्यामुळे चालु देयकातून रक्कम कपात करणे शक्य झाले नाही परंतु काम सुरू झाल्यानंतर रक्कम कपात करण्यात आली. विलंब झालेल्या इएमआयचे व्याज वसूल केले पाहिजे, असा समितीचा मुद्दा आहे. याबाबत महालेखाकार कार्यालय व विभागाची भूमिका विचारण्यात येईल व त्यावर चर्चा करण्यात येईल असे मत समितीने व्यक्त केले असता, दिनांक २५ ऑगस्ट, २००९ रोजी कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. त्यानंतर एक आठवड्याच्या आत दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ रोजी काम बंद करण्याचे आदेश देण्यात आले. उक्त आदेशानुसार दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ ते दिनांक १५ नोव्हेंबर, २०१० या १५ महिन्यांच्या कालावधीमध्ये काम बंद ठेवण्यात आले. त्यानंतर दिनांक १६ नोव्हेंबर, २०१० रोजी काम सुरू करण्याचे आदेश देण्यात आले होते. काम बंद असलेल्या १५ महिन्यांच्या कालावधीत कंत्राटदाराने कोणतेही काम केले नसल्याने एक देयक अदा करण्यात आले नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सन २००९ मध्ये कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. त्यानंतर काही काम करण्यात आले होते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, कार्यारंभ आदेश व काम बंद करण्याचे आदेश यामध्ये केवळ ६ दिवसांचा कालावधी होता असे विभागीय सचिवांनी सांगितले.

उक्त काम सुरू करण्यास पुन्हा केव्हा कार्यारंभ आदेश देण्यात आला ? अशी विचारणा समितीने केली असता, दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ ते दिनांक १५ नोव्हेंबर, २०१० या १५ महिन्यांच्या कालावधीमध्ये काम बंद ठेवण्यात आले. त्यानंतर दिनांक १६ नोव्हेंबर, २०१० रोजी काम सुरू करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानंतर काम सुरू करण्यात आले. कंत्राटदारास ८.६८ कोटी रुपये ॲडव्हान्स रक्कम प्रदान करण्यात आली होती त्याच्या काम बंद असलेल्या १५ महिन्यांच्या कालावधीतील व्याजाची रक्कम १.१५ कोटी रुपये झाली होती. ४७ लाख रुपये रक्कम आयडल मिसिंगली चार्जेसमध्ये ॲडजस्ट करण्यात आली. सदरहू रक्कम वजा जाता ८.६८ कोटी रुपये + १.१५ कोटी रुपये व्याज - ४४ लाख रुपये = ९.३५ कोटी रुपये रक्कम १०० टक्के वसूल करण्यात आली आहे. समितीचे मत आहे की, ६७.५ लाख रुपये वसूल केले पाहिजे. त्यासंदर्भात बैठक घेऊन सविस्तर आढावा घेतला आहे. सदरहू चूक मान्य असून उक्त रक्कम वसूल करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागामुळे काम १६ महिने बंद होते ही नवीन परिस्थिती आता समितीला माहिती झाली आहे. माहे नोव्हेंबर, २०१० मध्ये काम करण्यास परवानगी दिली व कंत्राटदाराने सन २०११ मध्ये वसूलीची रक्कम अदा केली आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१० रोजी काम सुरू करण्याचे आदेश देण्यात आले होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

दिनांक १५ नोव्हेंबर, २०१० रोजी नंतर कंत्राटदाराने माहे डिसेंबर, २०११ रोजी वसूलीची रक्कम अदा केली आहे. सदरहू काम सुरू झाल्यानंतरच्या १० ते १३ महिन्यांच्या कालावधीतील व्याजाची रक्कम वसूल केली पाहिजे. विभागाने उत्तरामध्ये नमूद केले आहे की, सदरहू रक्कम वसूल करता कामा नये. १२ ते १३ महिने काम विभागाच्या आदेशामुळे बंद होते त्यामुळे कंत्राटदाराने हप्त्यांची रक्कम अदा केली नसेल. एमओयूमध्ये काय नमूद केले आहे अशी विचारणा समितीने केली असता, प्रत्येक प्रकल्पामध्ये चालू देयकामधून कपात करण्यात येते. एखाद्या प्रकल्पामध्ये वसुली होतच नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीने ६७ लाख रुपयांची रक्कम निश्चित केली आहे. महालेखापालांनी निश्चित केलेली रक्कम वेगळी आहे, त्यामुळे महालेखाकाराबरोबर बैठक करून घ्यावी असे समितीने सूचित केले असता, २०११ पासून कंत्राटदाराचे आठ कोटी रुपयांचे डिपॉझिट विभागाकडे पडून आहे. ९९ टक्के काम झाले आहे. अशी शक्यता नाकारता येत नाही की, विभागाने वसुली केली तर आठ कोटी रुपयांवर व्याजाची मागणी ते करु शकतील कारण त्यांच्या डिपॉज़्झीटची रक्कम अद्याप दिलेली नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

डिपॉझिट ठेवणे हा विभागाचा अधिकार आहे. १०० टक्के काम पूर्ण झाल्यावर विभाग डिपॉझिटची रक्कम परत करीत असते. He cannot demand interest on deposit. असे असेल तर राज्यभरात विभागाच्या सर्व कामांसाठी ठेवण्यात आलेल्या डिपॉझिट रकमेवर ही पद्धत लागू होईल. ही बाब समितीने निदर्शनास आणली.

६७.६४ लाख रुपयांची वसूली कंत्राटदाराकडून करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले. (विभागाकडून उपरोक्त परिच्छेदा संदर्भात प्राप्त झालेली आश्वासित माहिती **(विवरण पत्र क्र. २ वर).**

अभिप्राय व शिफारशी

परिच्छेद क्र. ३.३ "मध्यम सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यास गैरवाजवी विलंब"

अभिप्राय

६.१ जलसंपदा विभागाने नंदूरबार जिल्ह्यातील तालुका नवापूर येथे नागन नदीवर रु. ७.०९ कोटीच्या अंदाजित किंमतीवर मध्यम सिंचन प्रकल्पास जो चार वर्षाच्या कालावधीत पूर्ण करावयाचा होता, त्यास प्रशासकीय मान्यता सन १९८४ मध्ये प्रदान केली. या प्रकल्पाचा उद्देश २३.६२ दशलक्ष घनमीटर प्रत्यक्ष जलसाठा क्षमतेसह एकूण २६.४८ दशलक्ष घनमीटर जलसाठा क्षमता निर्माण करणे असा होता. वितरीका, लघु आणि उपलघु यांचेसह आठ कि. मी. उजव्या कालव्याच्या आणि १४.१० कि. मी. डाव्या कालव्याच्या माध्यमातून प्रत्यक्ष जलसाठ्यातून २४८६ हेक्टर जमीन सिंचित करावयाची होती. नवापूर लाभक्षेत्रातील आदिवासी लोकांना या प्रकल्पाच्या माध्यमातून लाभ पुरवून त्यांचे राहणीमान उंचावणे अपेक्षित होते. परंतु प्रकल्पाच्या कार्यान्वयनात बेसुमार विलंब, कामाच्या व्याप्तीत बदल भुसंपादनात विलंब इत्यादी कारणांमुळे प्रकल्पाची किंमत जून, १९९८ मध्ये रु. ४९.५४ कोटी आणि पुन्हा जुलै, २००८ मध्ये रु. ९२.६२ कोटीवर वाढविण्यात आली. मार्च, २०१५ अखेर या प्रकल्पावर रु. ८१.१९ कोटी खर्च करण्यात आला होता.

धरणाच्या कामांकरिता ३९८.०१ हेक्टर जमिनीची आवश्यकता होती. परंतु धरणाचे काम जरी १९९० मध्ये सुरू झाले होते तरी भूसंपादन प्रक्रियेतील विलंब आणि प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राखालील दोन गावातील लोकांच्या पुनर्वसनास झालेला आणखी विलंब जे सन २००७ पर्यंत पूर्ण करण्यात आले. यामुळे निष्पादन अपेक्षित गतीने होऊ शकले नाही. एप्रिल, २०१५ अखेर धरणाचे काम ९८ टक्के आणि द्वार उभारणीचे काम ५८ टक्के पूर्ण करण्यात आले. परिणामी २०१२-२०१३, २०१३-२०१४ आणि २०१४-२०१५ मध्ये अनुक्रमे ५.९० दलघमी, ६.२५ दलघमी आणि ६.७७ दलघमी इतकाच प्रत्यक्ष जलसाठा होवू शकला.

धुळे मध्यम प्रकल्प विभाग क्र. २, नंदूरबार आणि भूधारक यांच्यातील जमीन किंमतीच्या देकाराबाबतच्या वादामुळे दोन कालव्यांच्या (डावा आणि उजवा कालवा) एकूण लांबी २२.१० कि. मी. निष्पादनासाठी लागणारी १३६.६८ हेक्टर जमीनीपैकी फक्त १३.८१ हेक्टर (१० टक्के) जमीन संपादित करता आली. विभागाने १४ कि. मी. पर्यंतच्या डाव्या आणि उजव्या कालव्याचे काम एकूण रु. १२.९१ कोटी किंमतीवर बहाल केले. (फेब्रुवारी २००९ आणि मार्च २०१४). तथापि, मार्च २०१५ पर्यंत फक्त २.५ कि. मी. चे कालव्याचे काम रु. २.३८ कोटी रक्कम खर्चून पूर्ण करण्यात आले होते. १३८ घरे असलेल्या दोन गावांचा फक्त २५ टक्के भाग बुडीत क्षेत्राखाली येत होता. २००७ पर्यंत येथील लोकांचे पुनर्वसन करण्यात आले. तथापि, त्या दोन गावांच्या उर्वरित लोकांनी (बुडीत क्षेत्रात येत नसलेले लोक) धरणाच्या बांधकामास आणि द्वार उभारणीस प्रतिकार केला आणि त्यांच्या पुनर्वसनाची मागणी केली. परिणामी, धरणाचे काम आणि द्वार उभरणीस विलंब झाला. कालव्याच्या कामांबाबत विभागाने देऊ केलेल्या दरांशी भूधारक सहमत नसल्याने जमीन संपादित करता येवू शकली नाही.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तिका, १९८४ च्या नियम २५१ नुसार संबंधित नागरी अधिकाऱ्याने जमिनीबाबतचा पुर्ण ताबा घेतल्याशिवाय त्या जमिनीवर कोणतेही काम सुरू करु नये. तसेच जेथे कामाच्या निविदा स्वीकारण्यात आल्या आहेत परंतु त्या कामासाठी लागणारी जमिन संपादित करण्यात आली नसेल तर काम सुरू करावयाचे आदेश जारी करण्यापुर्वी जमीन संपादनासाठी लागणारा कालावधी जिल्हाधिकाऱ्यांकडून निश्चित करून घ्यावयास पाहिजे. परंतु या प्रकरणी तसे करण्यात आले नाही. या प्रकल्पास सन १९८४ मध्ये मान्यता देण्यात आली. परंतु प्रत्यक्षात या कामाची सुरूवात सन १९९० मध्ये निविदा काढून करण्यात आली. भूसंपादनाची प्रक्रिया सन १९८८ ते १९९३ या कालावधीत करण्यात आली. सन २००६ पूर्वी सरळ खरेदी अस्तित्वात नव्हती. पूर्वी संमतीपत्राने जमीन ताब्यात घेण्यात येत असे. त्यानुसार नागन मध्यम या प्रकल्पासाठीची जमीन शासनाच्या ताब्यामध्ये होती असे गृहीत धरुन सदर जमिनीचा भाडेपट्टा दिलेला होता. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जमिनीचे निश्चितीकरण करणे बंधनकारक असताना सदरहू जमिनीचा ताबा तत्कालिन जिल्हाधिकारी यांच्याकडे असल्याचा पुरावा समितीला सादर करण्यात यावा अशी समितीने सूचना करूनही अद्यापही माहिती समितीला सादर करण्यात आली नाही. परिणामी विभागाने प्रकल्पासाठी जमीन कधी संपादित केली याबाबत स्पष्टता नाही. यावर सन १९९३ पर्यत धरणाच्या बुडीत क्षेत्रासाठी लागणारी जमीन शासनाच्या ताब्यात होती. परंतु सन १९९७ मध्ये काम सुरू असताना त्याठिकाणची दोन गावे जी केवळ २५ टक्के म्हणजे अंशत: बुडीत क्षेत्रात येत होती त्यांनी संपूर्ण गावाचे पुनर्वसन करण्याची मागणी केली. परंतु तत्कालिन नियमांप्रमाणे असे पुनर्वसन करणे शक्य नव्हते. परिणामी स्थानिक लोकांनी कंत्राटदाराच्या मशिन्स पेटवून दिल्या त्यामुळे सन १९९७ ते सन २००७ पर्यंत काम बंद होते. सन २००७ मध्ये घळभरणीचे काम पूर्ण करण्यात आले असे समितीसमोर सांगण्यात आले. त्यानंतर कालव्याच्या कामासाठी लागणाऱ्या जमिनीची संयुक्त मोजनी सन २००८ मध्ये करण्यात आली. तथापि, सरळ खरेदीने जमीन घेण्याचे आदेश व त्यात आदिवासी प्रकल्पग्रस्तांची जमीन असल्याने आदिवासी शेतकऱ्यांची जमिन खाजगी वाटाघाटीने खरेदी करणेची परवानगी महसूल व वन विभागाचे परिपत्रक क्र. आदिवासी/३१-अ/०९/५१५, पत्र क्र. १९६३/एल-९, दि. १७/७/२००९ अन्वये मिळाली. दरम्यानच्या काळात शासकीय दराच्या तुलनेत बाजारभावाच्या जमिनीच्या दरात वाढ झाल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी जमीन देण्यास विरोध केला. तद्नंतर सन २०१२-१३ मध्ये शासनाच्या जमिनीच्या दरात वाढ झाल्यामुळे काही शेतकरी जमिनीचा मोबदला घेणेस तयार झाले. त्यानंतर १३.८१ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. परंतु पुन्हा प्रकल्पग्रस्तांनी हे काम सन २००८ मध्ये बंद पाडले ते सन २०१२ पर्यंत बंद होते.

डावा व उजवा कालव्यासाठी लागणाऱ्या एकूण १३६. ६८ हेक्टर जमिनीपैकी सद्य:स्थितीत डावा कालवा कि. मी. १ साठी २.९१ हेक्टर व उजवा कालवा कि. मी. ते ४ कि. मी. साठी १०.९० हेक्टर असे एकूण १३.८१ हेक्टर संपादित केले. तसेच मा. जिल्हाधिकारी यांच्याकडून उजव्या कालव्यासाठी उर्वरित ते ४ साठी ३.४२ हेक्टर क्षेत्रास खाजगी वाटाघाटीने खरेदी करण्याची परवानगी मिळालेली असून जमीन खरेदी करण्याची कार्यवाही प्रगतीत असल्याचे विभागाने समितीसमोर स्पष्ट केले. तसेच उपरोक्त परिस्थितीत शेतकऱ्यांचा विरोध लक्षात घेता डावा कालवा पी. डी. एन (पाईप लाईन डिस्ट्रीब्युशन) नुसार करण्याचा शासनाने निर्णय घेतला. त्यामुळे यासाठी जमीन संपादनाची आता आवश्यकता नाही व उजव्या कालव्यासाठी ३७ हेक्टर जमीनीचे प्रस्ताव तयार करण्यात आले असून चार कि. मी. पर्यंतचे काम सुरू झाले आहे. प्रकल्प पुर्ण करण्यास लागलेल्या विलंबाची कारणे ही भूसंपादन नसून पुरेशी निधीची अनुपलब्धता,

त्यानुसार घटकांचे टप्प्यांचे काम टप्प्याटप्प्याने घेणे क्रमःप्राप्त ठरले. वेळोवेळी बदलेली भूसंपादन प्रक्रिया, प्रकल्पग्रस्तांचा विरोध इ. अनेक कारणांमुळे हा विलंब झाल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

शिफारशी

६.२ (१) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तिका, १९८४ च्या नियम २५१ नुसार संबंधित नागरी अधिकाऱ्याने जमिनीबाबतचा पूर्ण ताबा घेतल्याशिवाय त्या जमिनीवर कोणतेही काम सुरू करू नये. तसेच जेथे कामाच्या निविदा स्वीकारण्यात आल्या आहेत परंतु त्या कामासाठी लागणारी जमीन अद्याप संपादित करण्यात आली नसेल तर काम सुरू करावयाचे आदेश जारी करण्यापूर्वी जमीन संपादनासाठी लागणारा कालावधी जिल्हाधिकाऱ्यांकडून निश्चित करून घ्यावयास पाहिजे. परंतु धुळे मध्यम प्रकल्प विभाग क्र. २, नंदूरबार यांनी मुख्य घटकांकरिता (धरण आणि कालवे) जमिनीच्या उपलब्धतेची खात्री न करता मध्यम सिंचन प्रकल्पाची सुरूवात केली जे महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तिकेच्या तरतूदींच्या विरुद्ध होते. तसेच जो प्रकल्प चार वर्षात रु. ७.०९ कोटी अंदाजित किंमतीवर पूर्ण करावयाचा होता तो २७ वर्षाचा कालावधी लोटल्यानंतरही आणि रु. ८१.१९ कोटी खर्चूनही पूर्ण करण्यात येऊ शकला नाही. महत्वाचे असे की नवापूर तालुक्यातील आदिवासी लोक जे या प्रकल्पाचे मुख्य लाभार्थी म्हणून अपेक्षित होते ते सुद्धा उद्देशित लाभापासून वंचित राहिले. नागन मध्यम प्रकल्प पूर्ण करण्यास अमर्याद विलंब झाला आहे. हा प्रकल्प नंदूरबार जिल्ह्यामध्ये नवापूर तालुक्यामधील आहे. या प्रकल्पास सन १९८४ मध्ये मान्यता मिळालेली होती. त्यानंतर ९२ कोटी रुपयांची वित्तीय सुधारित प्रशासकीय मान्यता सन २००८ ला देण्यात आलेली आहे. या प्रकल्पाची पाणी साठवण क्षमता २६.४८ दलघमी असून सन २०१५ ला २६.४८ दलघमी पाणी साठा झालेला आहे. या धरणाचे सिंचन क्षेत्र हे २४८६ हेक्टर असून या धरणाला डावा आणि उजवा असे दोन कालवे आहेत. या धरणाला प्रथम प्रशासकीय मान्यता सन १९८४ मध्ये मिळाली असली तरी प्रत्यक्षात या कामाची सुरूवात सन १९९० मध्ये निविदा काढून करण्यात आलेली आहे. भूसंपादन न करता निविदा काढण्यात आलेली आहे, असा आक्षेप यामध्ये घेण्यात आलेला होता. या प्रकरणामध्ये सन १९९७ मध्ये काम सुरू असताना त्या ठिकाणची दोन गावे अंशतः २५ टक्के बुडीत होत असताना त्या गावांचे संपूर्ण पुनर्वसन करण्यात यावे अशी तेथील स्थानिक रहिवाशांनी मागणी केली. परंतु तत्कालीन नियमांप्रमाणे अशा प्रकारचे पुनर्वसन करता येणे शक्य नव्हते. म्हणून स्थानिक लोकांनी धरणाचे काम करणाऱ्या कंत्राटदाराच्या मशिन्स पेटवून दिल्या होत्या. त्यामुळे सन १९९७ पासून ते सन २००७ पर्यंत सदर काम बंद होते. त्यानंतर सदर धरणामध्ये अंशतः पाणीसाठा उपलब्ध झाला होता. सन २०१५ मध्ये सदरहू धरणामध्ये संपूर्ण पाणीसाठा उपलब्ध झालेला आहे. आता धरणाचे काम पूर्ण झालेले असून कालव्याचे काम सुरू आहे. कालव्याचे काम करण्यासाठी ५१४ हेक्टर जमीनीची आवश्यकता आहे. त्यापैकी ३९० हेक्टर जमीन शासनाने ताब्यामध्ये घेतलेली आहे. उर्वरित १२४ हेक्टर जमीनीपैकी उजव्या कालव्यासाठी ३७ हेक्टर आणि डाव्या कालव्यासाठी ८५ हेक्टर जमीन लागत आहे. शेतकऱ्यांचा विरोध लक्षात घेवून डावा कालवा हा पाईपलाईन डिस्ट्रीब्युशन (पी. डी. एन.) पद्धतीने करण्यात येत असल्यामुळे सदर जमीन ताब्यात घेण्याची आता आवश्यकता नाही. परंतू उजव्या कालव्याचे ३७ हेक्टर जमीनीचे अधिग्रहण प्रस्ताव तयार करण्यात आलेले असून चार किमी पर्यंतचे काम सुरू झालेले आहे. या माध्यमातून सिंचनाचा फायदा शेतकऱ्यांना देऊन २०० हेक्टर पर्यंत पाणी देण्यात आले आहे. या प्रकल्पाच्या कालव्याचे काम सन २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. सन २०१९ पुर्वी जमिनीचे अधिग्रहण पूर्ण होणे आवश्यक असून सदर प्रकरणी विभागाने जमीन अधिग्रहणाची कार्यवाही करावी. तसेच गत २७ वर्षापासून धरणाच्या कालव्याचे काम पूर्ण झालेले नाही यास विभागाच्या स्तरावरील नियोजनाचा अभावदेखील कारणीभूत असल्याचे स्पष्ट होते. डाव्या कालव्यासाठी आवश्यक असलेल्या जमीन भूसंपादन करण्यास स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध लक्षात घेवून शासनाने पाईपलाईन डिस्ट्रीब्युशन (पी.डी.एन.) धोरण राबविण्याचा निर्णय घेतला याच धर्तीवर उजवा कालवा सुद्धा पूर्ण करणे आवश्यक होते तसेच पाईपलाईन डिस्ट्रीब्युशन (पी.डी.एन.) धोरण राबविण्याचा निर्णय विभागाने उशिराने घेतल्याने अद्याप डाव्या कालव्याच्या कामास सुरूवात झाली नाही. परिणामी या प्रकल्पाची किंमत सुद्धा वाढली आहे. धरणापूर्वी कालव्याची प्रक्रीया देखील सुरू करणे गरजेचे होते तसे न केल्याने यामध्ये निश्चितच विभागाचे ढिसाळ नियोजन दिसून आले. धरण आणि कालवे यासाठी जमीन उपलब्धतेची खात्री न करता प्रकल्प सुरू करण्यात आले जे महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तिकेच्या तरतूदींच्या विरुद्ध आहे. याशिवाय जो प्रकल्प चार वर्षात पूर्ण होणे अपेक्षित होते तो प्रकल्प मार्च, २०१५ पर्यंत २७ वर्षांचा दिर्घावधी लोटल्यानंतरही आणि रु ८१.१९ कोटी खर्चूनही पूर्ण करण्यात आला नाही ही गंभीर बाब असून नवापूर तालुक्यातील आदिवासी लोक गत २७ वर्षांपासून या प्रकल्पाच्या अपेक्षित लाभापासून वंचित राहिले आहे. त्यामुळे प्रकल्पास विलंब करणाऱ्या व योग्यरित्या नियोजन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच पुर्वी अधिग्रहीत ३९० हेक्टर जागेची पी. डी. एन. प्रणाली डाव्या कालव्यासाठी लागू केली. त्या जागेचा वापर कालव्यासाठी व्हावा याची काळजी घ्यावी.

६.३ (२) गत २७ वर्षांपासून या कालव्यांचे काम अद्यापही पूर्ण होऊ शकले नाही. अंतिमतः डाव्या कालव्यासाठी पाईपलाईन डिस्ट्रीब्युशनद्वारे पाणी वितरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. उजव्या कालव्यासाठी ३७ हेक्टरच्या जमिनीचे प्रस्ताव पाठविण्यात आलेले असून त्यापैकी १५ हेक्टरचे प्रस्ताव अंतिम टप्प्यामध्ये आहेत. सन २००६ पासून ते सन २०१८ पर्यंत हा विभाग धरणाच्या कालव्याचे काम पूर्ण करु शकला नाही. अद्यापही त्या जागेच्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. यावरुन विभागाचे ढिसाळ नियोजन दिसून येते. विभागाने जमिनीचे यथायोग्य नियोजन केले नसल्यामुळे काम वेळेवर झाले नाही. कालव्याच्या कामासाठी लागणाऱ्या जमिनीचे भूसंपादन करताना स्थानिक शेतकऱ्यांकडून जो विरोध झाला तो समितीला मान्य आहे परंतु त्यावर तातडीने पर्याय शोधणे व समन्वयाने तोडगा काढणे आवश्यक होते. कारण धरण बांधतेवेळीच पुढच्या कालखंडामध्ये कालव्याची व्यवस्था करण्याबाबतही विचार व नियोजन करण्याची आवश्यक आहे. विभागाकडून फक्त धरण बांधण्याचे काम झाले. कालव्याबाबतची काळजी घेतली गेलीच नाही, त्यामुळे पाणी साठवून देखील उपयोग झाला नाही व याचा लाभ शेतकऱ्यांना होऊ शकला नाही. रु. ७ कोटी किंमतीच्या प्रकल्पावर रु. ८६ कोटी खर्च झाल्यानंतरही तो पुर्ण झाला नसून अद्यापही पाईपलाईनकरिता रु. २९ कोटी रुपयांची मागणी आहे. पाईपलाईनकरिता रु. १७ कोटी व पुढच्या उर्वरित कामाकरिता रु. १२ कोटी अशाप्रकारे विभागाला एकूण २९ कोटी रुपये अधिक लागणार आहे. तसेच आतापर्यंत खर्च झालेले रु. ८६ कोटी असे एकूण रु. ११५ कोटी रुपयांचा

हा अंदाजित प्रकल्प आहे. विभागाने जागेचे अधिग्रहन व नियोजन न करता प्रकल्प हाती घेतला. रु. ७ कोटीच्या प्रकल्पाची किंमत रु. ११५ कोटीवर गेलेली आहे. प्रकल्प पुर्ण होईपर्यंत त्याची किंमत जागेच्या अधिग्रहणाचा मोबदला धरुन अजून किती वाढेल याची खात्री नाही. उजवा कालवा जून, २०१८ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता असून डावा कालवा जून, २०१९ पर्यंत पूर्ण होईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. अतः हा प्रकल्प पूर्ण होण्यास येणाऱ्या अडचणी व अडथळे तात्काळ दूर करून आवश्यक निधीची तरतूद करून हे काम तात्काळ पुर्ण करण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. ३.४ "कंत्राटदारास अग्राह्य प्रदान"

अभिप्राय

६.४ अमरावती जिल्ह्यात जून २००५ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या पांढरी मध्यम सिंचन प्रकल्पाचे बांधकाम एका कंत्राटदारास रु. ११९.८४ कोटी किंमतीवर अंदाजित किंमतीच्या ३५ टक्के (रु. ८८.७७ कोटी) अधिक्याने बहाल करण्यात आले व हे काम जानेवारी, २०१३ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. कंत्राटाच्या खंड ३८ नुसार कंत्राटदाराद्वारे निष्पादित अतिरिक्त प्रमाणाची अदायगी निविदा प्रमाणाच्या १२५ टक्के पर्यंत निविदा दराने करावयाची होती आणि १२५ टक्क्यांच्या वर प्रचलित दर अनुसूचीनुसार, निविदा अधिमूल्य किंवा सवलतीच्या टक्केवारीने वाढवून अथवा घटवून अदायगी करावयाची होती. कंत्राटाच्या अनुसूची "ब" नुसार आवरण क्षेत्र तयार करणे आणि त्यावर बंधारा बांधण्यासाठी ७,०५,५०४ घन मीटर काम निष्पादित करावयाचे होते. परंतु, प्रकल्प निष्पादनाच्या वेळी धरणाच्या क्षेत्रामधील वाढ आणि कट-ऑफ खंदकाच्या (COT) अधिक खोलीमुळे, निविदेच्या अनुसूची "ब" मध्ये नमूद विविध बाबींच्या परिमाणात ठळक वाढ झाली आणि वाढीव परिमाणाची अदायगी, विभागाद्वारे कंत्राटाच्या खंड ३८ प्रमाणे करण्यात आली. कंत्राटाच्या खंड ३८ नुसार कंत्राटदारास २१,३१,८८० घनमीटर परिमाणासाठी निविदा दर रु. ११४.०८ प्रति घनमीटरने अदायगी करावयाची होती. परंतु कंत्राटदारास १६,३१,७७३ घनमीटर पर्यंतच्या परिमाणासाठी निविदा दर रु. ११४.०८ प्रति घनमीटर प्रमाणे अदायगी करण्यात आली व त्यापुढे परिमाणासाठी खंड ३८ अंतर्गत चालू दर अनुसूचीप्रमाणे रु ३२१.४२ प्रति घनमीटर दराने अदायगी करण्यात आली. यामुळे कंत्राटदारास रु. १०.३७ कोटीचे अग्राह्य प्रदान करण्यात आले. तसेच, निविदा अटींच्या कलम -१४ मध्ये कंत्राटदाराने सर्व कॉफर (Coffer) धरणांचे नियोजन, बांधकाम आणि देखभाल, प्रवाहाचे वळतीकरण आणि इतर व्यवस्था करावयास पाहिजे जेणेकरून धरणाचे बांधकाम क्षेत्र पाणी विरहित राहील. याशिवाय पूर अथवा अति प्रवाहामुळे वळती केलेले कालवे, कॉफर धरण आणि पाया खड्डे यांना होणाऱ्या हानीस रोखण्यासाठी कंत्राटदाराने स्वतः व्यवस्था करावयास पाहिजे. परंतु विभागाने कंत्राटाच्या तरतुदींविरुद्ध १,३६,८५१ घनमीटर परिमाण कॉफर धरणाच्या निष्पादनासाठी ऑक्टोबर, २०११ मध्ये मंजूर केले आणि त्याप्रमाणे कंत्राटदारास रु ३.२६ कोटी प्रदान केले जे अग्राह्य होते. कार्यकारी अभियंता, अमरावती सिंचन विभाग आणि अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती यांनी उपरोक्त वस्तुस्थिती मान्य केली व पुढील कालावधीत ही वसुली करण्यात येईल असेही महालेखाकारांसमवेत झालेल्या निर्गमन परिषदेत मान्य केले. तथापि, कंत्राटदाराकडून कुठलीही वसुली करण्यात आली नव्हती. अशा प्रकारे विभागाने कंत्राटाच्या खंड ३८ चा वापर चुकीचा केल्यामुळे आणि कंत्राटाच्या खंडाचे पालन न केल्यामुळे कंत्राटदारास रु १३.६३ कोटी अग्राह्य प्रदान करण्यात आले. पांढरी मध्यम सिंचन प्रकल्पासंदर्भात जून २०११ मध्ये कंत्राटदाराला रकमेचे प्रदान झाले व जून, २०१३ मध्ये वसुली झालेली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले असता, ही बाब आक्षेपांच्या माध्यमातून महालेखाकारांनी निदर्शनास आणल्यानंतर ही वसुली सन २०१७ मध्ये झाल्याचे समितीने सांगितले असता, विभागीय प्रतिनिधींनी ही वस्तुस्थिती व चूक मान्य केली. परंतु कंत्राटदाराकडून ही वसुली करण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले तसेच समितीला अशाप्रकारे दिशाभूल करणारी माहिती दिल्याबाबत समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली व संबंधितांवर कारवाई करण्याचेही निदेश दिले.

शिफारशी

६.५ (१) ता. वरुड, जि. अमरावती येथील पांढरी मध्यम प्रकल्पाद्वारे वर्धा नदीवर एक वळण बंधारा बांधून हे पाणी पुढे कालव्यांद्वारे सिंचनासाठी वापरणेचा प्रस्ताव असून यासाठी १७९ कोटी रुपयांची मूळ प्रशासकीय मान्यता दिनांक १५ जून, २००५ रोजी झाली. या प्रकल्पाच्या धरणाचे काम सन २००८ मध्ये सुरू केलेले आहे. अमरावती सिंचन विभागाने कंत्राटाच्या खंड-३८ चा चुकीचा अंमल केल्यामुळे आणि कंत्राटाच्या अटीचे पालन न केल्यामुळे कंत्राटदारास रु. १३. ६३ कोटी अग्राह्य प्रदान केले. कॉफर डॅमचे काम कंत्राटदारालाच करायचे होते. परंतु सदर कामाची रक्कम ठेकेदाराला द्यावयाच्या रक्कमेमध्ये अधिक करून दाखविण्यात आली परिणामी, हे अतिरिक्त प्रदान झाले आहे. सदरहु बाब विभागाच्या निदर्शनास स्वतःहून येणे अभिप्रेत व अपेक्षित होते. विभागांतर्गत स्वतंत्र लेखापरिक्षण व्यवस्था अस्तित्वात असतांना अशा गंभीर बाबी या लेखापरिक्षणात निदर्शनास येऊ शकल्या नाहीत यावरुनच हे अंतर्गत नियंत्रण अत्यंत ढिसाळ व कमकुवत असल्याचे सिद्ध होते. केवळ महालेखाकारांनी लेखापरिक्षण केल्यामुळे या गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत अन्यथा विभागाने याकडे पुर्णतः दुर्लक्ष केले होते. महालेखाकारांच्या आक्षेपानंतर विभागाने रु. १४. १८ कोटी इतकी रक्कम कंत्राटदाराच्या ३४ व्या देयकातून समायोजित केली असून ही वसुली झालेली आहे. परंतु यात दोषी अधिकाऱ्यांवर विभागाने कारणे दाखवा नोटीस बजावण्यापलीकडे कोणतीच कारवाई केली नाही. दरम्यानच्या कालावधीत त्यातील काही अधिकारी सेवानिवृत्तदेखील झाले आहेत ही देखील अतिशय गंभीर बाब आहे. वास्तविकतः याप्रकरणी विभागाने साक्षीपूर्वी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करूनच समितीसमोर साक्षीसाठी येणे अभिप्रेत व आवश्यक होते. परंतु विभागाने केवळ संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. विभागाने याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी तसेच कॉफर डॅमचे अतिरिक्त प्रदानाच्या रकमेचे समायोजन सन २०१३ मध्येच कंत्राटदाराच्या देयकामधून समायोजित केल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. परंतु समितीने यासंदर्भात सखोल छाननी केली असता ही रक्कम सन २०१७ मध्ये समायोजित केल्याचे स्पष्ट झाले व विभागीय प्रतिनिधींनी यात विभागाची चूक झाल्याचे समितीसमोर मान्य केले व संबंधितांवर कारवाई करण्याचेही

समितीला आश्वासित केले. त्याप्रमाणे आवश्यक ती कारवाई तात्काळ करण्यात यावी. तसेच विभागाने फिडर कॅनलचे प्रलंबित कामकाज तात्काळ पूर्ण करावे व भविष्यात राज्यातील सर्व प्रकारच्या धरणांच्या बदलणाऱ्या बांधकामांचे स्वतंत्र तांत्रिक लेखापरीक्षण करणे बंधनकारक करावे व त्यासाठी आवश्यक ती यंत्रणा निर्माण करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

६.६ (२) पांढरी मध्यम सिंचन प्रकल्पाचे काम बंद होते कारण यात पर्यावरणाचा मुद्दा देखील उपस्थित झाला होता. सन १९८६ च्या पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत सन १९९४ मध्ये पहिली अधिसूचना काढण्यात आली. या अधिसूचनेनुसार फक्त मोठया प्रकल्पांनाच पर्यावरणाची मान्यता घेणे अनिवार्य होते. त्यानंतर दिनांक १४ सप्टेंबर, २००६ ला जी अधिसूचना निर्गमित करण्यात आली, त्यानुसार सर्व पाटबंधारे प्रकल्पांना मग तो अल्प पाटबंधारे प्रकल्प असला, तरी सुद्धा त्याला पर्यावरण मंत्रालयाची मान्यता घेणे अनिवार्य करण्यात आले होते. त्यानंतर दिनांक २५.६.२०१४ ला पुन्हा सुधारित अधिसूचना काढण्यात आली, त्यानुसार मध्यम पाटबंधारे प्रकल्प आणि २००० हेक्टरपेक्षा जास्त सिंचन क्षमतेच्या प्रकल्पांना पर्यावरण मंत्रालयाची मान्यता घेणे आवश्यक आहे. केंद्र शासनाने राजपत्रामध्ये असे नमूद केले आहे की, जे प्रकल्प १० हजार हेक्टरपेक्षा अधिक जमिनीवर असतील त्याला परवानगी घेण्यात यावी. मात्र दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नंतर अशी परवानगी घ्यावी लागेल असे त्या राजपत्रात समाविष्ट होते. पांढरी मध्यम सिंचन प्रकल्प दिनांक १४ सप्टेंबर, २००६ पूर्वी सुरू झाला होता. या प्रकल्पाला पर्यावरण मंत्रालयाची मान्यता आवश्यक नव्हती तरीही विभागाने प्रस्तुत प्रकल्पाला पर्यावरण मंत्रालयाची मान्यता घेण्यासाठी अनावश्यक पत्र व्यवहार महाराष्ट्र शासनाकडे केला.

केंद्र शासनाच्या राजपत्रात स्पष्ट उल्लेख असताना विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रकल्पाला विलंब करण्यासाठी वेळकाढूपणाचे धोरण राबविण्याचा निर्णय घेतला त्यावर निधी सुद्धा खर्च झाला व ३ वर्षे प्रकल्पाचे काम थांबले व त्या भागातील शेतकरी शेतीच्या पाण्यापासून वंचित राहिले या सर्वांसाठी जे अधिकारी जबाबदार होते त्यांची चौकशी करून समितीला अहवाल द्यावा असे समितीने निदेश दिले असतांनाही यासंदर्भात विभागाने केलेल्या कारवाईसंबंधीत कोणतीही माहिती समितीस दिली नाही. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे व विभागाने संबंधित अधिकाऱ्यावर तातडीने जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस २ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. ३.५ "कंत्राटदारास गैरवाजवी आर्थिक लाभ

अभिप्राय

६.७ नांदेड जिल्ह्यात गोदावरी नदीवर बळेगाव उच्चस्तरीय बंधाऱ्याचे बांधकाम एका कंत्राटदारास रु. १५८.७८ कोटी किंमतीवर माहे ऑगस्ट, २००९ मध्ये देण्यात येऊन ते माहे ऑगस्ट, २०१३ पर्यंत पुर्ण करावयाचे होते. याच नदीवर बाभळी बंधाऱ्याच्या बांधकामाबाबतचे वाद प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय बळेगाव उच्चस्तरीय बंधाऱ्यांचे बांधकाम सुरू करण्यात येऊ नये व कुठलीही यंत्रसामग्री कार्यस्थळावर आणण्यात येऊ नये असे कंत्राटदारास काम देतेवेळी अवगत करण्यात आले होते. परंतु कंत्राटात तरतूद नसताना तसेच कंत्राटदारास सुसज्जता अग्रीम मंजूर करण्यास राज्य शासनाने (मार्च, २०००) प्रतिबंध लावला असतानाही कंत्राटदारास रु. १६.०० कोटी सुसज्जता अग्रीम मंजूर करण्यात आले, ज्यापैकी रु. ८.६८ कोटी माहे डिसेंबर, २००९ ते मार्च, २०१० दरम्यान तीन हप्त्यात वितरीत करण्यात आले. तसेच कंत्राटदाराकडून माहे फेब्रुवारी, २०१२ पर्यंत व्याजासह रु. ८.६८ कोटी वसुल करणे आवश्यक असताना माहे डिसेंबर, २०१५ पर्यंत सुसज्जता अग्रीमाच्या परिसमापनाच्या नियत तारखेपासून तीन वर्ष आणि दहा महिन्यांचा कालावधी लोटल्यानंतरही रु. १.७७ कोटी वसुली होणे बाकी होते. एवढेच नव्हेतर माहे नोव्हेंबर, २०१० पासून कंत्राटदारास काम सुरू करण्यास संमती देण्यात आली. परंतु काम सुरू केल्यानंतर केवळ एक वर्षातच कंत्राटदाराने कंत्राटाच्या खंड १५ (३) अंतर्गत निष्काम कालावधीकरिता यंत्रसामग्री आणि कामगार खर्चासाठी रु. १.४३ कोटीचा दावा केला. कंत्राटदाराने असेही प्रस्तावित केले की, जर त्याचा निष्क्रीय शुल्काचा दावा विचारात घेण्यात येणार नसेल तर कामाची प्रत्यक्ष सुरूवात होण्यापूर्वीच्या कालावधीसाठी सुसज्जता अग्रीमावरील व्याज घटक माफ करण्यात यावे. या प्रकरणी काम सुरूच करण्यात आले नसल्यामुळे कंत्राटाच्या खंड १५ (३) नुसार कंत्राटदार कुठल्याही नुकसान भरपाईच्या दाव्यासाठी पात्र नव्हता. तरीही कंत्राटदारांच्या विनंतीवर रु. ४७.७५ लक्षाचे व्याज माफ केले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

यासंदर्भात विभागाने असा खुलासा केला की, कंत्राटदाराद्वारे दावा करण्यात आलेल्या निष्क्रीय शुल्काच्या दाव्यापेक्षा व्याज घटक कमी होते त्यामुळे व्याज माफ करण्यात आले. अशाप्रकारे कंत्राटदारास रु. ८.६८ कोटी सुसज्जता अग्रीमाची मंजुरी देणे तसेच त्याचा रु. १.४३ कोटीचा निष्क्रीय शुल्काचा दावा स्वीकृत करणे आणि त्यानंतर कंत्राटदार आणि विभाग यांच्यात करण्यात आलेल्या वाटाघाटीतील म्हणजेच व्याज घटकाच्या बदल्यात निष्क्रीय शुल्कमाफी हे केवळ अनियमितच नव्हते तर त्यामुळे रु. ४७.७५ लक्ष व्याजाची सुद्धा कमी वसुली झाली असेही महालेखाकारांनी मत नोंदविलेले आहे.

बळेगाव बंधारा व बाभळी बंधारा अशा दोन बंधाऱ्यांचा समावेश असलेला हा प्रकल्प असून तो महाराष्ट्र व आंध्रप्रदेश (आता तेलंगणा) राज्याच्या सिमेलगत आहे. बळेगाव बंधारा हा बाभळी प्रकल्पाचा एक भाग असून बाभळी प्रकल्पाचे पाणी आंध्रप्रदेशला सोडावे लागल्यामुळे बंधाऱ्याच्या काठावर असलेल्या शेतीला पाणी कमी पडत होते. त्यामुळे बळेगाव बंधाऱ्याची तरतूद करण्यात आली होती. परंतु बाभळी प्रकल्पासंदर्भात आंतरराज्यीय वाद असल्यामुळे त्यास स्थगिती देण्यात आली व हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे बंधाऱ्याचे काम करता आले नव्हते. वास्तविकतः कंत्राट अटी व शर्तीमध्ये सुसज्जता अग्रीम देण्याची तरतूद नव्हती. तथापि, सुसज्जता अग्रीम देणेबाबत शासनस्तरावरुन त्यावेळी कोणतीही बंदी नव्हती. त्यामुळे करारातील अटी शर्तीमध्ये अग्रीमाचा समावेश करण्यास कोणताही प्रतिबंध नव्हता. परंतु ती तरतूद करारात करण्यात आली नाही हे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्यच केले. तरीही कंत्राटदारानी अग्रीम मिळणेबाबत विनंती केली असता सुसज्जता अग्रीम इतकीच रक्कम बँक हमीच्या स्वरुपात घेऊन अग्रीम मंजूर करण्याची शिफारस कार्यकारी अभियंता/अधीक्षक अभियंता/मुख्य अभियंता यांनी कार्यालयीन टिप्पणीत केली व त्यास मा. अध्यक्ष, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांची मान्यता घेऊन अग्रीम मंजूर करण्यात आला. यामागील कारणमिमांसा समितीने विचारली असता महामंडळाने

स्वतः ही रक्कम मुदत ठेवीमध्ये ठेवली असती तर जास्तीत जास्त ९ टक्के दराने व्याज मिळाले असते. परंतु ही रक्कम कंत्राटदारास १२.२५ टक्के दराने दिल्यामुळे शासनाचा फायदाच झालेला आहे. तसेच बाभळी बंधाऱ्याबाबत आंध्रप्रदेश मधील लोकप्रतिनिधींनी व जनतेने तीव्र आंदोलने केली, रास्ता रोको करण्यात आले व नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना अटकही झाली. सदरहु प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित होते. बळेगाव बंधाऱ्याच्या कामाला मा. सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती नव्हती परंतु तो बाभळी प्रकल्पाचाच भाग होता त्यामुळे बळेगाव बंधाऱ्याचे काम सुरू ठेवले असते व ही बाब आंध्रप्रदेश शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयासमोर मांडली असती तर याचा विपरीत परिणाम बाभळी प्रकल्पाच्या प्रकरणावर होऊ नये म्हणून बळेगाव बंधाऱ्याचे कामही थांबलेले होते. परंतु बाभळी बंधाऱ्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिकेचा निकाल कोणत्याही क्षणी लागल्यास महाराष्ट्राच्या वाट्याचे पाणी तत्काळ मिळविण्यासाठी काम सुरू करता यावे व यामध्ये कोणताही हस्तक्षेप वा प्रतिबंध करता येऊ नये म्हणून उपरोक्त विशिष्ट परिस्थिती लक्षात घेता सुसज्जता अग्रीम मंजूर करण्यात आला. तसेच निविदेच्या अनुषंगाने कार्यारंभ आदेशात यंत्रसामुग्री न आणणेबाबत कोणताही उल्लेख नव्हता. परंतु सांकेतांक मंजूर करताना ही अट घालण्यात आली होती असेही विभागाने समितीसमोर विदित केले. तरीही न्यायालयात प्रकरण सुरू असताना न्यायालयीन प्रक्रियेत अडचण निर्माण होऊ नये यासाठी कंत्राटदाराने कार्यस्थळावर कोणतीही यंत्रसामुग्री आणू नये असे आदेशात नमूद असताना न्यायालयाचा निकाल लागलयास तात्काळ काम सुरू करता यावे यासाठी बांधकामाचे ठिकाणी यंत्रसामुग्री व मनुष्यबळ उपलब्ध करून तयार ठेवण्यास कंत्राटदाराला सांगण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात कामास सुरूवात करण्यात आली नव्हती. आंतरराज्य प्रकरणात राज्याच्या हिताचा विचार करता या सर्व बाबी करण्यात आल्या व त्याप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लागल्यानंतर सदर काम तात्काळ सुरू केल्यामुळे राज्याचे हितसंबंध जोपासले गेले व राज्याच्या हिश्याचे पाणी अडविण्यात आले. उपरोक्त पार्श्वभूमी व कंत्राटदाराच्या मागणीवरुन राज्याचे हित लक्षात घेता सुसज्जता अग्रीम रु. ८.६८ कोटी रक्कम मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. परंतु त्या मध्यंतरीच्या दीड वर्षाच्या कामबंद कालावधीकरिता कंत्राटदाराची यंत्रसामुग्री व मनुष्यबळ विनावापर पडून राहिल्यामुळे त्या कालावधीसाठी कंत्राटदाराने रु. १.४३ कोटी रकमेची नुकसान भरपाईची मागणी केली किंवा सदर नुकसान भरपाईच्या मोबदल्यात कंत्राटदारानी घेतलेल्या सुसज्जता अग्रीमावरील कामबंद कालावधीतील व्याज रु. ४७.७५ लक्ष माफ करण्याची विनंती केली. निविदेतील तरतूद, न्यायालयीन घडामोडी, राज्याचे हित, कामावरील प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेता कंत्राटदारास रु. ४७,७५,०००/- रकमेची व्याजाची माफी देण्याचा निर्णय विभागाने घेतला व यात शासनाच्या रु. ९५,३६,७७६/- इतक्या रकमेची बचत झाल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

वास्तविकतः सुसज्जता अग्रीम देण्याची तरतूद करारात नसताना अग्रीम देण्यात आला. याही उपर सुसज्जता अग्रीमासंदर्भात शासनस्तरावर अस्तित्वात असलेल्या नियमांचे व कार्यपद्धतीचे पालन विभागाने करणे बंधनकारक होते व त्याआधारे तीन टप्प्यात दिलेली अग्रीम रक्कम रु. ८.६८ कोटी व त्यावरील व्याज रु. १,१५,०६,८८०/- अशी एकूण रक्कम रु. ९,८३,०६,८८०/- ही रक्कम समान हप्त्यात २४ महिन्यात वसूल करणे आवश्यक होते. परंतु प्रत्यक्ष वसुली रु. ९,३५,३१,८८०/- इतकी करण्यात आली व अग्रीमावरील कामबंद कालावधीतील व्याज रु. ४७.७५ लक्ष कंत्राटदारास माफ करण्यात आले. विनावापर आकार मोबदल्याच्या रु. १.४३ लक्ष/कोटी रुपयांच्या कंत्राटदाराच्या दाव्याच्या बदल्यात वाटाघाटी करून व्याजाची रु. ४७.७५ लक्ष रक्कम माफ करण्यात आली व यात शासनाचा फायदा झालेला असल्याची भूमिका विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितली. निविदेतील कलम १५(३) अनुसार ६० दिवसांपेक्षा जास्त काळ काम बंद राहिल्यास कंत्राटदार रकमेचा दावा करु शकतो व त्यांना ३० दिवसांपेक्षा जास्त कालावधीची रक्कम अनुज्ञेय ठरते. त्यामुळे कंत्राटदाराची सदर मागणी निविदा अटी शर्तीनुसार योग्य ठरते असेही विभागाने विदित केले. परंतु ही अट सुसज्जता अग्रीम न दिल्यास लागू होते. कंत्राटदाराने ही सर्व यंत्रसामग्री स्वखर्चाने ठेवली असती व ती विनावापर पडून राहिली असती तर ही बाब समिती समजू शकते. या प्रकरणी निविदा अटीमध्ये सुसज्जता अग्रीमाचा समावेशच नसताना हा अग्रीम देण्यात आला व त्याच अग्रीमाच्या रकमेतून कंत्राटदाराने ही यंत्रसामुग्री व मनुष्यबळाची व्यवस्था केली. अशा परिस्थितीत कंत्राटदाराने हा खर्च स्वखर्चातून नव्हेतर शासनाच्या अग्रीमाच्या निधीतूनच केलेला असताना त्याला कामबंद कालावधीसाठी विनावापर पडून राहिलेल्या यंत्रसामुग्रीचा दावा अनुज्ञेय ठरु शकत नाही. अग्रीम मंजूर करणे व व्याजही माफ करणे अशामुळे कंत्राटदारास दुहेरी लाभ मिळाला असे समितीचे स्पष्ट निष्कर्ष आहेत. बाभळी धरणासंदर्भात अस्तित्त्वात असलेला आंतरराज्यीय वाद, त्याअनुषंगाने उद्‌भवलेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती, यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेले दावे ही सर्व अपवादात्मक परिस्थिती पाहता या प्रकरणावर विपरीत परिणाम होऊन शासनाचे कोणतेही नुकसान होणार नाही यादृष्टीने ऐनवेळी विभागास विशिष्ट परिस्थिती पाहता काही महत्त्वाचे निर्णय घेणे अपरिहार्य ठरले याबाबत समितीचे कोणतेही दुमत नाही. परंतु अशा अपवादात्मक परिस्थितीचा आधार घेऊन निविदा अटी शर्तीचे उल्लंघन करून कंत्राटदारास दुहेरी लाभ देण्याच्या कृतीचे विभाग अशाप्रकारे समर्थन करु शकत नाही.

महालेखाकार यांच्या आक्षेपानुसार कंत्राटदाराकडून मुद्दल रु. ८.६९ कोटी व व्याज रु. २.४४ कोटी असे एकूण रु. ११.१२ कोटी वसुल करणे आवश्यक होते व त्यातून वसुल करण्यात आलेली रक्कम रु. ९.३५ कोटी वगळता उर्वरीत रु. १.७७ कोटी रक्कम अद्यापही वसुल होणे बाकी आहे. याबाबत समितीने विचारणा केली असता महालेखाकारांनी सदर व्याजाची गणना चक्रवाढ व्याज व बंद कालावधीतील व्याज व करारनाम्यातील अंतिम मुदतीनंतरही व्याजावर व्याज अशापद्धतीने गणना केली आहे. त्यामुळे महालेखाकारांच्या आक्षेपानुसार व्याजाची रक्कम रु. २.४४ कोटी एवढी दिसून येते. तथापि, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वर्क मॅन्युअल, २००३ अन्वये सुसज्जता अग्रीमावर सरळ व्याज आकारणेबाबत नमूद आहे. त्याचप्रमाणे करारातील मुद्दा क्र. ७ नुसार गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाला हप्त्यांचे पुनर्गठन अंतिम कालावधीच्या मर्यादेच्या अधीन राहून करण्याचे स्वेच्छाधिकार असल्याची तरतूद प्राप्त असल्यामुळे ही रक्कम समान हप्त्यात घेण्यात आली नाही व अंतिम २४ महिन्यांच्या मर्यादेत घेण्यात आली होती व त्याअनुषंगाने विभागाने केलेली व्याजाची गणना सरळव्याज पद्धतीने ही रु. १,१५,०६,७७०/- इतकी असून सद्यःस्थितीत मुद्दल व व्याजाची पुर्ण वसुली झालेली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. महालेखाकारांनी केलेली व्याजाची गणना, आकारणी व विभागाने केलेली व्याजाची गणना व आकारणी याची समितीने सखोल तपासणी केली असता बंधाऱ्याचे काम बंद असल्यामुळे हप्त्याहप्त्याने रक्कम न भरता काम सुरू झाल्यानंतर चालु देयकातून उर्वरीत रक्कम वसूल करण्यात आली. या कालावधीतील शिल्लक असलेल्या मुद्दल रकमेवर simple interest ने येणारे व्याज रिड्युसींग बॅलेन्सने परिगणित केले असता वसुलपात्र

रक्कम रु. ६७.५४ लक्ष इतकी येत आहे. ही रक्कम कंत्राटदाराकडून वसुल होणे आवश्यक असल्याचे समितीने लक्षात आणून दिले असता विभागीय सचिवांनी यास सहमती दर्शविली व या रकमेची परिगणना महालेखाकारांकडून करून घेऊन त्याप्रमाणे वसुली करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले. तसेच गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिनियम. १९९८ च्या कलम १९(१) मधील तरतूदीनुसार महामंडळाला सर्व निविदांच्या संबंधात तांत्रिक मंजूरी देण्याचा व स्वीकृती देण्याचा, अर्थसंकल्पाला मंजुरी देण्याचा व वित्तीय तरतूदी करण्याचा, उद्‌भवलेल्या विवादांच्या बाबतीत समझोता करण्याचा आणि या अधिनियमाखालील त्याची कामे पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक किंवा इष्ट असतील अशा कोणत्याही अन्य गोष्टी करण्याचा अधिकार असेल. तथापि, महामंडळाच्या अध्यक्षांना असा निर्णय घेण्याचा अधिकार आहे किंवा कसे ? याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले असून अद्याप अभिप्राय प्राप्त झालेले नाहीत असेही समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारशी

६.८ (१) नांदेड जिल्ह्यात गोदावरी नदीवर बळेगाव उच्चस्तरीय बंधाऱ्याच्या बांधकामासंदर्भात कंत्राट अटी शर्तींमध्ये तरतूद नसताना आणि कंत्राटदारास सुसज्जता अग्रीम मंजूर करण्यास राज्य शासनाने (मार्च, २०००) प्रतिबंध लावला असतानाही कंत्राटदारास सुसज्जता अग्रीम रु. १६ कोटी मंजूर करण्यात आला. यामध्ये रु. ८.६८ कोटी माहे डिसेंबर, २००९ ते मार्च, २०१० दरम्यान तीन हप्त्यांत वितरीत करण्यात आले. परंतु बळेगाव व बाभळी हे दोन्ही बंधारे एकाच प्रकल्पाचे भाग होते व बाभळी बंधाऱ्याबाबतचा वाद आंतरराज्यीय स्तरावरील असून त्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित होते. या प्रकरणात कोणतीही कायदेशीर अडचण निर्माण होऊ नये म्हणून बळेगाव बंधाऱ्याचे काम देखील थांबविण्यात आले होते. तसेच कोणत्याही क्षणी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झाल्यास हे काम तात्काळ सुरू करता यावे व यामध्ये कोणताही हस्तक्षेप वा प्रतिबंध अन्य राज्यांना करता येऊ नये यासाठी कामाच्या स्थळावर यंत्रसामुग्री व मनुष्यबळ तयार ठेवण्यास कंत्राटदाराला सांगण्यात आले. परंतु प्रत्यक्षात दीड वर्ष कामास सुरूवात करण्यात आली नाही. या दीड वर्षाच्या कामबंद कालावधीसाठी कंत्राटदाराची यंत्रसामुग्री व मनुष्यबळ विनावापर पडून राहिल्यामुळे या कालावधीकरिता कंत्राटदाराने रु. १.४३ कोटी रकमेची नुकसानभरपाईची मागणी केली व तसे शक्य नसल्यास अग्रीमावरील कामबंद कालावधीतील व्याज रु. ४७.७५ लक्ष माफ करण्याची विनंती केली असता ती शासनाने मान्य केली. वास्तविकतः निविदेतील कलम १५(३) नुसार ६० दिवसांपेक्षा जास्त काळ काम बंद राहिल्यास कंत्राटदार रकमेचा दावा करु शकतो अशी तरतूद आहे. परंतु ही अट सुसज्जता अग्रीम न दिल्यास लागू होते. या प्रकरणी निविदा अटीमध्ये सुसज्जता अग्रीमाचा समावेशच नसताना हा अग्रीम देण्यात आला व त्याच अग्रीमाच्या रकमेतून कंत्राटदाराने ही यंत्रसामुग्री व मनुष्यबळाची व्यवस्था केली. अशा परिस्थितीत कंत्राटदाराने हा खर्च स्वखर्चातून नव्हेतर शासनाच्या अग्रीमाच्या निधीतूनच केलेला असताना त्याला कामबंद कालावधीसाठी विनावापर पडून राहिलेल्या यंत्रसामुग्रीचा दावा अनुज्ञेय ठरु शकत नाही. अग्रीम मंजूर करणे व व्याजही माफ करणे अशामुळे कंत्राटदारास दुहेरी लाभ मिळाला असे समितीचे स्पष्ट निष्कर्ष आहेत. बाभळी धरणासंदर्भात अस्तित्वात असलेला आंतरराज्यीय वाद, त्याअनुषंगाने उद्‌भवलेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती, यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेले दावे ही सर्व अपवादात्मक परिस्थिती पाहता या प्रकरणावर विपरीत परिणाम होऊन शासनाचे कोणतेही नुकसान होणार नाही यादृष्टीने ऐनवेळी विभागास विशिष्ट परिस्थिती पाहता काही महत्वाचे निर्णय घेणे अपरिहार्य ठरले याबाबत समितीचे कोणतेही दुमत नाही. परंतु अशा अपवादात्मक परिस्थितीचा आधार घेऊन निविदा अटी शर्तीचे उल्लंघन करून कंत्राटदारास दुहेरी लाभ देण्याच्या कृतीचे विभाग अशाप्रकारे समर्थन करु शकत नाही. याही उपर विभागाने सुसज्जता अग्रीमावरील व्याजाची वसुली ही नियमानुसार ठरलेल्या समान हप्त्यात न करता काम सुरू झाल्यानंतर चालू देयकातून वसूल करण्यात आली. त्यानुसार अग्रीम व व्याज मिळून केवळ रु. ९,३५,३१,५५०/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली व व्याजाची रु. ४७.७५ लक्ष रक्कम माफ करण्यात आली. वास्तविकतः कंत्राटदाराने १८ महिने शासनाचे कोट्यावधी रुपये बिनव्याजी वापरले. आंतरराज्यीय वाद पाहता काम करता येणार नाही या परिस्थितीची जाणीव व माहिती कंत्राटदारास होती. समितीने याची विस्तृत छाननी केली असता महालेखाकारांनी निश्चित केलेली वसुलपात्र रक्कम व विभागाने वसुली केलेली वस्तुतः रक्कम यात तफावत दिसून आली. व्याजाच्या रकमेच्या गणनेमुळे (सरळ व्याज/चक्रवाढ व्याज) हा फरक दिसून आला. समितीने याची सखोल तपासणी केली असता बंधाऱ्याचे काम बंद असल्यामुळे हप्त्याहप्त्याने रक्कम न भरता काम सुरू झाल्यानंतर चालू देयकातून उर्वरित रक्कम वसुल करण्यात आली. कंत्राटदारास कामबंद कालावधीतील रकमेचा दावा सुसज्जता अग्रीम न घेतल्यास अनुज्ञेय ठरतो परंतु याठिकाणी आयडीयल चार्जेस रु. १.४३ कोटी रकमेतून व्याजाचे रु. ४७.७५ लक्ष माफ करण्यात आले व हे पैसे सुरूवातीला ठरलेल्या व्याजामधून कमी केले. परंतु कंत्राटदाराने १६ महिने हप्ते वेळेवर भरलेच नाही, ही बाब रकमेची गणना करताना दुर्लक्षित करता येणार नाही. या कालावधीतील शिल्लक असलेल्या मुद्दल रकमेवर simple interest ने येणारे व्याज reducing balance ने परिगणित केले असता ही अधिकची वसुलपात्र रक्कम रु. ६७.५४ लक्ष इतकी येत आहे व ती कंत्राटदाराकडून वसूल करण्यास विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सहमती दर्शविली. अतः विभागाने याअनुषंगाने केलेल्या परिगणनेला महालेखाकारांची मान्यता घेऊन ही रक्कम तात्काळ कंत्राटदाराकडून वसूल करावी. तसेच सुसज्जता अग्रीम मंजूर करण्याच्या मा. अध्यक्ष, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ यांच्या निर्णयासंदर्भात विभागाने विधी व न्याय विभागाचे अभिप्राय मागविलेले आहेत व ते अद्याप अप्राप्त आहेत. यासंदर्भात देखील विधी व न्याय विभाग व महालेखाकार यांचेसमवेत सहमतीने निष्कर्षाप्रत येऊन समितीस कळविण्यात यावे. तसेच या संपुर्ण प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कालबद्ध पद्धतीने कारवाई करण्यात यावी व या संपुर्ण प्रकरणी केलेल्या कारवाईसंदर्भात समितीस ३ महिन्यात कळविण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.

६.९ (२) बाभळी बंधाऱ्याची कामे अद्याप अपूर्ण आहेत तसेच या बंधाऱ्याच्या बुडीत क्षेत्रातील ज्या जमिनी आहेत त्या जमिनीचे संपादन काही प्रमाणात राहिलेले आहे. त्यामुळे बुडीत क्षेत्रातील कामे अपूर्ण राहिली असून सर्व अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी व प्रकल्पाचा लाभ जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावा यादृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट-अ

विवरणपत्र क्र. १

परि. क्र.३.२.४ भाताची सडणी व तो FCI कडे पोहचविणे.

दि.१५.११.२०१८ रोजीच्या बैठकीच्या अनुषंगाने:-

१. हंगाम २००९-१० ते २०१४-१५ शिल्लक सीएमआरची सद्य: परिस्थिती:

२००९ ते २०१४ शिल्लक CMR ची सद्यपरिस्थीती (कोटी)				
अ.क्र.	तपशील	टी.डी.सी.	मार्केटिंग फेडेशन	एकुण
१	शिल्लक सी.एम.आर.ची किंमत	६३.४८	१२.७४	७६.२२
२	मिलर्सच्या प्राप्त देयकातून,EMD व मिलींगमधून होवू शकणारी वसूली/समायोजन	२९.०५	७.७९	३६.८४
३	मिलर्सकडे शिल्लक असलेली वसूली	३४.४३	४.९५	३९.३८
४	१०० टकके समायोजन होणारे मिलर्स	४८	१३	६१
५	अंशत: वसूली झालेले मिलर्स	२७	०	२७
६	शुन्य वसूली असणारे मिलर्स	१२	३	१५

२. **मिलर्सवर दाखल करण्यात आलेल्या एफआयआर बाबत:**

१. टीडीसी वसूली बाकी असलेल्या ३९ मिलर्स व मार्केटिंग फेडरेशनची वसूली बाकी असलेले ३ मिलर्स असे एकूण **४२ मिलर्सवर एफआयआर** दाखल करण्यात आलेली आहे.

२. वसूली बाकी असलेल्या ४२ मिलर्सवर करण्यात आलेल्या एफआयआर चा **पुढील तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे.**

३. मिलर्सवरील सर्व गुन्हे पुढील तपासासाठी गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग केले असल्यामुळे सदर गुन्ह्यामध्ये भा.दं.वि. कलमांमध्ये सुधारणा करणे, त्यात वाढ करणे इत्यादी बाबत पुढील निर्णय चार्जशीट दाखल करीत असताना राज्य गुन्हे अन्वेषण विभाग घेईल. तसेच, याबाबत दि.१२.११.२०१८ रोजी प्रधान सचिव, अ. ना. पु. व ग्रा. सं. यांच्या अध्यक्षतेखाली गृह विभाग, कृषी व पणन विभाग, आदिवासी विकास विभाग, विधी व न्याय विभाग यांच्या समवेत बैठक घेण्यात आली. एफ. आय. आर. मधील सुधारणांबाबत गृह विभागाकडून पुढील माहिती घेऊन कार्यवाही करणे बाबत निर्देशित केले आहे.

३. मिलर्सवरील आरआरसी कार्यवाहीबाबत:

१. वसूली बाकी असलेल्या **४२ मिलर्सवर आरआरसी करण्यात आलेली आहे.**

२. टी.डी.सी.च्या **३९ मिलर्सवरती आरआरसी** ची कार्यवाही करण्यात आलेली आहे. संबंधित जिल्हाधिकारी यांनी आरआरसी ला मान्यता देऊन वसूलीबाबत पुढील कार्यवाही स्थानिक तहसिलदार यांच्या कडून पाठविली आहे. तहसिलदार यांनी नमुना-१ च्या नोटीस मिलर्सना दिलेल्या आहेत. नोटीसचा खुलासा प्राप्त होताच तहसिलदार संबंधित मिलर्सच्या मालमत्तांवर शासकीय बोजा चढविणे व बँक खाती सील करण्याची कार्यवाही करतील.

३. मा. फे. च्या **३ मिलर्सवरती आरआरसी** ची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच, या ३ मिलर्सच्या मालमत्तांवर शासकीय बोजा चढविण्यात आलेला आहे.

४. **अभिकर्ता संस्थाकडील २००९ ते २०१५ या कालावधीतील शिल्लक धानाच्या वसूलीबाबत :**

२००९ ते २०१५ शिल्लक धानाची सद्यपरिस्थीती (कोटी)

अ. क्र.	तपशील	टी.डी.सी.	मार्के फेड	एकुण
१	खरेदी (लाख/क्वि.)	६८.८७	८२.१३	१५१.००
२	भरडाई (लाख/क्वि.)	५३.०६	७८.२४	१३१.३०
३	शिल्लक धान (लाख/क्वि.)	१५.८१	३.८९	१९.७०
४	शिल्लक धानाची सी.एम.आर.प्रमाणे किंमत (कोटी)	२०४.४८	५६.३५	२६०.८३
५	लिलावाव्दारे प्राप्त रक्कम (कोटी)	३५.६९	१४.३६	५०.०५
६	केंद्रशासनाने मान्य केलेली १ टक्के तुटीची रक्कम (कोटी)	६.७०	१०.७६	१७.४६
७	अभिकर्ता संस्थाकडून वसुल केलेली रक्कम (कोटी)	६.०८	१९.८६	२५.९४
८	अभिकर्ता संस्थाकडे शिल्लक असलेली वसूली (कोटी)	१५६.०१	११.३७	१६७.३८

अ. **आदिवासी विकास महामंडळ:**

१. सन २००९-१० ते २०१५-१६ या कालावधीमध्ये एकुण २०४.४८ कोटी किंमतीचे १५.८१ लाख क्विं. धान शिल्लक राहीलेले आहे. त्यापैकी लिलावातुन ३५.६९ कोटी तर केंद्रशासनाच्या १ टक्का तुटीमुळे ६.७० कोटी प्राप्त झाले, अभिकर्ता संस्थाकडून ६.०८ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत. आज घडीला अभिकर्ता संस्थाकडे रु.१५६.०१ कोटी एवढी वसूली शिल्लक आहे. त्याबाबतचा पाठपुरावा संस्थेकडे करण्यात येत आहे.

२. मा. अप्पर मुख्य सचिव, पणन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.३०.०८.२०१८ रोजी शिल्लक धान तूट वसूली बाबत बैठक घेण्यात आली होती. त्यात दिलेल्या सूचनांनुसार धान नुकसान/ तूट वसूली बाबत दोन्ही अभिकर्ता संस्थांनी कालबद्ध आराखडा तयार करुन शासनास सादर केलेला आहे. त्यानुसार घट तूटीस जबाबदार अधिकारी कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करणे, नैसर्गिक घट तूटीबाबत माहिती तयार करुन त्या तूटीच्या निर्लेखनाबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.

३. टी.डी.सी. ने दि.२०.०७.२०१८ रोजी सादर केलेल्या पत्रानुसार कालबध्द कार्यक्रमामध्ये दिनांक १५.९.२०१८ पर्यंत नोटीसा बजावणे, दिनांक ३०.९.२०१८ पर्यंत खुलासे प्राप्त करणे, दिनांक

१.१०.२०१८ ते १.११.२०१८ पर्यंत चौकशी पुर्ण करणे, दिनांक १.११.२०१८ ते १.१२.२०१८ पर्यंत कर्मचारी व संस्थानिहाय वसुली आदेश निर्गमित करुन त्यांची बजावणी करणे व दिनांक १.१२.२०१८ पासुन वसुलीची कार्यवाही पगारातुन वसुल करणे / एफआयआर / आरआरसी इ. सुरु करण्यात येणार असल्याचे शासनास कळविले आहे. प्राथमिक स्वरुपातील माहितीच्या आधारे ५९ कर्मचाऱ्यांकडुन रु.१५ कोटी व १६३ संस्थांकडुन रु.१०९ कोटी वसूली करण्यात येईल असे कळविले आहे.

४. तसेच, २००७-०८ ते २०११-१२ पासून २% वाजवी घट मंजूरीचा प्रस्ताव आदिवासी विकास महामंडळामार्फत दि.२४.०८.२०१८ रोजी शासनास सादर करण्यात आलेला आहे. तो मान्यतेस्तव वित्त विभागाकडे पाठविण्यात आला आहे.

५. दि.०९.१०.२०१८ रोजी टीडीसी ने हंगाम २००९-१० ते २०१२-१३ या कालावधीत धानाचे झालेल्या नुकसानाबाबत वाजवी व अवाजवी घट तूट बाबत निर्लेखन व वसुलीचा अंतरीम अहवाल सादर केला आहे. यामध्ये संस्थांकडे शिल्लक असलेल्या धानाबाबत ऊन, वारा, पाऊस, दीर्घ काळ साठवणूकीमुळे ३.८७ लक्ष क्विं घट तसेच, ऊंदीर, घुस, जनावरे, उच्च तापमान, उघड्यावर पडून नुकसान यामुळे १.५७ लक्ष क्विं तूट व चोरी मुळे ०.१७ लक्ष क्विं अशी एकूण ५.६२ लक्ष क्विं वाजवी घट तूट निर्लेखित करणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे. तसेच, वाजवी घट तूट निर्लेखनानंतर शिल्लक घटीवर २% तूट मान्य केल्यास रु.२१.९४ कोटी व १% तूट मान्य केल्यास रु.२९.९७ कोटी इतकी संस्थांकडून वसूलपात्र राहतील असे नमूद केले आहे. तर कर्मचाऱ्यांकडून २% तूट केल्या रु.१२.८९ कोटी व १% तूट मान्य केल्यास रु.१५ कोटी वसूलपात्र राहतील असे नमूद केले आहे. एकूण प्रस्तावाचा विचार करता **२% तूट मान्य केल्यास रु.३४.८३ कोटी व १% तूट मान्य केल्यास एकूण रु.४४.९७ कोटी वसूलपात्र दाखविण्यात आली आहे.** सदरचा प्रस्तावास आदिवासी विकास विभागाची मान्यता घेऊन वित्त विभागाच्या मंजूरी स्तव सादर करण्यात येणार आहे.

ब. मार्केटिंग फेडरेशन:

१. मार्कफेड यांनी सादर केलेल्या कालबध्द कार्यक्रमामध्ये दिनांक २१.९.२०१८ ते ३०.९.२०१८ जिल्हानिहाय चौकशी पथक निर्माण करणे, १.१०.२०१८ ते १५.१०.२०१८ प्राथमिक चौकशी अहवाल प्रधान कार्यालयास द्वि सदस्यीय समितीपुढे एकत्रितरित्या सादर करणे. दि. १६.१०.२०१८ ते ३०.१०.२०१८ जिल्हानिहाय संस्थांचा लेखी खुलासा घेणे, दि. ३१.१०.२०१८ ते १४.११.२०१८ संस्थानिहाय प्राथमिक चौकशी अहवाल पथकाव्दारे संस्थानिहाय घटीबाबतची कारणमिमांसा व त्यावरील आपले अभिप्राय टिपणीसह सादर करणे, दि. १५.११.२०१८ ते दि.३०.११.२०१८ प्राथमिक चौकशीअंती दोषी सब एजंट संस्थांना नोटीस देणे.दि. १.१२.२०१८ ते ७.१२.२०१८ वसुली झालेल्या व येणे बाकी असलेल्या घटीच्या रकमेचा तपशीलासह प्रधान कार्यालयास सादर करणे. दिनांक १६.१२.२०१८ पासुन पुढे प्रधान कार्यालयामार्फत कायदेशीर कार्यवाही करणे अशा प्रकारचा कालबध्द कार्यक्रम शासनास सादर केलेला आहे.

दि.१२.११.२०१८ रोजी प्रधान सचिव, अ. ना. पु. व ग्रा. सं. यांच्या अध्यक्षतेखाली गृह विभाग, कृषी व पणन विभाग, आदिवासी विकास विभाग, विधी व न्याय विभाग यांच्या समवेत बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये दोन्ही अभिकर्ता संस्थांनी वाजवी व अवाजवी घट तूट बाबत निर्लेखन व वसूलीचा प्रस्ताव

त्या त्या विभागाची (कृषी व पणन/ आदिवासी विकास विभाग) मान्यता घेऊन अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे सादर केलेनंतर तो मान्यतेस्तव वित्त विभागाकडे पाठविण्यात यावा असे निर्देशित केले आहे.

याबाबत दि.११.०९.२०१८ व दि.३०.१०.२०१८ रोजी मा. मंत्री, अ.ना.पु. व ग्रा. सं. विभाग यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. सदर बैठकी मध्ये मा. मंत्री महोदयांनी हंगाम २००७-०८ ते २०१७-१८ या कालावधीतील घट तूटी बाबत स्वयंस्पष्ट अहवाल अभिकर्ता संस्थांनी शासनास सादर करणेबाबत आदेशित केले आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर राज्य शासनाच्या वतीने १% वाढीव तूट मान्य करणेबाबत चा प्रस्ताव विभागास सादर करणेबाबत चे निर्देश दिले आहेत.

सहायक संचालक
नागरी पुरवठा

विवरणपत्र क्र. २

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

मुख्य अभियंता (जसं) जलसंपदा विभाग, औरंगाबाद

नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

❖

बळेगांव उच्च पातळी बंधारा
ता. उमरी जि. नांदेड

संक्षिप्त टिप्पणी

❖

विष्णुपूरी प्रकल्प विभाग क्र. 2,
नांदेड.

बळेगांव उच्च पातळी बंधारा ता. उमरी, जि. नांदेड

ठळक टिप्पणी (Bullet Note)

- बाभळी उच्च पातळी बंधा-यास शासन निर्णय क्र. बाभळी १०९३ (२५/९३) जलसंपदा विभाग दि.१०/०३/१९९५ अन्वये ३१.३७ कोटीस प्रशासकीय मान्यता प्रदान केली
- बाभळी बंधा-याच्या बांधकामाचे दि.०९/०८/२००४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले व बंधा-याच्या कामास २ जानेवारी २००५ मध्ये सुरवात झाली.
- बाभळी बंधा-यामुळे ५५.४९ द.ल.घ.मी. (१.९५ अ.घ.फू.) पाणी साठा झाला आहे व ६३९५ हे. सिंचन अपेक्षित आहे.
- बाभळी बंधा-यास गोमपावि महामंडळ निर्णय क्र./ व्दिसुप्रमा/तां ३/ बाभळी बंधारा म.प्र./३० दि.२५/११/२००५ अन्वये रु. १४९४३.९७९ लक्ष किंमतीस द्वितीय प्रशासकीय मान्यता प्रदान केली.
- बाभळी प्रकल्पामध्ये पोचमपाड प्रकल्पाचे अधिक्रमीत झालेले १७ द.ल.घ.मी. पाणी आंध्र प्रदेशाला सोडणे आवश्यक झाल्याने उर्ध्व बाजूस बळेगांव बंधारा बांधण्याची आवश्यकता निर्माण झाली.त्यानुसार बळेगांव बंधा-याच्या समावेशनासह बाभळी मध्यम प्रकल्पाच्या रु. ४७३.९३ कोटी किंमतीस तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.
- बळेगाव बंधाऱ्याची साठवण क्षमता ४२.५० द.ल.घ.मी. असून याद्वारे ५६०० हे. क्षेत्राचे सिंचन होणार आहे.
- बळेगाव उच्च पातळी बंधारा कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करून कंत्राटदारास दि. २५/०८/२००९ रोजी कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले.
- कंत्राटदारास खालील प्रमाणे सुसज्जता अग्रीम देण्यात आली.

  १)पहिला हफ्ता:- दि.१४/१२/२००९ - ४००.०० लक्ष.

  २)दुसरा हफ्ता:- दि.१८/०१/२०१० - २५०.०० लक्ष.

  ३) तिसरा हफ्ता:- दि.१०/०३/२०१० - २१८.०० लक्ष.

- कंत्राटदाराकडून दि. ०१/०१/२०१० ते ०९/०४/२०१० च्या दरम्यान नियमित हफ्त्यामध्ये रू.१२११८४७५.०० /- वसूल करण्यात आले व दि .३०/५२/२०११ रारेजी चालू देयकातून रू. ८१४१३७४०५.००/- वसूल केले. याप्रमाणे अग्रीम रक्कम रू.८६८००००/- व व्याजाची रक्कम रू. ६७३१८८०/- वसूल केली.
- मा. सर्वोच्य न्यायालयात बाभळी बंधाऱ्याबाबत आंध्रप्रदेश सरकाराने याचिका दाखल केल्यामूळे व त्याअनुसरून मा. सर्वोच्य न्यायालयाने गोदावरी नदीवर्राल इतर बंधाऱ्याच्या कामावर आक्षेप घेतल्याने बळगाव बंधाऱ्याचे काम न करण्याचे ओदश दिले. त्यामुळे दि.३१/०८/२००९ ते दि.१५/११/२०१० पर्यंत बळेगाव बंधाऱ्याचे काम बंद ठेवण्यात आले.
- बळेगाव बंधारा कामाचा बंद कालावधितील आयडल चार्जेसची मागणी निविदेतील कलम १५(३) नूसार कंत्राटदाराने केली.
- मा. कार्यकारी संचालक यांचे पत्र क्र. गोमपाविम/ताशां-३/नापाम/बळेगाव उपाब/ब-१/(२/९-१०)/८८५२, दि.२५/०८/२०१२ अन्वये आयडल चार्जेसच्या तुलनेत व्याज कमी असल्यामुळे बंद कालवाधितील व्याज रू.४७.७५ लक्ष माफ करण्यात आले.
- कार्यकारी अभियंता यांचा कंत्राटदारासी झालेल्या करारानूसार २४ महिन्यात मुद्दल रू ८,६८,००,०००/- व व्याज रू. १,१५,०६,८८०/- वसूल करावयाचे ठरले होते. त्यानूसार मुद्दल रू.८,६८,००,०००/ - व व्याज रू.६७,३१,८८०/- व माफ केलेले व्याज रू.४७,७५,०००/- असे एकूण रू. ९,८३,०६,८८०/- ऐवढे कंत्राटदाराकडून वसूल झाले आहे.
- महालेखपरिक्षक यांनी अग्रीम रू.८.६८ कोटी व व्याज रू.२.४४ कोटी असे एकूण ११.१२ कोटी वसूल करणेबाबत शेरा नोंदवला आहे.
- बंधाऱ्याच्या प्रकल्प बांधकामास दि.१६/११/२०१० रोजी सुरवात होऊन बंधाऱ्याची स्थापत्य व यांत्रिकी कामे पुर्ण करून ऑक्टोबर २०१५ पासून पाणी साठा करण्यात येत आहे.

महालेखाकार (लेखापरीक्षा)-II,
महाराष्ट्र, नागपूर

ACCOUNTANT GENERAL (AUDIT) -
MAHARASHTRA, NAGPUR

पंजीकृत डाक

संख्या.पी.ए.सी.सेल/यु.ओ.आर./परि.क्र.3.5/2015-16/154
दिनांक 19-02-2018

प्रति,
अवर सचिव,
जल संपदा विभाग
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय
मुंबई 400 032.

विषय : : नियंत्रक महालेखापरीक्षक के लेखापरीक्षा प्रतिवेदन वर्ष 2014-15 परिच्छेद क्र.3.5।

संदर्भ : जल संपदा विभाग का अशासकीय ज्ञापन पत्र दिनांक 14-02-2018 ।

महोदय,

उपर्युक्त संदर्भिय पत्र पर की गयी निम्नलिखित लेखापरीक्षा टिप्पणी पर आवश्यक कार्यवाई /उत्तर महाराष्ट्र विधान मंडल सचिवालय/महालेखाकार को भेजने की कृपा करे । जल संपदा विभाग से प्राप्त स्पष्टिकरणात्मक ज्ञापन के मुल दस्तावेज पत्र के साथ संलग्न है ।

Para No.	Subject in brief	Remarks
3.5	**'Undue pecuniary benefit to a contractor'.** Irregular grant of mobilization advance of Rs.8.68 crore to a contractor as well as admitting his claim for idle charges of Rs.1.43 crore and subsequent trade-off between the contractor and Vishnupuri Project Division to waive off the interest component on mobilization advance in consideration of idle charges resulted in short recovery of interest amount of Rs.47.75 lakh.	The reply is not acceptable for the following reasons. 1) The work order was issued in **August 2009** with the condition that construction work should not be commenced and no machinery should be brought to site without prior permission of GMIDC. In spite of this fact, the mobilization advance was sanctioned in **August 2009**. Moreover, the advance was sanctioned without having any provision in the contract for providing such advance. 2) The contractor was directed to commence the work in November 2010. In such conditions accepting his claim for idle machinery for the period December 2009 to October 2010 was irregular. It was specifically mentioned in the work order that machinery should not be brought to site without prior permission of GMIDC. 3) Department in their reply stated that to avert any consequences arising out of verdict by Supreme

लेखा भवन, डाक पेटी क्र 220, सिविल लाईन्स, नागपूर-440001
दुरध्वनि /Telephone - 0712-2564506 to 2564510
फैक्स / Fax: 0712-2524130

'Audit Bhavan', Post Bag No. 220, Civil Lines, Nagpur-440001
Website : http://agmaha.cag.gov.in
e mail : agaumaharashtra2@cag.gov.in

		Court, preparedness was machinery and men was mandatory at project site. The contention is not acceptable, as the work order was given in August 2009 whereas the Supreme Court verdict came in February 2013. 4) Department also stated that recovery of advance was made regularly and total amount of Rs. 9.83 crore (including waiver amount of Rs. 47 lakh) had been recovered. The contention is not acceptable as the mobilization advance was released in December 2009 (Rs. 4 crore), January 2010 (2.50 crore) and March 2010 (Rs. 2.18 crore) with condition of recovery in 24 equal instalments. However, recovery made was Rs. 1.21 crore during January 2010 to April 2010 and Rs. 8.14 crore in December 2011. No recovery was made during May 2010 to November 2011. Thus interest for the period May 2010 to November 2011 was not calculated by department correctly. It should be Rs. 8.68 crore advance and Rs. 2.44 crore interest. Thus, the amount to be recovered should be Rs. 1.77 crore (Rs. 8.68 crore+Rs.2.44 crore - Rs.9.35 crore). 5) As per the information available with audit, the project was not completed by December 2015. The current status of the project may be stated to PAC.

संलग्नः यथोपरी

भवदीय,

वरिष्ठ लेखापरीक्षा अधिकारी
पी.ए.सी. सेल

बळेगांव उच्च पातळी बंधारा
ता.उमरीजि. नांदेड

भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांच्या सन २०१४-१५ या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेदक्र. ३.५ अन्वये उपस्थित मुद्यांचा अनुपालन अहवाल

शेरा क्र. १) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या पूर्व परवानगी शिवाय बांधकाम सुरु करण्यात येऊ नये व कार्यस्थळावर यंत्र सामुग्री आणण्यात येवू नये. या अटीसह ऑगस्ट २००९ मध्ये कार्यरंभ आदेश देण्यात आले होते. अशी वस्तुस्थिती असून देखील ऑगस्ट २००९ मध्ये सुसज्जता अग्रीम मंजूर करण्यात आला. तसेच निविदेमध्ये असा अग्रीम देण्याबाबत कोणतीही तरतूद नसतांना देखील अग्रीम मंजूर करण्यात आला.

खुलासा:-

"गोदावरी नदीवरील बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्याचे बांधकाम या कामाचा कार्यारंभ आदेश दि. २५/०८/२००९ रोजी देण्यात आला. सदर कामाचे कार्यारंभ आदेश देतांना काम सुरु न करणे, यंत्र सामुग्री साईटवर न आणणे अशा स्वरुपाच्या कोणत्याही अटी कार्यारंभ आदेशात नमूद केल्या नाहीत. तथापि गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र. गोमपाविम/ता-३/नांपामं/बळेगांवउपाबं/ब-१/निकाआ/६९२८/सप्र दि. २६/०८/२००९ अन्वये सांकेतांक क्रमांक देतांना खालील अट नमूद केली आहे.

"बाभळी बंधाऱ्याच्या संदर्भात आंध्र प्रदेश शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या दाव्याच्या सुनावणीमध्ये गोदावरी नदीवरील इतर बंधाऱ्यांच्या कामावरआक्षेप घेतला आहे. तरी महामंडळाने परवानगी देई तोपर्यंत कार्यक्षेत्रावर प्रत्यक्ष कामास सुरु करु नये. याबाबत संबंधीत अभिकरणास लेखी कळवून त्यांची पोच प्राप्त करावी व याकार्यालयास त्याची छायांकीत प्रत पाठवावी." या अटीनुसार विभागीय कार्यालयाचे पत्र क्र. विप्रवि-२/लेखा/३३४५ दि. ३१/०८/२००९ अन्वये बंधाऱ्याचे काम प्रत्यक्ष सुरु करु नये अशा सुचना कंत्राटदारास देण्यातआल्या. तथापि कंत्राटदाराने काम सुरु करण्याच्या दृष्टीने यंत्रसामुग्री, मनुष्यबळ, बॅचीगप्लॅन्ट, खडीसाठी क्रशर यासारखी तयारी केल्याचे कार्यकारी अभियंता / अधीक्षक अभियंता यांचे अहवालानुसार दिसून येते.

कार्यकारी अभियंता यांचे निर्देशानुसार कंत्राटदाराने प्रत्यक्ष कामास सुरुवात केली नाही तथापि बांधकामाचे ठिकाणी यंत्रसामुग्री, बॅचींग प्लॅन्ट, खडीसाठी क्रशर व मनुष्यबळ कार्यस्थळावर उपलब्ध करण्यात आले होते. त्यामुळे कंत्राटदाराने अग्रीमाची मागणी केली होती. बाभळी बंधाऱ्याच्या संदर्भात गोदावरी पाणी तंटा लवादाचा महाराष्ट्र शासन भंग करत असले बाबत आंध्र प्रदेश सरकार मा. सर्वोच्च न्यायालयात दि. ०३/०७/२००६ रोजी याचीका दाखल केली होती. सदरील याचीकेची वेळोवेळी सुनावनी होवून अंतीम सुनावनी दि. २४/०३/२००९ रोजी घेण्याचे मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले होते. तथापिया तारखेला सुनावनी न होता, वेळोवेळी सुनावणीच्या तारखा वाढविण्यात आल्या. कोणत्याही क्षणी सुनावनी दरम्यान मा. सर्वोच्च न्यायालयाकडून अंतिम निर्णय होवू शकण्याच्या टप्प्यात असल्याने व सदर प्रकार आंतरराज्यवादामध्ये असल्याने व अंतिम निर्णयान्वयेआंध्र प्रदेश शासनास ०.६० TMC पाणी सोडण्याबाबतची मागणी होण्याची शक्यता असल्याने बळेगांव बंधाऱ्याचे काम सुरु करण्यासाठी कामाच्या ठिकाणी बांधकाम साहित्य यंत्रणा व इतर सामुग्री उभारणे आंतरराज्यप्रकरणात राज्याच्या हिताचा विचार करता आवश्यक होते. त्याअनुषंगा नेकामाच्या ठिकाणी सर्व तयारकरण्यात आली.

उपरोक्त पार्श्वभुमी लक्षा घेता प्रत्यक्ष काम सुरु न करता बांधकामची संपुर्ण तयारी करणे आवश्यक झाले होते. त्यामुळे मनुष्यबळ, साहित्य व यंत्रसामुग्रीची जमवाजमव करण्यासाठी अग्रीम देण्याबाबत कामाचे कंत्राटदार यांनी दि. २६/०८/२००९ रोजी अग्रीम रक्कम मिळणे बाबतची मागणी केली. त्या अनुषंगाने प्रस्तावित निविदेत मोबीलायझेशन ॲडव्हान्सची तरतूद नाही. तथापि कार्यकारी अभियंता / अधीक्षक अभियंता यांनी मोबीलायझेशन ॲडव्हान्स इतकीच रक्कम बँक हमीच्या स्वरुपात घेऊन अग्रीम मंजूर करण्याची शिफारस केली आहे. निविदेअंतर्गत काम त्वरीत सुरु करण्यासाठी अग्रीम रक्कम देण्यास मा. अध्यक्षांच्या परवानगी नेमा. कार्यकारी संचालक यांचे पत्र क्र. गोमपाविम/तांशा-३/नांपामं/बळेगांव / उपाबं/ब-१/अग्रीम /७१३९ दि. ३१/०८/२००९ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली.

बळेगांव उच्च पातळी बंधारा

ता. उमरी जि. नांदेड

भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांच्या सन २०१४-१५ या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.५ अन्वये उपस्थित मुद्यांचा अनुपालन अहवाल

शेरा क्र.२) कंत्राटदारास नोव्हेबर २०१० मध्ये काम सुरु करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. अशा परिस्थितीमध्ये त्यांची डिसेंबर २००९ ते ऑक्टोबंर २०१० या कालवधीत विना वापर यंत्र सामुग्रीच्या नूकसान भरपाईची मागणी मान्य करणे. ही बाब अनियमितता आहे. कार्यारंभ आदेशामध्ये गो.म.पा.वि.म.औरंगाबाद पूर्वपरवानगी शिवाय कार्यस्थळावर यंत्रसामुग्री आणण्यात येऊ नये असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते.

खुलासा:-

बळेगांव बंधाऱ्याचे काम सुरु करणे बाबत कंत्राटदारास कार्यारंभ आदेश दिनांक २५/०८/२००९ रोजी देण्यात आले होते. त्यामध्ये काम बंद ठेवणे किंवा यंत्रसामुग्री कार्यक्षेत्रावर न आणणे यासंदर्भात अशा स्वरुपाचा कोणताही उल्लेख नाही. वरील परिच्छेदात नमूद उद्भवलेल्या अनिवार्य परिस्थितीमुळे जरी बंधाऱ्याचे प्रत्यक्ष काम चालू करावयाचे नसले तरी काम चालू करण्याच्या दृष्टीने सर्व तयारी करणे आवश्यक झाले होते.

निविदेतील कलम १५ (३) खालीलप्रमाणे आहे.

Where the Engineer-in-charge require the contractor to suspend the work for a period in excess of 30 days at any time or 60 days in the aggregate, the contractor shall be entitled to apply to the Engineer within 30 days of resumption of work after such suspension for payment of compensation to the extent of pecuniary loss suffered by him in respect of working machinery rendered idle on the site or on account of his having had to pay the salary wages of labour engaged by him during the said period of suspension, provided always that the contractor shall not be entitled to any claim in respect of any such working machinery salary or wages for the first 30 days whether consecutive or in the aggregate of such suspension or in respect of any suspension whatsoever occasioned, by unsatisfactory work or any other default on his part. The decision of the Engineer-in-charge in this regard shall be final and conclusive against the contractor.

वरील निविदा शर्तीत नमूद केल्याप्रमाणे बंधाऱ्याचे काम दि. ३१/०८/२००९ ते १५/११/२०१० या कालावधीत बंद होते. म्हणजेच ३० दिवसांपेक्षा जास्त दिवस काम बंद ठेवण्यात आले होते. प्रकल्प स्थळी संधानक बेचींग प्लान्टची उभारणी तसेच लोडर, पोकलेन, टिप्पर इ. यंत्रसामुग्री आणली तसेच स्टानक्रशरची उभारणी केली. याबाबतचा अहवाल विभागीय कार्यालयामार्फत सादर करण्यात आला. वरीलप्रमाणे निविदेतील तरतुद, न्यायालयीन घडामोडी, कामावरील प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेता कंत्राटदारास काही प्रमाणात दिलासा देण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. त्यामूळे कंत्राटदाराने मागणी केलेल्या रु. १,४३,१२,७७६/- ऐवजी रु. ४७,७५,०००/- माफीच्या स्वरुपात देण्याचा निर्णय कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी निविदेतील कलम १५ (३) ला अनुसरुन घेतल्याचे दिसून येते. या निर्णयामूळे शासनाची रु. ९५,३७,७७६/- इतकी बचत झाली.

बळेगांव उच्च पातळी बंधारा

ता.उमरीजि. नांदेड

भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांच्या सन २०१४-१५ या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.५ अन्वये उपस्थित मुद्यांचा अनुपालन अहवाल

शेरा क्र.३) विभागाने उत्तरात नमूद केले होती की, मा. सर्वोच्य न्यायालयाच्या निर्णयामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीचे निवारण करण्यासाठी कार्यस्थळावर यंत्र सामुग्री व मनुषबळ तयार असणे बंधनकारा होते. कार्यरंभ आदेश ऑगस्ट २००९ मध्ये देण्यात आले होत व मा. सर्वोच्य न्यायालयाचा निकाल फेब्रुवारी २०१३ मध्ये जाहीर झाला असल्याने हा खुलासा स्विकारार्ह नाही.

खुलासा:-

गोदावरी नदीवरील बाभळी उच्च पातळी बंधाऱ्यास जलसंपदा विभागाने दि. १०/०३/१९८५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली होती. त्यानुसार बाभळी बंधाऱ्याचे बांधकाम जानेवारी – २००५ मध्ये सुरु करण्यात आले होते. हा बंधारा महाराष्ट्र राज्याच्या सिमेपासून ७ कि. मी. वर असून महाराष्ट्र राज्याच्या हद्दीमध्ये बांधण्यात आला होता. सदर बंधाऱ्याच्या निम्न बाजूस आंध्र प्रदेशाचे पोचमपाड येथे मोठा प्रकल्प आहे. महाराष्ट्र राज्याने बाभळी बंधाऱ्याचे बांधकाम सुरु करण्यास आंध्र प्रदेश शासनाने विरोध केला व केंद्रीय जल आयोगाकडे तक्रार केली. याबरील सर्वसामान्य तोडगा काढण्यासाठी वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या. याबैठकी मधील तोडगा आंध्र प्रदेश शासनाने आमन्य करीत दि. ०३/०७/२००६ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयात दावा क्र. १/२००६ दाखल केला. बाभळी बंधाऱ्याचे बांधकाम बंद करण्याच्या संबंधात खालीलप्रमाणे आंध्रप्रदेशाची तीव्र निदर्शने झाली.

- बाभळी बंधाऱ्याच्या विरोधात आंध्र प्रदेशात दि. ११/०४/२००७ रोजी तेलंगणा भागात बंद पुकारला होता.
- दि. २४/०४/२००७ रोजी तेलगु देशमपक्षाने सर्व पक्षीय बैठक बोलावून निषेध मोर्चा काढला होता. त्यास आंध्र प्रदेश शासनाने कोणतीही प्रतिबंधात्मक कार्यवाही केली नाही.
- दि. १६/०७/२०१० रोजी तेलगु देशमपक्षातर्फे बंधाऱ्याच्या विरोधात बस यात्रा काढण्यात आली. २५ बस, ३०० इतर वाहनांचा ताफा घेऊन महाराष्ट्र सिमेवर आले. खासदार, आमदार व समर्थक मिळून जवळपास १००० व्यक्तीचा ताफा सिमेवरआला.
- श्री. चंद्राबाबु नायडू व इतर यांनी धरणे आंदोलन करुन महाराष्ट्र शासनाविरुध्द घोषणा दिल्या. प्रतिबंधात्मक आदेश धुडकावून महाराष्ट्र सिमेत प्रवेश केला.
- महाराष्ट्र पोलीसांनी श्री. चंद्राबाबू नायडू यांच्यासह ६६ इतर पक्ष कार्यकर्त्यांना अटक केली. यानंतर आंध्र प्रदेशात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.
- महाराष्ट्र राज्यातर्फे पोलीस प्रमुख व उप प्रमुख यांनी श्री नायडू व समर्थकांचे बंधाऱ्याच्या भेटीपासून मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनी नकार दिला. त्यामुळे त्यांना अटक करुन दोन दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली.
- दि. १९/०७/२०१० रोजी पक्ष नेत्यांच्या अटकेविरुध्द आंध्र प्रदेशात राज्यभर हरताळ व बंद पुकारण्यात आला.
- मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार मा. ना. आर. आर. पाटील गृहमंत्री यांना तणाव परिस्थिती निवळण्यासाठी श्री. चंद्रबाबु नायडु व पक्ष सदस्यांच्या विरुध्द सर्व आरोप मागे घेतल्याची घोषणा केली व व त्याच्याशी चर्चेअंती या सर्व नेत्यांना सन्मानाने आंध्र प्रदेशसिमेवर सोडण्यात आले.
- दि. ०४/०८/२०१० रोजी तेलगू देशम पक्ष सदस्यांनी बाभळी बंधाऱ्याच्या विरोधाच्या पोकळपणा अर्धा तास लोकसभा तहकुब करण्यात आली. अशा प्रकारे आंध्र प्रदेश राज्यातील राजकीय पक्ष बाभळी बंधारा वादाचा राजकीय लाभ उठविण्याचा प्रयत्न करीत होते.
- याव्यतिरिक्त आंध्र प्रदेशात वेळोवेळी आंदोलने करण्यात आले तसेच दि. १२/११/२००८ रोजी आंध्र प्रदेशातील लोकप्रतीनिधीनी वार्ताहार व फोटोग्राफर गोदावरी नदीपात्रातुन बोटीद्वारे कंधार स्थळी येण्याचा प्रयत्न केला होता. परंतु सदरील सर्व लोकप्रतिनिधीना पोलीस अधिकाऱ्यांनी

महाराष्ट्रसिमेवर संगम या गावाजवळ गोदावरी नदीमध्ये आडविले आणि कायदा व सुव्यवस्थेचा विचार करता प्रतिबंध केला व सर्व लोकप्रतिनिधींना नदी काठावर आणले. सर्व परिस्थिती निदर्शनास आणली व लोकांच्या भावना तिव्र आहेत असे सांगून परत जाण्याची विनंती केली. लोकप्रतिनिधींना परत पाठविण्यात आले.

याचबरोबर मा. सर्वोच्च न्यायालयातसुध्दा याबाबात वेळोवेळी सुनावण्या झाल्या. या सुनावणी दरम्यान दि. २८/०३/२००६ रोजी श्री मधुयासकी गौडयांनी मा. सर्वोच्चन्या यालयात याचिका क्र. १३४/२००६ दाखल केली. तसेच दि. १७/०४/२००७ — श्री इरोबेल्लीदयाकरराव आणि इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात याचीका क्र. २०७/२००७ दाखल केली. दि. १८/४/२००७ — श्री बी. विनोदकुमार आणि इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात याचीका क्र. २१०/२००७ दाखल केली.

दि. ०८/१२/२००८ रोजी सुनावणी दरम्यान महाराष्ट्र राज्याच्या वतीने सर्व याचिकांची एकत्र सुनावणी घेवून प्रकरण त्वरीत निकाली काढण्याची विनंती केली. त्यानुसार सविस्तर अंतिम सुनावणी दि. २४/०३/२००९ रोजी घेण्याचे आदेश दिले. यानंतर वेळोवेळी सुनावणीच्या तारखा देऊनही प्रत्यक्ष सुनावणी झाली नाही. दि. ०८/११/२०१२ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयात सर्व याचिकांची अंतिम सुनावणी होऊन निकाल राखून ठेवण्यात आला. त्यानंतर दि. २८/०२/२०१३ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने बाभळी बंधाऱ्याबाबत निर्णय दिला.

बाभळी प्रकल्पांतर्गत १) बाभळी उच्च पातळी बंधारा व २) बळेगांव उच्च पातळी बंधारा या दोन बंधाऱ्यांचा समावेश आहे.

बाभळी बंधारा हा राज्यसिमेपासून ७ कि.मी. उर्ध्व बाजूस गोदावरी नदीवरी आहे. बाभळी बंधाऱ्याच्या उर्ध्व बाजुस ३४ कि. मी. अंतरावर बळेगांव उच्च पातळी बंधारा आहे. तसेच, बाभळी बंधाऱ्याच्या निम्न बाजूस ७० कि. मी. अंतरावर पोचमपाड हे मोठे धरण आहे.

बाभळी बंधाऱ्यामुळे पोचमपाड धरणातील १७.१२ द.ल.घ.मी. पाणीसाठा (०.६० TMC) पाणीसाठा बाभळी बंधाऱ्यात अधिक्रमीत होतो. मा. सर्वोच्च न्यायालयाने उपरोक्त याचिकांमध्ये ०.६० TMC पाणी देण्याचे आदेश होण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील जनतेमध्ये सुध्दा असंतोष निर्माण झाला होता.

उन्हाळ्यात ०.६ TMC पाणी आंध्र प्रदेशसाठी सोडल्यास बाभळी ते आमदुरा या भागातील नदी पात्र कोरडे होऊन नदीकाठावरील लोकांना पाण्याची कमतरता भासून दुष्काळासारख्या परिस्थितीस दरवर्षी सामोरे जावे लागेल. तसेच बाभळी बंधाऱ्याच्या प्रशासकीय मान्यतेच्या अहवालानुसार नदी काठावरील ५८ गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध करू न देण्याबाबतच्या दिलेल्या हमीची पुर्तता होणार नाही. बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्याचे काम केल्यामुळे वरील सर्व बाबींची व हमीची पुर्तता होईल. हे ०.६० TMC ची तूट भरुन काढण्यासाठी बळेगांव बंधाऱ्याच काम करणे आवश्यक झाले होते. त्यानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाने ४ मार्च २०१३ रोजी दिलेल्या निकालातील ८३ (f) नुसार बळगांव बंधाऱ्याची क्षमता १.५० TMC असून यापैकी ०.९० TMC हे विष्णुपूरी प्रकल्पातील समायोजीत साठा व बाभळी बंधाऱ्याच्या ०.६० TMC साठा असल्याचे नमूद केले आहे.

उपरोक्त प्रमाणे न्यायालयीन घडामोडी, पोचमपाड धरणासाठी बाभळी बंधाऱ्यातून सोडावे लागणारे ०.६० TMC पाणी, महाराष्ट्रातील जनतेचा तीव्र रोष लक्षात घेता, बळेगांव बंधाऱ्याचे काम तातडीने सुरु करणे आवश्यक होते. त्यामुळे त्याची तयारी करण्यासाठी कार्यस्थळावर संयंत्र व मनुष्यबळ कांणत्याही क्षणी तयार ठेवण्याची गरज निर्माण झाली होती.

बळेगांवउच्चपातळीबंधारा

ता.उमरीजि. नांदेड

भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांच्या सन २०१४-१५ या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.५ अन्वये उपस्थित मुद्यांचा अनुपालन अहवाल

शेरा क्र.४) विभागाने उत्तरात नमूद केले होती की, अग्रीमाची नियमीतपणे वसूली करण्यात आली व एकूण ९.८३ कोटी(माफीच्या रू.४७.७५ लक्ष रक्कमेसह वसूल करण्यात आली आहे.हा खुलास स्विकारार्ह नाही कारण सुसज्जता अग्रीम २४ समान वसूलीच्या अटीसह डिसेंबर २००९ (रू. ४ कोटी), जानेवारी २०१० (रू.२.५० कोटी), मार्च २०१० (रू.२.१८ कोटी) असा वितरीत करण्यात आला. तथापी जानेवारी २०१० ते एप्रिल २०१० मध्ये रू. १.२१ कोटी, डिसेंबर २०११ मध्ये ८.१४ कोटी अशी वसूली करण्यात आली. मे २०१० ते नोव्हेबर २०११ या कालवधिमध्ये कोणतीही वसूली करण्यात आली नाही. अशा प्रकारे विभागाने मे २०१० ते नोव्हेबर २०११ या कालावधितील व्याजाची परिगणना योग्या प्रकारे केलेली नाही. ती रू.८.६८ कोटी अग्रीम व रू.२.४४ कोटी व्याज अशी आहे. अशा प्रकारे वसूली करावयाची रक्कम रू.१.७७ कोटी आहे.(रू.८.६८ कोटी + २.१४ कोटी — ९.३५ कोटी)

खुलासा:-

मा. लेखापरिक्षक यांचे आक्षेपानुसार कंत्राटदाराकडून मुद्दल रू.८.६८ कोटी व व्याज रू.२.४४ कोटी असे एकूण ११.१२ कोटी वसूल करणे आवश्यक होती असे नमूद केले आहे.

तथापि सदरच्या व्याजाची गणनाचक्रवाढ व्याज (Compound interest)पध्दतीने केली आहे. ही गणना प्रत्येक महिन्यासाठी केली असून महिना अखेर व्याज, परतफेड, दिलेली आगाऊ रक्कम याचा विचार करून शिल्लक दर्शविली आहे. या नंतरच्या लगतच्या महिन्याचा सुरवातीस ही शिल्लक रक्कम विचारात घेऊन व्याज लावले आहे. अशा पध्दतीने नंतरच्या सर्व महिन्यात व्याजावर व्याज गृहीत धरण्यात आले आहे. तसेच उर्वरित व्याजाचे रक्कमेवर दि.२०/१२/२०११ नंतरही (करारनाम्यानुसार संपूर्ण परतफेड झालेल्या तारखेच्या नंतर) दि.३०/०६/२०१६ पर्यंत व्याजाची गणना केली आहे. त्यामुळे आक्षेपानुसार रू.२.४४ कोटी व्याज दिसून येते तथापि कंत्राटदार व कार्यकारी अभियंता यांच्या दरम्यान झालेल्या करारनाम्यातील मुद्दा क्र.७ खालील प्रमाणे आहे.

The GMIDC may reschedule, at its complete discretion, the installments due without extending the ultimate time limit for full repayment of this advance together with all interest there on and costs incurred by the GMIDC in connection with this advance in which case the contractor shall be liable to adhere to such rescheduling as prescribed by the GMIDC without demur.

उपरोक्त करारनाम्यानुसार प्रतीमाह मुद्दल रूपये ३६१६६६७/- व व्याज रू. ४७९४५३/- असे एकूण रू.४०९६१२०/- वसूल करावयाचे असल्याचे नमुद आहे. अशा पध्दतीने २४ महिन्यात मुद्दल रू.८६८००००/- व व्याज रू.११५०६८८०/- वसूली करायचे ठरले होते. करारनाम्यातील व्याजाची गणना करतांना सरळ पध्दतीने व्याज (Simple Interest) विचारात घेतले आहे

आक्षेपानुसार चक्रवाढ व्याज (Compound interest) व बंद कालावधीतील व्याज व करारनाम्यातील अंमित मुदतीनंतरही व्याजावर व्याज यामुळे संपूर्ण व्याजाची रक्कम रू.२.४४ कोटी दर्शविली आहे.

१) चक्रवाढ व्याज(Compound interest):- सर्वसामान्यपणे कंत्राटदारास दिलेल्या सुज्जजता अग्रीमाची वसूली सरळ व्याजाने (Simple Interest) करण्यात येते. केंद्रिय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (CPWD) works mannual २००३पॅरा क्र.३१.६ नूसार सुसज्जता अग्रीमावर सरळ व्याज आकारणे बाबत नमूद केले आहे.

२) काम बंद कालावधीतील व्याज:- बळेगाव बंधाऱ्याचे बांधकाम दि.३१/०८/२००९ ते १५/११/२०१० काम बंद होते. त्यामुळे या कालावधीतील व्याजाची रक्कम रू. ४७.७५ लक्ष कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ,औरंगाबाद यांनी निविदेतील कलम १५ (३) नूसार अनुज्ञेय असलेल्या Idle charges च्या मोबदल्यात माफ केले आहे.

३) करारनाम्यानूसार अंतिम मुदतीनंतर आकारणी केलेले व्याज :- करारनाम्यानूसार अग्रीम व व्याजाची संपूर्ण वसूली दि.३०/१२/२०११ पर्यंत झाली आहे. तथापि उपरोक्त दोन कारणामुळे व्याज वसूल करणे शिल्लक दिसून येते. या शिल्लक रक्कमेवर दि.३०/१२/२०११ पा सून दि. ३०/०६/२०१६ पर्यंत चक्रवाढ पध्दतीने व्याज लावेले आहे. प्रत्यक्षात करारनाम्यानुसार संपूर्ण वसूली झालेली असल्याने या कालावधितील व्याज देय होत नाही.

उपरोक्त बाबीचे अवलोकन केले असता आक्षेपानूसार परिगणना केलेल्या व्याजाची रक्कम रु.२.४४ कोटी ऐवजी करारनाम्यानूसार वसूल केलेल व्याज रू.६७ ,३१,८८०/- आहे व माफ केलेल व्याज रू.४७,७५,०००/- अशी एकूण रू. १,१५,०६,८८०/-अशी व्याजाची संपूर्ण वसूली झाली आहे.

बळेगांव उच्च पातळी बंधारा

ता. उमरी जि. नांदेड

भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांच्या सन २०१४-१५ या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.५ अन्वये उपस्थित मुद्यांचा अनुपालन अहवाल

शेरा क्र.५) लेखापरिक्षणामध्ये उपलब्ध माहितीनुसार प्रकल्प डिसेंबर २०१५ अखेर पूर्ण झालेला नव्हता प्रकल्पाची अद्यावत सद्य:स्थिती लोकलेखा समितीस सादर करण्यात यावी.

खुलासा:-

बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्याचे प्रत्यक्ष बांधकाम दि. १६/११/२०१० रोजी सुरु झाले. बंधाऱ्याचे सर्व स्थापत्य व यांत्रिकी कामे पुर्ण झाली असून ऑक्टो. २०१५ पासून बंधाऱ्यात प्रत्यक्ष पाणीसाठा झाला. सन २०१५-१६ मध्ये पर्जन्यमान कमी असल्यामुळे बंधारा पुर्णक्षमतेने भरला नाही. प्रत्यक्षात २.९२ द.ल.घ.मी. पाणी आले. तद्नंतर २०१६-१७ यावर्षी प्रकल्पात २८.२६ द.ल.घ.मी. पाणीसाठा झाला व १६०४ हेक्टर लाभक्षेत्रावर प्रत्यक्ष सिंचन झाले.

चालु वर्षी सन २०१७-१८ मध्ये ३२.२५ द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला. बंधाऱ्यावरील किरकोळ कामे उदा. मेन्टनंन्सप्लॅटफॉर्म, जनित्रकक्षचे, स्वच्छतागृहाचे बांधकाम इ. किरकोळ कामे चालु असून एप्रिल २०१८ पर्यंत पुर्ण करणे नियोजीत आहे. याबंधाऱ्याच्या बुडीत क्षेत्रातील १७१.८६ हेक्टर जमिनीचे संपादन करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत ४१.३६ हेक्टर जमिनीचे भुसंपादन झाले असून उर्वरीत भुसंपादन करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच बुडीत क्षेत्रातील ११ पुलांचे बांधकाम प्रस्तावित आहेत. सद्यस्थितीत अंशत: पाणीसाठा करण्यात येत असून त्याद्वारे प्रत्यक्ष सिंचनास लाभक्षेत्रास मिळत आहे. तसेच जिल्हाधिकारी, नांदेड यांनी केलेल्या पिण्याच्या पाण्याच्या आरक्षणानुसार ग्रामीण भागास पिण्याच्या पाण्याचा लाभ मिळत आहे.

कार्यकारी अभियंता विष्णुपुरी प्रकल्प विभाग क्र.२ नांदेड	अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड	मुख्य अभियंता(जसं), जलसंपदा विभाग, औरंगाबाद	कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद

बळेगांव उच्च पातळी बंधारा ता. उमरी जि. नांदेड

- **प्रस्तावना** -

गोदावरी नदीवर मौजे बळेगांव ता. उमरी, जि. नांदेड येथे बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्याचे काम प्रगतीपथावर आहे. बळेगांव उच्च पातळी बंधा-यासह बाभळी बंधा-याच्या तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकास महामंडळ निर्णय क्र. गोमपाविम/तां-3/बाभळी/तृसुप्रमा.8/ दिनांक 25/8/2009 अन्वये बळेगांव बंधा-याच्या रु. 214.66 कोटी किंमतीस मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

- **प्रशासकिय मान्यता**

अ.क्र	प्रकल्पाचे नाव	मान्यता	अंदाजपत्रकीय किंमत(रु.कोटी)	दरसूची	मान्यतेचा दिनांक
1	बाभळी उच्च पातळी बंधारा (बळेगाव बंधा-यासह)	तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता	बाभळी- 259.26 बळेगांव- 214.67 **एकुण** 473.93	2008-09	25.08.2009

बळेगांव उच्च पातळी बंधा-याचा समावेश शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्पात करुन शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्पाच्या सुधारित जल नियोजनाच्या प्रस्तावास शासन पत्र क्र. संकिर्ण-2009/(1228)/(452/2009)/मोप्र-2, दिनांक16-10-2010 अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार 7.00 मी. जलस्तंभ उंचीचा 42.50 द.ल.घ.मी. एवढा पाणीसाठा करणे अंतर्भूत असून त्यानुसार बंधा-याची सुधारित पूर्ण जलाशय पातळी 342.00 मी. एवढी आहे.

प्रकल्पाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून बाभळी प्रकल्पाच्या सुधारीत अंदाजपत्रकाची किंमत रु. 73414.85 लक्ष असून बाभळी बंधाऱ्याची किंमत रु. 40427.72 लक्ष व बळेगांव बंधाऱ्याची किंमत रु. 32987.13 लक्ष एवढी आहे.

- **तांत्रिक मान्यता**

मुख्य अभियंता (ज.सं) जलसंपदा विभाग औरंगाबाद यांचे पत्र क्र.तांशा-5/11868 दिनांक 31.12.2008 अन्वये या बंधा-यास (स्थापत्य व यांत्रिकी कामे) रु. 143.72 कोटी किंमतीस तांत्रिक मान्यता असून प्रकल्पाच्या कामास मुख्य अभियंता ज.सं. जलसंपदा विभाग औरंगाबाद यांचे पत्र क्र. तांशा-5/धा-60/7958 दि. 25/10/2013 अन्वये सुधारित तांत्रिक मान्यता रू. 18764.32 लक्ष एवढ्या किंमतीस प्राप्त आहे.

- **अद्यावत किंमत**

प्रकल्पाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून बाभळी प्रकल्पाच्या चतुर्थ सुप्रमाअंतर्गत बंधाऱ्याची अद्ययावत किंमत रु. 73414.85 लक्ष एवढी आहे.

	बाभळी बंधारा	बळेगांव बंधारा	एकुण रु
बंधारा कामे	रु. 20780.90 लक्ष	रु. 24249.74 लक्ष	रु. 45030.64 लक्ष
भुसंपादन	रु. 18226.01 लक्ष	रु. 7404.56 लक्ष	रु. 25630.57 लक्ष
पुले	रु. 493.50 लक्ष	रु. 658.18 लक्ष	रु. 1151.68 लक्ष
आस्थापना व इतर	रु. 927.31 लक्ष	रु. 674.65 लक्ष	रु. 1601.96 लक्ष
एकुण	**रु. 40427.72 लक्ष**	**रु. 32987.13 लक्ष**	**रु.73414.85 लक्ष**

- **निविदा क्रमांक**

सदर योजनेचे कार्यारंभ आदेश मे. शारदा कन्स्ट्रक्शन, नांदेड यांना महामंडळ कार्यालयाचे पत्र क्र. गोमपाविमं /तांशा-3 /नांपामं /विप्रवि-2/ एन.एस. /6901/DA दि. 25/08/2009 नुसार ब-1 **निविदा क्र.** 2 सन 2009-10 विभागीय कार्यालयाचे पत्र क्र. विप्रविक्र-2/लेखा-3/3305 दि. 25.08.2009 रोजी देण्यात आले. स्विकृत निविदा किंमत रु. 158.78 कोटी एवढी आहे.

महामंडळ कार्यालयाचे पत्र क्र. गोमपाविमं / तांशा-3 / नांपामं / बळेगांव उपाबं / ब- 1 / निकाआ / 6928 / वप्र दि. 26/082009 अन्वये कामास सांकेतांक क्रमांक देण्यात आला. सदर सांकेतांकात नमूद केल्यानुसार बाभळी बंधाऱ्याच्या संदर्भात आंध्रप्रदेश शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या दाव्याच्या सुनावणीमध्ये गोदावरी नदीवरील इतर बंधाऱ्यांच्या कामावर आक्षेप घेतला आहे. तरी महामंडळाने परवानगी देईतोपर्यंत कार्यक्षेत्रावर प्रत्यक्ष कामास सुरु करु नये अशी अट नमूद केली होती. त्या अनुषंगाने विभागीय कार्यालयाचे पत्र विप्रविक्र-2 / लेखा / 3345 दि. 31/08/2009 अन्वये कंत्राटदारास काम सुरु करु नये याबाबत कळविण्यात आले.

कोलंबी उपसा सिंचन योजनेचा उद्भव बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्यातून केल्यामुळे विष्णुपूरी प्रकल्पाच्या सुधारीत जलनियोजनाअंतर्गत बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्याच्या जलनियोजनास महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. संकीर्ण -2009/1228/(452/2009)/मोप्र-2 दि. 16/10/2010 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली. त्यामुळे मा. कार्यकारी संचालक, गोमपाविम औरंगाबाद यांनी पत्र क्र.जा.क्र. गोमपाविम/तांशा-3/9063 दि. 25/10/2010 नुसार बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्याचे काम सुरु करण्यास मान्यता कळविली. त्याअनुषंगाने विभागीय कार्यालयाचे पत्र क्र. जा.क्र. विप्रवि-2/लेखा/बळेगांव-3339

दि. 15/11/2010 नुसार बंधाऱ्याचे काम सुरु करण्यास कंत्राटदारास कळविण्यात आले. तसेच सुधारीत पूर्ण संचय पातळीनुसार मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक कडून सुधारीत संकल्पन व रेखाचित्रे प्राप्त करुन दिनांक 16.11.2010 रोजी कामास सुरुवात करण्यात आलेली आहे.

- **कामाची सद्यस्थिती**

कामाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

4500. **स्थापत्य कामे –**

बळेगांव बंधाऱ्याची सर्व स्थापत्य कामे पूर्ण झाली असून Maintenance Platform, जनित्र कक्ष चे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे.

2) **यांत्रिकी कामे –**

बंधाऱ्याची यांत्रिकी कामे पूर्ण झाली असून देखभाल व दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.

बंधाऱ्याचे काम भौतिकदृष्ट्या पूर्ण झाले असून बंधाऱ्यात ऑक्टो. 2015 पासून पाणीसाठा करण्यात येत आहे.

- **आर्थिक तरतुद व खर्च**

बंधारा **(रु. लक्ष)**

अ. क्र.	तपशील	एकुण रु.
1	मंजुर प्रमा. किंमत (तृतीय)	47393.36
2	मार्च 2017 पर्यंत खर्च	43590.26
3	सन 2017-18 आर्थिक वर्षासाठी तरतूद (बाभळी बंधाऱ्यासह)	4500.00
4	सन 2017-18 मधील जानेवारी अखेर झालेला खर्च	1316.35
5	एकुण अद्यावत खर्च	44906.61

- **सिंचन क्षमता निर्मिती**

1) बंधा-याची प्रकल्पीय सिंचन क्षमता 1600 हे. असुन प्रकल्पामुळे चार तालुक्यातील 25 गावांना लाभ होणार आहे.

2) कोलंबी उपसा सिंचन योजनेकरिता 15.32 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्मिती होणार असून याद्वारे 4000 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

3) बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्याचे काम भौतिकदृष्टया पुर्ण करुन बंधाऱ्यात ऑक्टो. 2015 पासून पाणीसाठा करण्यात येत आहे.

वर्ष	पाणीसाठा (द.ल.घ.मी.	सिंचनक्षेत्र (हेक्टर)
2015-16	2.92	--
2016-17	28.26	1604
2017-18	32.25	सिंचन क्षेत्राची मोजणी प्रगतीपथावर

- **भूसंपादन**

अ) बंधा-याच्या भराव व पोच रस्त्या करिता 6.89 हेक्टर जमीन खाजगी वाटाघाटीने संपादित करण्यात आली आहे.

ब) बंधाऱ्याच्या बुडीत क्षेत्रात येणाऱ्या 15 गावांच्या जमीनीचे 171.86 हेक्टर करिता भुसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे सादर करण्यात आले आहेत. 8 गावांच्या संयुक्त मोजणाचे काम पूर्ण झाले असून 2 गावांच्या (मौजे. बरबडा व आंतरगांव) बुडीत क्षेत्रातील जमिनी खाजगी वाटाघाटीद्वारे संपादित करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. सद्यस्थितीत मौजे बरबडा येथील 39.42 हेक्टर (रु. 1640.97 लक्ष) क्षेत्राचे संपादन पुर्ण झाले आहे व मौजे आंतरगांव येथील 1.94 हेक्टर (रु. 64.17 लक्ष) क्षेत्राचे भुसंपादन पूर्ण झाले आहे. उर्वरीत गांवांच्या संयुक्त मोजणीचे काम प्रगतीपथावर आहे.

क) बुडीत क्षेत्रातील पुले : बंधाऱ्याच्या बुडीत क्षेत्रात सद्यस्थितीत 2 पुले येत असून त्या ठिकाणी नवीन पुले बांधणे प्रस्तावित आहे. तसेच, 9 ठिकाणी नळकांडी पुले प्रस्तावित असून सविस्तर अंदाजपत्रक सुप्रमा प्रस्तावात समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

- **बंधा-याचे फायदे**

1) या बंधा-यामुळे 42.50 दलघमी पाणीसाठा निर्मिती होणार आहे.
2) बंधा-याच्या दोन्ही तिरावरील 1600 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.
3) कोलंबी उपसा सिंचन योजनेद्वरे 4000 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.
4) नदी तिरावरील एकूण 25 गावाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सुटणार आहे.
5) पाणी संचयामुळे परिसरातील विहिर /विंधन विहिर या स्त्रोतांच्या पाणीपातळीत वाढ होईल.
6) सिंचन क्षेत्रात वाढ झाल्यामुळे शेती पुरक उद्योगात वाढ होऊन रोजगार निर्मीती होईल.
7) पशु-पक्षी व जलचरांना पाणथळाची सोय होईल.

- **कामाचे नियोजन**

बंधाऱ्याची स्थापत्य व यांत्रिकी कामे पुर्ण झाली असून बंधाऱ्यात ऑक्टों. 2015 पासून अंशत: जलसाठा निर्माण करण्यात आलेला आहे. बंधाऱ्याच्या बुडीत क्षेत्रातील लागणाऱ्या जमीनीचे भूसंपादन प्रगतीपथावर असून भूसंपादन झाल्यानंतर पूर्ण क्षमतेने जलसाठा निर्माण होणार आहे.

बळेगांव उच्च पातळी बंधारा ता. उमरी जि. नांदेड

ठळक वैशिष्टये

1	स्थळ	:	बळेगाव ता. उमरी जि. नांदेड
2	पाया स्तर	:	कठीण खडक
3	काठ स्तर	:	काळी माती
4	महत्तम पूर 100 वर्ष	:	17324 क्यूमेक्स
5	जोता पातळी	:	335.00 मी.
6	महत्तम पूर पातळी	:	350.60 मी.
7	पूर्ण संचय पातळी	:	342.00 मी.
8	फुगवटा पूर पातळी	:	351.10 मी.
9	प्रस्तंभ पातळी	:	352.60 मी.
10	माथा पातळी	:	354.60 मी.
11	बंधाऱ्याची लांबी	:	277.50 मी.
12	एकूण प्रस्तंभ	:	17
13	एकूण दरवाजे व आकार	:	16 (आकार 15 x 7 मी.)
14	एकूण पाणीसाठा	:	42.5 द.ल.घ.मी.
15	एकूण सिंचन क्षेत्र	:	1600 हे.
16	सिंचनाचा लाभ मिळणारे तालुके	:	नायगांव, उमरी, लोहा, मुदखेड
17	प्रकल्पाची अद्यावत किंमत	:	रु. 32987.13 लक्ष

ठळक वैशिष्ठये

1	स्थळ	:	बाभळी ता. धर्माबाद जि. नांदेड
2	महत्तम पुर	:	27300 घ.मी./सेकंद
3	नदीच्या तळाची पातळी	:	326.060 मी.
4	जोता पातळी	:	327.000 मी.
5	बंधा-याची पूर्ण संचय पातळी (F.R.L.)	:	338.000 मी.
6	महत्तम पुर पातळी (H.F.L.)	:	344.500 मी.
7	फुगवठा पुर पातळी (A.H.F.L.)	:	345.000 मी.
8	प्रस्तंभ पातळी	:	346.500 मी.
9	वॉक वे ब्रीज पातळी	:	347.170 मी.
10	डेक ब्रिजची माथा पातळी	:	348.000 मी.
11	हॉईस्ट ब्रीज पातळी	:	361.430 मी.
12	बंधा-याची लांबी	:	255.00 मी.
13	एकुण प्रस्तंभ	:	15
14	एकुण दरवाजे	:	14 (आकार 15 X 11 मी.)
15	एकुण साठा	:	77.70 द.ल.घ.मी.
16	एकुण सिंचन क्षेत्र	:	6395 हेक्टर
17	एकुण सिंचन क्षेत्र		
	1) ता. धर्माबाद	:	12 गावे - 2459 हेक्टर
	2) ता. बिलोली	:	4 गावे - 665 हेक्टर
	3) ता.नायगाव	:	9 गावे - 1788 हेक्टर
	4) ता. उमरी	:	10 गावे- 1483 हेक्टर
18	प्रकल्पाची एकूण किमंत	:	259.27 कोटी

बळेगांव उच्च पातळी बंधारा ता. उमरी जि. नांदेड

घटनाक्रम

1.	बळेगांव उ.पा.बं. कार्यारंभ आदेश VPD-2/AB-3/3305	दि. 25.08.2009
2.	कंत्राटदाराकडून अग्रीम रक्कमेची मागणी	दि. 26.08.2009
3.	बळेगांव उ.पा.बं. बांधकाम महामंडळाने परवानगी देई पर्यंत कार्यक्षेत्रावर प्रत्यक्ष कामास सुरुवात करू नये बाबत. गोमपाविमं यांचे पत्र क्र. गोमपाविमं/तां-3/नांपामं/बळेगांव उपाबं/ब-1/ विकाआ / 6928 व प्र. दि. 26.08.2009 विभागाचे पत्र क्र. विप्रविक्र-2/लेखा/3345	 दि. 26.08.2009 दि. 31.08.2009
4.	महामंडळाकडून अग्रीम मंजूर कार्यकारी संचालक यांचे पत्र गोमपाविमं/तां-3/नांपामं/बळेगांव/बी-1/ अग्रीम/7139	दि. 31.08.2009
5.	कंत्राटदारास अग्रीम रक्कम प्रदान पहिला हफ्ता 400 लक्ष दुसरा हफ्ता 250 लक्ष दुसरा हफ्ता 218 लक्ष	दि. 14.12.2009 दि. 18.01.2010 दि. 10.03.2010
6.	कंत्राटदाराकडून अग्रीम रक्कम वसूली हफ्ता 1887613 x 4 = 7550452 1179758 x 3 = 3539274 1027749 x 1 = 1028749 एकूण 12118475.00	दि. 01.01.2010 ते 09.04.2010 दि. 01.02.2010 ते 09.04.2010 दि. 09.04.2010
7.	विष्णुपूरी प्रकल्पाच्या सुधारित जल नियोजनास मंजूरी महाराष्ट्र शासन पत्र क्र. संकीर्ण-2009/1228/(452/2009)/ मोप्र-2,	दि. 16.10.2010
8.	बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्याच्या बांधकामास सुरुवात करणे मा. कार्यकारी संचालक यांचे पत्र क्र. गोमपाविमं/तां-3/9063, दि. 25.10.2010 विभागीय कार्यालयाचे पत्र क्र. विप्रवि-2/लेखा/बळेगांव/3339,	दि. 15.11.2010
9.	बळेगांव उच्च पातळी बंधाऱ्याच्या बांधकामास प्रत्यक्षात सुरुवात	दि. 16.11.2010
10.	कंत्राटदाराकडून बंद काळातील (31.08.2009 ते 15.11.2010) Ideal Charges च्या तूलनेत व्याज माफीची मागणी	दि. 28.11.2011
11.	अग्रीम रक्कमेचा व्याजासह चालू देयक क्र. 7 व 8 अंतर्गत वसूली रु. 81413405	दि. 30.12.2011
12.	कार्यकारी संचालक, गो.म.पा.वि.मं. यांचेकडून Idial Charges च्या तुलनेत व्याज रक्कम कमी असल्यामुळे बंद कालावधीतील व्याज रु. 47.75 लक्ष माफ मा. कार्यकारी संचालक यांचे पत्र क्र. गोमपाविमं/तां-3/नांपामं/बळेगांव उपाबं/ब-1/ (2/09-10)/ 8852, दि. 23.08.2012	दि. 23.08.2012

INDEX MAP OF BALEGAON BARRAGE



Balegaon High Level Barrage
Tq. Umri, Dist. Nanded





परिशिष्ट-ब

मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी २०१८ रोजी विधानभवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(८) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(९) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

निमंत्रितः-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :

श्री. महेश पाठक, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरु होऊन दुपारी २-५० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

विशेष निमंत्रित :

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री.नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :–

जलसंपदा विभाग :–

(१) श्री. आर. वी. पानसे, सचिव, जलसंपदा विभाग
(२) श्री. च. आ. बिराजदार, सचिव (लाभक्षेत्र), जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ संदर्भात सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४.३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(८) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(९) श्री. अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

निमंत्रित :-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री.नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले व को)विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :

श्री.महेश पाठक, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरु होऊन दु. २.५० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

विशेष निमंत्रित

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री.नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले व को)विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

जलसंपदा विभाग :–

(१) श्री. आर. वी. पानसे, सचिव, जलसंपदा विभाग
(२) श्री. च. आ. बिराजदार, सचिव (लाभक्षेत्र), जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ संदर्भात सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २४ एप्रिल २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी विधानभवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४-२० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(६) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(८) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(९) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१०) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(११) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(१२) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि. अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव
(४) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :

(१) श्री. गुप्ता आर. एस. टी. उप महालेखाकार, मुंबई कार्यालय.
(२) श्री. के. जी. पार्डीकर, वरिष्ठ उप महालेखाकार, नागपूर कार्यालय.

वित्त विभाग :-

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

जलसंपदा विभाग :-

(१) श्री. आय. एस. चहल, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग
(२) श्री. रा. वा. पानसे, सचिव, जलसंपदा विभाग
(३) श्री. च. आ. बिराजदार, सचिव (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ संदर्भात प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ३० मे २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ३० मे २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरु होऊन दुपारी २-५५ वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(९) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(११) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री.अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो.न.सानप, अवर सचिव
(४) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय.

वित्त विभाग :-

श्री. नितिन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले व को) विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

जलसंपदा विभाग :-

(१) श्री. आय. एस. चहल, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग
(२) श्री. रा. वा. पानसे, सचिव, जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ संदर्भात प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक ३१ जुलै, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ३१ जुलै २०१८ रोजी विधानभवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री.अरुण कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री.अनुदिप दिघे, उप सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :

श्री.महेश पाठक, प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक ०७ ऑगस्ट, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ०७ ऑगस्ट २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरू होऊन दुपारी २-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(६) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(८) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अरुण कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :-

१) श्री. के. जे. टोमी, उप महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :-

श्री. नितिन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :–

श्री. महेश पाठक, प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

गुरुवार, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(७) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

निमंत्रित सदस्य

(१०) श्री.जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अरुण कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :-

(१) श्री. एस. एस. सरफरे, वरिष्ठ उपमहालेखाकार
(२) श्री. करन वोहरा, उप महालेखाकार
(३) श्री. के. जे. टोमी, उप महालेखाकार

वित्त विभाग :-

श्री. नितिन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :–

श्री. महेश पाठक, प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

सोमवार, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक सोमवार, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४-१५ वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(४) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अ.चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव
(४) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालासंदर्भात परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ जलसंपदा विभागाचा समितीने तयार केलेला प्रारूप अहवाल विचारात घेतला.

बुधवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरु होऊन दुपारी १-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख :

(१) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(४) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(५) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.
(६) श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव
(३) श्री. रवींद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालासंदर्भात परिच्छेद क्र. ३.२ अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला तथापि, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत विभागीय सचिवांकडून प्राप्त झालेली सांख्यिकीय माहिती विचारात घेऊन त्याप्रमाणे प्रारूप अहवालात बदल करण्याचे ठरले.

गुरुवार, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरु होऊन दुपारी १-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख :

(१) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :-

श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय.

वित्त विभाग :-

श्री. नितिन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :

श्री. एस. के. उबाळे, उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रतिनिधींकडून प्राप्त झालेली सांख्यिकीय माहिती विचारात घेऊन त्यानुसार प्रारूप अहवालात बदल करण्यात आला.

परिशिष्ट-ब

मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी २०१८ रोजी विधानभवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(८) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(९) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

निमंत्रितः-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :

श्री. महेश पाठक, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरु होऊन दुपारी २-५० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

विशेष निमंत्रित :

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री.नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :–

जलसंपदा विभाग :–

(१) श्री. आर. वी. पानसे, सचिव, जलसंपदा विभाग
(२) श्री. च. आ. बिराजदार, सचिव (लाभक्षेत्र), जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ संदर्भात सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४.३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(८) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(९) श्री. अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

निमंत्रित :-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री.नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले व को)विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :

श्री.महेश पाठक, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरु होऊन दु. २.५० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

विशेष निमंत्रित

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री.नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले व को)विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

जलसंपदा विभाग :–

(१) श्री. आर. वी. पानसे, सचिव, जलसंपदा विभाग
(२) श्री. च. आ. बिराजदार, सचिव (लाभक्षेत्र), जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ संदर्भात सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २४ एप्रिल २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी विधानभवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४-२० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(६) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(८) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(९) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१०) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(११) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(१२) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि. अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव
(४) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :

(१) श्री. गुप्ता आर. एस. टी. उप महालेखाकार, मुंबई कार्यालय.
(२) श्री. के. जी. पार्डीकर, वरिष्ठ उप महालेखाकार, नागपूर कार्यालय.

वित्त विभाग :-

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

जलसंपदा विभाग :-

(१) श्री. आय. एस. चहल, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग
(२) श्री. रा. वा. पानसे, सचिव, जलसंपदा विभाग
(३) श्री. च. आ. बिराजदार, सचिव (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ संदर्भात प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ३० मे २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ३० मे २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरु होऊन दुपारी २-५५ वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(९) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(११) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री.अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो.न.सानप, अवर सचिव
(४) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय.

वित्त विभाग :-

श्री. नितिन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले व को) विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

जलसंपदा विभाग :-

(१) श्री. आय. एस. चहल, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग
(२) श्री. रा. वा. पानसे, सचिव, जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ संदर्भात प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक ३१ जुलै, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ३१ जुलै २०१८ रोजी विधानभवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री.अरुण कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री.अनुदिप दिघे, उप सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :

श्री.महेश पाठक, प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक ०७ ऑगस्ट, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ०७ ऑगस्ट २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरू होऊन दुपारी २-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(६) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(८) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अरुण कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :-

१) श्री. के. जे. टोमी, उप महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :-

श्री. नितिन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :–

श्री. महेश पाठक, प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

गुरुवार, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(७) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

निमंत्रित सदस्य

(१०) श्री.जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अरुण कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :-

(१) श्री. एस. एस. सरफरे, वरिष्ठ उपमहालेखाकार
(२) श्री. करन वोहरा, उप महालेखाकार
(३) श्री. के. जे. टोमी, उप महालेखाकार

वित्त विभाग :-

श्री. नितिन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :–

श्री. महेश पाठक, प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

सोमवार, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक सोमवार, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४-१५ वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(४) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अ.चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव
(४) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालासंदर्भात परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ जलसंपदा विभागाचा समितीने तयार केलेला प्रारूप अहवाल विचारात घेतला.

बुधवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरु होऊन दुपारी १-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख :

(१) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(४) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(५) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.
(६) श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव
(३) श्री. रवींद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालासंदर्भात परिच्छेद क्र. ३.२ अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला तथापि, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत विभागीय सचिवांकडून प्राप्त झालेली सांख्यिकीय माहिती विचारात घेऊन त्याप्रमाणे प्रारूप अहवालात बदल करण्याचे ठरले.

गुरुवार, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरु होऊन दुपारी १-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख :

(१) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :-

श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय.

वित्त विभाग :-

श्री. नितिन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :

श्री. एस. के. उबाळे, उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रतिनिधींकडून प्राप्त झालेली सांख्यिकीय माहिती विचारात घेऊन त्यानुसार प्रारूप अहवालात बदल करण्यात आला.

परिशिष्ट-ब

मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी २०१८ रोजी विधानभवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(८) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(९) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

निमंत्रितः-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :

श्री. महेश पाठक, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरु होऊन दुपारी २-५० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

विशेष निमंत्रित :

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री.नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :–

जलसंपदा विभाग :–

(१) श्री. आर. वी. पानसे, सचिव, जलसंपदा विभाग
(२) श्री. च. आ. बिराजदार, सचिव (लाभक्षेत्र), जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ संदर्भात सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४.३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(८) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(९) श्री. अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

निमंत्रित :-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री.नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले व को)विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :

श्री.महेश पाठक, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरु होऊन दु. २.५० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

विशेष निमंत्रित

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री.नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले व को)विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

जलसंपदा विभाग :–

(१) श्री. आर. वी. पानसे, सचिव, जलसंपदा विभाग
(२) श्री. च. आ. बिराजदार, सचिव (लाभक्षेत्र), जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ संदर्भात सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २४ एप्रिल २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी विधानभवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४-२० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(६) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(८) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(९) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१०) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(११) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(१२) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि. अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव
(४) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :

(१) श्री. गुप्ता आर. एस. टी. उप महालेखाकार, मुंबई कार्यालय.
(२) श्री. के. जी. पार्डीकर, वरिष्ठ उप महालेखाकार, नागपूर कार्यालय.

वित्त विभाग :-

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

जलसंपदा विभाग :-

(१) श्री. आय. एस. चहल, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग
(२) श्री. रा. वा. पानसे, सचिव, जलसंपदा विभाग
(३) श्री. च. आ. बिराजदार, सचिव (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ संदर्भात प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ३० मे २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ३० मे २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरु होऊन दुपारी २-५५ वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(९) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(११) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री.अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो.न.सानप, अवर सचिव
(४) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय.

वित्त विभाग :-

श्री. नितिन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले व को) विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

जलसंपदा विभाग :-

(१) श्री. आय. एस. चहल, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग
(२) श्री. रा. वा. पानसे, सचिव, जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ संदर्भात प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक ३१ जुलै, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ३१ जुलै २०१८ रोजी विधानभवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री.अरुण कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री.अनुदिप दिघे, उप सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :

श्री.महेश पाठक, प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक ०७ ऑगस्ट, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ०७ ऑगस्ट २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरू होऊन दुपारी २-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(६) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(८) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अरुण कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :-

१) श्री. के. जे. टोमी, उप महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :-

श्री. नितिन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :–

श्री. महेश पाठक, प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

गुरुवार, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(७) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

निमंत्रित सदस्य

(१०) श्री.जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अरुण कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :-

(१) श्री. एस. एस. सरफरे, वरिष्ठ उपमहालेखाकार
(२) श्री. करन वोहरा, उप महालेखाकार
(३) श्री. के. जे. टोमी, उप महालेखाकार

वित्त विभाग :-

श्री. नितिन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :–

श्री. महेश पाठक, प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

सोमवार, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक सोमवार, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४-१५ वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(४) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अ.चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव
(४) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालासंदर्भात परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ जलसंपदा विभागाचा समितीने तयार केलेला प्रारूप अहवाल विचारात घेतला.

बुधवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरु होऊन दुपारी १-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख :

(१) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(४) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(५) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.
(६) श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव
(३) श्री. रवींद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालासंदर्भात परिच्छेद क्र. ३.२ अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला तथापि, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत विभागीय सचिवांकडून प्राप्त झालेली सांख्यिकीय माहिती विचारात घेऊन त्याप्रमाणे प्रारूप अहवालात बदल करण्याचे ठरले.

गुरुवार, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरु होऊन दुपारी १-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख :

(१) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :-

श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय.

वित्त विभाग :-

श्री. नितिन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :

श्री. एस. के. उबाळे, उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रतिनिधींकडून प्राप्त झालेली सांख्यिकीय माहिती विचारात घेऊन त्यानुसार प्रारूप अहवालात बदल करण्यात आला.

परिशिष्ट-ब

मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी २०१८ रोजी विधानभवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(८) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(९) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

निमंत्रितः-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :

श्री. महेश पाठक, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरु होऊन दुपारी २-५० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

विशेष निमंत्रित :

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री.नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :–

जलसंपदा विभाग :–

(१) श्री. आर. वी. पानसे, सचिव, जलसंपदा विभाग
(२) श्री. च. आ. बिराजदार, सचिव (लाभक्षेत्र), जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ संदर्भात सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४.३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(८) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(९) श्री. अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

निमंत्रित :-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री.नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले व को)विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :

श्री.महेश पाठक, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरु होऊन दु. २.५० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

विशेष निमंत्रित

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री.नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले व को)विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

जलसंपदा विभाग :–

(१) श्री. आर. वी. पानसे, सचिव, जलसंपदा विभाग
(२) श्री. च. आ. बिराजदार, सचिव (लाभक्षेत्र), जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ संदर्भात सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २४ एप्रिल २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी विधानभवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४-२० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(६) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(८) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(९) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१०) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(११) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(१२) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि. अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव
(४) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :

(१) श्री. गुप्ता आर. एस. टी. उप महालेखाकार, मुंबई कार्यालय.
(२) श्री. के. जी. पार्डीकर, वरिष्ठ उप महालेखाकार, नागपूर कार्यालय.

वित्त विभाग :-

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

जलसंपदा विभाग :-

(१) श्री. आय. एस. चहल, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग
(२) श्री. रा. वा. पानसे, सचिव, जलसंपदा विभाग
(३) श्री. च. आ. बिराजदार, सचिव (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ संदर्भात प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ३० मे २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ३० मे २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरु होऊन दुपारी २-५५ वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(९) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(११) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री.अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो.न.सानप, अवर सचिव
(४) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय.

वित्त विभाग :-

श्री. नितिन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले व को) विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

जलसंपदा विभाग :-

(१) श्री. आय. एस. चहल, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग
(२) श्री. रा. वा. पानसे, सचिव, जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ संदर्भात प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक ३१ जुलै, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ३१ जुलै २०१८ रोजी विधानभवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री.अरुण कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री.अनुदिप दिघे, उप सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :

श्री.महेश पाठक, प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक ०७ ऑगस्ट, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ०७ ऑगस्ट २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरू होऊन दुपारी २-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(६) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(८) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अरुण कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :-

१) श्री. के. जे. टोमी, उप महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :-

श्री. नितिन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :–

श्री. महेश पाठक, प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

गुरुवार, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(७) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

निमंत्रित सदस्य

(१०) श्री.जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अरुण कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :-

(१) श्री. एस. एस. सरफरे, वरिष्ठ उपमहालेखाकार
(२) श्री. करन वोहरा, उप महालेखाकार
(३) श्री. के. जे. टोमी, उप महालेखाकार

वित्त विभाग :-

श्री. नितिन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :–

श्री. महेश पाठक, प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

सोमवार, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक सोमवार, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४-१५ वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(४) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अ.चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव
(४) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालासंदर्भात परिच्छेद क्र. ३.३, ३.४ व ३.५ जलसंपदा विभागाचा समितीने तयार केलेला प्रारूप अहवाल विचारात घेतला.

बुधवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरु होऊन दुपारी १-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख :

(१) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(४) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(५) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.
(६) श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव
(३) श्री. रवींद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालासंदर्भात परिच्छेद क्र. ३.२ अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला तथापि, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत विभागीय सचिवांकडून प्राप्त झालेली सांख्यिकीय माहिती विचारात घेऊन त्याप्रमाणे प्रारूप अहवालात बदल करण्याचे ठरले.

गुरुवार, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरु होऊन दुपारी १-३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख :

(१) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :-

श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय.

वित्त विभाग :-

श्री. नितिन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले.व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :

श्री. एस. के. उबाळे, उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रतिनिधींकडून प्राप्त झालेली सांख्यिकीय माहिती विचारात घेऊन त्यानुसार प्रारूप अहवालात बदल करण्यात आला.